# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# विसाव्या शतकातील जग

**(Twentieth Century World)**
**(1950 to 2000)**

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**एम. ए. भाग-२**

**इतिहास**

Compulsory : Paper 402

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१९
एम. ए. भाग - २ करिता (विसाव्या शतकातील जग - १९५० ते २०००)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-39-7

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूरशिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ **अभ्यासमंडळ : इतिहास** ■

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०१८-१९ पासून अभ्यासक्रम बदललेला आहे, सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-२ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''विसाव्या शतकातील जग-१९५० ते २०००'' या विषयाचे स्वयंःअध्ययनासाठी हे पुस्तक सन २०१९-२० या वर्षात लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंःअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

विसाव्या शतकातील जग-१९५० ते २००० या स्वयंअध्ययन साहित्यामध्ये शीतयुद्ध आणि त्याचा प्रभाव, सामाजिक न्यायाच्या चळवळी, प्रगतीचा काळ, शितयुद्धाचा शेवट इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**डॉ. अभय पाटील**
एस. जी. एम. कॉलेज,
कराड

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**(विसाव्या शतकातील जग–१९५० ते २०००)**
**एम. ए. भाग–२ : इतिहास पेपर ४०२ (आवश्यक)**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. अजितकुमार दादासो जाधव**<br>आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे, ता. जि. सातारा | १ |
| **प्रा. डॉ. व्ही. एस. येलमार**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | २ |
| **प्रा. डॉ. काशिलिंग रघुनाथ गावडे**<br>बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड, ता. शिराळा, जि. सांगली | ३ |
| **डॉ. सौ. वैशाली अभिजीत सारंग**<br>डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर | ४ |

■ **संपादक** ■

**डॉ. अभय पाटील**
एस. जी. एम. कॉलेज,
कराड

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | शीतयुद्ध आणि त्याचा प्रभाव | १ |
| २. | सामाजिक न्यायाच्या चळवळी | ४१ |
| ३. | प्रगतीचा काळ | ६९ |
| ४. | शितयुद्धाचा शेवट | १०४ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक-१

# शीत युध्द आणि त्याचा प्रभाव

## (Cold War and it Consequences)

**अ) तात्वीक आणि राजकीय आधारावर शीतयुध्द आणि लष्करी करार : नाटो, वॉर्सा (Ideological and Political basis of Cold War & Military Treaties-NATO, WARSAW)**

**ब) संयुक्त राष्ट्र संघ : यश आणि अपयश (UNO-Achievements and Failure)**

**क) अलिप्त राष्ट्र संघटना (Non-aligned Movement)**

---

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ तात्वीक आणि राजकीय आधारावर शीतयुध्द आणि लष्करी करार : नाटो, वॉर्सा (ideological and Political basis of Cold War & Military Treaties-NATO, WARSAW)

  १.२.२ संयुक्त राष्ट्र संघ : यश आणि अपयश (UNO-Achievements and Failure)

  १.२.३ अलिप्त राष्ट्र संघटना (Non-aligned Movement)

१.३ सारांश

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सरावासाठी स्वाध्याय

१.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१. शीतयुध्दाची पार्श्वभूमी, संकल्पना स्पष्ट करता येईल.

२. शीतयुध्दाचा प्रारंभ, तीव्रता तसेच शीतयुध्दकालीन नाटो, वॉर्सा या कराराचा अभ्यास करता येईल.

३. संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना, उद्दिष्ट्ये, कामकाज, यशापयश याची माहिती देता येईल.

४. अलिप्त राष्ट्र संघटनेचे अर्थ, स्वरूप, वाटचाल स्पष्ट करता येईल.

## १.१ प्रास्ताविक

विसावे शतक अनेक दृष्टीने महत्त्वाचे शतक मानले जाते. या शतकात जगाच्या इतिहासात अनेक घटना-घडामोडी घडून गेल्या. या शतकाच्या पूर्वार्धात झालेले पहिले महायुध्द व राष्ट्रसंघाची निर्मिती तर मध्यावर झालेले दुसरे महायुद्ध व संयुक्त राष्ट्र संघाची निर्मिती या घटनांमुळे अल्पावधीत जगाला प्रचंड प्राण व वित्त हानीला सामोरे जावे लागले. पराभूत राष्ट्रांवर जेत्या राष्ट्रांनी उगवलेला सूड, बड्या राष्ट्रांचा अतिमहत्त्वकांक्षीपणा व स्वार्थी धोरण यामुळे एक प्रकारे जगाला अशांततेच्या खाईतच लोटले गेले. द्वितीय महायुध्दानंतर महासत्ता म्हणून अमेरिका व सोव्हिएत रशियाचा झालेला उदय, या दोन महासत्तांमधील भांडवलशाही व साम्यवाद या विचारधारेमध्ये असलेल्या संघर्षाने जागतिक शांततेला धोका निर्माण केला. आंतरराष्ट्रीय राजकारणात आपले प्रभुत्व निर्माण व्हावे, म्हणून या दोन महासत्तामधील झालेल्या दिर्घकालीन संघर्षाला 'शीतयुध्द' या नावाने ओळखले जाते.

द्वितीय महायुद्धानंतर पुन्हा अशा सहारक युध्दाची परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून संयुक्त राष्ट्र संघाची निर्मिती करण्यात आली. याचवेळी नवस्वतंत्र झालेल्या आफ्रिका-आशिया खंडातील राष्ट्रांनी एकत्र येवून अमेरिका अथवा सोव्हिएत रशिया यांच्या गटात सामील न होता अलिप्त राष्ट्र संघटनेची स्थापना केली. या घटनांनी जागतिक इतिहासाला वेगळेच वळण प्राप्त करून दिले आहे. म्हणून या घटकातून शीतयुध्द व लष्करी करार, संयुक्त राष्ट्र संघ, अलिप्त राष्ट्र चळवळ याचा तपशीलवार अभ्यास करणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ तात्वीक आणि राजकीय आधारावर शीतयुध्द आणि लष्करी करार : नाटो, वॉर्सा

#### १.२.१.१ शीत युध्द :-

दुसऱ्या महायुद्धानंतर जगाचे पुन्हा एकदा विभाजन होईल अशी लक्षणे दिसू लागली होती. त्याचे कारण दुसऱ्या महयुध्दात अमेरिका, इंग्लंड, रशिया, फ्रान्स व अन्य दोस्त राष्ट्रांच्या समोर जर्मनी, इटली, जपान इत्यादी अन्य सत्तांचे आव्हान होते. परंतु दुसऱ्या महायुध्दात अन्य राष्ट्रांचा निर्णायक पराभव झाला. दोस्त राष्ट्रांचा विजय होऊनही इंग्लंड, फ्रान्स. या राष्ट्रांना मोठ्या नुकसानीस सामोरे जावे लागले. युरोपच्या भूमीवर हे महायुद्ध लढले असल्याने युरोपची अपरिमित हानी झाली होती. अशा स्थितीत अमेरिका आणि रशियाने आपली शक्ती वाढविण्यास सुरुवात केली. याचे रूपांतर अमेरिकेच्या नेतृत्वाखाली पश्चिम युरोपीय लोकशाही राष्ट्रांचा तर सोव्हिएट रशियाच्या नेतृत्वाखाली पूर्व युरोपातील समाजवादी विचारधारा असणाऱ्या

राष्ट्रांच्या गटात झाले. येथूनच अमेरिका-रशिया परस्परविरोधी संघर्ष, स्पर्धा व शत्रुत्वाला सुरूवात झाली. अमेरिका-रशियामधील हा संघर्ष भिन्न विचारसरणीमुळे वाढीस लागला. अशा प्रकारच्या भिन्न विचारसरणीमुळे सैध्दांतिक मतभेद निर्माण झाले. परस्परांवर मात करून जगावर प्रभुत्व गाजविण्यासाठी जगातील राष्ट्रांना आपआपल्या गटात ओढण्याची स्पर्धा सुरू झाली. प्रत्यक्ष रणांगणांवर युध्द न करता राजकीय, तात्वीक (वैचारिक), सामाजिक, आर्थिक कुटनीतीच्या पातळीवर आपली शक्ती वाढविण्यासाठी जो संघर्ष झाला त्यालाच 'शीतयुध्द' या संज्ञेने ओळखले जाऊ लागले.

## १.२.१.२ शीत युध्दाचे अर्थ व स्वरूप :-

द्वितीय महायुद्धाच्या समाप्तीनंतर जगाची पुनर्रचना करण्याच्या प्रक्रियेला गती आली. परंतु युध्दात अन्य राष्ट्रांचा पराभव करण्यासाठी एकत्र आलेली दोन राष्ट्रे, युध्द संपताच वेगवेगळी झाली. याचे प्रमुख कारण सोव्हिएट रशिया आणि अमेरिका यांच्या परस्परविरोधी विचारधारा व तत्त्वप्रणालीस जाते. रशियात वाढत जाणारी साम्यवादी राजवट ही लोकशाहीला घातक आहे. यासाठी साम्यवादाचा विस्तार रोखण्याची गरज अमेरिकेसह इंग्लंड व इतर राष्ट्रांना वाटू लागली. याचा परिणाम सोव्हिएट रशिया व अमेरिका यांच्यात संघर्ष उद्‌भवून त्यास शीतयुध्दाचे स्वरूप प्राप्त झाले. 'शीत युध्द' या शब्दांचा उल्लेख सर्वप्रथम वॉटर लिपमन या अमेरिकन राजनीतीज्ञाने केला. तर के.पी. एस. मेनन शीतयुध्दाबाबत म्हणतात, ''शीत युध्द हे दोन विरोधी विचारधारा-भांडवलशाही आणि साम्यवाद, दोन व्यवस्था भांडवली लोकशाही आणि सर्वसामान्य हुकूमशाही, दोन गट-नाटो आणि वॉर्सा करार, दोन राज्ये-अमेरिका आणि सोव्हिएट संघ यांच्यामधील युध्द होते. ज्याचा प्रभाव संपूर्ण जगावर पडला.'' अमेरिकेन मुत्सद्दी बर्नाड बरूश (Bernard Baruch) यांनी सन १९४७ नंतरच्या जागतिक तणावाच्या परिस्थितीबाबत 'शीत युध्द' हा शब्द वापरला होता. ऑक्सफर्ड डिक्शनरीमध्ये शीत युध्द म्हणजे 'हिरोचा वापर न करता धमकी, अडवणूक व प्रचाराच्या माध्यमातून कठूता व कलहाची स्थिती उत्पन्न करणे' असा अर्थ दिला आहे.

दुसऱ्या महायुध्दाच्या उत्तरार्धात दोस्त राष्ट्रांची वाटचाल विजयाच्या दिशेने जात असताना अमेरिकेने जपानवर अणुबॉम्बस्फोट घडविला. आणि जपानने शरणागती पत्करल्याने दुसऱ्या महायुद्धाला विराम मिळाला. परंतु दोस्ट राष्ट्रे म्हणून युध्दात एकत्र आलेल्या सोव्हिएट रशिया व इंग्लंड-अमेरिका. या प्रमुख राष्ट्रांमध्ये परस्पर अविश्वासाचे वातावरण निर्माण होत गेले. याचे प्रमुख कारण रशिया आणि अमेरिका पुरस्कृत देशामधील भिन्न विचारसरणी होय. रशियाने साम्यवादी, अमेरिकेने भांडवलशाही जगताचे स्वप्न पाहण्यास सुरुवात केली आणि त्या दिशेने देशाला शक्तीशाली बनविण्याबरोबरच जगातील लहान-मोठ्या राष्ट्रांना आपल्या गटात ओढण्याची स्पर्धा सुरू झाली. यासाठी या दोन्ही देशांनी सैन्य, बंदुका, विमाने, जहाजे, रणगाडे, शस्त्रे याचा उपयोग न करता परस्परांविरुध्द संघर्षाचे, युध्दाचे वातावरण निर्माण केले. यामध्ये जगातील बहुतांश राष्ट्रे सोव्हिएट रशिया व अमेरिका या गटात सामील झाली. या दोन्ही सत्तांनी एकमेकांविरुध्द उघडपणे विषारी प्रचार करण्यास सुरूवात केली. जागतिक राजकारणात एकमेकांचे पाय ओढणे, अपमान करणे, एकमेकांची प्रभाव क्षेत्रे कमी करण्याचे धोरण सोव्हिएट रशिया व अमेरिकेने

स्विकारले. रशियाच्या विखारी प्रचाराने जगात अशांतता निर्माण होत असून साम्यवादामुळे व्यक्तीस्वातंत्र्याचा नाश होत आहे, असे चित्र अमेरिकेने रंगविण्यास सुरुवात केली. याउलट रशियाने आशिया-आफ्रिका खंडातील समस्यांवर साम्यवाद हा एकमेव उपाय आहे, असे पटवून देण्यास प्रारंभ केला. या संघर्षामध्ये अल्पकाळातच ब्रिटन, फ्रान्स, कॅनडा, इटली, बेल्जियम, इटली, ग्रीस, नेदरलँड, पाकिस्तान, तुर्कस्थान इत्यादी देश अमेरिकेच्या गटात तर पोलंड, हंगेरी, रूमानिया, बल्गेरिया, झेकोस्लाव्हाकिया इत्यादी देश रशियाच्या गटात सामील झाले. अमेरिका व रशिया या दोन्ही देशांनी जगात आपले प्रभावक्षेत्र वाढावे म्हणून एकमेकांचे खच्चीकरण, हेरगिरी, लष्करी हस्तक्षेप या धोरणाचा अवलंब केला. परंतु प्रत्यक्ष युध्द केले नाही. म्हणूनच प्रत्यक्ष शस्त्रास्त्रे चालवून युध्द करण्याऐवजी राजनैतिक डावपेच कुटनिती मानसिक तणावाची परिस्थिती निर्माण करणे अशी परिस्थिती निर्माण केली. यामुळे अमेरिका व रशियाच्या या देशांच्या अतिमहत्त्वाकांक्षी भूमिकेमुळे जग काही काळ युध्दाच्या छायेत वावरत असल्याची स्थिती या शीतयुध्दामुळे निर्माण झाली.

## १.२.१.३ शीतयुध्दाची कारणे :-

### (i) महासत्तांचा उदय :-

दुसऱ्या महायुध्दानंतर विविध कारणांनी इंग्लंड, फ्रान्स, जपान, जर्मनी इत्यादी देश प्रभावहीन बनले होते. यातच भर म्हणून या काळात राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये परस्परांविरुध्द अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले होते. अशा परिस्थितीत जागतिक राजकारणावर प्रभाव टाकू शकतील, अशा दोन देशांचा (अमेरिका व सोव्हिएत रशिया) उदय झाला. या दोन्ही देशांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात भांडवलशाहीवादी विचारधारा व साम्यवादी विचारधारेचे प्रतिनिधीत्व केल्याने जगातील अनेक लहान-मोठी राष्ट्रे या विचारधारेची पाईक बनली. द्वितीय महायुद्धानंतर रशियाने पूर्व युरोपातील राष्ट्रांना आपल्या प्रभावाखाली आणून तेथे समाजवादाचा प्रसार केला हे पाश्चिमात्य राष्ट्रांना सहन होणार नव्हते. त्याचबरोबर अमेरिका व रशिया दोन्ही राष्ट्रांची विचारधारा, राजकीय आणि आर्थिक रचना ही परस्पर विरोधी असल्याने जागतिक राजकारणावर आपलाच प्रभाव रहावा यासाठी ही राष्ट्रे प्रयत्नशील राहिली. यातूनच या राष्ट्रांचा महासत्ता म्हणून उदय झाला.

### (ii) तात्वीक व राजकीय मतभेद :-

औद्योगिक क्रांतीनंतर उद्योग क्षेत्र वाढीस लागून मालक व कामगार आणि उत्पन्न. या घटकाला प्राधान्य दिले गेले, यातून भांडवलाही निर्माण झाली, परंतु १९व्या शतकात कार्ल मार्क्सने साम्यवादी विचारधारा जगाला सांगताना भांडवलशाहीमुळे कामगार वर्गाची कशी पिळवणूक होते हे दाखवून दिले. कामगार कल्याणासाठी साम्यवादी विचारधारा कशी उपयोगी आहे हे पटवून दिले. यामुळे आपोआपच भांडवलशाहीचा पुरस्कार करणारे अमेरिकेसहीत इतर देश व साम्यवादी विचारधारेचा पुरस्कार करणारा रशिया यांच्यामध्ये तात्विक मतभेद निर्माण झाले. पुढे याचे पडसाद आंतरराष्ट्रीय राजकारणावरही पडले. याचे पर्यवसान शीतयुध्द मध्ये झाले.

### (iii) परस्पराविरुध्द अविश्वास :-

रशियात बोल्शेहिक राज्यक्रांतीनंतर समाजवादी विचारसरणी निर्माण झाली. याकडे जगाचे विशेषत: पाश्चिमात्य राष्ट्राचे लक्ष गेले. याचे प्रमुख कारण म्हणजे औद्योगिक क्रांतीनंतर या राष्ट्रांनी भांडवलशाहीचा पुरस्कार केल्याने रशियातील ही समाजवादी क्रांती आपल्या व्यवस्थेला घातक आहे. म्हणून या क्रांतीच्या प्रारंभीच या समाजवादी विचारधारेचा विनाश व्हावा यासाठी ब्रिटन, अमेरिकेसह इतर राष्ट्रांचे प्रयत्न सुरू झाले. यामुळे रशिया व पाश्चिमात्य राष्ट्रे यांच्यात द्वेष, शत्रुत्वाचे राजकारण सुरू झाले. तरीही दुसऱ्या महायुध्दाच्या कालखंडात समान शत्रूंना तोंड देता यावे म्हणून रशिया, इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका ही राष्ट्रे एकत्र आली असली तरी परस्परांविषयी संशय व अविश्वासाचे वातावरण कायम होते. यातील एक घटना म्हणजे सन १९४२ च्या प्रांरभी जर्मनीविरुध्द पाश्चिमात्य राष्ट्रांनी पूर्ण आघाडी उघडावी, असा रशियाने आग्रह धरला. पण रशियाची ही सूचना ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स या राष्ट्रांनी मान्य केली नाही, त्याचे कारण म्हणजे युध्दातील विजयाचे सर्व फायदे पाश्चिमात्य राष्ट्रांना मिळावेत व रशियाचे जर्मनीकडून जास्तीत जास्त नुकसान व्हावे असा सुप्त हेतू होता. यामुळे रशियाचा पाश्चिमात्य राष्ट्रांवरील संशय बळावत गेला. अमेरिकेने जपानवर अणुबॉम्ब टाकले व जपान बेचिराख झाला, परंतु आपण अणुबॉम्ब निर्माण करीत आहोत, हे शेवटपर्यंत रशियाला समजू नये याची काळजी घेतल्याने परस्परांवरील अविश्वासाची दरी वाढतच गेली.

### (iv) रशियाचे वाढते लष्करी प्राबल्य :-

बोल्शेव्हिक राज्यक्रांतीनंतर रशियामध्ये आमूलाग्र बदल होऊन लष्करी ताकदही वाढली. रशियाची ही वाढत जाणारी शक्ती पाश्चिमात्य जगाला धोकादायक वाटू लागली. याचे पर्यवसान पाश्चिमात्य राष्ट्रांनी गुप्तपणे अण्वस्त्र सज्जतेचा कार्यक्रम हाती घेतला. रशियाने सन १९३९ मध्ये फिनलँड, सन १९४० मध्ये बाल्टीक देशांवर आपले लष्करी सामर्थ्य वापरून नियंत्रण मिळविले. पुढे सन १९४३ ते १९४८ या कालावधीत झेकोस्लाव्हाकिया, पोलंड, रूमानिया, हंगेरी, ब्लगेरिया, युगोस्लाव्हिया व फिनलँड या देशांशी परस्पर सहकार्य व मैत्री करार केले. रशियाची वाढती लष्करी शक्ती आणि पूर्व युरोपवर रशियाने मिळविलेले प्रभुत्व हा ब्रिटनसह पाश्चिमात्य राष्ट्रांना चिंतेचा विषय ठरला. याचे रूपांतर पुढे शीतयुध्दात झाले.

### (v) साम्यवाद लोकशाहीला मारक अशी भावना :-

साम्यवादी राजवट म्हणजे हुकूमशाही राजवट अशी लोकशाहीवादी पाश्चिमात्य राष्ट्रांची धारणा झाली होती. त्यामुळे जगातील साम्यवादी चळवळीचा प्रसार रोखण्यासाठी या राष्ट्रांनी पावले टाकण्यास सुरूवात केली. विशेषत: अमेरिकेने यामध्ये विशेष भूमिका बजावली. ग्रीसपासून व्हिएतनामपर्यंत आलेली साम्यवादी चळवळीची लाट परतवून लावण्यामध्ये अमेरिका यशस्वी झाली, तर ब्रिटनने सन १९४४ मध्ये ग्रीसमधील आपले हितसंबंध मान्य करून घेतले. अमेरिका व ब्रिटनने लोकशाहीच्या संरक्षणासाठी सातत्याने साम्यवादी

चळवळीला विरोध केला, अशा चळवळी मोडून काढल्यामुळे अमेरिका आणि रशियातील कटुता वाढतच गेली.

### (vi) पूर्व युरोपवर रशियाचा प्रभाव :-

दुसऱ्या महायुध्दात इंग्लंड, फ्रान्स ही राष्ट्रे विजयी होऊनही गलितगात्र झाली. त्यांचा जागतिक प्रभाव कमी झाला तर या युध्दात मोठी हानी होवूनही रशियाने आपले लष्करी सामर्थ्य, संपन्नता व प्रदेश विस्तार यात सातत्य ठेवले. द्वितीय महायुध्दाच्या उत्तरार्धात रशियाला त्यांच्या पश्चिम सीमेवर रोखता यावे म्हणून रशियाशी करार करावा असा आग्रह इंग्लंडचे पंतप्रधान चर्चिल यांनी धरला. परंतु अमेरिकेने चर्चिलच्या या म्हणण्याकडे दुर्लक्ष केले, याचा लाभ उठविण्याची संधी रशियाला मिळाली. रशियाने महायुद्धाच्या अखेरच्या काळात जर्मनीचा पाठलाग करीत आपले सैन्य पूर्व युरोपातून घुसविल्याने पूर्व युरोपातील राष्ट्रांवर रशियाचा प्रभाव वाढला. परिणामत: पूर्व युरोपातील अनेक देशात साम्यवादी सरकारे स्थापन झाली. अमेरिकेने रशियाच्या पूर्व युरोपातील प्रभावाला आळा घालण्यासाठी उपाययोजना केल्या. परंतु अमेरिकेला फारसे यश मिळाले नाही. यामुळे अमेरिकेने रशियाच्या विस्तारास केलेला गुप्त विरोध म्हणजे 'शीतयुध्द' असे म्हणावे लागेल.

## १.३ शीतयुध्दास प्रारंभ :-

जागतिक घडामोडी, अमेरिका व सोव्हिएत रशियाचे वर्चस्ववादी धोरण यामुळे जगभर अशांतता निर्माण झाली. अमेरिका व रशियातील तात्वीक, वैचारिक व राजकीय भेद, परस्परांमध्ये निर्माण झालेला अविश्वास व भीती, जगावर प्रभुत्व गाजविण्यासाठी चालू असलेली धडपड व त्याअनुषंगाने केले जाणारे प्रयत्न यामुळे परस्परांना एकाकी पाडण्यासाठी जगातील राष्ट्रांना आपल्या गोटात ओढण्याची स्पर्धाच उभय देशांमध्ये लागली. पश्चिमेकडील लोकशाही राष्ट्रांचे नेतृत्व अमेरिकेने तर साम्यवादी विचारधारेच्या राष्ट्रांचे नेतृत्व रशियाने स्विकारले. विविध राष्ट्रांमध्ये निर्माण झालेले संघर्ष, कलह मिटवून तेथे आपले वर्चस्व प्रस्थापित व्हावे म्हणून दोन्ही देशांचे प्रयत्न सुरू झाले. यातूनच शीतयुध्दाला प्रारंभ झाला. ग्रीस तुर्कस्थान, इराण या देशांमध्ये निर्माण झालेल्या अस्थिर परिस्थितीचा फायदा रशिया घेईल व आपले तेथे वर्चस्व निर्माण करील या भीतीने अमेरिकेने या देशामध्ये हस्तक्षेप केला.

### १. ग्रीसमधील यादवी :-

ग्रीस हा देश दारिद्र्याने ग्रासलेला होता. मोठी लोकसंख्या आणि आर्थिक दुरावस्था यामुळे लोकांना दोन वेळचे पोट भरणेही अवघड झाले होते. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात ग्रीसच्या सैन्याने जर्मनी व इटलीच्या लष्कराला तीव्र प्रतिकार केला होता, यामुळे आपोआप दोस्त राष्ट्रांचे ग्रीसवर लक्ष होते. ब्रिटनला आपल्या पूर्वेकडील साम्राज्यांच्या दृष्टीने ग्रीस महत्त्वाचे वाटत होते. यामुळे सन १९४४ मध्ये ब्रिटनने ग्रीकमध्ये रशियाशी एक 'अँग्लो-सोव्हिएत' करार केला. या करारान्वये सोव्हिएत रशियाने ग्रीसवरील ब्रिटनचे वर्चस्व मान्य केले. खरे तर रशियाला ग्रीसवर आपले वर्चस्व प्रस्थापित करावयाचे होते, परंतु

अपयश आले. तरीही रशियाने युगोस्लाव्हिया, अल्बानिया, बल्गेरिया या देशांता मदत करून युध्द प्रशिक्षण, शस्त्र पुरवठा इत्यादी कार्यक्रम गुप्तपणे राबवून ग्रीसमधील व्यवस्था अस्थिर करण्याचे प्रयत्न केले. याची माहिती ग्रीसमधील ब्रिटिशांना कळाल्याने ब्रिटनने ग्रीसमधील आपले लष्कर सन १९४७ साली परत (स्वदेशी) बोलविले. याची गंभीर दखल अमेरिकेने घेतली. अमेरिकेचे सेक्रेटरी मार्शल व अध्यक्ष हॅरी टुमन यांनी ग्रीसला सर्वोतोपरी मदत करण्याचा निर्णय घेतला. त्याचे कारण म्हणजे ब्रिटनने ग्रीसमधून आपले सैन्य काढून घेतल्यानंतर रशिया आपले वर्चस्व ग्रीसवर प्रस्थापित करेल व पुढे तुर्कस्थानवर वर्चस्व निर्माण करणे, रशियाला सोपे जाईल अशी भीती अमेरिकेला (मार्शल) वाटत होती. म्हणून अमेरिकेचे अध्यक्ष हॅरी टुमन यांनी ब्रिटनच्या सहमतीने लोकशाही व स्वातंत्र्य टिकविण्यासाठी ग्रीसला मदत करण्यास सुरूवात केली. अमेरिकेने हा सर्व खटाटोप रशियन साम्यवादाला प्रतिबंध घालण्यासाठी केला होता. यामुळे ग्रीसमध्ये रशियाला वर्चस्व मिळविता आले नाही.

## २. तुर्कस्थानमधील प्रश्न :–

जगाच्या राजकारणामध्ये तुर्कस्थानला महत्त्वाचे स्थान होते, त्याचे कारण म्हणजे त्या राष्ट्राच्या सीमे अंतर्गत काळा समुद्र व मेडिटेरेनियन समुद्राला जोडणाऱ्या डार्डनेल्स व बॉलफोरस् या दोन सामुद्रधुन्या होत्या. या सामुद्रधुन्या, मार्मोराचा समुद्र व कॉन्स्टँटिनोपलचा ताबा आपल्याला मिळावा अथवा त्यावर मार्गक्रमण करण्याची परवानगी मिळावी. यासाठी युरोपीय देशासह, सोव्हिएट रशिया प्रयत्नशील होता. या सामुद्रधुन्या युरोपीय राष्ट्राना खुल्या झाल्या तर रशियाच्या सुरक्षेला आरमारी धोका निर्माण होईल असे रशियाला वाटत होते. म्हणून या सामुद्रधुन्यांच्या मार्गात काळ्या समुद्रावरील राष्ट्राशिवाय इतर राष्ट्रांच्या युध्द नौकांना बंदी करावी. तसेच सामुद्रधुन्यांच्या प्रदेशात रशियाला नाविक तळ उभारू देण्यास परवानगी देऊन मैत्री तह करावा असा दबाव रशियाने तुर्कस्थानवर आणण्यास सुरुवात केली. पुढे सन १९१६ साली रशियाने तुर्कस्थानशी करार करून सामुद्रधुन्यांवर वर्चस्व मिळविले. परंतु या कराराचा तुर्कस्थानने वारंवार भंग केला. त्यामुळे सन १९४६ मध्ये रशियाने तुर्कस्थान सातत्याने १९३६ च्या तहाचा भंग करीत असल्याचा आरोप केला. तुर्कस्थानने आरोपाचा इन्कार केला. तरीही रशियाने अशा आरोपाचा पुनर्रुच्चार केल्याने या प्रश्नांवर आंतरराष्ट्रीय परिषद घ्यावी, या तुर्कस्थानच्या मागणीला पाठिंबा दिला. पण याअगोदर या देशांनी आपआपसात सविस्तर चर्चा करावी असा रशियाने खलिता पाठविला. रशियाच्या या खलित्यावर तुर्कस्थानने अमेरिकेचा सल्ला घेतला. अमेरिकेने तुर्कस्थानशी सल्लामसलत करून या प्रश्नावर खंबीर भूमिका घ्यावी असे सांगितले. याप्रमाणे तुर्कस्थान रशियाच्या दडपणाखाली जावून रशियाच्या प्रभावाखाली जावू नये असे अमेरिकेला वाटत होते. परंतु रशियाला विरोध करण्याइतपत सामर्थ्य तुर्कस्थानकडे नाही हे अमेरिकेने ओळखले. तुर्कस्थानला दिर्घ आर्थिक मदत दिल्याशिवाय त्याचे पुनरुज्जीवन होऊ शकणार नाही. कारण रशियन संकटापासून वाचण्यासाठी तुर्कस्थान राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५०% रक्कम संरक्षणावर खर्च करावी लागत होती. यावर उपाय म्हणून अमेरिकेने मार्शल योजनेखाली १५ कोटी डॉलर्सची तुर्कस्थानला मदत केली व रशिया लादत असलेल्या वर्चस्वापासून मुक्त केले.

## ३. इराणमधील परिस्थिती :-

रशिया व अमेरिकेमध्ये शीतयुध्दाला तोंड फुटण्यास आणखी एक कारण झाले ते म्हणजे इराणमधील चिघळलेली परिस्थिती. जगातील राष्ट्रांना इराणची भूमी दोन कारणाने महत्त्वपूर्ण वाटत होती. त्यामध्ये एक पर्शियन आखातातून हिंदी महासागरातील रशियाच्या प्रवेशाला आवर घालण्यासाठी इराणची मदत मिळविणे. दुसरे इराणमध्ये असणारे प्रचंड तेलसाठे यामुळे ब्रिटन, अमेरिका, रशियासह इतर राष्ट्रे इराणमध्ये प्रवेशासाठी उत्सुक होती. दुसऱ्या महायुध्द कालखंडात सन १९४१ मध्ये इंग्लंड व सोव्हिएत रशियाच्या लष्कराने रशियन प्रदेशातील बाकू तेलसाठ्याचे व अँग्लो इराण तेल कंपनीचे संरक्षण करण्यासाठी रशियन सैन्याने उत्तर इराणमध्ये तर ब्रिटिश लष्कराने दक्षिण इराणचा प्रदेश व्यापून टाकला. यावेळी अमेरिकेने दक्षिण इराणमध्ये ब्रिटिश सैन्याला मदत केली. जुलै १९४२ मध्ये सोव्हिएत संघ, ब्रिटन व इराण यांच्यात झालेल्या करारानुसार द्वितीय महायुध्दाच्या समाप्तीनंतर सहा महिन्याच्या आत परकीय सैन्यांनी इराण सोडावे असे ठरले. युध्दकालखंडात इराणच्या आधुनिकीकरणाची जबाबदारी ब्रिटन, अमेरिका, रशियाने घेण्याचे ठरविले, परंतु महायुध्दाच्या समाप्तीनंतर सोव्हिएत रशिया व ब्रिटन-अमेरिका यांच्या परस्परविरोधी धोरणामुळे अशक्य झाले.

सोव्हिएत रशियाने उत्तर इराणच्या तेलक्षेत्रात ब्रिटन-अमेरिकेचा प्रवेश रोखण्याबरोबरच इराणमध्ये रशियाला अनुकूल असणारे सरकार बनावे, यासाठी रशिया प्रयत्नशील राहिला. यासाठी उत्तर इराणमध्ये आपले लष्कर कायम राहील अशी काळजी घेतली. द्वितीय महायुध्दानंतर सर्व परकीय राष्ट्रांनी इराणमधून निघून जावे अशी इराण सरकारने मागणी केली. यावर पॉट्सडॅम परिषदेत ठराव होऊन असे ठरले की, तेहरानमधून ताबडतोब तर उर्वरित प्रदेशातून २ मार्च १९४६ पर्यंत सर्व फौजा माघारी घ्याव्यात असे ठरले. परंतु या अगोदरची एक महत्त्वाची घटना म्हणजे इराणमधील 'तुदेह' पक्षाने इराण सरकारविरुध्द इराणच्या उत्तरेला अझरबैजन प्रदेशात उठाव करून स्वातंत्र्य जाहीर केले. इराण सरकारने या उठावाचा बिमोड करण्यासाठी सैन्य कारवाई केली. परंतु रशियाने अटकाव केला, यामुळे इराणने हा प्रश्न सुरक्षा परिषदेत नेला. पण सुरक्षा परिषदेने असा निर्णय दिला की, हा प्रश्न इराण सरकार व सोव्हिएत रशियाने वाटाघाटीद्वारे सोडवावा. पॉटसडॅम परिषदेतील ठरावानुसार रशियाने आपले सैन्य २ मार्च, १९४६ पर्यंत लष्कर मागे घेण्याचे मान्य करूनही काहीच हालचाल केली नाही. यामुळे सुरक्षा समितीने ४ मार्च १९४६ रोजी ठरावाचा भंग केलेचा निषेधाचा खलिता रशियाला पाठविला. यास रशियाने उत्तर दिले नाही. परंतु एप्रिल, १९४६ मध्ये सोव्हिएत रशिया व इराण यांच्यात झालेल्या बैठकीत १ मे १९४६ पर्यंत रशियन फौजा इराणमधून काढून घेण्याचे रशियाने मान्य केले. जुलै १९४६ पर्यंत सर्व रशियन लष्कर इराणमधून काढून घेण्यात आले. ही प्रक्रिया पूर्ण होताच इराणने एप्रिल १९४६ मधील द्विपक्षीय बैठकीतील तरतुदी झुगारून दिल्या. इराणच्या या प्रतिक्रियेमुळे सोव्हिएट रशिया संतप्त झाला. इराणला अमेरिका-ब्रिटनची फूस आहे हे रशियाच्या लक्षात आले. यामुळे रशिया-अमेरिका यांच्यातील दरी वाढतच गेली. याचीच पुढची पावले म्हणून अमेरिकेचे अध्यक्ष हॅरी ट्रुमन यांनी एक मसुदा जाहीर केला त्याच 'ट्रुमन सिध्दांत' असे म्हणतात.

## १.२.१.४ रशियाविरोधी अमेरिकेचे धोरण :-

### (i) ट्रुमन सिध्दांत :-

सोव्हिएत रशिया हा साम्यवादी तत्त्वज्ञानानुसार राजकीय प्रणाली चालविणारा देश होता. एवढेच नव्हे तर रशियाचे अध्यक्ष स्टालीन यांनी जगात येथे संधी मिळेल तेथे साम्यवादाचा प्रचार-प्रसार करणे शक्य असल्यास राजवटी (सत्ता) निर्माण करण्याचे धोरण ठरविले होते. रशियाच्या या साम्यवादी तत्त्वप्रणालीनुसार सुरू असलेल्या विस्तारवादी कल्पनेला अमेरिकेने शह दिला. त्याचे कारण जगात लोकशाही स्थापन व्हावी याचबरोबर आपला प्रभाव जगावर रहावा असे अमेरिकेला वाटत होते. यातूनच ग्रीक, तुर्कस्थान, इराण या राष्ट्रांचे रशियन साम्यवादापासून रक्षण व्हावे व पूर्वयुरोपातील रशियाच्या प्रभावाला रोखावे हे उद्दिष्ट समोर ठेवून अमेरिकेने खंबीर पावले टाकण्यास सुरूवात केली. त्याचाच भाग म्हणून अमेरिकेचे अध्यक्ष हॅरी ट्रुमन यांनी या समस्येवर विचारविनिमयासाठी अमेरिकेचे प्रतिनिधी सभागृह व सिनेट यांची संयुक्त बैठक १२ मार्च १९४७ रोजी दुपारी १ वाजता बोलविली आणि आपला ट्रुमन सिध्दांत मांडला. या ट्रुमन सिध्दांतास २२ मे १९४७ रोजी अमेरिकन काँग्रेसची अंतिम मंजूरी मिळाली. या सिध्दांतामुळे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाला वेगळे वळण मिळाले. ''जगात कोठेही, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आक्रमण होऊन जागतिक शांतता धोक्यात आली की, अमेरिकेची सुरक्षिततादेखील धोक्यात आली असे मानले जाऊन अमेरिका त्या प्रकरणात हस्तक्षेप करील.'' असा हा 'ट्रुमन सिध्दांत' अमेरिकेने जाहीर केला. या सिध्दांतामुळे जगाची दोन गटात विभागणी झाली आणि अमेरिका-रशिया या दोन परस्पराविरोधी तत्त्वप्रणालीच्या सत्ता संघर्ष करण्यास तयार झाल्या.

### (ii) मार्शल योजना :-

रशियन साम्यवादाला रोखण्यासाठी अमेरिकेने उचललेले दुसरे पाऊल म्हणजे मार्शल योजना होय. युरोपीय राष्ट्रांची दुसऱ्या महायुध्दामध्ये झालेली आर्थिक व प्राणहानी यामुळे युरोपची ढासळलेली अर्थव्यवस्था यातून युरोपला सावरणे गरजेचे आहे असे अमेरिकेला वाटू लागले. त्याचे प्रमुख कारण म्हणजे युरोपच्या दुरावस्थेचा फायदा रशिया घेईल व तेथे साम्यवादाचा प्रसार करेल अशी भीती अमेरिकेला वाटत होती. तसेच पश्चिम युरोपातील लोकशाहीवादी राष्ट्रांना मुबलक आर्थिक पुरवठा करून तेथील साम्यवादाच्या उदयाचा धोकाही दडपून टाकता येईल, इतकी सामर्थ्यवान तेथील राष्ट्रे होतील. यासाठी अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री जॉर्ज मार्शल यांनी एक योजना तयार केली. ही योजना ५ जून १९४७ रोजी मार्शल यांनी हॉवर्ड विद्यापीठात 'युरोपीय पुनरूज्जीवन कार्यक्रम' या विषयावर भाषण करताना मांडली. तीच 'मार्शल योजना' म्हणून ओळखली जाते. युरोपीय पुनरूज्जीवनाबाबत बोलताना मार्शल म्हणाले, 'आमचे धोरण कोणताही देश अथवा सिध्दांताविरुध्द नाही, तर भूक, दारिद्र्य, निराशा व अराजकतेविरुध्द आहे. युरोपातील आर्थिक परिस्थिती सुधारावी, तेथील सामाजिक, राजकीय संस्था कायम राहतील अशी परिस्थिती निर्माण करणे यासाठी लागेल ती आर्थिक मदत करण्यास अमेरिका तयार आहे. याबाबत युरोपनेच पुढाकार घेतला पाहिजे

तसेच ही योजना मान्य असली पाहिजे. युरोपीय राष्ट्रांना मदत करणे ही आमची भूमिका आहे असे मार्शल यांनी म्हटले. एकंदरीत मार्शल यांचे हे भाषण राजकीय क्षेत्रात दूरगामी परिणाम घडवून गेले. याशिवाय युरोपीय राष्ट्रांनी मार्शल यांच्या या योजनेचे स्वागतच केले. अमेरिकेतही मार्शल यांच्या भाषणाला भरभरून प्रतिसाद मिळाला. मात्र रशियाने यावर तीव्र प्रतिक्रिया दिली. ट्रुमन सिध्दांत व मार्शल योजना म्हणजे संयुक्त राष्ट्र संघाला धोका देणे आणि अमेरिकन साम्राज्यवादाला खतपाणी घालण्याचे काम अमेरिका करीत आहे.' अशी टीका रशियाने केली. सन १९४८ मध्ये अमेरिकन काँग्रेसमध्ये मार्शल योजनेला मंजूरी देण्यात आली. यानुसार पहिल्या वर्षासाठी ५.३ अब्ज डॉलरची मदत मंजूर करण्यात येवून ती मदत स्वीडन, डेन्मार्क, फ्रान्स, जर्मनी, लक्झेबंर्ग, नेदरलँड, बेल्जियम, इटली, नॉर्वे, ऑस्ट्रिया, ब्रिटन, ग्रीस, स्वित्झर्लंड, पोर्तुगाल, तुर्कस्थान, चीन, आर्यलंड, आईसलँड या राष्ट्रांना देण्यात आली. सन १९४७ ते १९५१ या काळात मार्शल योजना कार्यान्वित राहिली. या योजनेनुसार ४ वर्षात अमेरिकेने युरोपियन देशांना जवळपास १३ अब्ज डॉलरची मदत केली.

### ❑ मार्शल योजनेचे महत्त्व :-

अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री जॉन मार्शल यांनी तयार केलेल्या या योजनेला जागतिक स्तरावर विशेष महत्त्व प्राप्त झाले, ते पुढीलप्रमाणे :-

१) या योजनेमुळे दुसऱ्या महायुध्दात कोलमडून गेलेली युरोपीयन राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेला उभारी मिळाली.

२) मार्शल योजनेमुळे युध्द काळातील मानवी हानी व लोकांच्या वाट्याला आलेले दुःख, दारिद्रद्य, निराशा दूर करण्यासाठी भरीव प्रयत्न झाले. या मानवतावादी कर्त्यामुळे ही योजना लोकप्रिय झाली.

३) साम्यवादाविरुध्द लढा उभारण्यासाठी या योजनेचा वापर अमेरिकेला करता आला. फ्रान्स व इटलीमध्ये वाढत चाललेल्या साम्यवादी चळवळींना आळा बसण्यासाठी अमेरिकेने या दोन्ही देशांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली.

४) मार्शल योजनेतून युरोपची आर्थिक एकसंघता वाढीस लागली यातून युरोपमध्ये सर्व राष्ट्रांनी एकत्र येऊन अनेक सामुदायिक योजना आखून युरोपची प्रगती साधली.

५) या योजनेखाली लाभ मिळालेल्या देशांमध्ये परस्पर आर्थिक सहकार्य वाढीस लागले.

६) ट्रुमन सिध्दांत व मार्शल योजनेमुळे अमेरिकेने संयुक्त राष्ट्र संघाचे महत्त्व कमी केले आणि संयुक्त राष्ट्रसंघाने घालून दिलेल्या नियमानुसार कार्य करीत असल्याचा खुलासा केला.

मार्शल योजनेने चार वर्षाच्या कालखंडात सोव्हिएत रशियाचा विरोध असतानाही पश्चिम युरोपात खूप मोठे यश संपादन केले. शिवाय रशियाने घाईघाईने मार्शल योजनेला केलेला विरोध तर अमेरिकन व युरोपीयन जनतेने दिलेला पाठिंबा यामुळे रशियाची लोकांच्या मनातील प्रतिमा हळूहळू कमी होऊ लागली. यामुळे

रशियाने दुप्पट वेगाने फ्रान्स, इटली व पूर्व युरोपातील राष्ट्रांच्या साम्यवादी पक्षांची एक नवी आंतरराष्ट्रीय संघटना कोमिन्फॉर्म (Communist Information Bureau) ची स्थापना केली व त्याचे मुख्य कार्यालय 'बेलग्रेड' येथे सुरू केले. या संघटनेच्या माध्यमातून साम्यवादाला विरोध करणाऱ्या तत्वांना मुळासहीत उकडून टाकणे हे प्रथम उद्दिष्ट ठरले. या संघटनेमार्फत एक वृत्तपत्र सुरू करून मार्शल योजनेविरुध्द प्रचार केला. मार्शल योजनेनंतर रशिया व अमेरिकेतील ताण-तणाव वाढतच गेला व याचाही परिणाम शीतयुध्दाची दोन्ही देशामधील व्याप्ती वाढत गेली.

### (iii) अमेरिकेचे व्यापक धोरण :-

रशियाच्या साम्यवादी प्रभावाला रोखण्यासाठी फक्त आर्थिक क्षेत्रात मदत करून चालणार नाही. तर राजकीय आघाडीवरही सक्रीय असणे गरजेचे आहे हे अमेरिकेने ओळखले. रशियाच्या या साम्यवादी तत्वप्रणालीला रशियन सीमेपर्यंत रोखण्यासाठी अमेरिकेने व्यापक धोरण आखले. युरोपात साम्यवादाचा प्रसार रोखण्यासाठी भरीव आर्थिक मदतीबरोबर युरोपीय जनतेच्या सुरक्षिततेसाठी लष्करी व शस्त्रास्त्राची मदत करण्यासाठी अमेरिकेने पावले उचलली. यामुळे सोव्हिएत रशियाच्या साम्यवादी आक्रमणाची भीती बाळणाऱ्या युरोपीय राष्ट्रांना दिलासा मिळाला. अमेरिकेने युरोपीय देशांशी सल्ला-मसलत करून या राष्ट्रांच्या सल्ल्यानुसार विविध आर्थिक मदत करणाऱ्या योजना आखण्याबरोबर काही लष्करी संरक्षक योजनाही आखल्या.

मार्शल योजनेतील तरतुदीनुसार सन १९४८ मध्ये युरोपियन पुनरूज्जीवन कार्यक्रमांतर्गत १६ राष्ट्रांच्या प्रतिनिधींना एकत्र करून 'युरोपीय आर्थिक सहकारी संघटना' (Organisation of European Economic Co-operation-OEFC) स्थापन करून गरजू देशांना आर्थिक मदत केली. दुसऱ्या महायुध्दानंतर ज्या राष्ट्रामध्ये शस्त्रास्त्रांची कमतरता निर्माण झाली. त्या राष्ट्रांना स्वावलंबी करण्यासाठी 'परस्पर संरक्षण साहाय्य कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले यासाठी एक प्रशासन व्यवस्था उभारून त्यांच्याकडे लष्करी व आर्थिक मदत वितरणाची जबाबदारी देण्यात आली. याशिवाय 'युरोपांतर्गत अर्थदेय योजना' (Intra European Payment Scheme), शूमन योजना, युरोपीय कोळसा व पोलाद संघ (The European Coal and Steel Community-ECSC), युरोपीय समाईक बाजारपेठ (European Common Market-ECM) यासारख्या संस्था उभारून युरोपला सर्वंकष मदत मिळण्यासाठी युरोपीयन राष्ट्रांच्या सहकार्याने प्रयत्न केले.

आपल्या रशियाविरोधी व्यापक धोरणाचा भाग म्हणून अमेरिकेने राजनैतिक व लष्करी स्तरावरही प्रयत्न केले. याच प्रयत्नाचा भाग म्हणून पश्चिमी युरोपीय राष्ट्रांना ब्रुसेल्स करारासारखे करार करून युरोपीयन एकीकरणासाठी अमेरिकेने उत्तेजन दिले. तर साम्यवादाला विरोध करणाऱ्या राष्ट्रांना लष्करी स्तरावर एकत्र करनू अमेरिकेने स्वत:च्या नेतृत्वाखाली अटलांटिक क्षेत्रात 'नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑमनायझेशन (NATO). मध्यपूर्वेत सेंट्रल ट्रीटी ऑर्गनायझेशन (CENTO) असे लष्करी गट उभा केले. यामागे हेतू हाच होता की, रशियाला चोहोबाजूनी लष्करी तळांनी घेऊन साम्यवादाला आळा घालणे. पण रशियानेही साम्यवादी राष्ट्रांचा एक गट करून त्यांच्यामध्ये 'वॉर्सा करार' घडवून आणला.

## १.२.१.५ शीतयुध्दकालीन लष्करी करार :–

### (i) नॉर्थ अटलॉंटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन–१९४९ (NATO) :-

दुसऱ्या महायुध्दानंतर जगामध्ये अमेरिका व रशिया यांच्यात शीतयुध्दाच्या रूपाने संघर्ष वाढतच गेला. रशियाने पूर्व युरोपात साम्यवादी तत्वप्रणालीतून मिळविलेली पकड व दुसऱ्या महायुध्दात होरपळून निघालेल्या पश्चिम युरोपीय राष्ट्रांना रशियाची वाटणारी भीती यातून अमेरिकेने युरोपीयन राष्ट्रांचे संघटन घडवून आणले. याचवेळी युरोपात बर्लिनचे विभाजन झाल्यामुळे तणावात आणखी भरच पडली. अमेरिकेने ब्रुसेल्स करारानुसार करारात सहभागी असणाऱ्या राष्ट्रांशी गुप्त चर्चा करून रशिया–विरोधी एक मजबूत संघटन उभे केले. त्यास 'नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑरगनायझेशन' (NATO) असे म्हणतात. रशियाचे ताठर धोरण व साम्यवादाच्या वाढत्या विस्ताराला रोखण्यासाठी ४ एप्रिल १९४९ रोजी 'नाटो' या संघटनेची स्थापना झाली. या संघटनेत अमेरिका, इंग्लंड, डेन्मार्क, फ्रान्स, बेल्जियम, इटली, आयर्लंड, नेदरलँड, नॉर्वे, पोर्तुगाल, लक्झेंबर्ग व कॅनडा अशा बारा देशांच्या प्रतिनिधींनी वॉशिंग्टन येथे नाटो संघटनेच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. २५ जुलै १९४९ रोजी अमेरिकन अध्यक्षांनी या नाटो करारास अंतिम मंजुरी दिली, तर १९५२ मध्ये ग्रीस, तुर्कस्थान व १९५५ साली पश्चिम जर्मनी नाटोमध्ये सामील झाली.

### ❑ नाटोतील महत्त्वाच्या तरतुदी :–

नाटोतील सर्व सदस्य देशांच्या समान सार्वभौमत्वाची जबाबदारी सर्वच देशांनी घ्यावी. तसेच सदस्य असणाऱ्या कोणत्याही एका किंवा अनेक राष्ट्रांवर उत्तर अमेरिका किंवा पश्चिम युरोपीयन राष्ट्रांवर दुसऱ्या एखाद्या राष्ट्राने लष्करी कारवाई केली तर अशी कारवाई म्हणजे नाटोतील सर्व सदस्य राष्ट्रांवर आलेली आपत्ती समजून राष्ट्राची सुरक्षितता कायम ठेवण्यासाठी प्रसंगी शस्त्रबळाचा वापर करावा. नाटो करारात एक सरनामा आणि १४ कलमांचा समावेश होता. नाटो करारातील तरतुदींचा मुख्य भाग कलम नं. ३४–५ मध्ये आहे. कलम तीननुसार सदस्य राष्ट्रांनी परस्पर सहकार्याने शांतता टिकविण्याचा प्रयत्न करावा. परंतु युध्दमय परिस्थितीत सर्वानुमते कलम पाचनुसार कार्यवाही करावी अशी तरतूद करण्यात आली होती. कलम एकनुसार नाटोतील सदस्य राष्ट्रांनी परस्परांमधील मतभेद मिटवून एकमेकांना सहकार्य करावे. तर दुसऱ्या कलमान्वये सदस्य राष्ट्रांची स्वातंत्र्य व सुरक्षितता धोक्यात आली तर सर्वानुमते त्वरित विचारविनिमय करून निर्णय घ्यावा असे ठरविण्यात आले. नवव्या कलमान्वये नाटोची कार्यपध्दती विशद करण्यात आली, यानुसार नाटोचे प्रशासन करण्यासाठी यंत्रणा उभारण्यात आली. नाटोच्या स्थापनेनंतर १० वर्षांनी करारात आवश्यक ते बदल करण्याची मोकळीक सदस्य राष्ट्रांना देण्यात आली तर २० वर्षांनी एखाद्या राष्ट्राला नाटोतून बाहेर पडावयाचे असेल तर परवानगी देण्यात आली. परंतु १ वर्ष अगोदर तशा प्रकारची सूचना देणे बंधनकारक होते. अशाप्रकारे नाटोने दीर्घकाळ प्रभावीपणे काम करून स्वरसंरक्षणाबरोबरच आर्थिक विकास साधण्याचे काम केले.

## ❑ नाटोची कार्यपध्दती :-

नाटो संघटनेचे कामकाज चालविण्यासाठी नवव्या कलमानुसार एक 'कौन्सिल' निर्माण करण्यात आले. यामध्ये सदस्य राष्ट्रांतील परराष्ट्र मंत्री, संरक्षणमंत्री व अर्थमंत्री यांना कौन्सिलचे सदस्यत्व देण्यात आले. तसेच 'कौन्सिल' ही कामकाजातील सर्वोच्च शाखा म्हणून काम करेल असे ठरविण्यात आले. या कौन्सिलचे कामकाज दोन स्तरावर चालविले जाते असे. ते पुढीलप्रमाणे :-

१) वर्षातून दोन वेळा सदस्य राष्ट्राच्या मंत्र्यांच्या बैठका घेवून निर्णय घेतले जात असत.

२) नाटोचे सदस्य राष्ट्रांतील प्रतिनिधी पॅरीस येथील मध्यवर्ती कार्यालयात एकत्र येऊन कामकाजावर विचारविनिमय करीत असत.

याशिवाय वेळोवेळी निर्माण होणाऱ्या समस्यावर तोडगा काढण्यासाठी २० कायम समित्यांची निर्मिती करण्यात आली. लष्करी कारवाईसाठी एक लष्करी समिती नेमून त्यावर 'सुप्रीम अलाईड कमांडर युरोप' या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. नाटो संघटनेत सरचिटणीस हे पद निर्माण करण्यात आले. तसेच संरक्षण, सुरक्षितता याबाबत दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड या राष्ट्रांच्या सदस्याची एक 'स्थायी समिती' स्थापन केली. या कामकाज पध्दतीमुळे नाटोच्या कार्यक्षमतेत वाढ झाली आणि युरोपमध्ये एकसंघता निर्माण करण्यास पोषक वातावरण निर्माण केले तर दुसरीकडे रशियन साम्यवाद व आक्रमक नीतीला पायबंद घालण्याचे कार्य या संघटनेमुळे काही प्रमाणात शक्य झाले.

## ❑ नाटोचे कार्य/कामगिरी :-

सन १९४९ नाटो संघटना स्थापन झाल्यानंतर प्रारंभी काही वर्षातच आपल्या कामगिरीद्वारे पश्चिम युरोप व उत्तर अटलांटिक क्षेत्रात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. तर दुसरीकडे रशियन साम्यवादाचा प्रचार रोखण्यास नाटो यशस्वी झाला. नाटोच्या स्थापनेनंतर पंधरा वर्षात युरोपात एकही युध्द लढले गेले नाही हे नाटोचे यश मानावे लागेल. याकाळात नाटोने युरोपात 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्यासाठी प्रयत्न केले. परंतु यामुळे अमेरिका-रशिया संघर्षात आणखी तेल ओतल्यासारखे झाले. युरोपीय निवडणुकांमध्ये साम्यवादी पक्षाची लोकप्रियता नाटोच्या स्थापनेनंतर कमी होत गेली, नव्हेतर या नाटो प्रणीत राष्ट्रामध्ये साम्यवादी पक्ष मरणोन्मुख झाले. नाटोमुळे युरोपात मोठ्या प्रमाणात युध्दविषयक लष्करी तयारीला वेग आला, शस्त्रास्त्रे खरेदी व निर्मिती, अण्वस्त्रांचा शोध व उपलब्धता, युध्दाचे आधुनिक तंत्रज्ञान यामुळे नाटोतील सदस्य राष्ट्रांमध्ये भूदल, वायूदल व नौदलता प्रचंड वाढ झाली याचे परिणाम संपूर्ण जगावर झाले. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील बरेचसे उत्पन्न हे लष्करी शक्ती वाढविण्यामध्ये गेल्याने युरोपात काही प्रश्नही निर्माण झाले. तरीही नाटोमुळे सदस्य राष्ट्रांमध्ये सहकार्याची व समन्वयाची भूमिका तयार करण्यासाठी वातावरण पोषक राहिले. यातूनच पुढे परस्परांच्या सहकार्यातून 'पश्चिम युरोपीय संघ'ची निर्मिती झाली.

सोव्हिएट रशियाने नाटोच्या या कामगिरीवर प्रचंड टीका केली. नाटोच्या माध्यमातून अमेरिकेने आपले प्रभुत्व नाटोच्या सदस्य राष्ट्रांवर निर्माण केले आहे, याचे टिकात्मक विश्लेषण केले. जी राष्ट्रे नाटोची

सदस्य झाली नाहीत अथवा रशियाच्या गटात गेली नाहीत, अशा राष्ट्रांनी जगात तिसरा गट (अलिप्त राष्ट्र संघटना) निर्माण केला. नाटोच्या माध्यमातून अमेरिकेने कोणत्याही परिस्थितीत रशियाची शक्ती वाढू नये याची काळजी घेण्याचा प्रयत्न केला. याच पार्श्वभूमीवर रशियाने अमेरिकाविरोधी साम्यवादी राष्ट्रांना एकत्रित करून 'वॉर्सा' करार केला.

## (ii) वॉर्सा करार (Warsaw Pact) :-

अमेरिकेने पाश्चिमात्य राष्ट्रांना बरोबर घेवून रशिया व साम्यवादाच्या प्रसाराविरोधात भक्कम तटबंदी उभारण्यासाठी नाटो, सीटो, सेन्टो, ॲन्झ्यूस यासारखे संरक्षक करार केले. याविरोधात रशियानेही अमेरिका व पश्चिम युरोपच्या विरोधात संघटन करून साम्यवादी राष्ट्रांना एकत्र बांधण्यास सुरूवात केली. रशियाने कोमिन्फार्म, कॉमेकॉन यासारख्या मोठ्या कराराबरोबर अनेक छोटे-छोटे करार करून आर्थिक व तात्वीक सहकार्यातून राष्ट्रांना मदत केली. अमेरिकेच्या मार्शल योजनेला प्रत्युत्तर म्हणून रशियाने मोलोटोव्ह योजनेद्वारे पूर्व युरोपातील राष्ट्रांना आर्थिक व तांत्रिक मदत पुरविली. तर अमेरिकेने पुढाकार घेऊन 'नाटो'ची केलेली स्थापना व नंतर 'पश्चिम युरोपीयन संघ'ची निर्मिती यामुळे रशिया अस्वस्थ झाला. परिणामत: रशियानेही पूर्व युरोपीय राष्ट्रांना एकत्रित करून जो संरक्षण करार केला, त्यास 'वॉर्सा करार' असे म्हणतात.

अमेरिकेच्या वर्चस्ववादी वृत्तीला विरोध म्हणून डिसेंबर १९५४ मध्ये रशियाने आपल्याच देशातील मास्को मध्ये बल्गेरिया, हंगेरी, अल्बानिया, पूर्व जर्मनी, पोलंड, रूमानिया, सोव्हिएट रशिया व झेकोस्लाव्हाकीया या आठ देशांची बैठक बोलाविली. या बैठकीत अमेरिकेचे साम्यवादी विरोधी धोरण, जगातील वाढता प्रभाव आणि रशिया व पूर्व युरोपला असणारा धोका यासंबंधी चर्चा करण्यात आली. यातूनच पुढे ११ ते १४ मे १९५५ रोजी पोलंडची राजधानी वॉर्सा या ठिकाणी बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत सर्व आठ राष्ट्रांनी सहभाग घेऊन सुरक्षा, मैत्री, सहकार्य आणि परस्पर मदत यावर सखोल चर्चा होऊन या सर्व राष्ट्रांनी वॉर्सा येथील करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या घटनेस वॉर्सा करार असे म्हटले जाते.

## ❑ वॉर्सा करारातील महत्त्वाची कलमे :-

वॉर्सा करारातील ध्येये व उद्दिष्ट्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या तरतुदीनुसारच केली असून आंतरराष्ट्रीय शांतता, मैत्री, सहकार्य राखण्यासाठीच वॉर्सा करारातील कलमे ठरविण्यात आली असे सांगण्यात आले. त्यानुसार कलमे खालील प्रकारे :-

१) वॉर्सा करारातील सदस्य राष्ट्रांमधील संघर्ष, समझोता व शांततेच्या मार्गाने सोडविण्यात येतील.

२) या करारानुसार सदस्य राष्ट्राचे एक संयुक्त लष्करी दल उभारण्यात येईल.

३) करारातील सदस्य राष्ट्रांपैकी कोणत्याही एका राष्ट्रांवर जर शत्रू राष्ट्राने हल्ला केला, तर तो हल्ला हा वॉर्सा करारातील सर्व राष्ट्रांवरील हल्ला समजून तो परतवून लावण्यासाठी सामूहीक विरोध करण्यात येईल.

४) आंतरराष्ट्रीय शांततेचा भंग होऊ नये म्हणून सदस्य राष्ट्रांनी शस्त्रास्त्रांचा वापर टाळावा.

५) या करारातील सदस्य राष्ट्रे कराराविरोधी इतरांशी किंवा एकमेकांमध्ये तह/करार करणार नाहीत.

६) सभासद राष्ट्रांनी वॉर्सा करानुसार राष्ट्रांतर्गत हस्तक्षेप करू नये तसेच परस्परांमध्ये आर्थिक व सांस्कृतिक सहकार्य भावना ठेवावी.

७) वॉर्सा करारात सामील झालेल्या राष्ट्रांना वीस वर्षांची मुदत निश्चित केली.

८) एखाद्या सभासद राष्ट्राला या करारातून बाहेर पडावयाचे असेल तर अगोदर एक वर्ष सूचना द्यावी, असेही कलम तयार करण्यात आले.

वॉर्सा कराराच्या अंमलबजावणीसाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्या. त्यानुसार राजकीय सल्लागार समिती, सभासद राष्ट्रांचे संयुक्त सेनादल, सचिवालय, आंतरराष्ट्रीय संबंध व राजकीय धोरणावर चर्चा करण्यासाठी स्थायी कमिशन नेमण्यात आले. याद्वारे कामकाज पार पाडण्याची यंत्रणा उभी करण्यात आली. वॉर्सा कराराचे मुख्य कार्यालय 'मॉस्को' या ठिकाणी निश्चित झाले.

## ❑ वॉर्सा कराराचे महत्त्व व कामगिरी :-

अमेरिकेने जागतिक प्रभुत्व मिळविण्यासाठी नाटो, सिटो, सेंटों यासारखे करार करून जगावर अप्रत्यक्ष-प्रत्यक्षपणे आपले प्रभुत्व मिळविले होते. या पार्श्वभूमीवर रशियाने साम्यवादी विचारधारा असणाऱ्या राष्ट्रांना एकत्र करून केलेल्या वॉर्सा कराराला महत्त्व प्राप्त झाले. हा करार म्हणजे पूर्वी साम्यवादी तत्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी रशियाने जी कोमिन्फॉर्म संघटना स्थापन केली होती त्याची सुधारित आवृत्ती म्हणजे हा करार होता. या कराराअंतर्गत १९६० ते १९६७ या काळात लष्कराचे आधुनिकीकरण करून साम्यवादी देशांमध्ये शस्त्रबळ वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले.

वॉर्सा करारामुळे रशियाने देशोदेशी आपले हस्तक पेरून त्या देशात साम्यवादी क्रांती घडविण्यासाठी प्रोत्साहन दिले. या करारातील राष्ट्रांवर रशियाचा खूप मोठा दबाव होता. त्यामुळे करारातील सभासद राष्ट्रांना रशियाच्या प्रत्येक सुचनेचा व निर्णयाचा स्विकार करावा लागत होता. वास्तविक पाहता लालचीन वार्सा करारात सभासद नसतानाही केवळ रशियाशी असलेल्या मैत्रीमुळे वारंवार करारातील राष्ट्रांमध्ये हस्तक्षेप करीत होता, त्यावर रशिया नियंत्रण घालत नव्हता. लालचीनप्रमाणेच उत्तर कोरियाने करारात सभासद नसताना हस्तक्षेप करायला प्रारंभ केला.

रशियाने तर वॉर्सा करारानुसार सभासद राष्ट्रांमध्ये हस्तक्षेप करू नये असे असतानाही कराराचा भंग करून सन १९५६ मध्ये हंगेरी या राष्ट्रामध्ये सैन्य घुसवून तेथील स्वातंत्र्य चळवळ दडपून टाकली. रशियाच्या या अतिरेकी कारवाईमुळे जनमत प्रक्षुब्ध झाले व सर्व स्तरातून रशियावर टिका होवू लागली. वास्तविक पाहता रशियाने आपला साम्यवादाचा प्रभाव टिकून राहावा या उद्देशाने ही कारवाई केली होती.

थोडक्यात रशियाने कराराच्या सुरूवातीलाच करार मोडला. तरीही पुढील काळात वॉर्सा करारातील सभासद राष्ट्रांनी बर्लिन प्रश्नावर तोडगा सुचविला होता. या करारामुळे लष्कराचे आधुनिकीकरण झाले. १९६० साली ख्रुश्चेव्ह यांनी नवे लष्करी धोरण जाहीर करून जुनी लढावू पध्दत बंद करून सैन्य संख्येतही कपात केली तर दुसरीकडे अण्वस्त्रे, दूर पल्ल्याची क्षेपणास्त्रे निर्माण करण्यावर भर दिला. रशिया-चीन यांच्यामध्ये कटुता निर्माण झाल्यामुळे रशियाने आपल्या धोरणात बदल करून करारातील साम्यवादी राष्ट्रांमध्ये व पूर्व युरोपीय देशात राजकीय एकसंघता टिकविण्यासाठी रशियाने वॉर्सा कराराच्या माध्यमातून प्रयत्न केले.

या करारामुळे युरोपचे लष्करीदृष्ट्या दोन भागामध्ये विभाजन झाले. एकमेकांविरुध्द तयार करण्यात आलेल्या संरक्षण योजनामुळे आंतरराष्ट्रीय शांतता धोक्यात आली. रशिया व अमेरिका या राष्ट्रांनी अशा कराराच्या माध्यमातून जगाचे विभाजन करून अशांतता निर्माण केली. पुढे १९६६ साली वॉर्सा करारातील राष्ट्रांची बुखारेस्ट येथे झालेल्या राजकीय सल्लागार समितीच्या बैठकीत वॉर्सा-नाटो विसर्जित करून जर्मनीशी शांतता तह करण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु यास अमेरिकेने पाठिंबा न दिल्याने शीतयुध्द सुरूच राहिले.

## १.२.१.६ शीतयुध्द समाप्ती :-

दुसऱ्या महायुध्दानंतर जगावर आपले प्रभुत्व निर्माण व्हावे यासाठी अमेरिका व सोव्हिएत रशिया या देशांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण केलेली अशांतता शीतयुध्दास कारणीभूत ठरली. या दोन सत्तांनी भांडवलशाही व लोकशाही विरुध्द साम्यवाद या विचाराचा जगात प्रसार करताना जगाचे दोन गटात विभाजन होईल असे पाहिले. यासाठी जगातील समविचारी राष्ट्रांना आपल्या गोटात ओढण्याचे काम या राष्ट्रांनी केले. परंतु याचवेळी या दोन्ही गटात सामील न होता अलिप्त राष्ट्र संघटनेच्या रूपाने तिसरी शक्ती निर्माण झाली व याचे नेतृत्व भारताने केले. यामुळे रशिया-अमेरिकेच्या प्रभुत्ववादाला शह बसला. दुसरे म्हणजे या दोन्ही राष्ट्रांनी जे लष्करी करार (नाटो, सिटो, सेंटो, वॉर्सा इत्यादी) घडवून आणले त्या करारात जगातील अनेक राष्ट्रे गुंतून गेली व या छोट्या-मोठ्या राष्ट्रांचा वापर रशिया-अमेरिकेने आपल्या हितासाठी करून घेतला. यामुळे शीतयुध्दाची तीव्रता वाढीस लागली. परंतु काळानुसार झालेल्या परिवर्तनामुळे अमेरिका-रशियाला या संघर्षावर विचार करायला भाग पाडले.

१९६६ साली वॉर्सा करारातील राष्ट्रांनी बुखारेस्ट येथे घेतलेल्या बैठकीत वॉर्सा करार विसर्जित करून युरोपातील लष्करी तणाव कमी व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात आले. तर दुसरीकडे हळूहळू अमेरिकेच्याही लक्षात येऊ लागले की, साम्यवादाला प्रतिबंध घालण्याचा प्रश्न फक्त रशियापुरता मर्यादित राहिला नाही. त्याचे कारण म्हणजे चीन, कोरिया, मलाया या राष्ट्रांमध्ये बलसंपन्न झालेला साम्यवाद रोखणे अवघड आहे. तसेच अलिप्त राष्ट्र संघाच्या रूपाने जगात तिसऱ्या शक्तीचा झालेला उदय यामुळे अमेरिकेने धोरण बदलत गेले. पुढे १९८९ मध्ये पूर्व युरोपातील अनेक देशांमध्ये साम्यवादी सरकारे कोसळली. तसेच १९९१ मध्ये सोव्हिएत रशियाचे विघटन झाले. यामुळे रशियाची शक्ती कमी झाली. त्यानंतर दोन्ही राष्ट्रांनी सुरू केलेले

शीतयुध्द संपवण्याचे दिशेने पावले उचलली. त्याच्याच भाग म्हणून अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश व रशियाचे अध्यक्ष बोरिस येल्सीन यांनी दोन्ही देशामधील शीतयुध्द संपल्याची घोषणा केली.

### स्वयं-अध्ययन प्रश्न-१

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. सन १९४७ नंतरच्या जागतिक ताण-तणावाच्या परिस्थितीबाबत 'शीतयुध्द' हा शब्द ............ यांनी वापरला.

*(अ) बर्नाड बरूश* *(ब) स्टॅलिन* *(क) हॅरी ट्रुमन* *(ड) जॉन मार्शल.*

२. भांडवलशाहीचा पुरस्कार ............ या देशाने केला.

*(अ) इंग्लंड* *(ब) चीन* *(क) अमेरिका* *(ड) रशिया.*

३. नाटो (NATO) या संघटनेची स्थापना ........... साली झाली.

*(अ) १९४८* *(ब) १९४९* *(क) १९५०* *(ड) १९५१.*

४. मार्शल योजना तयार करणारे जॉन मार्शल हे अमेरिकेचे .............. होते.

*(अ) अध्यक्ष* *(ब) अर्थमंत्री* *(क) व्यापारमंत्री* *(ड) परराष्ट्रमंत्री.*

५. वॉर्सा कराराचे मुख्य कार्यालय ............. या ठिकाणी होते.

*(अ) बुखारेस्ट* *(ब) पॅरीस* *(क) वॉर्सा* *(ड) मॉस्को.*

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. दुसऱ्या महायुध्दानंतर जागतिक राजकारणावर प्रभाव टाकू शकणाऱ्या कोणत्या दोन महासत्तांचा उदय झाला.

२. नाटो, सिटो, सेंटो हे करार कोणत्या देशाने घडवून आणले.

३. वॉर्सा करार कोणत्या देशाच्या नेतृत्वाखाली व किती साली झाला.

## १.२.२ संयुक्त राष्ट्र संघ : यश आणि अपयश

विसाव्या शतकात झालेल्या दोन जागतिक महायुध्दानी जग होरपळून निघाले. या युध्दामध्ये झालेला नरसंहार व वित्तहानीमुळे मानवी समाज भयग्रस्त झाला होता. पहिल्या महायुध्दात झालेल्या संहारानंतर जगात निर्माण झालेली अशांतता दूर करून शांततामय सहजीवन निर्माण करण्यासाठी राष्ट्रसंघाची निर्मिती करण्यात आली. परंतु महायुध्द समाप्तीनंतर जेत्या राष्ट्रांनी पराभूत राष्ट्रांवर अपमानास्पद तह लादल्याने राष्ट्रसंघाच्या माध्यमातून सुरू झालेल्या शांतता प्रक्रियेला सुरूंग लागला. राष्ट्रसंघावर प्रभुत्व असणाऱ्या राष्ट्रांनी-जर्मनी, रशिया इत्यादी राष्ट्रांना राष्ट्र संघात सामील करण्याबाबत टाळाटाळ केली याचा परिणाम ज्या हेतूने

राष्ट्रसंघाची निर्मिती झाली, तो शांतता निर्माण करण्याचा हेतू बाजूला राहिला व त्याचे विपरीत परिणाम अल्पावधीतच जगाला भोगावे लागले. पराभूत राष्ट्रामध्ये निर्माण झालेली सूडभावना, विजेत्या राष्ट्रांनी लादलेल्या मानहानीकारक अटी, शस्त्रकपात, फॅसिझमची चालू असलेली वाटचाल, राष्ट्रा-राष्टामधील निर्माण झालेले संशयाचे वातावरण व ताण-तणाव या सर्व घटनांना राष्ट्रसंघाला आवर न घालता आल्याने आपोआपच दुसऱ्या महायुध्दाची पार्श्वभूमी तयार झाली.

जर्मनीवर पहिल्या महायुध्दानंतर लादलेला 'व्हर्सायचा तह' झालेला अन्याय, हिटलरची महत्त्वाकांक्षी वाटचाल, यातून दुसऱ्या महायुध्दाला प्रारंभ झाला. दुसऱ्या महायुध्दाची दाहकता, हिटलरची विजयी वाटचाल यामुळे लोकशाही राष्ट्रांनी एकजूट करून हिटलरच्या शक्तीला आवर घालण्यासाठी विचारविनिमय सुरू झाला. दुसरे महायुध्द सुरू असतानाच जागतिक शांतता व सुरक्षितता निर्माण करण्यासाठी जागतिक पातळीवर एक प्रभावशाली संघटना निर्माण झाली पाहिजे असा विचार पुढे आला व यातूनच संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली.

## १.२.२.१ संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना

हिटलरच्या विजयी घौडदौडीला आवर घालणे, तसेच जागतिक शांतता व सुरक्षितता निर्माण करण्याच्या हेतूने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रॅक्लीन रुझवेल्ट आणि ब्रिटनचे पंतप्रधान विस्टन चर्चिल यांनी अटलांटिक महासागरातील न्यू-फौडलंड बेटाजवळ एका जहाजावर भेट घेऊन सुरू असलेल्या महायुध्दावर चर्चा करून दि. १४ ऑगस्ट १९४१ रोजी आठ कलमी योजना तयार केली, यालाच 'अटलांटिक सनद' असे म्हणतात. या सनदेमुळे संयुक्त राष्ट्रसंघ निर्मितीसाठी आवश्यक असणारी वैचारिक भूमिका तयार झाली. अमेरिकेचे अध्यक्ष फ्रॅक्लीन रुजवेल्ट यांनी या आंतरराष्ट्रीय संघटनेला 'संयुक्त राष्ट्र' हे नाव सुचविले. पुढे दिवसेंदिवस याला अनेक राष्ट्रांकडून पाठिंबा मिळत गेला. त्यावेळी युध्दात शत्रुराष्ट्राविरुध्द एकत्र आलेल्या २६ मित्र राष्ट्रांनी १ जानेवारी १९४२ रोजी या संघटनेस मान्यता दिली. अशारितीने संयुक्त राष्ट्र संघ निर्मितीतील आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले. पुढे ब्रिटनचे पंतप्रधान चर्चिल. अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट आणि रशियाचे प्रमुख स्टॅलिन यांनी सन १९४४ मध्ये 'तेहरान' येथे बैठक घेतली. या बैठकीत संयुक्त राष्ट्रसंघाची निर्मिती करणे व त्यासाठी जनमतांचा पाठिंबा मिळेल अशी घटना तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. याचवर्षी म्हणजे १९४४ मध्ये 'डंबर्टन ओक्स' येथे अमेरिका, ब्रिटन व रशिया या राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी सविस्तर चर्चा करून जागतिक संघटनेचा एक मसुदा तयार केला. या मसुद्यावर फेब्रुवारी १९४५ मध्ये 'याल्टा' येथे भरलेल्या परिषदेत चर्चा व विचारविनिमय होऊन अमेरिका, ब्रिटन, रशिया आदी राष्ट्रांनी सह्या केल्या. यानंतर सॅनफ्रॅन्सिस्को येथे एका परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेसाठी ५० राष्ट्रांना आमंत्रित केले, त्या ५० राष्ट्रांमध्ये भारताचाही समावेश होता. ही परिषद २५ एप्रिल ते २६ जून १९४५ पर्यंत सुरू होती. दोन महिने विविध विषयावर चर्चा होऊन संयुक्त राष्ट्र संघाची सनद तयार होऊन २४ ऑक्टोंबर १९४५ रोजी ५० राष्ट्रांची 'संयुक्त राष्ट्र संघटना' स्थापन करण्यात आली.

### १.२.२.२ उद्दिष्ट्ये

जागतिक शांतता निर्माण करण्याच्या हेतूने स्थापन झालेल्या 'संयुक्त राष्ट्र संघाची' सनद विस्तृत व तपशीलवार आहे. या सनदेत १९ भाग व १११ कलमे असून त्यामध्येच संयुक्त राष्ट्रसंघाची उद्दिष्ट्ये निश्चित केली आहेत, ती पुढीलप्रमाणे :-

१) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकविणे.

२) समान अधिकार आणि स्वयंनिर्णय या तत्वांना मान्यता दिलेल्या राष्ट्रांमधील मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करणे.

३) आंतरराष्ट्रीय पातळीवर आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगती आणि मानवी प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी राष्ट्राराष्ट्रांमध्ये सहकार्याची भावना निर्माण करणे.

४) धर्म, जात, लिंग, भाषा याद्वारे भेदभाव न करता मानवी हक्क व मुलभूत स्वातंत्र्याची जोपासना करणे.

५) आंतरराष्ट्रीय प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शांतता पूर्ण उपाय शोधणे.

वरील उद्दिष्टांच्या आधारे संपूर्ण जगात शांततामय सहजीवन निर्माण करण्याचा प्रयत्न संयुक्त राष्ट्रसंघ करत आहे.

### १.२.२.३ संयुक्त राष्ट्रसंघाचे सभासदत्व

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेतील ३ ते ६ कलमामध्ये सभासदत्व मिळविण्यासाठी अटी दिलेल्या आहे. जगातील कोणत्याही शांतताप्रिय राष्ट्राने संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेचा विचार करून त्यानुसार कर्तव्य पार पाडण्याची जबाबदारी स्विकारावी. जी राष्ट्रे सनदेनुसार कार्य करतील अशा राष्ट्रांना सभासदत्व दिले जात असे. प्रामुख्याने संयुक्त राष्ट्र संघामध्ये मुळ सभासद व स्विकृत सभासद असे विभाजन केले आहे. सन १९४२ च्या अटलांटिक सनदेला मान्यता देणारी व १९४५ च्या सॅनफ्रॅन्सिस्को परिषदेत उपस्थित राहून युनोच्या सनदेला मान्यता देणारी ५० राष्ट्रे ही मूळ सदस्य राष्ट्रे म्हणून ओळखली जातात. तर युनोची सनद मान्य असणाऱ्या राष्ट्रांना युनोचे सदस्य दिले जाते. परंतु यासाठी अशा राष्ट्राला महासभा व सुरक्षा समितीची मान्यता घ्यावी लागते. इंग्लंड, अमेरिका, चीन, रशिया आणि फ्रान्स या पाच बड्या राष्ट्रांना युनोच्या सुरक्षा परिषदेत कायम सदस्यत्व देण्यात आले आह. सध्या युनोमध्ये १९६ राष्ट्रांना सदस्यत्व मिळाले आहे.

### १.२.२.४ संयुक्त राष्ट्रसंघाची रचना :-

संयुक्त राष्ट्रसंघाचे ध्येय व उद्दिष्ट साध्य होण्यासाठी सहा प्रमुख घटकामध्ये रचना करण्यात आली. संयुक्त राष्ट्रसंघ उर्फ युनोच्या सनदेतील तिसऱ्या प्रकरणातील सातव्या परिच्छेदामध्ये महासभा, सुरक्षा

समिती, आर्थिक व सामाजिक समिती, विश्वस्त समिती, आंतरराष्ट्रीय न्यायालय, सचिवालय या प्रमुख घटकाच्याआधारे युनोची कार्यप्रणाली चालविण्यात येते.

## १. महासभा :–

संयुक्त राष्ट्र संघातील सर्व राष्ट्रांना महासभेचे सदस्यत्व मिळते. महासभेतील सर्व राष्ट्रांना समान दर्जा असतो. प्रत्येक सदस्य राष्ट्राला या सभेवर ५ प्रतिनिधी पाठविता येतात. मात्र एका राष्ट्राला एकच मत देण्याचा अधिकार असतो. महासभेचे अधिवेशन वर्षातून एकदाच भरते. साधारणपणे सहा आठवडे या अधिवेशनाचे कामकाज चालते. या सभेमध्ये प्रतिवर्षी आपला नवीन अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सात प्रमुख समित्यांच्या सभापतींची निवड केली जाते. महासभेमध्ये जागतिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी चर्चा करून त्यावर उपाययोजना केली जाते. तसेच जागतिक स्तरावर आर्थिक, सामाजिक सहकार्य वाढविण्यासाठी सूचना, मार्गदर्शन करण्याचा अधिकार महासभेला असतो. नव्या सदस्य होऊ इच्छिणाऱ्या राष्ट्रांना प्रवेश देणे, संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालावर चर्चा करणे, सुरक्षा मंडळ व समकक्ष विभागाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे, विश्वस्त समितीच्या कामकाजावर देखरेख ठेवणे इत्यादी कार्ये महासभा करते. महासभेच्या या कार्यात मदत करण्यासाठी खालील समित्यांची निर्मिती करण्यात आली.

१) राजकीय सुरक्षितता व शस्त्रास्त्र नियंत्रण समिती.

२) आर्थिक व वित्तीय समिती.

३) सामाजिक व मानवता समिती.

४) संरक्षणविषयक समिती.

५) प्रशासकीय व अर्थसंकल्पाबाबत विचार करणारी समिती.

६) कायदेविषयक समिती.

७) राजकीय प्रश्नांवर चर्चा करणारी समिती.

## २. सुरक्षा समिती :–

संयुक्त राष्ट्रसंघातील प्रमुख व महत्त्वाची घटक संस्था म्हणून सुरक्षा समितीकडे पाहिले जाते. संयुक्त राष्ट्रसंघाची संपूर्ण इमारतच या समितीवर अवलंबून आहे. जागतिक शांतता व सुरक्षा राखण्याची जबाबदारी या समितीवर आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, रशिया व चीन या राष्ट्रांना सुरक्षा समितीत कायम सदस्य म्हणून स्थान आहे. या पाच कायम सदस्य असलेल्या राष्ट्रांनी निवडून दिलेल्या सहा सदस्यांना या समितीत घेतले जाते. निवडून आलेल्या सदस्य राष्ट्रांना ह्यांची दोन वर्षाची मुदत संपल्यानंतर पुन्हा निवडणुकीत सहभाग घेता येत नाही. सुरक्षा समितीतील जी पाच राष्ट्रे कायम सदस्य आहेत त्या प्रत्येक सदस्याला 'नकाराधिकार' (Veto Power) दिलेला आहे. यामुळे संयुक्त संघामधील प्रमुख घटक संस्थामध्ये सुरक्षा समितीचे महत्त्व वाढीस लागले आहे.

सुरक्षा समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकविणे. शस्त्र कपात, नि:शस्त्रीकरण, शांततेचा भंग करणाऱ्या राष्ट्राविरुध्द उपाययोजना करणे, राष्ट्रा-राष्ट्रातील शस्त्रास्त्रांची स्पर्धा कमी करणे, विश्व योजनेखाली असलेल्या प्रदेशावर देखरेख करणे इत्यादी बाबी येतात. सुरक्षा समितीचे कामकाज वर्षभर चालू असते. सुरक्षा समितीने घेतलेले सर्व निर्णय संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व राष्ट्रांना पाळावे लागतात. या समितीत भारतास प्रवेश द्यावा असे प्रयत्न अमेरिका व फ्रान्सचे चालू आहेत. त्यात 'चीन' अडथळा आणत आहे.

## ३. आर्थिक व सामाजिक समिती :-

आंतरराष्ट्रीय पातळीवर शांतता निर्माण करावयाचीअसेल तरफकत राजकीय प्रश्न सोडवून चालणार नाही. त्याबरोबरच आर्थिक व सामाजिक विषमता दूर झाली पाहिजे. जगातील अनेक राष्ट्रे, मागासलेली, गरीब व निरक्षर आहेत. अशा राष्ट्रांना जर मुख्य प्रवाहात आणले नाही तर जगात चिरकालीन शांतता लाभणार नाही, ही भूमिका समोर ठेवून संयुक्त राष्ट्र संघाने सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात भरीव योगदान देण्यासाठी या समितीची स्थापना केली. या समितीने गरीब व विकसनशील राष्ट्रातील स्त्रियांच्या समस्या, लोकसंख्या अज्ञान, बाल-कल्याण, मानवी हक्क, दशहतवादास प्रतिबंध, आंतरराष्ट्रीय व्यापार, यावर काम करून उपाययोजना केल्या. या समितीत १८ सभासदांची निवड केलेली असते. महासभा या सभासदांना तीन वर्षाचा कार्यकाल निश्चित करते.

या समितीची वर्षातून २-३ अधिवेशने भरविली जातात. या अधिवेशनातून जगातील सामाजिक, आर्थिक प्रश्नावर चर्चा करून प्रश्नांची सोडवणूक केली जाते. या समितीच्या अंतर्गत आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, आंतरराष्ट्रीय अन्न व कृषी संघटना, जागतिक आरोग्य संघटना, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक, शास्त्रीय व सांस्कृतिक संघटना, जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी इत्यादी उपसमित्याच्या आधारे कार्य केले जाते.

## ४. विश्वस्त समिती :-

दुसऱ्या महायुध्दानंतर जर्मनी, जपान, इटली या देशातील अनेक वसाहती मुक्त झाल्या. या प्रदेशाचा विकास घडवून आणण्यासाठी व त्यांच्यावर देखरेख ठेवण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने 'विश्वस्त योजना' सुरू केली. या योजनेनुसार दुसऱ्या महायुध्दातील पराभूत राष्ट्रांच्या वसाहतींची गळचेपी होऊ नये, लोकांना अंतर्गत स्वायत्तता व स्वातंत्र्य उपभोक्ता यावे यासाठी विश्वस्त समितीच्या माध्यमातून कार्य करण्यात आले. विश्वस्त समितीची बैठक वर्षातून २ वेळा घेण्यात येत असून दरवर्षी एक अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करण्यात येते. या समितीतील सदस्यसंख्या निश्चित नसते. महासभा ३ वर्षांकरिता विश्वस्त समितीतील सदस्यांची निवड करते. या योजनेनुसार कामेरून, टोगोलँड, सोमाली लँड, टांझानिका, मार्शल बेटे, कॅरोलिना, मॅरियाना इ. लष्करीदृष्ट्या महत्त्वाच्या प्रदेशावर विश्वस्त समितीची प्रत्यक्ष देखरेख होती. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शांतता निर्माण करण्यासाठी या समितीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली होती.

## ५. आंतरराष्ट्रीय न्यायालय :-

संयुक्त राष्ट्रसंघटनेची प्रमुख न्यायदान करणारी संस्था म्हणजे आंतरराष्ट्रीय न्यायालय होय. जागतिक स्तरावरील वादग्रस्त प्रश्न व तंटे सोडविण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना केली. या न्यायालयाचे मुख्य कामकाज हॉलंडमधील 'हेग' या ठिकाणी चालते. सुरक्षा समितीच्या शिफारशीने महासभेकडून १५ न्यायाधिशांची निवड केली जाते. त्या न्यायाधिशांना ९ वर्षांची मुदत असते. महासभेने निवडलेल्या १५ न्यायाधिशांकडून न्यायालयाच्या अध्यक्ष व उपाध्यक्षाची निवड ३ वर्षांच्या कालावधीसाठी केली जाते. न्यायाधिशांची निवड करताना त्या व्यक्तीला राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कायद्याचे ज्ञान, पात्रता पाहिली जाते. तसेच एका राष्ट्रातून एकच न्यायाधिश एकावेळी निवडला जातो.

आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय तह-करारांना अर्थ लावणे, राष्ट्रा-राष्ट्रातील तंटे मिटविणे, आंतरराष्ट्रीय पातळीवर अशांतता निर्माण झाल्यास त्यावर तोडगा काढणे इत्यादी कार्य केले जाते. न्यायालयाचे कामकाज, इंग्रजी व फ्रेंच या भाषातून चालविले जाते.

## ६. सचिवालय :-

संयुक्त राष्ट्र संघाचे व्यापक कार्य शिस्तबध्दपणे चालावे म्हणून प्रशासकीय कार्य पाहण्यासाठी सचिवालयाची स्थापना करण्यात आली. सचिवालयाचे दैनंदिन कार्य पाहण्यासाठी सरचिटणीस (Secretary General) ची निवड केली जाते. सरचिटणीस हा सचिवालयाचा प्रमुख असतो. सरचिटणीसाची निवड करण्यासाठी सुरक्षा समिती नाव सुचविते तर महासभेची मान्यता मिळाल्यानंतर सरचिटणीसपदी निवड अंतिम मानली जाते. त्यांचा कार्यकाल हा पाच वर्षाचा असतो. सरचिटणीसाला संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रमुख घटक संस्था असणाऱ्या सर्व समित्यांच्या बैठकीला उपस्थित राहण्याचा अधिकार असतो. तसेच जागतिक शांततेला धोका निर्माण झाल्यास त्याची माहिती सुरक्षा समितीला देण्याची जबाबदारी सरचिटणीसाची असते. महासभेच्या नियमानुसार सचिवालयातील कर्मचाऱ्यांच्या नेमणुका सरचिटणीस करतो. सचिवालय हे संयुक्त राष्ट्रसंघाचे मध्यवर्ती कार्यालय असून ते न्यूयॉर्क येथे आहे. संयुक्त राष्ट्र संघाचे सध्याचे सरचिटणीस (महासचिव) एंटोनियो गुटेरेश हे आहेत. ते पोर्तुगाल या देशाचे असून त्यांची निवड १ जानेवारी २०१७ रोजी झाली. आतापर्यंत ट्रिग्वेली (नार्वे), डाग हॅमरशील्ड (स्वीडन), उ-थांट (म्यानमार), डॉ. कुर्टवाल्डहाईम (ऑस्ट्रिया), पेरेझ द क्यूलर (पेरू), डॉ. ब्रुटस घाली (इजिप्त), कोफी आन्नन (घाना), एंटोनियो गुटेरेश (पोर्तुगाल) यांनी सरचिटणीस म्हणून कार्य केले आहे.

सरचिटणीस यांना वार्षिक अहवाल, अंदाजपत्रक, विविध योजनांची माहिती महासभेला देणे, महासभा व सुरक्षा समितीच्या ठरावांची अंमलबजावणी करणे इत्यादी कार्य करावे लागते. जगभरात विविध राष्ट्रांमध्ये असलेले संघर्ष मिटविण्यासाठी मध्यस्थी करण्यासाठी व आंतरराष्ट्रीय राजकारणात सरचिटणीस महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात.

### १.२.२.५ संयुक्त राष्ट्रसंघाच्या इतर समित्या :-

संयुक्त राष्ट्रसंघाच्या वरील सहा प्रमुख घटक संस्थाशिवाय या घटक संस्थांना सहाय्यभूत ठरतील अशा दुय्यम स्वरूपाच्या संघटना उभारण्यात आल्या. त्यामध्ये विश्व बँक (IBRD), जागतिक आरोग्य संघटना (WHO), आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IFM), आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO), अन्न व शेती संघटना (FAO), आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटना (ICAD), संयुक्त राष्ट्रांची शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटना (UNESCO), आंतरराष्ट्रीय डाकसेवा संघ (CPU), जागतिक ऋतू विज्ञान संघटना (WMO), आंतरराष्ट्रीय दूरध्वनिक्षेपण संघ (ITU), आंतरराष्ट्रीय विकास संघटना (IDA), आंतरराष्ट्रीय वित्तीय महामंडळ (IFC), आंतरराष्ट्रीय जलवाहतूक सल्लागार संघटना (IMCO), आंतरराष्ट्रीय बालकनिधी (UNICEF) अशा अनेक संस्थांच्या आधारे संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्य पाहिले जाते.

### १.२.२.६ संयुक्त राष्ट्र संघाचे कार्य :-

दुसऱ्या महायुद्धाच्या उत्तरार्धात स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्र संघाने आतापर्यंत आंतरराष्ट्रीय पातळीवर भरीव स्वरूपाचे योगदान दिले आहे. प्रारंभापासूनच संयुक्त राष्ट्रसंघाला अनेक अडचणी व प्रश्नांना तोंड द्यावे लागले. त्या सोडविण्यासाठी युनोने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. यामुळे जगाच्या संयुक्त राष्ट्र संघाकडून अपेक्षा वाढल्या. तशा मर्यादा देखील लक्षात आल्या. तरीही संघटनेने आतापर्यंत राजकीय क्षेत्राबरोबर सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात भरीव असे कार्य केले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यात बड्या राष्ट्रांनी वारंवार हस्तक्षेप करून अडचणी निर्माण केल्या. यामुळे युनोच्या कामकाजाला मर्यादा पडत गेली.

#### (i) राजकीय क्षेत्रातील कार्य :-

#### १. कोरियाचा प्रश्न :-

दुसऱ्या महायुध्दाच्या काळात जपानचा पराभव करण्यासाठी अमेरिकेने दक्षिण कोरियावर तर रशिया व चीनने उत्तर कोरियावर वर्चस्व निर्माण केले. पुढे दुसरे महायुध्द समाप्त झाल्यानंतर रशियाने आपले सैन्य तसेच दक्षिण कोरियात ठेवल्याने अमेरिकेने हा प्रश्न संयुक्त राष्ट्र संघात उपस्थित केला. परंतु रशियाने संयुक्त राष्ट्र संघाच्या सुचनेकडे दुर्लक्ष केल्याने उत्तर कोरिया व दक्षिण कोरिया यांच्यामध्ये संघर्षाचे वातावरण निर्माण झाले, याला रशियाने खतपाणी घातले. पुढे दक्षिण कोरिया व उत्तर कोरिया यांच्यामध्ये युध्द सुरू झाले. परंतु हे युध्द युनो (संयुक्त राष्ट्रसंघ) ला थांबविण्यास यश आले. तरीही आजपर्यंत हा प्रश्न सुटलेला नाही.

#### २. इराण :-

दुसऱ्या महायुध्द काळात आपले प्रभाव क्षेत्र निर्माण करण्यासाठी रशियाने इराण व आशियाई प्रदेशात आपले लष्कर घुसविले. दुसऱ्या महायुध्दानंतरही रशियाने इराणमधून सैन्य काढून घेतले नाही. यामुळे इराणने

रशियाची सुरक्षा समितीकडे तक्रार केली. सुरक्षा समितीने पाठपुरावा करून रशियाला आपले सैन्य परत घेण्यास प्रवृत्त केले व ही समस्या सुटली.

### ३. इंडोनेशिया :-

डचांची सत्ता असणाऱ्या इंडोनेशियामध्ये दुसऱ्या महायुध्दानंतर स्वातंत्र्य चळवळी सुरू झाल्या. यामुळे डच सत्ताधिशांनी तेथील जनतेवर जुलूम करण्यास सुरुवात केली, याचा अनेक राष्ट्रांनी निषेध नोंदविला. संयुक्त राष्ट्र संघाने यामध्ये हस्तक्षेप करून हा प्रश्न सामोपचाराने सोडविला. याच पध्दतीने पश्चिम न्यू-गिनी, लेबनॉन, सिरिया. या देशातील संघर्ष सामोपचाराने मिटविण्यास संयुक्त राष्ट्र संघाला यश आले.

### ४. इस्रायल पॅलेस्टाईन संघर्ष :-

इंग्लंड हे राष्ट्र पॅलेस्टाईन प्रदेशाची व्यवस्था विश्वस्त म्हणून पाहत होते. दुसऱ्या महायुद्धानंतर पॅलेस्टाईनचा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी संयुक्त राष्ट्र संघावर आली. सन १९४८ मध्ये पॅलेस्टाईनमधून इस्रायल हे राष्ट्र ज्यू लोकांसाठी निर्माण केले. इस्रायलमध्ये जगातील सर्व ज्यू धर्मीयांना आश्रय मिळाला. इस्रायलच्या रूपाने ज्यू राष्ट्राची निर्मिती होऊनही पॅलेस्टाईनमधील अरबाबरोबर संघर्ष सुरू झाला. या ज्यू-अरब संघर्षामध्ये अरब लोक रहात असलेल्या पॅलेस्टाईनची बाजू बहुतांशी अरब राष्ट्रांनी घेतली तर अमेरिकेने इस्रायलला मदत केली. यामुळे संघर्ष वाढत जाऊन झालेल्या युध्दात इस्रायलने पॅलेस्टाईनचा पराभव करून गाजापट्टी, जॉर्डनच्या पश्चिमघाट, जेरूसलेम व गोलन हाईट्स या प्रदेशावर ताबा मिळविला. पुढे पॅलेस्टाईनमधील नेते यासर अराफत व इस्रायली पंतप्रधान इत्झॉक रॉबीन यांच्यात करार होऊन जिंकलेला प्रदेश सोडावा असे ठरले व शेजारील राष्ट्रांचे सार्वभौमत्व मान्य करण्याचे ठरले. तरीही संयुक्त राष्ट्रसंघाला हा प्रश्न सोडविण्यास पूर्ण यश मिळाले नाही, कारण पॅलेस्टाईन-इस्रायलमध्ये वारंवार संघर्ष झालेले दिसून येतात.

### ५. काश्मीरचा प्रश्न :-

पाकिस्तान आणि भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पाकिस्तानने सीमेवर असणाऱ्या काश्मीरमध्ये आपले सैन्य घुसविले. त्यावेळी काश्मीर संस्थानचा राजा हरिसिंग यांनी भारतात सामील होण्याचा करार करून पाकिस्तानच्या या कृतीपासून वाचविण्यासाठी विनंती केली. भारताने ही विनंती मान्य करून पाकिस्तानी घुसखोरी परतवून लावण्यासाठी भारताने लष्करी कारवाई केली. पुढे काश्मीरचा प्रश्न भारताने इ.स. १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा समितीसमोर मांडला व पाकिस्तानने बेकायदेशीर सैन्य घुसवून आक्रमण केलेचा आरोप केला. परंतु पाकिस्तानने याचा इन्कार केला आणि उत्तर काश्मीरचे भारताने केलेले विलीनीकरण हे कायद्याला धरून नाही असा आरोप केला. पुढे १९४९ मध्ये सुरक्षा समितीने मध्यस्थी करून दोन्ही देशामध्ये युध्दबंदी घडवून आणण्यात यश मिळविले. परंतु काश्मीर प्रश्नावरून भारत-पाक संघर्ष सतत धुमसत राहिला. सन १९६५ मध्ये या प्रश्नावरून युध्द झाले. पुन्हा सुरक्षा समितीने हस्तक्षेप करून युध्दबंदी केली. ताश्कंद करार करून हे युध्द थांबले. यानंतर सन १९७१ ला पूर्व पाकिस्तानातील

यादवी, बांगलादेश निर्मिती, पाकिस्तानच्या दहशतवादी कारवाया, कारगील युध्द. या माध्यमातून आजपर्यंत भारत-पाकिस्तानमध्ये सातत्याने संघर्षमय वातावरण राहिले आहे. यावर संयुक्त राष्ट्र संघाला आजही कायमस्वरूपी तोडगा काढता आला नाही.

याचबरोबर संयुक्त राष्ट्र संघाने जगभरातील अनेक राष्ट्रामध्ये मध्यस्थी करून प्रश्न सोडविले आहेत, तर काही प्रश्न तात्पुरते मिटवण्यात यश मिळविले आहे, ते खालीलप्रमाणे :-

१) ग्रीकचा प्रश्न.

२) सुएजचा पेचप्रसंग.

३) कांगोचा प्रश्न.

४) दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांचा प्रश्न.

५) बर्लिनचा प्रश्न.

६) व्हिएतनामचा प्रश्न.

७) सायप्रसचा प्रश्न.

८) हंगेरीतील पेचप्रसंग.

९) झिंबाब्वेचा प्रश्न.

१०) क्युबाचा पेचप्रसंग.

११) झेकोस्लाव्हायातील पेचप्रसंग.

अशाप्रकारे संयुक्त राष्ट्र संघाने आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक प्रश्नामध्ये यशस्वी करून ते सोडविण्यासाठी प्रयत्न केले. काही राष्ट्रांचे प्रश्न सोडविण्यात संयुक्त राष्ट्र संघाला यश मिळाले तर काही राष्ट्रांमध्ये असणाऱ्या संघर्षात हस्तक्षेप करून त्याची व्याप्ती वाढणार नाही याचीही काळजी घेतली. थोडक्यात, जागतिक शांतता टिकविण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने केलेले कार्य महत्त्वपूर्ण मानावे लागते.

### (ii) अराजकीय क्षेत्रातील कार्य :-

संयुक्त राष्ट्रसंघाने (युनो) राजकीय क्षेत्रातील कार्याबरोबरच अराजकीय क्षेत्रातही आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. त्याचाच भाग म्हणून युनोने सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात भरीव अशी कामगिरी केली आहे. जगातील सर्व लोकांना समान मुलभूत हक्क मिळावेत म्हणून 'मानवी हक्क आयोगाची' स्थापना करण्यात आली. संयुक्त राष्ट्र संघातील महासभा, आर्थिक व सामाजिक मंडळ, विश्वस्त समितीमध्ये मावी हक्क व अधिकारासंबंधी चर्चा घडवून आणली. सन १९५० पासून १० डिसेंबर हा दिवस 'मानवाधिकार दिन' म्हणून जगभर साजरा केला जावू लागला. दुसऱ्या महायुध्द समाप्तीनंतर पुनर्वसन, युध्दोत्तर पुनर्रचना करण्यासाठी युनोने कार्यक्रम राबविले.

मागासलेल्या राष्ट्रांमधील अज्ञान, दारिद्र्य, बेकारीची समस्या मिटावी. त्यांचा आर्थिक विकास व्हावा. प्रश्नांची सखोल माहिती व्हावी यासाठी अभ्यासगटांची निर्मिती करून अभ्यासगटानी दिलेल्या अहवालावर चर्चा करून उपाययोजना केल्या. लोकसंख्यावाढ, आर्थिक पुनर्रचना, प्रदेशनिहाय समस्या याबद्दलची आकडेवारी संकलीत करून ती प्रसिध्द करण्यात आली. यासाठी आंतरराष्ट्रीय बँकांची निर्मिती व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना करून कमकुवत राष्ट्रांना आर्थिक मदत देण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता, मुक्त वातावरणात सार्वत्रिक निवडणूक, अवर्षण, दारिद्र्य, कुपोषण या क्षेत्रात युनोने उल्लेखनीय कार्य केले आहे.

## १.२.२.७ संयुक्त राष्ट्र संघाचे यशापयश :-

दुसरे महायुद्ध सुरू असतानाच युध्दाची तीव्रता आणि होत असलेली प्राण व वित्तहानी पाहून जगातील इंग्लंड, अमेरिकेसारख्या राष्ट्रांनी जागतिक स्तरावर समन्वय राखण्यासाठी एक संघटना उभारली जावी यासाठी प्रयत्न केले. यातून संयुक्त राष्ट्रसंघाची निर्मिती झाली. पहिल्या महायुध्दानंतर जागतिक शांततेसाठी निर्माण केलेल्या राष्ट्रसंघाच्या तुलनेत संयुक्त राष्ट्र संघाचे स्वरूप अधिक व्यापक बनविण्यात आले. या संघटनेने गेल्या ७३-७४ वर्षात जे कार्य केले त्याचे यशापयश पाहणे आवश्यक ठरते.

जगामध्ये राजकीयदृष्ट्या शांतता व सुरक्षितता निर्माण करण्याबरोबरच आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या राष्ट्रांच्या प्रगतीसाठी सतत प्रयत्नशील राहण्याचे, ध्येयधोरण संघटनेने ठरविलेले आहे. जगातील विविध देशांमध्ये कोणत्यातरी कारणामुळे सातत्याने संघर्ष होत असतात, या संघर्षातून जागतिक युध्द भडकण्याची शक्यता असते. अशाप्रसंगी संयुक्त राष्ट्र संघटनेची मध्यस्थी उपयोगी पडते व संघर्ष चालू असणाऱ्या राष्ट्रांमध्ये तडजोड घडवून आणली जाते. हे संयुक्त राष्ट्र संघाचे यशच मानावे लागेल. ईस्राईल, काश्मीर. कोरिया, क्युबा, इंडोनेशिया, बर्लिन, हंगेरी अशा ठिकाणचे संवेदनशील प्रश्न आजही संयुक्त राष्ट्र संघटनेसमोर आहेत. बऱ्याचवेळा या प्रश्नावरून युद्धमय परिस्थितीही तयार होते. अशावेळी कधी दोन्ही राष्ट्रांवर दडपण आणून तर कधी दोन्ही राष्ट्रामध्ये समेट घडवून विकोपाला जाणारा संघर्ष रोखण्याचे काम युनोने केले आहे. या संघटनेने जगातील पाच कायम सदस्य राष्ट्रांना सुरक्षा समितीत नकाराधिकाराचा (Veto) अधिकार दिला. याबाबत जगभरातून युनोवर टिका केली जाते. त्याचे कारण म्हणजे इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स व रशिया व चीन या सुरक्षा समितीतील कायम सदस्य असणाऱ्या राष्ट्राच्या मतानुसार संयुक्त राष्ट्र संघाची कार्यप्रणाली चालते. त्यामुळे जगातील अनेक छोट्या-मोठ्या राष्ट्रांवर अन्याय होतो. त्यांच्या प्रश्नाला फारसे महत्त्व दिले जात नाही असा आरोप जगातील बहुतांश राष्ट्रे करतात. यासाठी जगातील राष्ट्राचे प्रश्न असोत किंवा राष्ट्रा-राष्ट्रांतील संघर्षातून चिघळलेली परिस्थिती असो; अशा प्रसंगी सुरक्षा समितीतील या पाच राष्ट्रांनी तटस्थपणे भूमिका घेऊन संघर्ष मिटविण्यासाठी मदत केली पाहिजे, अशी अपेक्षा जगातील राष्ट्रांची आहे. बऱ्याचवेळा जगातील बडी राष्ट्रे सत्तेच्या राजकारणासाठी व आपली प्रभावक्षेत्रे वाढविण्यासाठी अनेक लहान-मोठ्या राष्ट्रांमध्ये हस्तक्षेप करून त्यांना आपल्या प्रभावाखाली

आणण्याचा प्रयत्न करतात. अशा राजकारणावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य संयुक्त राष्ट्र संघ करीत आहे, यातून संघाचे (युनो) महत्त्व आपणाला समजते.

युनोने मानवी हक्क संरक्षणाला प्राधान्य देवून अखिल मानवजातीच्या विकासासाठी प्रयत्न केला आहे. राजकीय स्वातंत्र्य, स्वयंनिर्णयाचा हक्क मिळण्यासाठी बहुमोल कार्य केले आहे. तसेच सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात युनोने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. हे संयुक्त राष्ट्र संघाचे यशच मानावे लागेल.

संयुक्त राष्ट्रसंघाने मिळविले वरील यश हे प्रशंसनीय असले तरी अण्वस्त्र निर्मिती, शस्त्रास्त्र स्पर्धा, बड्या राष्ट्रांचा जागतिक राजकारणातील हस्तक्षेप रोखण्यास युनोला काही अंशी अपयश आले आहे. राष्ट्रा-राष्ट्रातील तणाव तात्पुरते रोखण्यास युनोला यश मिळाले असले तरी त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यात मात्र युनोला मर्यादा पडल्या आहेत. उदा. पॅलेस्टाईन-इस्राईल संघर्ष, भारत-पाकिस्तानमधील काश्मीर प्रश्न, दक्षिण व उत्तर कोरियामधील संघर्ष इत्यादी.

अशाप्रकारे संयुक्त राष्ट्र संघाने (युनो) स्थापनेपासून शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले. परंतु आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्वच समस्या सोडविणे युनोला जमले नाही. याचे प्रमुख कारण बड्या राष्ट्रांचे महत्त्वाकांक्षी धोरण आणि त्यांचे युनोवर असलेला प्रभाव आहे. परंतु दुसऱ्या महायुध्दानंतर जागतिक स्तरावर युनोसारखी संघटना निर्माण झाली नसती तर आंतरराष्ट्रीय पातळीवर नेमक्या काय अघटीत घटना घडल्या असत्या याची कल्पना करणे अशक्य आहे. या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र संघटनेचे यशापयश आपणाला चांगले लक्षात येईल.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-२

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना ............... रोजी करण्यात आली.

*(अ) २२ ऑक्टोबर १९४५* *(ब) २३ ऑक्टोंबर १९४५*

*(क) २४ ऑक्टोबर १९४५* *(ड) २५ ऑक्टोंबर १९४५.*

२. संयुक्त राष्ट्र संघाच्या सनदेत .......... भाग व ........... कलमे आहेत.

*(अ) १७ व ११०* *(ब) १८ व १११* *(क) १९ व १११* *(ड) २० व १११.*

३. संयुक्त राष्ट्रसंघाचे संघाचे मध्यवर्ती कार्यालय ........... येथे आहे.

*(अ) पॅरीस* *(ब) न्यूयॉर्क* *(क) वॉशिंग्टन* *(ड) हॉलंड.*

४. संयुक्त राष्ट्र संघाच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे कामकाज ............ या देशातून चालते.

*(अ) अमेरिका* *(ब) हॉलंड* *(क) इंग्लंड* *(ड) जर्मनी.*

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कोणत्या राष्ट्रांना संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेत कायम सदस्यत्व देण्यात आले.

२. संयुक्त राष्ट्र संघाचे सरचिटणीस उ-थॉट हे कोणत्या राष्ट्रांचे होते.

३. अटलांटिक सनद तयार करण्यासाठी कोणत्या दोन प्रमुख राष्ट्रांनी सहभाग घेतला होता.

४. कोणत्या दिवशी संयुक्त राष्ट्र संघाच्यावतीने 'मानवाधिकार दिन' सर्व जगभर साजरा केला जातो.

## १.२.३ अलिप्त राष्ट्र संघटना (Non-aligned Movement)

दुसऱ्या महायुद्धानंतर संपूर्ण जग भांडवलशाही आणि साम्यवाद अशा दोन गटात विभागले गेले. या दोन्ही गटातील राष्ट्रांनी नाटो, वॉर्सा कराराच्या रूपाने लष्करी सामर्थ्य उभा करून संघर्षमय परिस्थिती निर्माण केली. याच आंतरराष्ट्रीय संघर्षाला शीतयुध्दाचे स्वरूप प्राप्त झाले. अमेरिका व सोव्हिएत रशिया या दोन्ही सत्तामध्ये परस्परविरोधी वैचारिक भिन्नता असल्यामुळे जगातील नवीन स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना आपल्या गोटात ओढण्याचा प्रयत्न अमेरिका व सोव्हिएत रशिया करत होते. या दोन महासत्तांच्या गटातील शत्रुत्वामुळे जागतिक शांततेला धोका निर्माण झाला. अशा परिस्थितीत नवोदित स्वतंत्र राष्ट्रांनी स्वत:च्या सर्वांगीण विकासासाठी या दोन्ही गटात सामील न होता वेगळे (अलिप्त) राहण्याचा निर्णय घेतला, त्याला अलिप्त राष्ट्रांची चळवळ असे म्हटले जाते.

### १.२.३.१ अलिप्तता अर्थ व स्वरूप :-

अलिप्ततावाद म्हणजे तटस्थता नव्हे तर आंतरराष्ट्रीय क्षेत्रात लष्करी स्वरूपाच्या आणि गटातटाच्या राजकारणापासून अलिप्तता स्विकारणे होय. कुणाचीही बाजू न घेता युध्द प्रभावित राष्ट्रापासून अलिप्त राहून तटस्थता स्विकारणे, युध्दात सहभागी न होणे, कोणत्याही प्रबळ राष्ट्राने निर्माण केलेल्या संरक्षण गटात सामील न होणे, तसेच शांतता टिकविण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटना, लवाद, मध्यस्थ, वाटाघाटी आणि तडजोड या मार्गाचा वापर करणे यालाच अलिप्ततावादाचे धोरण म्हटले जाते. पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी अलिप्ततावादाचे धोरण स्पष्ट करताना म्हटले आहे की, ''कोणत्याही राष्ट्राचे अंकित म्हणून न राहता, आम्ही एक स्वतंत्र राष्ट्र या नात्याने आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभागी होऊ, आम्ही सत्तागटाच्या राजकारणापासून अलिप्त राहू इच्छितो. अमेरिका व रशिया या महासत्तांच्या गटामध्ये सामील न होता जागतिक व्यासपीठावर भारतास सन्मानाचे स्थान मिळविता येईल.'' पंडित नेहरूच्या या विचारावरून त्यांनी अलिप्ततावादाची बीजे पेरलेली दिसतात.

अलिप्ततावादाचा अर्थ जागतिक स्तरावर विविध राजनितीज्ञांनी वेगवेगळा घेतला आहे. पिटर लॉयन यांच्या मते, 'राजकीय तटस्थता म्हणजे दोन गटामध्ये जेव्हा संघर्ष होत असतो तेव्हा तिसरा गट किंवा राष्ट्र त्यांच्यापैकी कोणाचीही बाजू घेत नाही, परंतु अलिप्तता याचा अर्थ वेगळा आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात

अलिप्ततावादी देश महत्त्वपूर्ण भूमिका बजावीत असतात. जॉर्ज सिस्का, व्ही.के. कृष्णमेनन यांनी 'अलिप्ततावाद' असा उल्लेख केला आहे. अलिप्तवादाचा सरळ अर्थ असा आहे की, विविध शक्ती गटापासून तटस्थ अथवा दूर राहून आपले स्वतंत्र निर्णय, धोरण आणि राष्ट्रीय हित पाहून योग्य व न्याय बाजू असणाऱ्या राष्ट्रांना मदत करणे. अलिप्तता म्हणजे कृतीहीन तटस्थ राष्ट्रांची भूमिका नव्हे तर आंतरराष्ट्रीय घडामोडीत रस घेऊन सक्रीय मदत करणारे गतिमान धोरण म्हणून अलिप्ततावादाकडे पाहिजे जाते. देशाच्या स्वातंत्र्याला धोका पोहोचण्याची शक्यता असल्यास सुरक्षिततेचा उपाय म्हणून अलिप्ततावादाची मूलभूत चौकट कायम ठेवून गरजेनुसार धोरणात बदल करणे.

भारतासारख्या असंख्य नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना स्व-विकासासाठी शांततेची गरज होती. अशा स्थितीत देशहित व शांततेकरिता अलिप्तता आवश्यक होती. त्याचे प्रमुख कारण म्हणजे एखाद्या राष्ट्रगटांशी संलग्नता वाढविली तर दुसऱ्या राष्ट्रगटाचे शत्रुत्व पत्करल्यासारखे होईल असे घडणे शांततेच्या दृष्टीने उपकारक ठरणार नव्हते. त्यामुळे सर्व राष्ट्र गटांशी सलोख्याचे, मैत्रीचे व सहकार्याचे संबंध निर्माण करून त्याचा वापर शांतता टिकविण्यासाठी करणे हे अलिप्ततावादाचे मुख्य ध्येय होते.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाचा भाग म्हणून अलिप्ततावादाचा पुरस्कार केला. पुढे या अलिप्ततावादी चळवळीत आफ्रो-आशियाची राष्ट्रांबरोबर इतर राष्ट्रांनीही सहभाग घेतला. यामुळे तिसऱ्या जगाच्यारूपाने भक्कमपणे अलिप्ततावादी चळवळ उभी राहिली. अलिप्ततावाद म्हणजे केवळ तटस्थ अथवा अलिप्त राहणे नसून भारताने स्वातंत्र्यानंतर जगातील प्रमुख देशांशी राजनैतिक संबंध जोडले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यप्रणालीत भारताने सक्रीय सहभाग घेतला. राष्ट्रकुलाचे सदस्यत्व घेण्याबरोबरच आफ्रो-आशियाई संघटनात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली या सर्व कृतीवरून भारताने अलिप्तता म्हणजहे तटस्थता नाही तर प्रसंग व गरजेनुरूप कृतीप्रवण अलिप्तता धोरण असले पाहिजे हे भारताने सिध्द करून दाखविले.

## १.२.३.२ अलिप्त राष्ट्र चळवळीची वैशिष्ट्ये :-

आंतरराष्ट्रीय पातळीवर दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिका व सोव्हिएत रशियाच्या गटात न जाता अलिप्ततावादी धोरण स्वीकारावे आणि स्व विकास साधावा हे अलिप्ततावादाचे प्रमुख सूत्र होते. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी अनेकवेळा अलिप्ततावादी धोरणाचा अवलंब करून जगातील गटा-तटाच्या राजकारणात आपला देश ओढला जाणार नाही याची काळजी घेतली. त्या अनुषंगाने अलिप्ततावादाचे धोरण आखणे महत्त्वाचे होते. अलिप्ततावादी चळवळीची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :-

१) लष्करी करार व लष्करी संघटना यापासून अलिप्त राहणे.

२) शांततेच्या धोरणाचा पुरस्कार करणे.

३) स्वातंत्र्य व सार्वभौमत्व यावर आधारीत धोरण आखणे.

४) प्रसंगानुरूप कारवाई करण्याचे स्वातंत्र्य असणारे धोरण तयार करणे.

५) सहकार्य व सहजीवनाचे धोरणाचा अवलंब करणे.

६) आपल्या राष्ट्रभूमीवर परराष्ट्रांना लष्कळी तळ उभारण्यास परवानगी न देणे.

७) राष्ट्रीय स्वातंत्र्याकरिता निरनिराळ्या राष्ट्रात चालू असलेल्या चळवळींना प्रोत्साहन व पाठिंबा देणे.

८) निर्भयतेचे धोरण स्विकारणे.

वरील वैशिष्ट्यांच्या आधारे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्विकारलेल्या 'अलिप्ततावादी' धोरणावर आंतरराष्ट्रीय पातळीवर १९५५ च्या बाडुंग परिषदेत चर्चा होऊन परिषदेत सर्व सहभागी राष्ट्रांनी नेहरूंच्या धोरणाला पाठिंबा दिला.

## १.२.३.३ अलिप्ततावाद व पंचशील

पंडित जवाहलाल नेहरू हे जागतिक शांतता निर्माण करणयासाठी प्रयत्न करणारे नेते होते. आंतरराष्ट्रीय राजकारणात सहकार्य, सामंजस्य व सहिष्णुतेचे वातावरण निर्माण होऊन तडजोड वृत्ती वाढावी, यासाठी नेहरू प्रयत्नशील होते. याच पार्श्वभूमीवर सन १९५४ मध्ये पंडित नेहरूनी कोलंबो (श्रीलंका) येथील भाषणात 'पंचशील' तत्त्वावर आधारलेल्या अलिप्ततावादी चळवळीची संकल्पना मांडली. ती पंचशील तत्त्वे खालीलप्रमाणे :-

१) प्रादेशिक अखंडता.

२) अनाक्रमण.

३) हस्तक्षेप न करणे.

४) समानता.

५) शांततामय सहजीवन.

या पाच तत्त्वांच्या आधारे आंतरराष्ट्रीय राजकारणात सुरक्षितता व शांतता निर्माण करेल असा नेहरूना विश्वास वाटत होता. या पाच तत्त्वांच्या अंतर्भाव. प्रथमच एप्रिल १९५४ मध्ये भारत व चीन या राष्ट्रांमध्ये तिबेटसंबंधी झालेल्या करारात केला गेला. १७ ऑक्टोबर १९५४ रोजी व्हिएतनामचे अध्यक्ष हो-ची-मिन्ह व १९५५ मध्ये युगोस्लाव्हिया या राष्ट्राने पंचशील तत्वांना मान्यता दिली. पुढे एप्रिल १९५५ पर्यंत चीन, नेपाळ, ब्रम्हदेश, लाओस कम्बोडिया या देशांनीही पंचशील तत्वांना पाठिंबा दिला. नवी दिल्ली येथे एप्रिल १९५५ मध्ये भरलेल्या आशियाई देशांच्या परिषदेला २०० प्रतिनिधी हजर होते. या सर्व प्रतिनिधींनी या तत्त्वांना पाठिंबा दिला. तर सन १९५५ मध्ये ऑस्ट्रेलिया, ऑस्ट्रिया व पोलंड या राष्ट्रांनीही पंचशील तत्वांना मान्यता दिली. थोडक्यात पंडीत नेहरूंच्या पंचशील तत्त्वांचा स्विकार जागतिक सहकार्य व शांतता टिकविण्यासाठी जगातील बहुतांशी राष्ट्रांनी केला.

## १.२.३.४ बाडुंग परिषद (१९५५)

सन १९५४ मध्ये कोलंबो येथे आफ्रो-आशियाई राष्ट्रांच्या परिषदेत पंडीत नेहरूंनी 'पंचशील' तत्त्वाचे महत्त्व सांगून सर्व सहभागी राष्ट्रांनी पंचशील तत्त्वांना मान्यता द्यावी असे आवाहन केले होते. त्याप्रमाणे पुढील काळात अनेक आफ्रो-आशियाई राष्ट्रांनी या पंचशील तत्त्वांना मान्यता दिली. कोलंबो परिषदेवेळी इंडोनेशिया नुकताच डच वर्चस्वातून स्वतंत्र झाला होता. इंडोनेशिया या नव्या स्वतंत्र राष्ट्राचे नेतृत्व डॉ. सुकार्नो यांच्याकडे आले होते. जागतिक स्तरावर आपला व देशाचा प्रभाव वाढावा या हेतूने डॉ. सुकार्नो यांनी आफ्रो-आशियाई राष्ट्राची पुढील परिषद इंडोनेशियातील बाडुंग या ठिकाणी व्हावी, अशी इच्छा व्यक्त केली. त्यानुसार १८ एप्रिल १९५५ रोजी आफ्रो-आशियाई राष्ट्राची परिषद 'बाडुंग' या ठिकाणी भरली. आशिया खंडातील २३ व आफ्रिका खंडातील ०६ राष्ट्राचे प्रतिनिधी परिषदेला हजर होते. ऑस्ट्रेलिया या देशास या परिषदेला 'निरीक्षक' म्हणून उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली. पाश्चिमात्य राष्ट्रांच्या वसाहतवादी प्रवृत्तीला संपविणे हे प्रमुख उद्दिष्ट बांडुश परिषदेचे होते. त्या अनुषंगाने परिषदेचे काम सुरू झाले. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी परिषदेतील उपस्थित २९ (२३+६) राष्ट्रांना पंचशील तत्त्वे स्विकारण्याचे आवाहन केले. बहुतांशी राष्ट्रांनी पंचशील तत्वे स्विकारण्याचे आवाहन केले. बहुतांशी राष्ट्रांनी पंचशील तत्वांना मान्यता दिली. मात्र पाकिस्तानने विरोधकाची भूमिका घेतली. पंचशील तत्वाचा स्विकार म्हणजे भारताच्या जागतिक भूमिकेला पाठिंबा असा क्षुद्र विचार पाकिस्तानने केला होता. याचे प्रमुख कारण म्हणजे भारत व पाकिस्तान स्वतंत्र झाल्यापासून भारताला पाकिस्तानने प्रथम क्रमांकाचा शत्रू मानले होते. यावेळी बहुसंख्य मुस्लीम असलेल्या इंडोनेशिया या राष्ट्रानेही पाकिस्तानच्या भूमिकेला पाठिंबा देत पंचशीलमधील पाच तत्त्वाऐवजी आणखी काही तत्त्वांचा त्यात समावेश असावा अशी मागणी केली. शेवटी बाडूंग परिषदेत विचार विनिमय होऊन पंचशीलमधील शांततामय सहजीवन' हे तत्त्व वगळून आणखी काही तत्वांचा समावेश करून दहा तत्त्वे निश्चित करण्यात आली यालाच 'दशशील' म्हणून ओळखले जाते. ती खालीलप्रमाणे :-

### ❑ बांडुंगचे दशशील :-

१) मुलभूत मानवाधिकार आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या घटनेतील उद्दिष्टांचे पालन करणे.

२) सर्व राष्ट्राचे सार्वभौमत्व व प्रादेशिक अखंडत्व यांचा आदर करणे.

३) प्रत्येक राष्ट्राने परस्परांमध्ये हितसंबंध व समानता राखावी.

४) प्रत्येक देशाच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे.

५) कोणत्याही राष्ट्राने स्वत:हून आक्रमण न करणे.

६) प्रत्येक देशाने अथवा सामुदायिक राष्ट्र संरक्षणाचा हक्क प्राप्त करणे.

७) कोणत्याही राष्ट्रांच्या दबावाशिवाय कोणत्याही करारात सामील होण्याचे स्वातंत्र्य मान्य करणे.

८) स्वदेश हितासाठी गुप्त करारात सामील होण्याचे स्वातंत्र्य मान्य करणे.

९) आंतरराष्ट्रीय संघर्षाची सोडवणूक शांततामय मार्गाने करणे.

१०) प्रत्येकाने न्याय व आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्यांचा आदर करावा.

वरील दहा तत्त्वाच्या आधारे आंतरराष्ट्रीय पातळीवर शांतता निर्माण करून सहकार्याची भावना वाढीस लावण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. या तत्वान्वये प्रत्येक राष्ट्राने मुलभूत विचारसरणी समजावून घेऊन प्रादेशिक एकात्मता व सार्वभौमत्वाचा आदर केला पाहिजे. तसेच परस्परांचे हित व समानता यावर विशेष भर देण्यात आला होता. पंडीत नेहरूचे अलिप्ततावादाचे धोरण आदर्शवादावर आधारले होते असे नव्हे तर राष्ट्रहितासाठी गरज पडेल तेव्हा त्यामध्ये लवचिकता आणण्यात आली होती. उदाहरणार्थ १९६२ च्या भारत-चीन युध्दावेळी इंग्लंड व अमेरिकेकडून शस्त्रसामग्री मागवून चीनशी लढा दिला यावरून आवश्यकतेनुसार भारत देश अशीही भूमिका घेऊ शकतो, हे जगाला दाखवून दिले.

## १.२.३.५ अलिप्ततावादी चळवळीचा विकास

दुसऱ्या महायुद्धानंतर जग दोन गटात (अमेरिका व रशिया) विभागले गेले तर दुसरीकडे आशिया व आफ्रिकेतील राष्ट्रांनी स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व सिध्द करण्यासाठी अलिप्ततावादी चळवळीची कास धरली. बाडुग (१९५५) परिषदेनंतर खऱ्या अर्थाने अलिप्ततावादी चळवळीचा विकास सुरू झाला. जगातील दोन प्रमुख लष्करी गटापासून अलिप्त राहून आशिया-आफ्रिका खंडातील राष्ट्रांनी राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक सहकार्य करावे. वंशभेद वसाहतवादाचे समुळ उच्चाटन करावे. यासाठी पंडित नेहरूंनी अलिप्त चळवळीच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. पंडित नेहरूंनी सन १९५५ मध्ये इजिप्तची राजधानी कैरो येथे अब्दुल गमाल नासेर यांच्याशी अलिप्त चळवळ निर्माण करण्याची चर्चा केली. उभय नेत्यांनी जगातील महासत्तांच्या आहारी जाण्यापेक्षा हा मार्ग आपल्यासाठी सुकर आहे याच अनुमोदन दिले. याचवेळी युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष माशल टिटो यांनी नेहरू-नासर यांच्या निर्णयाला पाठिंबा दिला. सन १९५६ मध्ये युगोस्लाव्हियातील ब्रिओनी बेटावर पंडीत जवाहरलाल नेहरू (भारत), मार्शल टिटो (युगोस्लाव्हिया) व अब्दल गमाल नासेर (इजिप्त) या तीन खंडातील नेत्यांनी एकत्र येऊन जागतिक शांतता, लष्करी करारांना विरोध, आंतरराष्ट्रीय प्रश्नांची सोडवणूक यासाठी अलिप्त राष्ट्र संघटनेची स्थापना केली. या तीन राष्ट्रांच्या राष्ट्रप्रमुखांनी सन १९५६ पासून अलिप्त राष्ट्र चळवळीच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न केले. अलिप्त राष्ट्र चळवळीत सामील झालेल्या सर्व राष्ट्रांना जागतिक राजकारणात महत्त्व व प्रतिष्ठा प्राप्त व्हावी यासाठी युगोस्लाव्हियाची 'राजधानी बेलग्रेड' येथे डिसेंबर १९६१ मध्ये अलिप्त राष्ट्राची पहिली परिषद घेण्यात आली.

## १.२.३.६ अलिप्त राष्ट्रांच्या शिखर परिषदा

अलिप्त राष्ट्र चळवळीचा पाया घातल्यानंतर नेहरू-नासर-टिटो यांनी जागतिक पटलावर या चळवळीचा आपल्या कार्याने ठसा उमटविला. प्रारंभी जगातील अनेक बड्या राष्ट्रांनी या चळवळीवर टिका केली. परंतु आफ्रो-आशियातील अनेक राष्ट्रे जागतिक महासत्तांच्या लष्करी गटात सहभागी न होता या चळवळीत सामील झाली. सन १९५५ च्या बाडुंग परिषदेनंतर सन १९६१ पासून अलिप्त राष्ट्रांच्या शिखर परिषदांना प्रारंभ झाला आणि हळूहळू या चळवळीचे महत्त्व व कार्य जगाला पटत गेले. यामुळे रशियाकडून

भारताच्या अलिप्ततावादी धोरणाला पाठिंबा मिळाला तर सन १९६१ मध्ये अमेरिकेनेही मान्यता दिली. त्यामुळे अलिप्ततावादी चळवळीला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा पाप्त झाली. या चळवळीकडे आशिया-आफ्रिका खंडातील देशाबरोबर युरोपातील देशही आकर्षित झाल्याने अलिप्त (असंलग्नता) राष्ट्र चळवळीचा विस्तार झाला. या चळवळीने शिखर परिषदेच्या माध्यमातून स्वतंत्र राष्ट्रांना स्वत:चे धोरण ठरविण्याचा अधिकार, वसाहतवादाचा नाश, शस्त्रबंदी, वंशभेदाचे समूळ उच्चाटन, विविध राष्ट्रातील सीमा-प्रश्नाची सोडवणूक, अण्वस्त्र चाचण्यांना बंदी, निर्वासिताचे प्रश्न, व्यापार, कृषी व अन्ननिर्मिती, मच्छिमारी, दळणवळण, बँकींग, तांत्रिक विकास, अशा अनेक विषयावर चर्चा, विचारविनिमय, उपाययोजना व सहकार्याच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर योगदान दिले. अलिप्त राष्ट्र चळवळीने शिखर परिषदाच्या माध्यमातून अनेक प्रश्नाची सोडवणूक करण्याबरोबर विकास कार्यात बहुमोल कामगिरी केली, त्या शिखर परिषदाची माहिती पुढीलप्रमाणे :-

| **शिखर परिषद क्रमांक** | **शिखर परिषदेचे ठिकाण ठिकाणाचे नाव** | **देशाचे नांव** | **वर्ष** |
|---|---|---|---|
| पहिले | बेल ग्रेड | युगोस्लाव्हिया | १९६१ |
| दुसरे | काहिरा | इजिप्त | १९६४ |
| तिसरे | लुसाका | जाम्बिया | १९७० |
| चौथे अल्नीयर्स | अल्जीरिया | १९७३ | |
| पाचवे | कोलंबो | श्रीलंका | १९७६ |
| सहावे | हवाना | लॅटीन अमेरिका | १९७९ |
| सातवे | नवी दिल्ली | भारत | १९८३ |
| आठवे | हरारे | झिम्बाव्बे | १९८६ |
| नववे | बेलग्रेड | युगोस्लाव्हिया | १९८९ |
| दहावे | जकार्ता | इन्डोनेशिया | १९९२ |
| अकरावे | कार्टाजेना | कोलंबिया | १९९५ |
| बारावे | डर्बन | दक्षिण आफ्रिका | १९९८ |
| तेरावे | क्वालांम्पूर | -- | २००३ |
| चौदावे | हवाना | क्युबा | २००६ |
| पंधरावे | शर्म-अल-शेख | इजिप्त | २००९ |
| सोळावे | तेहरान | इराण | २०१२ |
| सतरावे | मार्गरिटा | वेनेजुएला | २०१६ |
| अठरावे | अजरबैजान | -- | २०१८ |

या शिखर परिषदाच्या माध्यमातून अलिप्त राष्ट्र चळवळ मजबूत होत गेली. या परिषदांच्या माध्यमातून राष्ट्र विकास, शांतता, सहकार्याची भावना निर्माण करण्याचे प्रयत्न या चळवळीने केले.

## १.२.३.७ अलिप्त चळवळीतील भारताचे योगदान

स्वातंत्र्यानंतर भारताने आपल्या परराष्ट्र धोरणाचा मुख्य भाग म्हणून अलिप्ततेचे धोरण स्विकारले. याचे प्रमुख कारण आंतरराष्ट्रीय पातळीवर द्वितीय महायुध्दानंतर अमेरिका-रशिया यांच्या गटातील राष्ट्रामध्ये निर्माण झालेले 'शीतयुध्द' होय. या शीतयुध्दातून जे लष्करी करार झाले. हे करार जागतिक शांततेला धोका पोहचविणारे होते. म्हणून भारताने पंडीत नेहरूच्या नेतृत्वाखाली स्वत: अलिप्तता धोरणाचा स्विकार करत अलिप्त चळवळीची उभारणी केली. या चळवळीत आफ्रिका-आशिया खंडातील नव-स्वतंत्र राष्ट्रांनी शांतता आणि विकास हे सूत्र समोर ठेवून सहभाग घेतला. प्रारंभापासूनच भारताने अलिप्तता धोरणाचा स्विकार केल्याने साहजिकच या चळवळीचे नेतृत्व भारताकडे आले. नेहरू-नाझर-टिटो या नेत्यांनी अलिप्त चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. यामध्ये पंडीत नेहरूंनी महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला. आंतरराष्ट्रीय सद्‌भाव व सहकार्य वाढीस लागून जागतिक शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी नेहरूंनी 'पंचशील' तत्वाचा पुरस्कार केला. पुढे हेच तत्व अलिप्त राष्ट्र चळवळीचे तत्त्वज्ञान बनले. या तत्वांना जगातील अनेक राष्ट्रांनी मान्यता दिली. अलिप्तता धोरण हे जागतिक शांतता टिकण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक व उपयुक्त आहे हे हळूहळू जगाच्या लक्षात येऊ लागले त्याचे प्रमुख कारण म्हणजे कोरियन प्रश्न होय.

उत्तर कोरियाने दक्षिण कोरीयावर हल्ला करून युध्दजन्य परिस्थिती निर्माण केली. अशा स्थितीत संयुक्त राष्ट्रसंघात उत्तर कोरियाला आक्रमक ठरवून आपल्या फौजा ३८ अक्षांशापलीकडे मागे न्याव्यात असा ठराव करण्यात आला. या ठरावाला भारताने पाठिंबा दिला. उत्तर कोरियाने आपले सैन्य माघारी घेतले नाही तर सामूहीक लष्करी कारवाई केली जावी असा ठराव संयुक्त राष्ट्र संघात आणला. परंतु यावेळी भारताने कोरियाच्या बाजूने पाठिंबा देत आपली भूमिका स्पष्ट केली. ती म्हणजे या सामूहीक लष्करी कारवाईतून मोठ्या प्रमाणात युध्दाचा भडका उडू नये व जागतिक शांततेला धोका पोहचू नये. पुढे कोरियन प्रश्नावरून अमेरिका व चीनने दक्षिण व उत्तर कोरियाला पाठिंबा दिल्याने युध्दजन्य परिस्थिती निर्माण झाली, पण भारताने मध्यस्थी करून सन १९५२ च्या शेवटी या दोन्ही देशामध्ये युध्दबंदी घडवून आणली. यास उत्तर कोरिया व चीनने मान्यता दिली. यामुळेच बड्या राष्ट्रांना (रशिया, अमेरिका) अलिप्त धोरणाचे महत्त्व समजले.

भारताने अलिप्तता चळवळीचे नेतृत्व करीत या चळवळीला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त करून दिले. अमेरिका किंवा सोव्हिएत रशिया याच्या गटात सामील न होता. जागतिक प्रश्नाबाबत राष्ट्रांनी स्वतंत्र धोरण ठरवावे यासाठी प्रोत्साहन दिले. यामुळे जागतिक राजकारणात बड्या राष्ट्रांचे महत्व कमी करण्यास भारताला यश मिळाले. प्रत्येक राष्ट्रांने शांतता व सुरक्षितता राखत आर्थिक बळकटीसाठी प्रयत्न केला. अशा प्रकारे भारताने अलिप्तता धोरणाचा स्विकार केल्यामुळे राष्ट्र हित व राष्ट्रीय सुरक्षितता या दोन्ही गोष्टी साध्य

केल्या. जागतिक प्रश्नाबाबत आपली स्वतंत्र भूमिका मांडल्याने भारताला जागतिक राजकारणात प्रतिष्ठा प्राप्त झाली.

### १.२.३.८ मूल्यमापन

अलिप्त चळवळीने नव स्वतंत्र राष्ट्रांना स्वतंत्र परराष्ट्र धोरणाचा सिध्दांत देऊन अशा सर्व राष्ट्रांना एकाच व्यासपीठावर आणण्याचे काम केले. दुसऱ्या महायुध्दानंतर जागतिक शांततेला पोषक वातावरण निर्माण करण्याबरोबरच जगातील विकसित राष्ट्रांना या चळवळीमुळे अविकसित राष्ट्रांच्या समस्या सांगता आल्या. याठिकाणी अलिप्त राष्ट्र चळवळीच्या यशापयशाची चर्चा करणे गरजेचे आहे.

#### (i) अलिप्त चळवळीचे यश :–

अमेरिका–सोव्हिएत रशिया या दोन महासत्तानी शीतयुध्द सुरू केले. एकमेकांना शह देण्यासाठी लष्करी करार करून शस्त्रास्त्र स्पर्धा सुरू केली. याचा परिणाम संपूर्ण जगात तणावग्रस्त स्थिती निर्माण झाली. अशा अवस्थेत अलिप्तता चळवळीने जागतिक शांतता निर्माण करण्यासाठी खूप मोठे योगदान दिले, हे या चळवळीचे यशच मानावे लागते. या चळवळीने वसाहतवाद, साम्राज्यवाद आणि वंशवादाला विरोध करून आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततामय मार्गाने सोडविण्यास प्रोत्साहन दिले. स्वातंत्र्य चळवळी करणाऱ्या राष्ट्रांना अलिप्तता चळवळीने पाठिंबा दिल्याने अनेक राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळविणे शक्य झाले. अशी स्वतंत्र व नवस्वतंत्र राष्ट्रे मोठ्या संख्येने अलिप्तता चळवळीत सामील झाली. ही नव स्वतंत्र राष्ट्रे अमेरिका किंवा सोव्हिएत रशियाच्या गटात सामील न होता, अलिप्त चळवळीत सामील झाल्यामुळे अमेरिका, सोव्हिएत रशिया, या दोन गटाबरोबर तिसरा अलिप्त राष्ट्रांचा गट (तिसरे जग) तयार झाला. या तिसऱ्या गटातील बहुतांश देश हे 'संयुक्त राष्ट्रसंघाचे सभासद' राष्ट्रे असल्यामुळे अलिप्ततावादी राष्ट्रांच्या पाठिंब्याशिवाय महासभेत कोणताही निर्णय घेणे दुरापास्त झाले, या सर्वांचा परिणाम जगात शांतता निर्माण करण्यासाठी या चळवळीने महत्त्वपूर्ण कार्य केले. अलिप्तता चळवळीमुळे सर्वात महत्त्वाची गोष्ट घडली, ती म्हणज अलिप्ततावादी राष्ट्रांनी जागतिक शांततेसाठी परस्परांमधील वाद, युध्दाऐवजी चर्चा व समन्वयाने सोडविण्यावर भर दिला, यासाठी वाद उत्पन्न झालेल्या राष्ट्रांवर नैतिक दबाव टाकून प्रश्नांची सोडवणूक केल्याने युध्दाची भीती कमी झाली हे या चळवळीला आलेले मोठे यश मानावे लागेल. या चळवळीतील राष्ट्रांनी आपआपसामध्ये आर्थिक व्यवहार करून नवीन आर्थिक व्यवस्था निर्माण करून आपला विकास साधला. तसेच या राष्ट्रांना आपल्या कुवतीनुसार परराष्ट्र धोरण आखून देशाला विकासाच्या टप्प्यावर नेण्यासाठी अलिप्त राष्ट्रांचे व्यासपीठ मिळाले. अशाप्रकारे अनेक बाबतीत अलिप्तता चळवळीला यश मिळाले असले तरी या चळवळीला समोर ठेवलेली काही ध्येय पार करता आली नाहीत, तसेच काही धोरणामध्ये अपयशही आले.

#### (ii) अलिप्त चळवळीचे अपयश :–

अलिप्तता चळवळीचा मुख्य उद्देश शीतयुध्दाच्या रूपाने जगात जे दोन गट तयार झाले होते, त्या

गटात सामील न होता तिसरा गट (अलिप्तता) निर्माण करून शांतता प्रस्थापित करणे असा होता. परंतु अमेरिका व सोव्हिएत रशियाने केलेल्या लष्करी करारातील काही राष्ट्रांनी अलिप्त राष्ट्रसंघाचे सदस्यत्व मिळविले. यामुळे अलिप्तता चळवळीचा मुख्य हेतू मागे पडला. अलिप्त राष्ट्राच्या विविध ठिकाणच्या शिखर परिषदांमध्ये चर्चा, विचारविनिमय आणि घोषणा मोठ्या प्रमाणावर केल्या गेल्या. परंतु त्यासाठी फार मोठी कारवाई झाली नाही. यामुळे या शिखर परिषदांमधून फार मोठे यश प्राप्त झाले असे म्हणता येणार नाही. या चळवळीतील राष्ट्रांनी वसाहतवाद, साम्राज्यवादाला विरोध तर स्वातंत्र्य चळवळींना प्रोत्साहन दिले. परंतु याची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी राहिली नाही. (उदा. पैसा, शस्त्र, सैन्य) अलिप्त चळवळीतील राष्ट्रामध्ये शिखर परिषदातील उपस्थितीबाबत गंभीरता राहिली नाही. यामुळे सदस्य संख्या भरपूर असूनही काही शिखर परिषदांना खूपच कमी राष्ट्रे उपस्थित राहिली. याशिवाय अलिप्तता चळवळीतील अनेक राष्ट्रे अमेरिका, रशिया, चीन या राष्ट्रांची समर्थक राष्ट्रे बनली. यामुळे अलिप्त चळवळीच्या मुळ हेतूलाच तडा गेला. हेही अलिप्तता चळवळीचे मोठे अपयश म्हणावे लागेल. एकंदरीत अलिप्त चळवळीला काही बाबतीत अपयश आले असले तरी जागतिक राजकारणात या चळवळीचे महत्त्व कमी होत नाही. कारण या चळवळीमुळेच जगातील विकसनशील, नवस्वतंत्र राष्ट्रांना प्रतिष्ठा तर प्राप्त झालीच. पण अशा राष्ट्राच्या विकासात भरच पडली.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-३

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ............. यांनी भारताच्या परराष्ट्र धारेणाचा भाग म्हणून अलिप्ततावादाचा पुरस्कार केला.
*(अ) सरदार वल्लभभाई पटेल* *(ब) महात्मा गांधी*
*(क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर* *(ड) पंडीत जवाहरलाल नेहरू.*

२. ............. रोजी आफ्रो-आशियाई राष्ट्रांची परिषद 'बाडुंग' या ठिकाणी भरली.
*(अ) १७ एप्रिल १९५५* *(ब) १८ एप्रिल १९५५*
*(क) १९ एप्रिल १९५५* *(ड) २० एप्रिल १९५५.*

३. बाडुंगच्या परिषदेत पंचशीलमधील ............. हे तत्व वगळण्यात आले.
*(अ) शांततामय सहजीवन* *(ब) अनाक्रमण*
*(क) समानता* *(ड) प्रादेशिक अखंडता.*

४. अलिप्त राष्ट्र चळवळीतील नेते अब्दुल गमाल नासेर हे ............ देशाचे होते.
*(अ) युगोस्लाव्हिया* *(ब) भारत* *(क) इजिप्त* *(ड) श्रीलंका.*

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. शिखर परिषदेचे पहिले अधिवेशन कोणत्या ठिकाणी भरले होते.

२. अलिप्तता राष्ट्र चळवळीची स्थापना कोणी केली त्यांची नावे लिहा.

३. अलिप्तता राष्ट्र चळवळीची सातवी शिखर परिषद भारतात कोणत्या ठिकाणी झाली.

४. कोरियन प्रश्नाबाबत कोणत्या देशाने मध्यस्थी करून युध्दबंदी घडवून आणली.

## १.३ सारांश

विसाव्या शतकात आंतरराष्ट्रीय स्तरावर घडून गेलेली प्रमुख घटना म्हणजे दुसरे महायुध्द होय. या युध्दात प्रचंड प्राण व वित्तहानी झाली. हे युध्द युरोपच्या भूमीवर लढले गेले असलेने अनेक युरोपीयन राष्ट्रे या युध्दानंतर कोलमडून गेली. मात्र या युध्दानंतर जगात दोन महाशक्तीचा उदय झाला त्या म्हणजे अमेरिका व सोव्हिएत रशिया. या दोन्ही बड्या राष्ट्रांनी एकमेकांविरोधी जागतिक स्तरावर गट तयार करून अशांतता निर्माण केली. प्रत्यक्ष रणांगणावर युध्द न करता राजकीय तात्वीक (वैचारिक), सामाजिक, आर्थिक आणि कुटनीतीच्या पातळीवर आपली शक्ती वाढविण्यासाठी अमेरिका व सोव्हिएत रशियाने जो संघर्ष केला त्यास 'शीतयुध्द' असे म्हटले गेले. अमेरिकेने रशियाविरोधी ट्रुमन सिध्दांत, मार्शल योजना तयार करून जागतिक राजकारणात एकटे पडण्याचा प्रयत्न केला, यासाठी नाटो, सिटो, सेंटो यासारखे करार करून रशियन साम्यवादाला उखडून टाकण्यासाठी जगातील राष्ट्रांना एकत्र केले. परिणामत: सोव्हिएत रशियानेही जागतिक राजकारणात आपली बाजू मजबूत होण्यासाठी वार्सा करार घडवून आणला. सोव्हिएत रशियाचे विभाजन होईपर्यंत म्हणजे १९९० पर्यंत हे शीतयुध्द चालू होते व नंतर संपुष्टात आले.

पहिल्या महायुध्दानंतर झालेली प्रचंड प्राण व वित्त हानी यामुळे जागतिक पातळीवर राष्ट्रसंघाची निर्मिती करण्यात आली. परंतु राष्ट्रसंघाची स्थापना होऊनही दुसऱ्या महायुध्दाची आपत्ती जगावर ओढविली. अन्याय व अपमानकारक वागणूक मिळालेल्या जर्मनीसारख्या राष्ट्राने हिटलरच्या नेतृत्वाखाली दुसऱ्या महायुध्दाला तोंड फोडले. या महायुध्दात प्रचंड हानी झाली. यामुळेच हे महायुद्ध चालू असतानाच जागतिक शांतता व सुरक्षितता निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर एक प्रभावशाली संघटना निर्माण झाली पाहिजे असा विचार पुढे आला व यातूनच 'संयुक्त राष्ट्र संघाची' स्थापना करण्यात आली. संयुक्त राष्ट्र संघाची उद्दिष्टे ठरवून कार्यप्रणाली निश्चित करण्यात आली. जगातील राष्ट्रामध्ये निर्माण होणारे तंटे, संघर्ष, सामाजिक, आर्थिक, धार्मिक प्रश्न याची सोडवणूक करण्याची जबाबदारी संयुक्त राष्ट्र संघावर असे. त्यामुळे द्वितीय महायुद्धानंतर स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक स्तरावर समन्वयाची महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली.

दुसऱ्या महायुध्दानंतर अनेक राष्ट्रांना स्वतंत्र मिळाले. अशा नवस्वतंत्र राष्ट्रांना आपल्या देशाचा विकास साधण्यासाठी काही धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे होते. परंतु जगामध्ये अमेरिका व सोव्हिएत रशिया या राष्ट्रांनी शीतयुध्द आणि जागतिक स्तरावर लष्करी करार करून जगाचे दोन गटात विभाजन केले. अशा परिस्थितीत नवस्वतंत्र राष्ट्रांना कोणाच्या तरी गटात सामील होऊन राष्ट्रांची उभारणी करणे अडचणीचे होते म्हणून प्रथमच भारताने आपल्या परराष्ट्र धोरणाचा भाग म्हणून अलिप्तता धोरणाचा स्विकार केला.

पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी पंचशील तत्त्वज्ञान आधारे आफ्रिका व आशिया खंडातील राष्ट्रांना अलिप्ततावादी चळवळीत सामील होण्याचे व पंचशीलचा स्विकार करण्याचे आवाहन केले. अनेक राष्ट्रांनी नेहरूच्या या धोरणाला व पंचशीलला मान्यता दिली. सन १९१६ मध्ये युगोस्लाव्हियातील ब्रिओनी बेटावर पंडित जवाहरलाल नेहरू (भारत). मार्शल टिटो (युगोस्लाव्हिया) व अब्दल गमाल नासेर (इजिप्त) या नेत्यांनी एकत्र येऊन जागतिक शांतता, लष्करी करारांना विरोध आंतरराष्ट्रीय प्रश्नाची सोडवणूक करणे यासाठी अलिप्त राष्ट्र संघटनेची स्थापना केली. राजकीय, आर्थिक, सामाजिक प्रश्नांची चर्चा होऊन त्यावर मार्ग निघावा यासाठी या संघटनेने शिखर परिषदा घेतल्या. पहिली शिखर परिषद सन १९६१ साली बेलग्रेड येथे भरली होती. या अलिप्तता चळवळीत भारताचे खूप मोठे योगदान आहे, कारण या चळवळीचा पायाच भारतात घातला गेला. यामुळे दुसऱ्या महायुध्दानंतर जगात अमेरिका व सोव्हिएत रशिया हे दोन लष्करी गट जगात अशांतता निर्माण करत असताना अलिप्तता चळवळीने मात्र तिसऱ्या जगाच्या रूपाने शीतयुध्दाची तीव्रता कमी तर केलीच परंतु आफ्रो-आशियातील गरीब विकसनशील राष्ट्रांना विकास प्रक्रियेत आणण्यासाठी बहुमोल योगदान दिले.

## १.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

**अ)** १. *(अ) बर्नाड बरूश.*

२. *(क) अमेरिका.*

३. *(ब) १९४९.*

४. *(ड) परराष्ट्रमंत्री.*

५. *(ड) मॉस्को.*

**ब)** १. *दुसऱ्या महायुध्दानंतर जागतिक राजकारणावर प्रभाव टाकू शकणाऱ्या अमेरिका व रशिया दोन महासत्ता होत.*

२. *अमेरिकेने या देशाने नाटो, सिटो, सेंटो हे करार घडवून आणले.*

३. *रशिया या राष्ट्राच्या नेतृत्वाखाली इ.स. १९५५ साली वॉर्सा करार झाला.*

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

**अ)** १. *(क) २४ ऑक्टोबर १९४५.*

२. *(क) १९ व १११.*

३. *(ब) न्यूयॉर्क.*

४. *(ब) हॉलंड.*

**ब)** १. *संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेत अमेरिका, इंग्लंड, चीन, रशिया, फ्रान्स या राष्ट्रांना कायम सदस्यत्व देण्यात आले.*

२. *संयुक्त राष्ट्र संघाचे सरचिटणीस उ-थॉट हे म्यानमार देशाचे होते.*

३. *अमेरिका व इंग्लंड या दोन प्रमुख राष्ट्रांनी अटलांटिक सनद तयार करण्यासाठी सहभाग घेतला.*

४. *१० डिसेंबर या दिवशी संयुक्त राष्ट्र संघाच्यावतीने 'मानवाधिकार दिन' सर्व जगभर साजरा केला जातो.*

## ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे

**अ)** १. *(ड) पंडीत जवाहरलाल नेहरू.*

२. *(ब) १८ एप्रिल १९५५.*

३. *(अ) शांततामय सहजीवन.*

४. *(क) इजिप्त.*

**ब)** १. *शिखर परिषदेचे पहिले अधिवेशन 'बेलग्रेड' या ठिकाणी भरले होते.*

२. *अलिप्तता राष्ट्र चळवळीची स्थापना पंडित जवाहरलाल नेहरू (भारत), मार्शल टिटो (युगोस्लाव्हिया), अब्दुल गमाल नासेर (इजिप्त) यांनी केली.*

३. *अलिप्तता राष्ट्र चळवळीची सातवी शिखर परिषद भारतात दिल्ली या ठिकाणी झाली.*

४. *कोरियन प्रश्नाबाबत भारत देशाने मध्यस्थी करून युध्दबंदी घडवून आणली.*

# १.५ सरावासाठी स्वाध्याय

### अ) दिर्घोत्तरी प्रश्न.

१. तात्वीक व राजकीय आधारावर शीतयुध्दाचे महत्त्व विशद करा.

२. लष्करी करार म्हणून नाटो व वॉर्सा कराराची माहिती लिहा.

३. संयुक्त राष्ट्र संघाचे कार्य स्पष्ट करा.

४. अलिप्त राष्ट्र चळवळीची माहिती द्या.

### ब) टिपा लिहा.

१. शीत युध्दाची कारणे.

२. नाटो करार.

३. वॉर्सा करार.

४. ट्रुमन सिध्दांत.

५. मार्शल योजना.

६. संयुक्त राष्ट्र संघाची रचना.

७. संयुक्त राष्ट्र संघाचे यशापयश.

८. अलिप्तता अर्थ व स्वरूप.

९. बांडुगची परिषद.

## १.६ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१. जैन हुकूमचंद, माथूर कृष्णचंद्र, काळे अनिल (अनुवादक), आधुनिक जगाचा इतिहास, के. सागर प्रकाशन, पुणे.

२. वैद्य सुमन, शांता कोठेकर, आधुनिक जग (१९४५-२०००), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३. जोशी पी. जी., विसाव्या शतकाचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर.

४. कदम य. ना., विसाव्या शतकातील जग, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. यादव आर. एस., भारत की विदेश नीती : एक विश्लेषण, किताब महल प्रकाशन, इलाहाबाद, २००५, संशोधित पीयरसन, नई दिल्ली, २०१२.

६. जैन बी. एम., प्रमुख देशों की विदेशी नितिया, राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी, जयपूर, १९९६-९७.

७. Nanda S. P., History of the Modern World, Anmol Publication, New Delhi, 1998.

८. Mahajan V. D., History of Modern Europe, S. Chand of Co, Ltd., New Delhi, 1974.


❋ ❋ ❋

घटक–२

# सामाजिक न्यायाच्या चळवळी

---

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्टये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

 २.२.१ नागरी हक्काची चळवळ–अमेरिका

 २.२.२ वांशिक भेदभावाविरूद्धची चळवळ–आफ्रिका

 २.२.३ अमेरिकेतील स्त्रीवादी चळवळ

२.३ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.४ सारांश

२.५ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्टये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला–

१. कृष्णवर्णीय चळवळ म्हणजे काय हे समजेल.

२. अमेरिकेतील नागरी हक्काच्या चळवळीची माहिती मिळेल.

३. निग्रोंच्या प्रश्नांसंदर्भात श्वेतवर्णियांची राजकीय व आर्थिक भूमिका समजेल.

४. यादवी युद्ध आणि निग्रोच्या समस्याची उकल होईल.

५. २० व्या शतकातील रौद्र रूप धारण करणाऱ्या निग्रोच्या प्रश्नांची माहिती मिळेल.

६. राष्ट्राध्यक्षांची या प्रश्नासंबंधी असणारी भूमिका लक्षात येईल.

७. मॉर्टिन ल्यूथर किंगच्या चळवळीचे स्वरूप समजून येईल.

## २.१ प्रास्ताविक

अमेरिकेच्या इतिहासामध्ये निग्रो/कृष्णवर्णीय चळवळ ही एक राजकीय अधिष्ठान असलेली राजकीय चळवळ आहे. एक नवस्वंतत्र लोकशाही राष्ट्र म्हणून अमेरिकेने स्वत:चे अस्तित्व जपण्यास सुरूवात केली होती. स्वत:चे वेगळेपण जोपासण्यात अमेरिका यशस्वी होताना दिसून येते. मात्र दोनशे वर्षाच्या दिर्घ राजकीय प्रवासामध्ये नवसमाजनिर्मिती किंवा आदर्शवादी सामाजिक संरचना खऱ्या अर्थाने धुसर झाल्याचे दिसून येते.

जागतिक राजकारणापासून अलिप्त राहून एखाद्या राष्ट्राला राजकीय व आर्थिक स्थैर्यही साधता येईल. मात्र मानवतावादी समाजासाठी वंशभेदाविरूद्धच्या जाणीवा जातीय, वर्गीय आणि धार्मिक द्वेषाधारित रूढीवादी संकुचित प्रवृत्तीना नष्ट करता येत नाही. स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचा विचार राष्ट्रामध्ये, समाजामध्ये रूजविण्यासाठी किंवा अशा नवराष्ट्राची निर्मिती करण्यासाठी प्रगल्भ विचारांची पिढी घडविण्यासाठी सक्षम अर्थव्यवस्था व स्वतंत्र राष्ट्र किंवा स्वत:ला अलिप्त ठेवून चालत नाही. अमेरिकेने जागतिक राजकारणापासून अलिप्त राहून स्वत:च्या राजकीय व आर्थिक स्थैर्य व सामर्थ्यामध्ये भर घातली पण अमेरिकेने वंशाआधारीत विषमतावादी वर्णवादी विचारांची रूजवणूक केली.

दुसऱ्या महायुद्धापूर्वी अमेरिकेमध्ये व्यवस्थेने बळी पडलेल्या निग्रो/कृष्णवर्णियांनी स्वउद्धारासाठी काही प्रमाणात आवाजही उठवला मात्र कृष्णवर्णीय, अल्पसंख्याक व स्त्रीयांच्या प्रश्नांना नागरी प्रश्न (Civil Rights) किंवा नागरी हक्क म्हणण्या इतकी प्रगल्भ मानसिकता अमेरिकेतील उच्चवर्गीय श्वेतवर्णीय समाजव्यवस्थेमध्ये नव्हती म्हणूनच 'अंतर्गत यादवी'च्या हया संघर्षाने पाहता पाहता जागतिक राजकीय पटलावर नैतिक श्रेष्ठत्वाचे स्वगुणगाण गाणाऱ्या, स्वातंत्र्याचे धडे देणाऱ्या अमेरिकन राष्ट्राची प्रतिमा उत्तरोत्तर मलिन होवू लागली. हा अमेरिकेचा पराभव असल्याची जाणीव श्वेतांना होऊ लागली. ?नाझीच्या वांशिक तत्वज्ञानास झिडकारलेल्या राष्ट्रात कृष्णवर्णीय नागरिक वंशद्वेषाचे बळी पडावेत या विरोधाभासाची अनेकांना चीड आली. झपाटयाने बदलत चाललेल्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेसमोर एकच पर्याय उरला. तो म्हणजे वर्ण वंश भेदभावाच्या पलीकडे जाऊन सर्व नागरिकांना समानतेच्या तत्वावर लोकशाहीचे फायदे मिळवून देणे.'

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ नागरी हक्काची चळवळ : अमे़रिका

आंतरराष्ट्रीय घडामोडीचा होकारात्मक परिणाम कृष्णवर्णीय चळवळीस प्रोत्साहन मिळण्यास झाला. झपाटयाने ऱ्हास होऊ लागलेले युरोपीय राष्ट्रांचे वसाहतवादी साम्राज्य, चीनसारख्या राष्ट्राचा वाढता प्रभाव आणि कृष्णवर्णीय आफ्रिकी राष्ट्राचा उदय जागतिक परिस्थितीमध्ये श्वेतवर्णीय श्रेष्ठत्वास शह बसत असताना असताना अमेरिकेत आणखी किती काळ वर्णविद्वेश सहन करावा लागणार हा प्रश्न अमेरिकी कृष्णवर्णियांच्या

मनात घोळू लागला. निग्रोची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहत असताना असे लक्षात येते की, निग्रो लोक मूळचे आफ्रिकेतील असून अमेरिकन वसाहतींची उभारणी होत असताना काम करण्यासाठी मजूर म्हणून निग्रोंना आफ्रिकेतून अमेरिकेत आणण्यात आले त्यांचा रंग काळा होता. म्हणून त्यांना 'निग्रो' किंवा 'निगर' म्हणजेच काळे म्हणण्यात येत असे. सुरूवातीच्या कालावधीमध्ये निग्रोंना मुदतबद्ध सेवक (Indentured Sevants) म्हणून अमेरिकेत आणले गेले. पण लवकरच त्यांना गुलाम बनवण्यात आले इ.स १८५७ मध्ये अमेरिकन सुप्रीम कोर्टने निग्रोंना गुलामगिरीत (Slavery) ठेवण्याचा हक्क मान्य केला. हा सुप्रिम कोर्टाचा निकाल 'ड्रेडस्कॉट' निकाल म्हणुन ओळखला जातो. १७ व्या शतकामध्ये अमेरिकेत आणण्यात आलेल्या या मुदतबध्द सेवकांना निग्रो निगर म्हणजेच काळे हे तिरस्कारयुक्त नाव मिळाले आणि अमेरिकन घटनेनेसुद्धा निग्रोंना गुलामीत ठेवण्याचा हक्क मान्य केला. आणि ड्रेडस्कॉट निकालाने तर निग्रोंना एका शतकापेक्षा अधिक काळापर्यंत हीन दर्जाचे मनुष्यप्राणी समजण्यात आले. गोऱ्या लोकांबरोबर राजकीय व सामाजिक व्यवहार करण्यास ते सर्वथा नालायक ठरविण्यात आले. व निग्रोंना कायद्याने गुलाम ठरविण्यात आले.

## ❑ गुलामगिरीविरोधी चळवळीची वाटचाल :-

गुलामगिरीमध्ये काही कालावधी व्यतीत केल्यानंतर निग्रोंना व काही श्वेतवर्णियांनाही अशा प्रकारची प्रथा अमानवी असून संघराज्यात अशा प्रकारची प्रथा असता कामा नये. असे वाटत होते. शिवाय गुलामगिरी प्रथेचे आर्थिक फायदेही तितकेच जास्त असल्याने एका गटाला ही पद्धत आवश्यक वाटत होती. त्यामुळे एका शतकाहून अधिक काळ हा गुलामगिरीचा प्रश्न चिघळत ठेवण्यात आला.

१) इ. स. १८१७ मध्ये अमेरिकेत कलोनायझेशन संघाची स्थापना करण्यात आली. त्याद्वारे मुक्त निग्रोंना आफ्रिकेतील लायबेरिया मध्ये स्थापित करण्याचा निर्णय झाला मात्र निग्रोंच्या वाढत्या संख्येमुळे हा प्रश्न सुटला नाही.

२) 'जिनस ऑफ युनिव्हर्सल इमॅनसिपेशन' व 'लिबरेटर दी ऑब्झर्वर' या वर्तमानपत्रांनी या अमानुष प्रथेविरूद्ध लिखान केले. इ.स. १८४० पर्यंत २० लाख कार्यकर्ते अनेक संस्थामधून गुलामगिरी विरोधात कार्य करत होते.

३) याचाच परिणाम म्हणजे काही राज्यांनी आपल्या राज्यांमध्ये स्वातंत्र्यविषयक कायदे तयार करून घेवून त्यांची अंमलबजावणी करावयास सुरूवात केली. त्यात उत्तरेकडील राज्यांनी गुलामगिरी पूर्णत: नष्ट झाली पाहिजे. अशी भूमिका स्वीकारली तर दक्षिणेतील राज्यांनी गुलामगिरीचा आग्रह धरला.

## ❋ यादवी युद्ध आणि त्याचे परिणाम :-

१२ एप्रिल १८६१ रोजी अमेरिकेमध्ये यादवी युद्धास सुरूवात झाली आणि हे युद्ध २६ एप्रिल १८६५ ला संपले. यामध्ये दक्षिण संघराज्याचा पूर्णत: पराभव झाला. या युद्धाचा परिणाम म्हणजे -

१) संघराज्यातून विभक्त होण्याच्या कल्पनेला मूठमाती मिळाली.

२) नागरिकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली.

३) गुलामांनी युद्धात भाग घेऊन शौर्याचे प्रदर्शन घडवले.

४) दक्षिणेच्या पराभवामुळे गुलामगिरीतील निग्रोंना मुक्त करण्यात आले.

५) युद्धकाळात लिंकनने गुलामाच्या मुक्ततेचा जाहिरनामा प्रसिद्ध केला. युद्ध काळात १,८६,००० गुलाम मुक्त झाले या मुक्त गुलामांनी उत्तरेकतील सैन्यास मदत करून स्वबांधवाच्या मुक्ती कार्याला प्रोत्साहन दिले.

गुलामगिरी नष्ट करण्याची महत्त्वपूर्ण कृती १८६५ मध्ये करण्यात आली. अमेरिकन काँग्रेसने १३ वी घटनादुरूस्ती मंजूर करून या घटनादुरूस्तीद्वारे गुलामगिरी कायमची नष्ट होवून गुलामाची सर्वत्र मुक्तता करण्यात आली. खऱ्या अर्थाने यादवी युद्धास गुलामाच्या मुक्ततेचे युद्ध म्हणता येईल. मुक्त झालेल्या गुलामांना सैन्यात नोकरी देवुन लोकशाहीची नवी मूल्ये प्रस्थापित करण्यात आली. अमेरिकन इतिहासकार चार्ल्स एडवर्ड याने यादवी युद्धास (Second American Revolution) म्हटले आहे. मात्र लिंकनच्या निधनाने या अमानुष गुलामगिरीला मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहणाऱ्या लोकशाही पर्वाचाही शेवट झाला व लिंकनच्या मृत्यूनंतर त्यांच्या गुलामगिरीविषयक धोरणाला राजकीय पक्षांनीही मूठमाती दिली. परिणामत: निग्रोंना दासमुक्त करणाऱ्या उत्तरेतही कामगाराच्या रूपानेच पुन्हा दासप्रथा निर्माण केली. ज्या निग्रोंच्या समस्या निवारण्यासाठी प्रामुख्याने यादवी युद्ध लढले गेले. यादवी युद्धानंतर त्याच्याकडे मानवतेच्या भूमिकेतून पाहण्याची साधी नैतिकताही दाखवली गेली नाही.

## ❑ २० व्या शतकातील निग्रोंच्या समस्या :-

लिंकनच्या मृत्यूनंतर निग्रोची स्थिती विदारकच झाली. पूर्वी निग्रो गुलाम होते. आता उद्योग व्यापाराच्या स्पर्धेमध्ये ते 'दास' झाले. श्वेतवर्णियांची वंशश्रेष्ठत्वाची भावना जास्तच बळावली. इ.स. १८९६ चा सुप्रिम कोर्टाचा निकाल 'प्लेसी विरूद्ध फर्ग्युसन' म्हणजे निग्रोंची पायमल्ली करणारा ठरला. गोऱ्या समाजापासून निग्रोंना अलग ठेवण्यात आले व सार्वजनिक त्यांना ठिकाणावर बंदी घालण्यात आली आणि ही व्यवस्था जवळजवळ इ.स. १९५४ पर्यंत टिकून होती. दोन्ही महायुद्धामध्ये कृष्णवर्णीय श्वेतवर्णीयाच्या खांद्यास खांदा लावून लढले जखमी झाले आणि मृत्यूमुखीही पडले. त्यांचा त्याग, त्याची राष्ट्रसेवा लक्षात घेवून, कृतज्ञतेच्या भावनेतून त्यांना मानाची वागणूक देणे आवश्यक असल्याचे अनेकांना वाटू लागले. वर्ण व वंश भेदभावाच्या पलीकडे जावून सर्व नागरिकांना समानतेच्या तत्वामध्ये गुंफणे ही अमेरिकेची राष्ट्रीय जबाबदारी होती. 'रूथ बोनेडिक्ट' आणि 'गुणार मीर्डाल' याच्या लिखानाचा जनमाणसावर सखोल परिणाम होऊ लागला. निग्रोंना राजकीय हक्क नाकारल्याबद्दल विविध स्तरातून तीव्र मनस्ताप व्यक्त होऊ लागला.

इ. स. १९४७ सालच्या राष्ट्राध्यक्ष ट्रुमनच्या अहवालामध्ये निग्रोना अलग करण्याच्या (Segregation of the Negroes) धोरणाचे योग्य समर्थन करता येत नाही. इ. स. १९५० ते १९५३ या कालावधीत अमेरिकेतील जनमत निग्रोच्या बाजूने झाले.

## ❋ आर्थिक महामंदी व निग्रो समस्या :-

पहिले महायुद्ध अमेरिकेला महाग पडले त्यानंतर निग्रोची जबाबदारी आली पण पुढे आर्थिक महामंदीच्या कालावधीमध्ये निग्रोच्या प्रश्नांकडे पूर्ण दुर्लक्ष करण्यात आले. परिणमत: निग्रो संघटीत झाले. आपल्या अस्तित्वासाठी संघटितरित्या प्रयत्न करण्यास सुरूवात केली. शिक्षणाशिवाय आपला उद्धार होवू शकत नाही. हे त्यांना समजले त्यांच्या संघटीत चळवळीमुळेच इ. स. १९५३ सालापर्यंत फक्त पाच विद्यापीठे वगळता सर्वच विद्यापीठामध्ये प्रवेश देण्यात येवू लागला. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात जवळजवळ आपले सर्व हक्क निग्रोंनी संघटनेतूनच मिळविले.

## ❋ निग्रोंच्या प्रश्नासाठी शासकीय प्रयत्न :-

१. इ.स. १९४७ चा राष्ट्राध्यक्ष ट्रुमनच्या नागरी हक्क समितीचा अहवाल हा निग्रोसाठी अनुकूल होता.

२. सर्व विद्यापीठातून निग्रोंना प्रवेश देण्याचे धोरण

३. ब्राऊन केसमधील सुप्रिम कोर्टाचा निकाल १७ मे १९५४ ब्राऊन विरूद्ध शिक्षण मंडळ निर्णयामध्ये गोऱ्यांना असलेल्या शैक्षणिक संस्थामधून निग्रोंना प्रवेश देण्याचे निश्चित झाले.

४. राष्ट्राध्यक्ष आयसेन हॉवर व सुप्रिम कोर्टाचा निकाल ब्राऊन विरूद्ध शिक्षण मंडळाच्या निर्णयाची अमंलबजावणी करण्याचा संदेश राष्ट्राध्यक्ष हॉवर यांनी वेळेत न दिल्यामुळे दक्षिणेची धोरणे निग्रोविरूद्ध राहिली व वर्षानंतर जेव्हा शाळा सुरू झाल्या तेव्हा एकाही निग्रो विद्यार्थ्याला शाळेत प्रवेश देण्यात आला नाही. परिणामत: हॉवर यांनी निग्रोसंबंधी सहानुभूतीचे धोरण जाहीर केले.

रूझवेल्ट, ट्रुमन व आयसेन हॉवर या राष्ट्राध्यक्षांनी राजकीय फायद्या-तोटयाचा विचार न करता निग्रों प्रश्नांना महत्त्व दिले आयसेनने आपल्या कारकिर्दीत ४७ महत्त्वाच्या पदावर निग्रोंच्या अधिकारी नेमले व काळा गोरा भेद दूर करण्याचे धोरण पूर्ण केले अनेक निग्रो नेत्यांनी आयसेन हॉवरच्या कामगिरीबद्दल प्रसंगोद्गार काढले.

५. **इ. स. १९५७ चा नागरी हक्क कायदा :** इ.स. १९५६ मध्ये आयसेन हॉवर यांनी काँग्रेसकडे आपला नागरी हक्काचा कार्यक्रम शिफारसीसाठी पाठवला. सिनेटमधील वातावरण प्रतिकूल असूनही सिनेटमधील डेमॉक्रेटीक पक्षाचे नेते लिंडन बो जॉन्सन यांच्या प्रयत्नाने आयसेन हॉवर यांचा 'नागरी हक्काचा कायदा' (Civil Rights Act 1957) पारीत झाला. या कायद्याने नागरी

हक्क मंडळाची स्थापना होवून एका नव्या सहाय्यक कायदा मंत्र्याची (Assis Attorney General) ची नेमणूक करण्यात आली व कायदा मंत्रालयाच्या कार्यालयात नागरी हक्क विभाग (Civil Rights Division) स्थापन करण्यात आले. वकीलांना खास अधिकार दिले व कोर्टाचे आदेश न पाळणाऱ्या विरूद्ध ज्युरीशिवाय खटले चालवण्याची परवानगी देण्यात आली हा नागरी हक्काचा मोठा विजय होता या कायद्याला दक्षिणेने व्यापक विरोध केला. सुप्रीम कोर्टाचा निकाल धुडकावण्याबरोबरच निग्रोविरूद्ध भेदभाव करणारे ४२ कायदे पास केले.

लिटलरॉक प्रकरणाने पुन्हा निग्रोंचा प्रश्न ऐरणीवर आणला लिटलरॉक शहरातील शाळांना निग्रो भेदभाव थांबविण्याचा आदेश दिला होता मात्र निग्रोद्वेष्टा गव्हर्नर आर्व्हल फॉबेस ने निग्रो मुलांना शाळेत प्रवेश मनाई केली मात्र आयसेन हॉवरनी शांतता प्रस्थापित करून निग्रो विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देण्यास भाग पाडले. त्यासाठी लष्करी बळाचा वापर केला. मात्र श्वेतवर्णीय या धोरणाबाबत कमालीचे नाखूष होते हेच दिसून येते.

## ❑ डॉ.मार्टिन ल्यूथर किंग आणि नागरी हक्क लढा :–

जगाचे लक्ष निग्रोच्या समतेच्या लढयावर केंद्रित करणारा गांधीतत्वांना प्रमाण मानणारा धर्मगुरू म्हणजे मार्टिन ल्यूथर किंग होय. मार्टिन ल्यूथर किंगने नागरी हक्क मिळविण्याची ही चळवळ अहिंसेच्या मार्गाने चालविली.

## ❑ मॉटगोमरीचा लढा :–

मॉटगोमेरी या शहरातील मिसेस रोझा या निग्रो महिलेने बसमधून प्रवास करत असताना ती चुकून गोऱ्यासाठी आरक्षित सीटवर बसली तिला अटक करण्यात आले. परिणामत: अलबामा राज्यातील सर्वच निग्रोनी बस कंपनी विरोधी खूप मोठा लढा दिला या कंपनीवर पूर्णतः बहिष्कार टाकून पायी किंवा खाजगी वाहनांतून ऑफिस व कामाच्या ठिकाणी जावू लागले. ३८२ दिवस हा बहिष्कार लढा चालला निग्रोंचे नैतिक बळ वाढले. खटल्याचा निकाला लागला बस कंपनीला भेदभावाचे धोरण बंद करणे भाग पडले व अहिंसावादी लढयाच्या नेतृत्वामुळे मार्टिन ल्यूथर हे निग्रोच्या नेतेपदी विराजमान झाले. मॉर्टिनने निग्रोचा लढा अतिशय संघटितपणे चालवला ल्यूथरची संघटना 'सदर्न ख्रिश्चन लिडरशिप कॉन्फरन्स' (SCLC) व इतर संघटना नॅशनल असोशिएशन फॉर दी ॲडव्हॉन्समेंट ऑफ दी कलर्ड पिपल, 'कॉंग्रेस फॉर दी रेशियल इक्वालिटी' यासारख्या अन्य संघटना व्यापक प्रमाणात निग्रोंच्या दु:खाना वाचा फोडत होत्या. अतिशय संघटितपणे केलेल्या या संघटनात्मक बांधणीमुळे श्वेतवर्णीय अमेरिकनाच्या जीवनावर एक दडपण निर्माण झाले. १९६० मध्ये निग्रो संघटनांनी बैठे संप पुकारल्यामुळे भोजनालये, प्रवास व मनोरंजनाची स्थळे भेदभाव मुक्त झालो. निग्रोवर होणाऱ्या प्रत्येक अन्यायकारक घटनेची दखल राष्ट्राध्यक्षाना घ्यावी लागल्यामुळे निग्रोंच्या मार्गातील असंख्य अडचणीची कल्पना येवून इ.स.१९६० चा नागरी हक्क कायदा करावा लागला.

## ❑ १९६० चा नागरी हक्क कायदा (Civil Rights Act) :-

या कायद्याप्रमाणे निग्रोंना धमक्या देणे व फेडरल सरकारच्या आदेशांना झुगारून देणे, मतदानास प्रतिबंध करणे यासाठी दंड व कारावासाची शिक्षा सांगितली एखाद्याला केवळ वर्णावरून, वंशावरून मतदान करू दिले नाही तर राज्याच्या मतदानाच्या अटीची तपासणी करण्याचा अधिकार निग्रोंना देण्यात आला.

मार्टिन ल्यूथर किंग यांना 'अमेरिकन निग्रो मुक्तीचे' प्रणेते असे म्हटले जाते. त्यांनी विविध संघटनांमध्ये समन्वय साधून खऱ्या अर्थाने निग्रोंना स्वतंत्र केले. ३५० वर्षे गुलामीमध्ये बंदिस्त असलेल्या निग्रोंना मुक्त केले. त्यांच्यासाठी जीवन समर्पित केले. मार्टिन ल्यूथरनी फक्त अहिंसेच्याच मार्गानी हिंसेला दडपशाहीला संघटीतपणे प्रत्यूत्तर देवून निग्रोंचा मुक्ती लढा यशस्वी केला. निग्रोंचा प्रश्न कायदेशीर असण्याबरोबरच आर्थिक आहे. हे ओळखून निग्रोना १४, १५ व १६ वी घटना दुरूस्ती करून स्वातंत्र्य, समता व नागरिकत्व मतदानाचे हक्क दिले.

## ❑ राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी आणि नागरी हक्क लढा :-

जॉन केनेडी यांना निग्रो प्रश्नाबाबत सहानुभूती होती त्यांनी मार्टिन ल्युथर किंग यांना मदत करून निग्रो समाजाशी बांधीलकी व्यक्त केली निग्रो प्रश्नास केनेडी नैतिक समस्या मानत. जो पर्यंत सर्व नागरिक मुक्त होणार नाहीत तोपर्यंत राष्ट्र मुक्त होणार नाही त्यामुळे केनेडीने काँग्रेसमध्ये सुधारणा करण्याचे धोरण अवलंबविले. त्यांनी

१) नागरी हक्क कायदयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली.

२) आयसेन हॉवरची धोरणे कृतीत उतरवली उदा महत्वाच्या शासकीय पदावरती निग्रोंची नेमणूक करणे.

३) केनेडीचे धाकटे बंधू रॉबर्ट केनेडी यांनी निग्रोंना मतदानाचा हक्क देण्याची अमंलबजावणी केली.

४) घटनेची २४ वी दुरूस्ती मान्य करून जॉन केनेडी यांनी निग्रोचा भेदभाव रद्द केला.

५) ब्राउन केस (१९५४) निकालाची अंमलबजावणी करून निग्रोंना गोऱ्या समाजाशी एकरूप केले.

६) २० नोव्हेंबर १९६२ च्या केंद्रशासनाच्या आदेशाद्वारे गृहनिर्माण मंडळातील घरे निग्रोंना मिळण्याची तरतूद करण्यात आली.

७) मिसीसीपी विद्यापीठातील प्रवेश हा केनेडी राजवटीचा निग्रोच्या बाजूने असणारा प्रचंड विजय होता. श्वेतवर्णियांनी विद्यापीठ परिसरात निदर्शने केली. मात्र निग्रोंनी न घाबरता विद्यापीठात आपले नाव नोंदवले.

८) १९६३ वर्णद्वेषाची महाभंयकर लाट निर्माण झाली. ऑगस्ट महिन्यात २ लक्ष निग्रो व निग्रोबद्दल सहानुभूती असणाऱ्या गोऱ्यांनी मार्टिन ल्यूथरच्या नेतृत्वाखाली वॉशिंग्टनवर मोर्चा नेला. 'आता

स्वातंत्र्य पाहिजे' अशी फलके आंदोलन कर्त्याजवळ होती. केनेडीनी स्वागत करून हस्तांदोलन केले व मार्टिन ल्यूथर किंगने 'I have a Dream' सुप्रसिद्ध भाषण केले.

राष्ट्राध्यक्ष केनेडी यांनी मांडलेले नागरी हक्काचे विचार कॉंग्रेसपुढे चर्चिले जात असतानाच २२ नोव्हेंबर, १९६३ रोजी टेक्सास राज्यातील डग्लास शहरात एका माथेफिरूने राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी यांचा खून केला. केनेडीचे स्वप्न १२ जुलै, १९६४ रोजी साकार झाले. या दिवशी १९६४ चा नागरी हक्क कायदा पास झाला.

## ❋ १९६४ चा नागरी हक्क कायदा :–

१. या कायद्याद्वारे सार्वजनिक ठिकाणी हॉटेल्स रेस्टॉरंट थिएटर्स ठिकाणी वर्णभेद पाळण्यावर संपूर्ण बंदी गातली.

२. कायदा मंत्री यांना शाळेतून होणाऱ्या वर्णभेदाविरूद्ध तीव्र खटले भरण्याचे अधिकार दिले.

३. कायद्याने मालक, मजूर संघटनांनी वर्णभेद करू नये असे बजावले.

४. निग्रोंचा मतदानाचा हक्क अधिक सक्षम केला गेला.

५. वर्णभेदाच्या तत्वांना कायमस्वरूपी मूठमाती देण्याचे धोरण अवलंबिले गेले.

## ❑ निग्रो चळवळीचे मूल्यमापन :–

दोन राष्ट्राध्यक्षांचे बळी, असंख्य निग्रोवर जुलूम अन्याय व अत्याचार तसेच ३५० वर्षाच्या या अविवेकी परंपरेला मूठमाती देण्यासाठी अमेरिकेमध्ये घडून आलेले दु:खमय प्रसंग शेवटी मानवमुक्तीचा लढा यशस्वी ठरला मानवतादाच्या पुरस्कार करूनच आपण जगावर अधिराज्य गाजवू शकतो. याची पूर्ण जाणीव नेत्यांना तर झालीच पण श्वेत वर्णीय मानसिकता असणाऱ्यांनासुद्धा झाली. २००९ ते २०१७ या काळात बराक ओबामा या कृष्णवर्णिय व्यक्तीने अमेरिकन राष्ट्राध्यक्ष पद भूषविले. व त्यांनी जगात मानवतेचा विचार स्वातंत्र्य, समता व बंधूतेचा विचार वर्णद्वेषापेक्षा किती महत्त्वाचा आहे. हे सांगितले.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१

### अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) कलोनायझेशेन संघाची स्थापना अमेरिकेमध्ये केंव्हा झाली.

२) 'नागरी हक्काचा कायदा' १९५७ कोणी पारित केला.

३) गांधी तत्वांना प्रमाण मानणारा धर्मगुरू कोण होता.

४) खालीलपैकी कोणाला 'अमेरिकन निग्रो मुक्तीचे प्रेणेते म्हटले जाते.

५) इ. स. १९६४ चा नागरी हक्क कायदा कोणत्या राष्ट्राध्यक्षाच्या हौतात्म्याचे प्रतिक होय.

**ब) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

१) निग्रो हे मूळचे ................या खंडातील आहेत.

*(अ) युरोप (ब) ऑस्ट्रीया (क) आफ्रिका (ड) ऑस्ट्रेलिया.*

२) इ. स. १८५७ मधील सुप्रिम कोर्टाचा गुलामगिरी मान्य करणारा निकाल.....................या नावाने ओळखला जातो.

*(अ) निगर (ब) ब्लॅक फ्रायडे (क) ड्रडस्कॉट (ड) इमॅनसिपेशन.*

३) खालीलपैकी ................ या वृत्तपत्राने गुलामगिरी प्रथेविरूद्ध लिखान केले.

*(अ) द स्टेटसमन (ब) द डाऊन (क) लिबरेटर (ड) डाऊन टू अर्थ.*

४) गुलामाच्या मुक्ततेचा जाहीरनामा ................ यांनी प्रसिद्ध केला.

*(अ) जॉर्ज वॉशिंग्टन (ब) जॉर्ज बुश (क) वुड्रो विल्सन (ड) अब्राहम लिंकन*

५) अंतर्गत यादवी युद्धास ................. या अमेरिकन इतिहासकाराने सेकंड अमेरिकन रिव्होल्युसन असे म्हटले.

*(अ) चार्ल्स एडवर्ड (ब) जे.पी. गूच (क) टॉयन्बी (ड) इमॅन्युअल कांट.*

**क) दिर्घोत्तरी प्रश्न**

१) अमेरिकेतील नागरी हक्क चळवळीची सखोल माहिति लिहा?

२) अमेरिकेतील निग्रो जीवनाची चिकित्सक मांडणी करा.

३) निग्रो समस्यांचे स्वरूप विशद करा?

४) निग्रोच्या प्रश्नांसाठी करण्यात आलेल्या शासकीय प्रयत्नाची माहिती लिहा

५) निग्रोच्या प्रश्नासंबंधी राष्ट्राध्यक्षांच्या भूमिकेचे विवेचन करा?

६) मार्टिन ल्यूथर किंगचे योगदान विशद करा?

७) अमेरिकेतील नागरी हक्क कायद्याची सखोल चर्चा करा?

## २.२.२ वांशिक भेदभावाविरूद्धची चळवळ आफ्रिका

## २.२.२.१ उद्दिष्टये :-

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला-

१) वांशिक भेदभेदाची नीती म्हणजे काय? हे लक्षात येईल.

२) मानवतावादी विचारसरणीची जागतिक स्तरावर होणारी पायमल्ली/घसरण लक्षात येईल.

३) दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांच्या जीवन संघर्षाचा आढावा घेता येईल.

४) युरोपियन राष्ट्रानी आरंभिलेला व्यापारवाद, औद्योगिकरण, वसाहतवाद व साम्राज्यवादाचे नेमके स्वरूप लक्षात येईल.

५) दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णिय समाज आणि त्यांच्या नेत्यांची स्वातंत्र्य, समता व बंधुता यासाठी केलेली रचनात्मक व संघटनात्मक बांधणी समजेल.

दुसऱ्या महायुद्धानंतर आफ्रिकेतील काळया निग्रोंना वांशिक वेगळेपणाची वागणूक देण्याबाबत युरोपियन वसाहतवाद्यांनी जे धोरणात्मक बदल केले त्या धोरणालाच वांशिक भेदभावाचे धोरण म्हटले जाते. 'पृथ्वीवरील काळेखंड' आणि 'मानवी संस्कृतीचा पाळणा' अशी परस्परविरोधी विशेषणे देण्यात आलेला आफ्रिका खंड खूप मोढया प्रमाणावर युरोपियनांनी केलेल्या वसाहतवाद व साम्राज्यवादाची आठवण करून देतो ॲलन पॅटन यांनी आपल्या 'क्राय दी बिल्व्हेड कंट्री' या कादंबरीमध्ये दक्षिण आफ्रिकेतील वंशवादाचे वास्तव चित्र रंगविले आहे.

नैसर्गिक साधनसंपत्तीने परिपूर्ण असलेल्या या खंडामध्ये व्यापारी व भौतिकवादी मनोवृत्तीच्या युरोपीय साम्राज्यवादी राष्ट्रांनी नैसर्गिक व मानवी साधनसंपत्तीची लुट करून प्रचंड प्रमाणात नफा कमवून या संपत्तीचा उपयोग विलासी, ऐषारामी व समृद्ध जीवन जगण्यासाठी केला आणि आफ्रिकेतील लोकांमध्ये राष्ट्रवादाची भावना जोपासण्यापेक्षा तेथे युरोपीयन राष्ट्रातील संकुचिता अविवेकी असा वांशिक भेदाचा विचार रूजविला व आफ्रिकेची पिळवणूक करण्याचे धोरण अवलंबवले.

एका खंडामध्ये पुर्नरूज्जीवनाच्या चळवळीमुळे प्रबोधनाचे वारे वाहत होते तर दुसरीकडे याच प्रबोधनाचा विचार घेवून येरोपीय राष्ट्रानी उदा. फ्रेंच, ब्रिटीश, डच, स्पॅनिश आणि पोर्तुगिज यांनी आफ्रिकेमध्ये व्यापाराचा, साम्राज्यवादाचा वसाहतवादाचा वंशवादाचा आणि मूलत: माानवी मुल्यांना संस्कृतींना मारक ठरेल अशा वांशिक श्रेष्ठत्व कनिष्ठत्वाचा विचार रूजविला त्यातून जगातील सत्तासंतूलनामध्ये जी खंडे किंवा राष्ट्रे मागे पडली त्यात प्रामुख्याने आफ्रिका खंडाचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागते.

वंशभेद किंवा वांशिक भेदभावाच्या धोरणाला जगात सगळयात मोठया प्रमाणात बळी पडणारा खंड म्हणजे आफ्रिका खंड होय. दुसऱ्या महायुद्धानंतर निग्रोंसाठी/ कृष्णवंशियांसाठी आफ्रिकन प्रजासत्ताकाने (Republic of South Africa) अधिकृतपणे जाहीर केले. जगामधील वंश व रंगाच्या आधारे भेदभाव करणाऱ्या या वृत्तीला 'वंशभेद नीती' असे म्हणतात. युरोपीयन लोक स्वत:ला श्वेतवर्णीय समजत असल्यामुळे आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांच्या वसाहतीला कनिष्ठ समजून छळ करण्याचे धोरण अवंलबविले कारण वसाहतवादाच्या व व्यापारवादाच्या धोरणामुळे गुलामाप्रमाणे कृष्णवर्णीय विकले जात. मळयावर किंवा इतर कामांसाठी त्यांचा पशूसारखा वापर होईल या वसाहतवादी राष्ट्रांनी इ. स. १९४५ नंतर कृष्णवर्णियांना दुटप्पी वागणूक देण्याचा चंगच बांधला.

Apartheid हा आफ्रिकन शब्द Aparthess म्हणजेच वेगळेपण दर्शवितो. इ. स. १९४० च्या

दशकात आफ्रिकन नॅशनल पक्ष (African National Party) या राजकीय पक्षाने निग्रो वंशियाचे इतर वंशापासून वेगळेपण दर्शविण्यासाठी प्रचलित केला खर तर ही वंशद्वेषची खूळचट कल्पना असली तरी आपल्या प्रतिस्पर्धांना हीन लेखने दुबळा समजणे किंवा कमजोर समजण्याची ही प्रवृत्ती म्हणजेच वंशभेद नीती होय.

## ❑ वांशिक भेदभावाची पार्श्वभूमी :-

प्रथमत: इ. स. १६५२ साली युरोपीय गोरे लोक आफ्रिकेत कायम वास्तव्यासाठी आले तेव्हापासूनच वांशिक भेदाभेदाची भावना गोऱ्या लोकांच्या मनामध्ये रूजलेली होती. दक्षिण आफ्रिकेमध्ये अस्तित्वात असलेल्या १९% श्वेतवर्णीय, ६८% कृष्णवर्णीय (आफ्रिकन) व ३% आशियायी व अन्य वंशिय मानवी समूहाची वेगवेगळया प्रादेशिक विभागात वास्ती करावयास लावून, त्यांची स्वायत्त एकवंशीय राष्ट्रे, दक्षिण आफ्रिकेमध्ये निर्माण करण्याची योजना यावांशिक दृढिकरणाच्या नितीमागे होती. ही योजना पाश्चिमात्य श्वेत लोकांनी प्रस्तुत केली. या योजनेमध्ये फक्त कृष्णवर्णीय, श्वेतवर्णीयांच्या वसाहतीमध्ये वेगळेपण असावे इतकेच नव्हेतर 'गौरवर्णीय किंवा श्वेतवर्णीय' हे युरोप वंशीय मुलत: श्रेष्ठ असून त्यांचे वर्चस्व संपूर्ण जगाने मान्य केले पाहिजे अशी एक अनैसर्गिक व कृत्रिम धारणा बनवून ती जगामध्ये रूजविण्याचे काम मोठया प्रमाणात युरोपियनांने केले आणि आफ्रिकेमध्ये तर या विचारसरणीने मानवतावादी मूल्यांना अगदी पायदळी तुडवले. एकंदरीतच वांशिक भेदभाव "Apartheid" ही एक निसर्ग दत्त गोष्ट आहे हा विचार जगभर युरोपीयनांनी बिंबवण्याचा प्रयत्न केला.

## ❑ युरोपियन साम्राज्याचा आफ्रिकेतील विस्तार :-

१९ व्या शतकामध्ये वसाहती स्थापन करण्यासाठी युरोपियन राष्ट्रांमध्ये स्पर्धा लागली आणि आफ्रिका खंडामध्ये मोठया प्रमाणात वसाहती निर्माण करण्यात आल्या आफ्रिका खंडाचे क्षेत्रफळ साधारणत: १ कोटी १५ लाख चौरस मैल असून हे खंड जगातले दुसऱ्या क्रमांकाचे खंड म्हणून ओळखले जाते. इ.स. १८७५ पर्यंत आफ्रिका खंडाचा खूप थोडा भाग युरोपियन वर्चस्वाखाली होता मात्र उत्तरोत्तर वसाहती वाढत गेल्या फ्रान्सने इ.स.१८३० मध्ये 'अल्जेरिया' वर वर्चस्व मिळविले तर इंग्लडने केप कॉलनी व पुढे इ.स.१८४३ मध्ये नाताळवर वर्चस्व प्रस्थापित केले. गांबीया, गोल्डा व लेगास यावर इंग्लंडने वर्चस्व निर्माण केले. पुढे फ्रान्सने सेनेगल, आयव्हरी कोस्ट आणि गैबन वर वर्चस्व निर्माण केले. तर अंगोला व मोझांबिक पोर्तुगालकडे व स्पॅनिश गियाना स्पेनकडे खरतर तर बलाढय आफ्रिकेच्या फक्त १०% भागावरच युरोपचे वर्चस्व होते. ९०% भूभाग अजूनही अपरिचित होता. मात्र बेल्जीअमचा राजा दुसरा लिओपोल्ड याने आफ्रिकेतील ब्रुसेल्स येथे इ. स. १८७६ मध्ये आपली राजधानी नेली व आफ्रिकेचा शोध घेवून तेथे मानवी संस्कृतीत प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय भुगोल परिषद भरवली. बेल्जीअमच्या या कृतीमुळे इटली, फ्रान्स, ब्रिटन, जर्मनी, पोर्तुगाल या राष्ट्रांनी आफ्रिकेचे वेगवेगळे भाग ताब्यात घेतले. परिणामत: आफ्रिकेच्या विभाजनाची प्रक्रिया सुरू झाली. पुढे इ. स. १८८४-८५ मध्ये समन्वयासाठी आंतरराष्ट्रीय बर्लिन परिषद

बोलावण्यात आली. त्यात व्यापार, जहाज, वाहतूकीचे प्रश्न यावरच चर्चा झाली. या परिषदेने आफ्रिकन लोकांच्या प्रत्यक्ष कल्याणाबद्दल चिंता व्यक्त केली आणि म्हटले की, गुलामी व गुलामाचा व्यापार नष्ट करणे आणि आफ्रिकन लोकांच्या शैक्षणिक आणि भौतिक प्रगतीसाठी कार्य करणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट असेल. मात्र या पवित्र कर्तव्याचा लोकांना विसर पडला आणि युरोपियन सत्तांनी आफ्रिकन लोकांचे अमानुष शोषण करावयास सुरूवात केली. इ.स. १९१४ पर्यंत ॲबॅसिनिया व लायबेरिया वगळता सर्व भूभागाचे विभाजन युरोपीयन सत्तांनी आपापसात केले हे विभाजन कोणतेही युद्ध न होता झाले. आणि ते फक्त ३० वर्षात झाले हे विभाजन म्हणजे आफ्रिका खंडाला लुटून त्याचे जास्तीत जास्त शोषण करू पाहणाऱ्या युरोपीयन सत्तांचे वसाहतीकरण होते. ब्रिटिश व उंच यांच्यामध्ये दक्षिण आफ्रिकेच्या अन्य भागात स्थलांतर करण्याच्या प्रश्नांवरून 'बोअर युद्ध' झाले. यात डचांचा पराभव झाला. १९१० साली ट्रान्सवाल, ऑरेंज फ्री स्टेट' नाताळ व केप कॉलनी या प्रदेशाचे 'दक्षिण आफ्रिकन संघराज्य' (Union of South Africa) निर्माण केले गेले. या नवनिर्मित संघराज्यात ७०% काळे निग्रो (बांटू-Bantu) १८% श्वतेवर्णीय (डच व ब्रिटीश) ९% मिश्रवंशीय व ०३% आशियायी होते. आफ्रिकेमध्ये गोऱ्या लोकांद्वारे निग्रोंना देण्यात येणारी वागणूक ही अमेरिकेतील निग्रोंना देण्यात येणाऱ्या निग्रोपेक्षा हीन होती.

एकंदरितच साम्राज्यवादाच्या विस्ताराबरोबरच युरोपियन लोकांनी मोठया संख्यने आफ्रिकेमध्ये स्थलांतर केले. ही संख्या सुमारे ७० लक्ष होती. त्यापैकी २५ लक्ष दक्षिण आफ्रिकेत स्थलांतरीत झाले होते. १९६० पर्यत बहुतांश वसाहती स्वातंत्र्य झालेल्या असल्या तरी आफ्रिकेत स्थायिक झालेल्या युरोपियन लोकांनी ही वर्णद्वेषाची समस्या सतत चिघळत ठेवली.

## ❑ दक्षिण आफ्रिकेतील वर्णविद्वेष (अपार्थाईड)

३ मे १९१० रोजी बोअर युद्धानंतर ब्रिटिश संसदेच्या कायद्यान्वये दक्षिण आफ्रिकेच्या संघराज्याची स्थापना करण्यात आली. सर्व सत्ता गोऱ्या लोकांकडे देण्यात आली. गोऱ्या लोकांनी आफ्रिकन व आशियायी लोकांना अत्यंत अपमानास्पद वागणूक दिली. दुय्यम श्रेणीचे नागरिक समजण्याबरोबर वर्णावर आधारित अत्यंत कठोर कायद्याची निर्मिती करण्यात आली व तेवढयाच जाचक पद्धतीने ते अमलात आणले गेले. योहानिस स्टियम यांच्या मते, 'गोरे हे जन्मताच मालक असतात, राज्यकर्ते असतात, तर काळे लोक हे जन्मताच गुलाम असतात. आणि काळयाशी सहकार्य म्हणजे गोऱ्याचा मृत्यूच!' आफ्रिकेत सर्वच क्षेत्रामध्ये वर्णविद्वेषाचा भयानक चेहरा दिसून येत होता. अल्पसंख्यांक गोऱ्या राजवटीने आफ्रिकन व आशियायी कृष्णवंशीयावर राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक बंधने घातली ती खालीलप्रमाणे :-

## ❑ वैशिष्टये :-

**१. मतदानाचा अधिकार नाकारला :** कृष्णवर्णियांना मतदानाचा अधिकार नाकारला दक्षिण आफ्रिकेचा पंतप्रधान डॉक्टर मालान कमालीचा निग्राद्वेष्टा होता. त्याने नाताळ व ट्रान्सव्हालमधील

निग्रो व भारतीयांच्या मतदानाचा हक्क नाकारला. या घटनेकडे संयुक्त राष्ट्रसंघाने दुख व्यक्त करण्यापलिकडे काहीही केले नाही.

२. **ओळखपत्राची अट :** काळया लोकांचे अधिकार दडपण्यासाठी वॉवर्ड सरकारने केलेल्या अनेक कायद्यापैकी 'पीपल्स रजिस्ट्रेशन लॉ' अनुसार प्रत्येक कृष्णवर्णियांना ओळखपत्र जवळ ठेवण्याची सक्ती करण्यात आली. त्यामुळे कृष्णवर्णियांना नियंत्रित जीवन जगावे लागले.

३. **विवाहावर बंदी :** 'इमॉरॅलिटी अमेण्डमेंड ॲक्ट'नुसार कोणत्याही युरोपियन व्यक्तीला बिगरयुरोपियन महिलेशी लग्न करण्यास मनाई करण्यात आली.

४. राजकीय हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले.

५. कामाचे बंधन घालण्यात आले.

६. अन्नधान्याचा साठा करण्यावर बंदी घालण्यात आली.

७. सर्वच स्तरावर कृष्णवर्णियांना दुय्यम दर्जा

८. बांटूच्या स्वशासनाचा कायदा

९. संप करण्यास बंदी घालण्यात आली.

१०. निग्रोंना कुशल काम करणाऱ्यावर बंदी घालण्यात आली.

## ❑ वांशिक भेदाभेदावाचे अधिकृत धोरण (१९४८)

१९४८ साली डॉ. माल्न दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान झाले आणि त्यांनी नवे वांशिक भेदभावाचे (Apartheid) धोरण जाहीर केले. अधिकृतपणे असे धोरण जाहीर करणारे ते पहिले पंतप्रधान होते. यांच्या धोरणाने आफ्रिकन कृष्णवर्णीयांचे जीवन हालाखीचे झाले. डच रिफार्म चर्च या संस्थेने बायबलमधील 'वांशिक भेदभाव' स्पष्ट करणारे उतारे उदधृत करायला लावले व समतेच्या तत्वाच्या विरोधी धोरणाची आखणी करून आफ्रिकेच्या मानवी संसाधनाची गतिशिलता खंडीत केली.

डॉ. माल्न (१९४८-५४), स्ट्रिज्डम (१९५४-५८), व्हरवर्ड (१९५८-६६), होर्स्टर (१९६६-७८) या सर्वच पंतप्रधानांनी वांशिक भेदभावाचे धोरण अतिशय कडकपणे राबविले. कृष्णवर्णियावर नियंत्रण ठेवण्यासाठी पासपद्धती लागू करण्यात आली. गलिच्छ ठिकाणी राहण्यासाठी त्यांच्यावर सक्ती करण्यात आली. यामुळे राहणीमान शिवाय अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांना जीवन जगावे लागले.

## ❑ आफ्रिकेमध्ये राष्ट्रवादाचा उदय :-

आपला उद्धार आपण स्वत:च करू शकतो. या मनोवृत्तीने प्रेरीत होवून परकीय सत्तेची प्रतिक्रिया म्हणून परकीय सत्तेमुळे बाहेरच्या जगाशी संबंध आल्यामुळे आफ्रिकेमधे राष्ट्रवादाचा जन्म झाला. युरापियनांनी

आफ्रिकेत जी जातीय वर्णीय धोरणे आखली त्या विरूद्धची प्रतिक्रिया म्हणजे आफ्रिकेत राष्ट्रवादाचा उदय झाला.

## ❋ राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे :-

१) युरोपीयनाने केलेल्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक शोषण.

२) युरापीयनांशी आलेल्या संपर्कामुळे बाहय जगाशी आलेला संबंध.

३) भारतीय स्वातंत्र्यामुळे आफ्रिकनांना स्फूर्ती.

४) सयुंक्त राष्ट्र संघटना व इतर आंतरराष्ट्रीय संघटनांचा वसाहतवाद व साम्राज्यवादाला विरोध.

५) दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपियन राष्ट्राना आलेले आर्थिक दौर्बल्य.

या व अन्य कारणामुळे उत्तरोत्तर युरापियनांच्या आफ्रिकेतील वसाहतवादाचा प्रभावा कमी होताना दिसून येतो.

## ❋ वांशिक भेदभावास विरोध :-

आफ्रिकेतील अनेक वसाहती स्वतंत्र होत होत्या. आफ्रिकेत जहालवादाची लाट उसळली पण दक्षिण आफ्रिकेतील गोरे लोक वर्णद्वेश वाढवण्यातच मग्न होते. दक्षिण आफ्रिकेतील निग्रो मुळातच अशिक्षित, असंघटीत, निशस्त्र होते. अशा गंभीर परिस्थितीमध्ये अगदी शांततामय मार्गाने कृष्णवर्णीयांनी श्वेतवादाला विरोध करावयास सुरूवात केली. ब्रिटीश कॉमनवेल्थ देशांच्या प्रधानमंत्र्यांच्या बैठकीत दक्षिण आफ्रिकेच्या वर्णविद्वेशी धोरणावर कडाडून टीका केली. मात्र दक्षिण आफ्रिकेमध्ये राजकीय धोरणाला विरोध करणाऱ्या कृष्णवर्णीयांवर कम्युनिष्ठ असा आरोप ठेवून कठोर शिक्षा दिली जाई. (Suppression of communism Act).

### १. अल्बर्ट लुथलीची मोहीम :-

आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेसचा नेता असलेल्या लुथुलीने सरकारी धोरणाचा प्रथम संघटीतपणे विरोध केला.

### २. स्वातंत्र्याची सनद Freedom Charter १९५५ :-

आशियायी, कृष्णवर्णीय व आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेसने क्लिपटाऊन येथे एकत्र येवून स्वातंष्याची सनद वाचून दाखवली. यातील प्रमुख मागण्या समानता, स्वातंत्र्य, मतदानाचा अधिकार, शिक्षण, वैद्यकीय मदत, शिक्षण इ. होत्या.

### ३. धार्मिक संघाटनाचा वंशवादास विरोध :-

ट्रेव्हर हडलसन व चर्चमधील मिशनऱ्यांनी मोठया प्रमाणात वांशिक भेदभावास विरोध केला.

### ४. आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेसची बस वाहतूकीवर बहिष्कार मोहीम :-

## ५. १९६० चे निर्देशने व मंडेलांना अटक :-

शार्प व्हिला या नगरीत १९६० मध्ये प्रचंड मोर्चेव निदर्शने काढण्यात आली. पोलीसांनी केलेल्या गोळीबारात ६७ आफ्रिकन ठार झाले. पुढे या संघटनेवर बंदी घातली. १५,००० निदर्शकांना अटक करण्यात आली. मात्र हा मोचा कृष्णवर्णियांना वळण लावणारा ठरला. नेल्सन मंडेलासह अनेक नेत्यांना जन्मठेपेक्षी शिक्षा झाली. काँग्रेसच्या अनेक नेत्यांना पकडून शिक्षा देण्यात आल्या. लुथुली यांनी आपली चळवळ अहिंसक मार्गाने सुरू ठेवली. Let my People Go या नावाने त्यांनी आपले आत्मचरित्र लिहिले. या कार्यामुळे त्यांना १९६७ चे शांततेच नोबेल पारितोषिक त्यांना देण्यात आले.

## ६. १९७० च्या दशकातील असंतोष :-

या दशकात वंशेभेदाचा प्रश्न व्यापक प्रमाणात चिघळला सरकारच्या दडपशाहीला ५०० निग्रो बळी पडले. मात्र कृष्णवर्णियांच्या निदर्शनाने व्यापक स्वरूप धारण केले.

## ❑ डॉ. नेल्सन मंडेलाचे नेतृत्व :-

दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासातील गोऱ्यांकडून काळयांकडे झालेले हे सत्तांतर, यादवी व हिंसाचाराविरूद्ध अतिशय धीर व गांभिर्याने तोंड देवून प्रसंगातून मार्ग काढण्याचे श्रेय नेल्सन मंडेला यांना जाते. मंडेलांनी वांशिक भेदभावाविरूद्ध प्रदिर्घ लढा देतांना २७ वर्षे तुरूंगवास भोगला दक्षिण आफ्रिकेचे पहिले अध्यक्ष होण्याचा मान त्यांना मिळाला.

१९१२ साली स्थापन झालेल्या आफ्रिकन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या पुढाकारने मंडेला व त्यांच्या सहकार्याने विविध संघटनेच्या माध्यमातून वंशभेद विरोधी आंदोलन केले. मंडेला हे आफ्रिकन नॅशनल काँग्रेसचे उपाध्यक्ष होते. त्यांचा जन्म इ.स. १९१८ मध्ये 'कुनू' येथ झाला. वडीलाचे नाव हेन्री मंडेला थेम्बू होते. ते निग्रो टोळीचे सरदार होते. त्याचे शिक्षण जोहान्सबर्ग येथे झाले. त्यांनी कायद्याची पदवी घेतली. तद्नंतर स्कॉटलंड विद्यापीठाने त्यांना डॉक्टरेट पदवी बहाल केली. मंडेलांनी आफ्रिकन नॅशनल काँग्रेसच्या मदतीने गांधीवादी पद्धतीने लढा दिला. १९५५ साली आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने 'आफ्रिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आफ्रिकेमध्ये १९८० पर्यंत वांशिक भेदभावाच्या धोरणाविरूद्ध लढा दिला.

इ. स. १९७९ साली आफ्रिकेमध्ये पंतप्रधान पी.डब्लू बोथाचे सरकार आले व त्यांनी कृष्णवर्णीयाच्या धोरणात अनुकूल बदल केले. या सरकारने

१) कृष्णवर्णियांना कामगार संघटना स्थापन करण्यास व संपावर जाण्यास परवानगी दिली.

२) कृष्णवर्णियांना नगरपालिकेची निवडणूक लढविण्यास परवानगी दिली.

३) मिश्रविवाहांना व लैंगिक संबंधाना परवानगी दिली.

४) पास पद्धतीचा त्याग करण्यात आला.

त्यानंतर १९८९ मध्ये निवडून आलेल्या डब्लू डी क्लार्क सरकारने कृष्णवर्णियांना मतदानाचा अधिकार दिला व कृष्णवर्णियांच्या हाती सत्ता सोपवण्याचे ठरवले. २७ वर्षे तुरूंगात असलेल्या मंडेलांना १९९० साली मुक्त केले. आफ्रिकन नॅशनल पक्षाला मान्यता दिली. वांशिक भेदभावाचे धोरण रद्द करण्यात आले. तुरूंगातून बाहेर आल्यानंतर मंडेलाने पक्षाचे नेतृत्व स्वीकारले. नामीबीयालाचे स्वातंत्र्य बहाल केले. तेथे कृष्णवर्णिय सरकार स्थापन केले. १६ जून १९९९ रोजी नेल्सन मंडेला दक्षिण आफ्रिकेच्या अध्यक्षपदावरून निवृत्त झाले त्यानंतर थाम्बो एम्बेली यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली.

आफ्रिकेमध्ये दक्षिण आफ्रिका वगळता जवळजवळ सर्वच देश मागास व गरीब असून सर्वच देशामध्ये राजकीय अस्थिरता दिसून येते. शिक्षण, आर्थिक मागासलेपणा याबरोबरच युरोपियन वंशीय लोकांच्या वास्तव्यामुळेही राष्ट्रीय एकात्मतेस अडचणी येताना दिसून येतात. आफ्रिकन एकता संघ, कंपाला शिखर परिषद, नौरोबी शिखर परिषद व इतर बैठकी व शिखर परिषदांमधून वंशवादाविरोधी भावनेचे जागतिक ऐक्य प्रस्थापित करण्याचा प्रयत आफ्रिकन संघटनांनी केला.

## ❑ वांशिक भेदभावास जागतिक विरोध :-

१) राष्ट्रकूल संघटना ब्रिटनचे पंतप्रधान हेरॉल्ड मॅकमिलन

२) संयुक्त राष्ट्रसंघ १९६०, ७०, ८०

३) आफ्रिकन एकता संघ

याशिवाय जगांमध्ये अनेक आंतरराष्ट्रीय बैठका व परिषदामध्ये दक्षिण आफ्रिकेतील वांशिक भेदभावाचा विरोधी करण्यात आला.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२

### अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) १९४८ साली दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान कोण होते.

२) क्राय दी बिलव्हेड क्रंटी हे पुस्तक कोणी लिहीले.

३) पृथ्वीवरील काळेखंड म्हणून ओळखले जाते.

४) 'बोअर युद्ध' कोणी जिंकले.

५) 'बोअर युद्ध' कोणत्या वर्षी घडून आले.

### ब) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा?

१) वांशिक भेदभाव नीतीचे अनुसरण युरोपीयनाने .............. या खंडात केले.

*(अ) दक्षिण आफ्रिका (ब) इंग्लड (क) फ्रान्स (ड) जर्मनी.*

२) डॉ. नेल्सन मंडेला यांचा जन्म................येथे झाला.

*(अ) अल्जेरिया (ब) कूणू (क) ट्रान्सवाल (ड) जोहान्सबर्ग.*

३) .................. यांना शांततेचे नोबल पारितोषिक देण्यात आले.

*(अ) डॉ. माल्न (ब) निक्सन (क) लुथुली (ड) अॅलन पॅटन.*

४) .................. हे लुथुली यांच्या आत्मचरीत्राचे नाव आहे.

*(अ) Racial Riscrimination (ब) Caste and creed*

*(क) Europeans Go back (ड) Let my people Go.*

५) डॉ. मंडेला यांना ................ वर्षे तुरूंगामध्ये ठेवण्यात आले.

*(अ) २५ (ब) २७ (क) २९ (ड) ३१.*

## २.२.३ स्त्रीवादी चळवळ अमेरिका

### ❑ उद्दिष्टे :-

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

- ❋ स्त्रीवादाचा अर्थ, व्याख्या याची माहिती मिळेल.
- ❋ स्त्रीवादी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून येईल.
- ❋ स्त्रीवादाच्या अभ्यासासाठीचे वेगवेगळे .ष्टिकोन किंवा सिद्धांत समजतील.
- ❋ अमेरिकेतील स्त्रीवादी चळवळीचा विकास समजेल.
- ❋ स्त्रीवादी चळवळीच्या संघर्षाचे टप्पे समजतील.
- ❋ स्त्रीवादाचा अमेरिकन समाजव्यवस्थेवरील प्रभावाचे स्पष्टीकरण करता येईल.

इ. स. १९९० च्या जनगणनेनुसार अमेरिकेमध्ये स्त्रियांची संख्या पुरूषांच्या संख्येपेक्षा जवळजवळ ६८ लाखाने अधिक भरली आणि तरीसुद्धा त्यांची गणना 'अल्पसंख्याक' केली जाते. ही अमेरिकेतील विसंगतीपूर्ण शोकांतिका आहे. स्त्रियांच्या संबंधी अतिशय परंपरागत दृष्टिकोन अमेरिकेमध्ये अस्तित्वात होता. विज्ञान तंत्रज्ञानाने प्रगत अशा अमेरिकन राष्ट्राला आपल्या राष्ट्राचा पायाभूत घटक असणाऱ्या या नैतिक आणि तितक्याच संवेदनशील प्रश्नाला वाचा फोडण्यास २० वे शतक उजाडावे लागले.

स्त्रियांचे कार्यक्षेत्र पती, मुल व कुटुंबापर्यंतच सिमीत करण्यात अमेरिकाही मागे नव्हती. स्त्रियांचे एक व्यक्ती म्हणून अस्तीत्व मान्य करण्यास अमेरिका सुद्धा मागेच पडल्याचे दिसून येते. पितृसत्ताक व्यवस्थेने स्त्रीला नेहमीच गौन स्थान दिलेले असून स्त्रीयांच्या आत्मविश्वासाचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न सातत्याने

पुरूषप्रधान व्यवस्थेने केलला आढळतो. 'स्त्रियांच्या शोषणाला कारणीभूत ठरलेली पुरूषप्रधान व्यवस्था नष्ट करण्याची भाषा स्त्रीवाद करतो.'

प्रस्थापित पुरूषप्रधान व्यवस्था नष्ट करून स्त्रीयांच्या हक्कांना महत्त्व देणारी आणि स्त्रीयांच्या विकासाला वाव नवसमाजरचेनची मांडणी करणाऱ्या विचारप्रणालीला 'स्त्रीवाद' म्हणतात.

मूलत: स्त्रीवाद म्हणजे स्त्रीयांच्या हक्कामध्ये भर घालणारी विचारप्रणाली नसून समाज परिवर्तनाचा मार्ग दाखविणारी आणि परिवर्तनाचा प्रचार आणि प्रसार करणारी विचारधारा होय. १९६० च्या दशकानंतर विविध राष्ट्रामधील राज्यव्यवस्थांनी सामाजिक चळवळीचा नेमका अर्थ लावताना हे लक्षात आले की स्त्रीवादी विचाराची पार्श्वभूमी व स्त्रीवादाचा प्रवाह खूप जुना व बहुआयामी आहे, अनेक मितीय आहे. आणि स्त्रीवाद ही एक राजकीय प्रणाली आहे.

## स्त्रीवाद म्हणजे काय?

स्त्रीवादी अभ्यासक लिंडा यांनी आपल्या 'यू वुमन' या ग्रंथात 'स्त्रीवाद' या शब्दाचा सर्वप्रथम वापर इ. स. १८९० मध्ये केला तर एलीन डयूबोयस यांनी इ.स. १९१० मध्ये 'स्त्रीवाद आणि मताधिकार' या विषयावर लिहिलेल्या संशोधन लेखात राजकीय चळवळ या हेतूने स्त्रीवाद हा शब्द वापरला. स्त्रीवाद या शब्दाचा वापर खूप पूर्वीपासून केला जात असला तरी सशक्त विचारधारा म्हणून ही संकल्पना २० व्या शतकात उदयाला आली. स्त्रीवाद ही राजकीय प्रणाली आहे हे लक्षात घेतले पाहिजे. स्त्रीयाच्या अधिकारचा पुरस्कार करणारी स्त्रीवाद ही सर्वसमावेशक विचारसरणी आहे. स्त्रीला आपल्या क्षमता सिद्ध करण्यासाठी समाजाने पुरूषाच्या बरोबरीने संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. ही स्त्रीवादाची प्रमुख मागणी असून लिंगभेदाधिष्ठीत राजकारणाविरूद्ध संघर्ष करणारी कृतिशिल विचारधारा म्हणजेच स्त्रीवाद होय.

## ❑ स्त्रीवादाच्या व्याख्या :-

फेमिनिझम हा मूळ शब्द लॅटिन आहे. फेमिना याचा अर्थ वूमन असून स्त्रीयांना त्यांच्या बाईपणामुळे दुय्यमत्व मिळते. जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील स्त्रीयाचे शोषण आणि दुय्यमत्व नष्ट करणे म्हणजे स्त्रीवाद होय.

१) **वेबस्टर शब्दकोषानुसार,** ''स्त्रीवाद म्हणजे स्त्रीयांना पुरूषाच्या बरोबरीने समान राजकीय अधिकार देणे होय.''

२) **तत्वज्ञान शब्दकोशानुसार,** ''स्त्रीयांच्या हक्काचे समर्थन करणारा विचार म्हणजे स्त्रीवाद होय.''

३) **सिमॉन दि बूव्हा** यांच्या मते, ''सिमॉन म्हणजे केवळ स्त्री हक्काचे समर्थन नसून स्त्रीची 'स्त्री' म्हणून ओळख करून देणे आणि स्त्रीयांच्या प्रश्नाविषयी समाजामध्ये आस्था विकसीत करणारी विचारधारा आहे.''

एकंदरीतच स्त्रीवाद म्हणजे पुरूषाच्या बरोबरीने समान राजकीय, सामाजिक आणि आर्थिक अधिकार मिळविण्यासाठी चालू असलेला तात्विक संघर्ष होय.

## ❑ स्त्रीवादी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

जागतिक इतिहासामध्ये प्रारंभीचा टप्पा हा मातृप्रधान कुटुंबव्यवस्थेचा होता. ज्यात स्त्रीयाचे स्थान पुरूषांपेक्षा वरचे होते. कृषीसंस्कृतीचा उगमच मूळी स्त्रीयांनी केला पुढे 'श्रमविभागणी' मुळे स्त्रीयांना दुय्यमत्व बहाल केले आणि धर्मग्रंथानी तर स्त्रियांच्या अस्तित्वाला उपभोग्य वस्तूच मानले. पुढे सरंजामशाही कालखंडामध्ये स्त्रीयांच्या व्यक्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले.

विज्ञानाच्या उदयातून इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. त्यातून वसाहतवाद व वसाहतवादातून साम्राज्यवाद उदयाला आला. मात्र वर्चस्ववादी सत्तांनी वसाहतवाद व साम्राज्यवादांच्या प्रारंभिक अवस्थेमध्ये स्त्रीयांच्या अस्तित्वालाच दुय्यम स्थान देण्याचेच धोरण अंगिकारले. मात्र फ्रेंच राज्यक्रांती स्वातंत्र्य, समता व बंधुतेचा विचार, पहिले महायुद्ध अमेरिकेतील व जगातील चळवळी या घटनांनी स्त्रीवादाला चालना दिली. स्त्रीयांनी आपल्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी स्वतंत्रपणे व सामुहिकपणे प्रयत्न सुरू केले. कामाच्या ठिकाणच्या प्रश्नापासून ते वैयक्तिक प्रश्न याची चर्चा करावयास स्त्रीया पुढे येवू लागल्या.

मेरी वालस्टोन क्रॉफ्ट यांच्या 'दि व्हिडीकेशन ऑफ द राईटस ऑफ वुमन' या ग्रंथाने महिलांच्या अधिकाराबद्दल सर्वप्रथम आवाज उठवला हा ग्रंथ म्हणजे स्त्रीयांच्या प्रश्नांची वैचारिक मांडणी करणारा पहिला प्रयत्न मानला जातो. पुढे स्त्रीयांच्या आर्थिक आणि लैंगिक प्रश्नासंबंधी विस्ताराने मांडणी करण्यात येऊ लागली. स्त्रीयांचे दुयमत्व नष्ट करण्याची विविध नाटके, पुस्तके व व्याख्यानातून ही चळवळ सक्षमपणे पुढे आली.

अमेरिकेत लुसी स्टीन यांनी महिला आंदोलन सुरू केले. इ. स. १८९० नंतर स्त्रीयांना मतदानाचा हक्क असावा या राजकीय मागणीसाठी विविध देशात चळवळी सुरू झाल्या. इंग्लंडमध्ये मतदान अधिकारासाठी झालेल्या आंदोलनातून स्त्री चळवळीला व्यापक दिशा मिळाली. महायुद्धातील स्त्रीयांच्या कार्याने प्रभावित होवून इंग्लंडने मतदानाचा अधिकार बहाल करण्याचे पाऊल उचलले इ.स. १९१० मध्ये कोपनहेग येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेने जगातील स्त्रीयांच्या हक्काचे स्मरण करण्यासाठी ८ मार्च हा जागतिक 'महिला दिन' म्हणून साजरा केला जावा हा ठराव सम्मत केला.

इ. स.१९२० ते १९६० हा स्त्रीवादी चळवळीसाठी प्रतिक्रांतीचा काळ मानला जातो. मात्र इ. स. १९४८ मध्ये युनोने जाहीर केलेल्या मानवी हक्क जाहीरनाम्यामुळे स्त्रियांच्या अधिकाराला वैश्विक मान्यता मिळाली. दुसऱ्या महायुद्धानंतरच खऱ्या अर्थाने स्त्री प्रश्नांचे वैचारिक मांडणी करणारे लेखन खूप मोठया प्रमाणावर प्रसिद्ध होवू लागले. इ. स. १९४५ ते १९६० या कालखंडातील स्त्री जीवनाचे वैशिष्टये म्हणजे सुखसोई सुबत्ता यामध्ये स्त्रीया पुरूषप्रधान संस्कृतीत गुरफटल्याचे दिसून येते.

इ. स. १९६० नंतर नोकरी करणाऱ्या स्त्रीयांची संख्या वाढली स्त्रीयांना आपले आत्मभान जाणून घेण्याची संधी मिळाली व पिळवणूकीविरूद्ध संस्थात्मक स्वरूपाचे मोठे गट निर्माण झाले. एलिझाबेथ कॅंढी व सुसान अँथनी यांच्या प्रेरणेने स्त्रीवादी मुक्तीगट अमेरिकेमध्ये स्थापन झाला. स्त्री शक्तीची दखल घेऊन केनेडी यांनी स्त्रीयांच्या दर्जाविषयक पाहणीसाठी आयोग नेमला बेटी फ्रिडन नी 'दी फेमिनिन मिस्टीक' (नारी रहस्य कथा) ग्रंथाद्वारे स्त्रीयाचे अस्तित्व व प्रेरणा विकसित केल्या. १९६८ साली फ्रान्समधील विद्यार्थी चळवळीत स्त्रीयांचा सहभाग होता. १९७०-८० या कालखंडात या स्त्रीवादी चळवळीने व्यापक स्वरूप धारण केले. इ.स. १९७५ हे 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून जाहीर केले गेले. इ.स.१९८० ते २०१० हा कालखंड स्त्रीवादी चळवळीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा ठरला व स्त्रीवादासंदर्भातील गोंधळ दूर होवून स्त्रीवादाचे नव्याने आकलन केले जावू लागेल. खऱ्या अर्थाने या चळवळीला अजूनही खूप लांबचा पल्ला गाठायचा आहे.

## ❑ अमेरिकेतील स्त्री हक्काची चळवळ :-

स्त्रीवादाचे परंपरागत आणि शरीरशास्त्रीय हे प्रमुख दोन दृष्टीकोन असून  असून परंपरागत दृष्टिकोनातूनच ५० टक्के स्त्रिया सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात दुय्यम  मानल्या जातात. स्त्री स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास करून अभ्यासकांनी प्रमुख सिद्धांत व दृष्टिकोन मांडले ते खालीलप्रमाणे

१. परंपरावादी व सनातनी स्त्रीवाद.

२. उदारमतवादी स्त्रीवाद.

३. जहाल स्त्रीवाद.

४. मार्क्सवादी स्त्रीवाद.

५. समाजवादी स्त्रीवाद.

६. अस्तित्ववादी स्त्रीवाद.

७. कृष्णवर्णीय स्त्रीवाद.

या सर्व दृष्टिकोनांची विशेषत: परंपरावादी, मार्क्सवादी, कृष्णवर्णीय व अस्तित्ववादी या प्रमुख सैद्धांतिक स्त्रीवादी तत्त्वज्ञानाची बीजे आपल्याला अमेरिकेतील स्त्री हक्काच्या चळवळीमध्ये सापडतात. पुढारलेल्या अमेरिकेत स्त्रीही गुलामाप्रमाणे पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेच्या कचाटयात होती आणि तिला ही जाणीव होण्यासाठी बराच काळ जावा लागला. शैक्षणिक सुविधांमुळे व विविध क्षेत्रात काम करण्याच्या अनुभवामुळे अमेरिकेत प्रथम मताधिकारी चळवळ सुरू झाली, इ.स. १८४० च्या लंडन येथील गुलामगिरीविरुद्ध मेळाव्याला अमेरिकन स्त्री प्रतिनिधीही उपस्थित होत्या मात्र त्यांना उपस्थित राहण्यास मनाई करण्यात आली. इ. स. १८४८ मध्ये एलिझाबेथ कॅडी स्टॅटन यांनी स्त्रीयासाठी मेळावा भरवला. त्या मेळाव्यात सेमोका फॉल्स

जाहीरनामा प्रसिद्ध केला हा स्त्री हक्क चळवळीतला एक महत्त्वाचा जाहीरनामा मानला जातो. सेनेका फॉल्स जाहीरनाम्यामध्ये अमेरिकेच्या स्त्रीवादाच्या प्रश्नाने खूप व्यापक रूप घेतले. इ.स. १९४० ते १९७० या ३० वर्षाचा कालखंडामध्ये नोकरी करणाऱ्या महिलांचे प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत वाढले त्यामुळे अमेरीकेमध्ये इ. स. १९६० मध्ये स्त्री चळवळीचा उदय झाला. गुलामगिरीच्या निर्मूलनार्थ व पुरुषप्रधान परंपरेने लादलेले पाश तोडून फेकण्यास स्त्रियांनी मोठया संख्येने सहभाग घ्यायला सुरुवात केली स्त्री श्वेत असो वा कृष्णवर्णीय असो पुरुषांच्या लेखी काहीच किंमत नसल्याचे त्याच्या लक्षात आल्यामुळे या चळवळीला गतिशीलता प्राप्त झाली.

इ. स. १९६० मध्ये स्त्रियांची राष्ट्रीय संघटना बेटी फ्राईडन नेतृत्वाखाली स्थापन करण्यात आली. या संघटनेला (NOW : National Organisation of Women) या नावाने ओळखले जाते त्यामुळे स्त्री चळवळीस स्त्रीमुक्तीचे रूप आले.

इ. स. १९७० ते १९८० च्या दशकामध्ये स्त्री चळवळीने आक्रमक रूप धारण केले या कालावधीमध्ये एक प्रकारचा जहालपणा या चळवळीला आल्याचे दिसून येते. आत्मसन्मानासाठी प्रस्थापित व्यवस्थेवर चीड व्यक्त करण्यात येऊ लागली. या दशकामध्ये गर्भपात हा स्त्रीचा हक्क आणि अधिकार असून गर्भपाताविरोधी कायदे रद्द करण्याचा आग्रह स्त्री चळवळीने केला. इ. स. १९६० च्या दशकात सन्मान मिळावा एवढी माफक अपेक्षा असणारी स्त्री चळवळ इ. स. १९८० च्या दशकात उग्र व लैंगिक जीवनावर पूर्णत: स्वत:चेच  नियंत्रण असण्याची भाषा करू लागली जनन प्रक्रिया, गर्भपात आणि कुटुंब नियोजन यावर तिचेच नियंत्रण असेल हा भाव या कालावधीत स्त्री चळवळीने व्यक्त केला त्याबरोबरच स्त्री .ष्टिकोनातून बायबलच्या पुनर्लेखनची मागणी करण्यात आली.

स्त्री चळवळीला प्रतिसाद मिळत असल्यामुळेही चळवळ वेगाने पुढे जावू लागली उदाहरणार्थ इ.स.१९६४ च्या नागरी हक्क कायद्याने वंशलिंगाधारित भेदभावास तिलांजली देण्यात आली. अमेरिकन संघ व  राज्याने भेदभाव निर्मूलनार्थ कायदे केले. स्त्रियांच्या गर्भपाता विषयी मागणीस समर्थन देणारा ऐतिहासिक निकाल इ. स. १९७३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिला. स्त्रियासंदर्भात भेदभाव होतो असे दिसून आल्याने परराष्ट्र सेवा परीक्षेस इ. स. १९८८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने आक्षेप घेतला. मात्र स्त्री चळवळीने केंद्र व राज्य सरकारच्या स्त्री प्रश्नांविषयी नकारात्मक निर्णयांना न्यायालयामध्ये आवाहन देऊन ही चळवळ सुरूच ठेवली.

आर्थिक क्षेत्रामध्ये इ. स. १९६० ते १९९० च्या दशकात या चळवळीने जबरदस्त यश मिळवले. या कालावधीत नोकरीमध्ये स्त्रियांचा दुपटीने सहभाग होता तर काही क्षेत्रांमध्ये स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षा अधिकच होती. परंपरेने पुरुषांकरिता राखीव असलेल्या क्षेत्रात स्त्रियांनी सहज प्रवेश केला. इंजिनियरिंग, कायदा आर्किटेक्ट इत्यादी याच कालावधीत स्त्रियांची न्यायाधीश व वकिलांची संख्या पाच टक्क्यांपासून १४ टक्क्यांवर गेली. आर्किटेक्टसची संख्या आठ टक्क्यांपर्यंत तर स्त्री पीएच. डी धारकांची संख्या तिप्पट

वाढली. स्त्रियांनी प्रशासनामध्ये १५ टक्क्यांवरून ३० टक्क्यांपर्यंत वृद्धी झाली. इ. स. १९७४ मध्ये प्रथमच मर्चंट नेव्हीत प्रवेश त्याबरोबरच लष्कर पोलीस अग्निशामक दल या पुरुषी क्षेत्रात यशस्वी सहभाग नांदविला. इ. स. १९९१ च्या आखाती युद्धामध्ये तर स्त्रियांनी प्रत्यक्ष युद्धभूमीवर लढल्या मुष्टीयुद्धाच्या खेळात यशस्वी झाल्या. इ. स. १९८३ मध्ये सॅली राईड अंतरीक्ष यानातून उड्डाण करणारी पहिली स्त्री ठरली बिशप होण्याचा मान प्रथमच स्त्रीला १९८९ मध्ये मिळाला. बार्बरा हॅरीस ही पहिली कृष्णवर्णीय स्त्री बिशप झाली.

नागरी हक्क धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये स्त्रीयांचा अंतर्भाव असल्यामुळे स्त्री चळवळीचा प्रभाव अमेरिकन प्रशासनावर सखोल पडल्याचे दिसून येते त्यातून स्त्री चळवळीच्या प्रत्यक्ष राजकीय सहभागाची जाणीव निर्माण झाली आणि अमेरिकेच्या इतिहासामध्ये प्रथमच डेमेक्रॅटीक पक्षातर्फे उपाध्यक्ष पदासाठी उमेदवारी देण्यात आली. इ. स. १९६० च्या अमेरिकेतील स्त्री चळवळीवर खरे तर लैंगिक प्रश्नांचा खूप मोठा प्रभाव होता. पुरुषाच्या ढोंगी, अप्पलपोटी, स्वैराचारी वृत्तीचा निषेध लैंगिक कृतीतून व्यक्त झाला. इ. स. १९७० ते १९८० च्या दशकांमध्ये विवाह संख्येवरील त्याच्या पावित्र्यावरील स्त्री चळवळीचा विश्वास हळूहळू कमी होऊ लागला. उदाहरणार्थ अविवाहित जोडप्याची संख्या १९८० मध्ये अकरा लाखाच्या आसपास गेली. तर इ. स. १९६० ते १९८० च्या दरम्यान घटस्फोटाचे प्रमाण १००% पर्यंत पोचले इ. स. १९७० ते १९९० या कालावधीत एक पालक कुटुंबाची संख्या ४० लक्षावरून ८० लक्ष एवढी झाली. स्त्रियांच्या नोकरीचे प्रमाण वाढले असले तरी मूल होवून देण्याच्या प्रवृत्ती वाढल्या, लग्नाचे प्रमाण घसरले, घटस्फोटित विभक्त कुटुंब संख्याही वृद्धींगत होताना दिसून येते पर्यायाने अमेरिकेतील कुटुंब व्यवस्था मोडकळीस येऊ लागली. याबरोबरच अविवाहित माता, बालमाता, दारिद्रय, गुन्हेगारी यांचेही दुष्टचक्र स्त्रीवादी चळवळी दरम्यान सुरूच होते.

स्त्रीवादी चळवळ ही श्वेतवर्णीय व कृष्णवर्णीय स्त्रीयांची चळवळ होती या चळवळीचा मुख्य उद्देश सामाजिक सुधारणे बरोबरच सामाजिक क्रांती असा होता आर्थिक सक्षमतेबरोबरच वांशिक व लैंगिक अत्याचारापासून मुक्ती राजकीकरणात सहभाग ही मूलभूत वैशिष्टय या चळवळीमध्ये अस्तित्वात होती कृष्णवर्णीय स्त्रीवादी चळवळ तर वरील घटकांना पायाभूत मानते कारण नावीन्याचा लवलेशही त्यांच्या जीवनामध्ये नव्हता ॲलिस वॉकर यांनी कृष्णवर्णीय स्त्रीवाद्याच्या उल्लेख Feminist ऐवजी Womanist असा करतात. या कालखंडातील स्त्रीवादी चळवळीचे स्वरूप जहालवादी होते बेटी फ्रायडनने कुटुंबाची तुलना स्त्रीचा मानसिक छळ करणाऱ्या तुरुंगाशी केली.

अमेरिका आणि आफ्रिकेतील निग्रोच्यामध्ये जागृती घडवून आल्यानंतर कृष्णवर्णी स्त्रीवादाचा उदय झाला. ॲलिस वॉकर, पॉल मार्शल, रोमी मॉरिसन, बार्बरा स्मिथ व मेरी हेनॉन ह्या स्त्रीवादाच्या प्रमुख पुरस्कर्त्या होत्या. एवढे सतत प्रयत्न व संघर्ष करूनही अमेरिकेमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार देण्यासाठी १९२० हे वर्ष उजाडावे लागले. १९ वी घटनादुरुस्ती करून अमेरिकेने महिलांना मतदानाचा अधिकार दिला. अमेरिकेतील ओहिआ राज्यात ओ बर्लिन कॉलेजमध्ये स्त्रियांना प्रवेश देण्यात आला. माउंट

एलीओक फिमेल सेमिनरी ही स्त्रियांसाठी असलेली संस्था सुरू करण्यात आली. १९ व्या शतकाच्या अखेरीस स्त्रियांना सहशिक्षण उपलब्ध झाले मिसिसिपी राज्यामध्ये विवाहित स्त्रियांना खाजगी मालमत्ता संपादन करण्याचा पहिला कायदा मंजूर करण्यात आला.

अमेरिकेमध्ये कृष्णवर्णीय स्त्रीवादाची मांडणी करण्यात आली. कृष्णवर्णीय स्त्रीवादाची मांडणी प्रथम १९७७ मध्ये बार्बरा स्मिथ यांनी Towards a Black Feminism नामक पुस्तकातून मांडली. त्यानंतर हा विचार पुढे बेल हुक्स, विलिस यांनी विकसित केला. स्त्रीयांच्या जीवनावर लिंगभेदाचा परिणाम होत असतो. त्याचबरोबर वर्ण, वर्गीय स्थान आणि वांशिक गटाचा परिणाम होत असतो या आधारावर कृष्णवर्णीय स्त्रीयांचे जगणे नियंत्रित केले जाते. याची फारसी जाणीव श्वेत किंवा गौरवर्णीय स्त्रियांना नसते त्यामुळे गौरवर्णीय स्त्रियांबरोबर वावरताना कृष्णवर्णीय स्त्रियांना उपरेपणा जाणवतो.

## ❑ अमेरिकन स्त्री चळवळीचे परिणाम :-

१. स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला.

२. स्त्रियांच्या राजकीय सहभागामध्ये वाढ झाली.

३. सार्वजनिक जीवनात स्त्रीयांचा प्रवेश सुकर झाला.

४. स्त्री शिक्षण व स्त्री जागृती यात वाढ झाली.

५. स्त्रीयांना कायदेशीर संरक्षण संरक्षण मिळाले.

## ❑ सांराश :-

साडेतीन शतक असहयजीवन व्यतीत करणाऱ्या निग्रोंनी राष्ट्राचे अविभाज्य अंग बनण्यासाठी शतकभर अथक प्रयत्न केले. ३०० डॉलर्सपासून १२०० डॉलर्स किंमतीना गुलामांना विकले जात असत. शिरगणतीनुसार १७९० पर्यंत ७ लाख काळे निग्रो अमेरिकेत गुलाम म्हणून विकले गेले. दरवर्षी त्यांच्या संख्येत एक लाखाची भर पडत असे यादवी युद्धापूर्वी ही संख्या ४० लाख होती. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाचे नेतृत्व करणाऱ्या अमेरिकेला हा अंतर्गत नागरी हक्काचा संसाधनाच प्रश्न आत्मघातकी स्वरूपाचाच वाटत होता. राजकीय गणितांना बाजूंना सारून अतिशय शिस्तबद्ध व संघटितपणे निग्रोनी स्वसामर्थ्यावर आपली चळवळ वाढवली त्यांची वाटचाल थक्क करणारी आहे.

संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेणाऱ्या या सामाजिक न्यायाच्या सामाजिक समतेच्या चळवळीने जागतिक नेतृत्व उभे करणाऱ्या राष्ट्राच्या स्वातंष्यता मूलक विचारसरणीपुढे एक नैतिक प्रश्न निर्माण केला. वांशिक हत्याकांडाच्या धोरणांनी आफ्रिकेच्या मानवतावाला काळीमा फासली होती. जगाचे नेतृत्व करायचे आणि जगातल्या खूप मोठया मानववंशाला वंशवादाच्या खोटया धारणेमुळे कायम गुलामगिरीच्या बंधनातच जखडून ठेवायचे या दुटप्पी धोरणाचा अंत करण्यासाठी निग्रोंनाच (कृष्णवर्णियांनाच) काळाची पावले ओळखून

आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागला. नेल्सन मंडेलांना तर २७ वर्षे तुरूंगातच रहावे लागले. अबाहम लिंकन, केनेडी सारख्या राष्ट्राध्यक्षांना आपल्या प्राणाची आहूती द्यावी लागली. पण वर्णभेदाचे पर्व अजूनही संपलेले आहे. असे वाटत नाही. वर्तमानपत्रातून, विविध दृश्य माध्यमामधून वर्ण धर्म वंश जात या सारख्या शुल्लक प्रश्नांवरून आजही हजारो लोकांचे अस्तीत्व धोक्यात आहे हे लक्षात येते ही वर्णविद्वेषाची धग कायमची विझवण्यासाठी जागतिक मानवतावादाचा पुरस्कार करणारी पिढी निर्माण करण्याचे शिक्षण अगदी बालपणापासूनच आपल्या पिढयामध्ये रूजवण्याची आवश्यकता आहे.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-३

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. स्त्रीवाद या शब्दाचा प्रथम वापर कोणी केला?

२. दि व्हिडीकेशन ऑफ राइट्स ऑफ वुमन हे पुस्तक कोणी लिहिले?

३. स्त्रियांच्या अधिकारांना वैश्विक मान्यता युनोच्या कोणत्या वर्षीच्या जाहीरनामामुळे मिळाली?

४. NOW या संघटनेची पूर्ण रूप काय आहे?

५. पहिली कृष्णवर्णीय स्त्री बिशप कोण?

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१. अमेरिकेने ............ घटना दुरुस्ती करून १९२० साली महिलांना मतदानाचा हक्क दिला.
*(अ) १७ (ब) १८ (क) १९ (ड) २०.*

२. संयुक्त राष्ट्र संघटनेने ............. हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर केले.
*(अ) १९७५ (ब) १९७७ (क) १९७९ (ड) १९८३.*

३. कृष्णवर्णीय स्त्रीवादाची मांडणी ............. यांनी केली.
*(अ) ॲलिस वॉकर (ब) बार्बरा स्मित*
*(क) सिमोन दी बोव्हा (ड) मिलेट.*

४. Towards a Black Feminism या पुस्तकाच्या लेखिका ............. आहेत.
*(अ) डॉ. माल्न (ब) ॲलीस वॉकरा (क) बार्बरा स्मिथ (ड) मेरी हेनान.*

५. ........... यांनी कृष्णवर्णीय स्त्रीवाद्यांचा उल्लेख Feminist ऐवजी Womanest असा केला आहे.
*(अ) ॲलिस वॉकर (ब) बेटी फ्रीडन (क) केट मिलेट (ड) शीला रोबॉथम.*

## २.३ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे :-

**अ) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) *१८१७.*

२) *राष्ट्राध्यक्ष आयसेन हॉवर.*

३) *डॉ.मार्टिन ल्यूथर किंग.*

४) *डॉ.मार्टिन ल्यूथर किंग.*

५) *राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी.*

**ब) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

१) *(क) आफ्रिका.*

२) *(क) ड्रडस्कॉट.*

३) *(क) लिबरेटर.*

४) *(ड) अबाहम लिंकन.*

५) *(अ) चार्ल्स एडवर्ड.*

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे :-

**अ) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) *डॉ. माल्न.*

२) *ॲलन पॅटन.*

३) *आफ्रिका खंड.*

४) *इंग्लंड.*

५) *३ मे १९१०.*

**ब) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा?**

१) *(अ) दक्षिण आफ्रिका.*

२) *(ब) कूणू.*

३) *(क) लुथुली.*

४) *(ड) Let my people Go.*

५) *(ब) २७.*

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे :-**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) लिंडा.

२) मेरी ऑल स्टोन.

३) १९४८.

४) National Organisation for women.

५) बाबर्रा हॅरिस.

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१) *(क) १९.*

२) *(अ) १९७५.*

३) *(ब) बार्बरा स्मित.*

४) *(क) बार्बरा स्मिथ.*

५) *(अ) ॲलिस वॉकर.*

## २.४ सांराश

साडेतीन शतक असहय जीवन व्यतीत करणाऱ्या निग्रोंनी राष्ट्राचे अविभाज्य अंग बनण्यासाठी शतकभर अथक प्रयत्न केले. ३०० डॉलर्सपासून १२०० डॉलर्स किंमतीना गुलामांना विकले जात असत. शिरगणतीनुसार १७९० पर्यंत ७ लाख काळे निग्रो अमेरिकेत गुलाम म्हणून विकले गेले. दरवर्षी त्यांच्या संख्येत एक लाखाची भर पडत असे यादवी युद्धापूर्वी ही संख्या ४० लाख होती.

दुसऱ्या महायुद्धानंतर जगाचे नेतृत्व करणाऱ्या अमेरिकेला हा अंतर्गत नागरी हक्काचा संसाधनाच प्रश्न आत्मघातकी स्वरूपाचाच वाटत होता. राजकीय गणितांना बाजूंना सारून अतिशय शिस्तबद्ध व संघटितपणे निग्रोनी स्वसामर्थ्यावर आपली चळवळ वाढवली त्यांची वाटचाल थक्क करणारी आहे.

संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेणाऱ्या या सामाजिक न्यायाच्या सामाजिक समतेच्या चळवळीने जागतिक नेतृत्व उभे करणाऱ्या राष्ट्राच्या स्वातंष्यता मूलक विचारसरणीपुढे एक नैतिक प्रश्न निर्माण केला. वांशिक

हत्याकांडाच्या धोरणांनी आफ्रिकेच्या मानवतावाला काळीमा फासली होती. जगाचे नेतृत्व करायचे आणि जगातल्या खूप मोठया मानववंशाला वंशवादाच्या खोटया धारणेमुळे कायम गुलामगिरीच्या बंधनातच जखडून ठेवायचे या दुटप्पी धोरणाचा अंत करण्यासाठी निग्रोंनाच (कृष्णवर्णियांनाच) काळाची पावले ओळखून आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागला. नेल्सन मंडेलांना तर २७ वर्षे तुरूंगातच रहावे लागले. अब्राहम लिंकन, केनेडी सारख्या राष्ट्राध्यक्षांना आपल्या प्राणाची आहूती द्यावी लागली. पण वर्णभेदाचे पर्व अजूनही संपलेले आहे. असे वाटत नाही. वर्तमानपत्रातून, विविध दृश्य माध्यमामधून वर्ण धर्म वंश जात या सारख्या शुल्लक प्रश्नांवरून आजही हजारो लोकांचे अस्तीत्व धोक्यात आहे हे लक्षात येते ही वर्णविद्वेषाची धग कायमची विझवण्यासाठी जागतिक मानवतावादाचा पुरस्कार करणारी पिढी निर्माण करण्याचे शिक्षण अगदी बालपणापासूनच आपल्या पिढयामध्ये रूजवण्याची आवश्यकता आहे.

स्त्री चळवळीने तिच्या वर्षानुवर्षे दबलेल्या आवाजाला, भावनेला, उन्मेषाला शब्दरूप, मूर्तरूप दिले तिच्यात आत्मविश्वास, आत्मसन्मानाची भावना निर्माण झाली. याचबरोबर गुलामगिरीतून त्यांची सुटका झाली. स्त्रीया स्वातंत्र्याचा अनुभव घेतानाही दिसून येतात. स्वत:चा निर्णय स्वत: घेण्याबरोबरच जगण्याची आर्थिक, मानसिक क्षमता हळूहळू निर्माण होताना दिसून येते. विज्ञान व तंत्रज्ञानामुळे कामाचे स्वरूपही बदलले लैंगिक प्रश्न हाताळतानाही कणखर भूमिका बजावू लागले मात्र प्रस्थापित यंत्रणेने वरवरचे कायदे करून तांत्रिक आणि टोकाची भूमिका घेवून स्त्रीयांना दुय्यम ठेवण्याचा प्रयत्न करताना दिसून येतोच. नोकरी, व्यवसाय आदी संदर्भात लिंगाआधारित भेदभाव प्रवृत्ती समूळ नष्ट झालेली नाही अनेक क्षेत्रांमध्ये पुरुषांना बढती, वेतन याबाबतीत पुरुषांनाच प्राधान्य दिले जाते वेगवेगळया व्यवसायामध्ये स्त्रीला आजही मोबदला व अन्य बाबतीत दुय्यमच वागणूक दिली जाते. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदापर्यंत आजपर्यंत एकही महिला पोहोचू शकली नाही.

पुरुषाने स्त्रीला फक्त लैंगिक उपयोगाचे खेळणे मानले ही वास्तव नाकारून चालणार नाही त्यामुळे स्त्रीवादाला अजूनही खूप दूरचा पल्ला गाठावयाचा आहे. समकालीन जीवनामध्ये तर प्रसार माध्यमे स्त्रियांना विविध दृश्य माध्यमातून सौंदर्यप्रसाधनांची विक्री करणाऱ्या शोभेच्या वस्तू म्हणूनच दाखवल्या जातात.

## २.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ/पुस्तके

१. **कदम. य. ना.** : *'आधुनिक जग'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जून, २०१०.

२. **डॉ. हुकमचंद जैन/माथूर** : *'आधुनिक जगाचा इतिहास १५०० ते २०००'*, सागर पब्लिकेशन्स, पुणे, २०१८.

३. **देवपुजारी** : *'अमेरिकेचा इतिहास'*, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी विद्या प्रकाशन, नागपूर, १९७९.

४. **देशपांडे सु. ग.** : *'अमेरिकेचा इतिहास'*, व्हीनस प्रकाशन, पुणे १९७५.

५. **डॉ. मोरवंचीक रा. श्री.** : *'अमेरिकन संघराज्याचा इतिहास'*, विद्या बुक पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद.

६. **जोशी पी. जी.** : *'अमेरिकेचा इतिहास'*, १९९९ अभय प्रकाशन, नांदेड, १९९१.

७. **डॉ. सुमन वैद्य** : *'आधुनिक जगाचा इतिहास'*.

८. **डॉ. कोठेकर शांता** : *'अमेरिकेच्या संघराज्याचा इतिहास'*.

९. **डॉ. नलावडे विजय** : *'अमेरिकेचा इतिहास'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.

१०. **डॉ. पाटील एम. पी.** : *'युद्धोत्तर अमेरिका ट्रुमन ते बुश'*, मंगल प्रकाशन, कोल्हापूर.

११. **डॉ. पाटील महेंद्र** : *'विसाव्या शतकातील राजकीय विचारप्रवाह'*, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २०१८.

१२. **पाटील शोभा** : *'स्त्रीवाद विचार आणि समीक्षेचा मागोवा'*, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

१३. **रचना माने** : *'स्त्रीवाद संकल्पना आणि स्वरूप'*, अक्षर प्रकाशन, कोल्हापूर २०१३

१४. **विद्युत भागवत** : *'स्त्रीवाद सामाजिक विचार'*, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००८.

❋ ❋ ❋

घटक–३

# प्रगतीचा काळ

**अ) विज्ञान आणि तंत्रज्ञान : आण्विक शस्त्रसामुग्री आणि सामुहिक संहार**

**ब) संदेश वहन आणि माहिती तंत्रज्ञान**

**क) मानवी हक्क**

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ विज्ञान आणि तंत्रज्ञान : आण्विक शस्त्रसामुग्री आणि सामहिक संहार

३.२.२ संदेश वहन आणि माहिती तंत्रज्ञान

३.२.३ मानवी हक्क

३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.४ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## ३.० उद्दिष्टे

१. विद्यार्थ्यांना विज्ञान व तंत्रज्ञानाचा परिचय करुन देणे.

२. विद्यार्थ्यांना आण्विक शस्त्रसामुग्रीची विध्वसंकता लक्षात आणून देणे.

३. विद्यार्थ्यांना संदेशवहन आणि माहिती तंत्रज्ञानातील प्रगतीचा परिचय करून देणे.

४. विद्यार्थ्यांना मानवी हक्कांची जाणिव करुन देणे.

५. ऐतिहासिक दृष्टिकोनाबरोबरच वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

६. विद्यार्थ्यांमध्ये वस्तुनिष्ठतेची जोपासना करुन स्वत:चे मत तयार करण्यास प्रवृत्त करणे.

## ३.१ प्रास्ताविक

विसावे शतक हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. पूर्वी मानवी व्यवहारांचा केंद्रबिंदू 'धर्म' होता. आता मानवी व्यवहारांचा केंद्रबिंदू 'विज्ञान' झाला आहे. आता मानवाचे बहुतांश व्यवहार 'विज्ञाना'भोवती फिरत आहेत. सकाळी उठल्यापासून रात्री निद्राधीन होईपर्यंत आपला असा एकही व्यवहार असत नाही, की जिथे विज्ञानाचा अथवा त्यातून निर्माण होणाऱ्या तंत्रज्ञानाचा त्याच्याशी काहीच संबंध नाही. आपले जीवन हे आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यांनी घडविले आहे. आता ही जी जीवनाची जडणघडण आहे, तिलाच आपण प्रगती असे म्हणतो.

विज्ञानाच्या आधारे मानव पध्दतशीर ज्ञान मिळवितो. हे पध्दतशीर ज्ञान माणूस केवळ ज्ञानासाठी किंवा मानसिक समाधानासाठी मिळवितो असे नाही, तर त्या ज्ञानाचा वापर करुन तो निसर्गावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करतो. वेगवेगळ्या सुखसाधनांची यंत्रांची आणि तंत्रांची निर्मिती करतो. यातूनच तंत्रविधा, तंत्रज्ञान विकसित होते. ज्ञान मिळविणे व वितरित करणे, ज्ञानाची पध्दतशीर रचना करणे व तिचा सुखसमृध्दीसाठी तसेच वर्चस्वासाठी वापर करणे हा सारा ज्ञान विज्ञान व तंत्रज्ञानाचा व्यवहार हा मानवी संस्कृतीचा एक महत्वाचा भाग आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकसित देश इतर देशांवर वर्चस्व गाजवू इच्छतात. मानवी हक्काला बाधा निर्माण करतात. अशावेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवी हक्कांचे जतन व संवर्धन मानवाच्या संरक्षणासाठी व प्रगतीसाठी खूपच गरजेचे असते.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ विज्ञान आणि तंत्रज्ञान : आण्विक शस्त्रसामुग्री आणि सामुहिक संहार

- **विज्ञान म्हणजे काय?**

विज्ञान या शब्दाला इंग्रजीमध्ये SCIENCE असे म्हणतात. युरोपातील प्राचीन भाषा लॅटिन मधील SCIRE (सायर-जाणणे) या शब्दावरुन Science हा शब्द तयार झाला आहे. त्याचा अर्थ सृष्टीचा अर्थ जाणून घेणे असा होतो. विज्ञान म्हणजे निसर्गात दडून राहिलेल्या नियमांचा शोध शास्त्रज्ञांना हे नियम शोधून काढण्याचा एक ध्यास लागलेला असतो. त्यांच्या ध्यासातून व त्यांच्या संशोधनातून विज्ञान निर्माण होते.

- **विज्ञानाच्या व्याख्या**

१. निरीक्षण व प्रयोग यांच्याद्वारे निश्चित केलेले, चिकित्सपणे परीक्षण केलेले, पध्दतशीरपणे मांडणी केलेले व नियमांमध्ये बसविलेले ज्ञान म्हणजे विज्ञान होय.

२. निरीक्षण, प्रयोग व विगमन यांच्याद्वारे मिळविलेले निसर्गातील घडामोडींचे सुसत्र आणि पध्दतशीर ज्ञान म्हणजे विज्ञान होय.

३. आपल्या सभोवताची परिस्थिती किंवा पर्यावरण समजावून घेण्यासाठी आणि तिच्यावर प्रभुत्व मिळविण्यासाठी मानवाने जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न म्हणजे विज्ञान होय. - डेव्हीज.

विज्ञानाच्या वरील व्याख्या विचारात घेता विज्ञान आपल्या सभोवतालच्या परिस्थितीसंबंधी वस्तुनिष्ठ ज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्नशील असते हे लक्षात येते. अशा प्रकारचे वस्तुनिष्ठ ज्ञान मिळविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. विज्ञानाला नेहमीच अतिशय डोळसपणे व चिकित्सकपणे वाटचाल करावी लागते. प्रचलित समज, अंधश्रध्दा, भावनात्मक विचार यासारख्या गोष्टींना विज्ञानात स्थान नसते. वस्तुनिष्ठ सत्याचा शोध, अनुभव प्रामाण्य व्यवस्थीकरण, निश्चितता व सामान्यीकरण ही विज्ञानाची महत्वाची वैशिष्ट्ये होत.

## ● तंत्रज्ञान म्हणजे काय?

विज्ञानाचा व्यवहारात केलेला वापर म्हणजे तंत्रज्ञान होय. शास्त्रज्ञांनी तंत्रज्ञानाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. 'निसर्गावर विजय मिळविण्यासाठी व मानवाचे जीवन सुखी करण्यासाठी विज्ञानातून निर्माण झालेल्या साधनांचे व यंत्रांचे ज्ञान म्हणजे तंत्रज्ञान होय.'

रेल्वे हे विज्ञानातून निर्माण झालेले साधन आहे. वाफेच्या अंगी असणाऱ्या शक्तीचा शोध म्हणजे विज्ञान आणि त्या शक्तीच्या जोरावर रेल्वे इंजिन तयार करण्याचे निर्माण झालेले ज्ञान (तंत्र) म्हणजे तंत्रज्ञान होय. विद्युत चुंबकीय शोध म्हणजे विज्ञान व त्याच्या आधाराने निर्माण झालेला रिडिओ म्हणजे तंत्रज्ञान होय. अणूच्या अंतरंगाचा शोध व त्याचे विभाजन म्हणजे विज्ञान अणुशक्तीवर चालणारी पाणबुडी म्हणजे तंत्रज्ञान होय. सारांश विज्ञानाच्या साहाय्याने मानव विश्वातील गुढे उकलतो, ज्ञान निर्माण करतो या ज्ञानाचा जोरावर तंत्रज्ञ मानवाचे जीवन सुखी करणारी साधने (यंत्रे) तयार करतो. म्हणजे विज्ञानाचा व्यावहारिक उपयोग म्हणजे तंत्रज्ञान होय.

## ● विज्ञान व तंत्रज्ञानातील फरक :-

बऱ्याचवेळा विज्ञान व तंत्रज्ञान हे दोन शब्द समानार्थाने वापरले जातात. व्यवहारात तर त्या दोहोंमध्ये फारसा फरक केला जात नाही. तंत्रज्ञानालाच अनेकदा विज्ञान असे संबोधले जाते. अशी गल्लत होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या अतिशय निकटचा संबंध आहे. तथापि, त्यांच्यात निकटचा संबंध असला तरी तंत्रज्ञान हे विज्ञानाहून वेगळे आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

विज्ञानाचा प्रमुख हेतू ज्ञानसाधना हा असतो. विश्वातील विविध घटना आणि घडामोडी यांचे वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून अध्ययन करुन त्या संबंधीचे निश्चित ज्ञान प्राप्त करणे, त्यांच्यातील कार्यकारण संबंधाचा तर्कशुध्द पध्दतीने शोध घेणे आणि त्यावरुन काही सामान्य नियम प्रस्थापित करणे हे विज्ञानाचे कार्य असते. ज्ञानाविषयी विशुध्द प्रेम ही विज्ञानाची प्रेरकशक्ती असते. ज्या नियमांच्या आधारे सृष्टीचे व्यवहार चालतात त्या नियमांची माहिती करुन घेणे म्हणजेच सृष्टीच्या व्यवहारांमागील रहस्यांचा उलगडा

करणे, त्यावर प्रकाश टाकणे हे विज्ञानाचे उद्दिष्ट असते. विज्ञानाने प्रस्थापित केलेल्या अशा सामान्य नियमांनाच वैज्ञानिक सत्याचे स्वरुप प्राप्त होते. मानवी ज्ञानभांडार समृध्द करण्यासाठी विज्ञान प्रयत्नशील असते.

तंत्रज्ञानाचा उद्‌देश मात्र विज्ञाना इतका व्यापक स्वरुपाचा नसतो. विज्ञानाने संपादन केलेल्या ज्ञानाचा आणि प्रस्थापित केलेल्या सिध्दान्ताचा प्रत्यक्ष व्यवहारात वापर करुन घेण्यापुरताच तंत्रज्ञानाचा मर्यादित उद्‌देश असतो. मानवाने निसर्गातील घडामोडी व सृष्टीचे व्यवहार यांच्याबाबतचे सुत्रबध्द स्वरुपात मिळविलेले ज्ञान म्हणजे विज्ञान होय आणि त्या ज्ञानाचा त्याने आपल्या जीवनात प्रत्यक्ष केलेला वापर म्हणजे तंत्रज्ञान होय. उदा. वाफेच्या अंगी प्रचंड शक्ती असते. हा नियम म्हणजे विज्ञान होय. या नियमाचा उपयोग करुन मानवाने रेल्वे इंजिन, आगबोट इत्यादी वाफेवर चालणारी बनविलेली यंत्रे म्हणजे तंत्रज्ञान होय. थोडक्यात तंत्रज्ञान हे विज्ञानावर आधारित असते. तंत्रज्ञान ही विज्ञानाचीच एक मर्यादित शाखा आहे.

आधुनिक काळात विज्ञानाच्या प्रगतीबरोबर तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही मोठीच क्रांती झाली आहे. तंत्रज्ञानातील विकासामुळे मानवी जीवन समृध्द होण्यास फार मोठी मदत झाली आहे. किंबहुना तंत्रज्ञानाचे मानवाच्या जीवनात आश्चर्यकारक परिवर्तन घडवून आणले आहे. अगदी पन्नास साठ वर्षापूर्वीचा काळ विचारात घेतला तरी त्या वेळचे मानवी जीवन व आजचे मानवी जीवन यामध्ये झालेला बदल विस्मयकारक वाटावा असाच आहे. आज सर्व प्रकारच्या अत्याधुनिक यांत्रिकी सुविधा आणि सर्व प्रकारची भौतिकसुखे मानवापुढे हात जोडून उभी आहेत. मानवाच्या जीवनातील शारीरिक कष्टाच्या कामाचा भार आता खूपच कमी झाला आहे. विविध प्रकारच्या सुखसोयी आता त्याला घरबसल्या उपलब्ध होत आहेत. हे सर्व तंत्रज्ञानाचा विकासामुळे शक्य झाले आहे. आधुनिक काळातील मानवाचे प्रगत जीवन आणि त्याला लाभलेली भौतिक समृध्दी ही आधुनिक तंत्रज्ञानाची किमया आहे.

विसाव्या शतकात तर तंत्रज्ञान अतिशय विकसित झाले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर मानवाने विविध क्षेत्रात प्रगतीचे फार मोठे टप्पे गाठण्यात यश मिळविले आहे. आधुनिक काळात उद्योगधंदे वाहतुकीची व दळणवळणाची साधने, शेती, ऊर्जानिर्मिती इत्यादी अनेक क्षेत्रांत प्रगत तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जात आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील या प्रगतीलाच तंत्रज्ञानातील क्रांती असे म्हटले जाते. आधुनिक काळात आर्थिक विकास हा संपूर्णपणे तंत्रज्ञानावरच अवलंबून असतो. त्यामुळेच प्रगत तंत्रज्ञानाकडे पाठ फिरविणे म्हणजे देशाच्या प्रगतीकडे व आर्थिक विकासाकडे पाठ फिरविणे होय असे सध्याचे समीकरण झाले आहे.

विज्ञानाच्या प्रगतीला सतराव्या शतकापासून सुरुवात झाली असली तरी विसाव्या शतकात या प्रगतीने विलक्षण गती घेतली. त्यामुळे विज्ञानाची अक्षरश: घोडदौड सुरु झाली विज्ञान व तंत्रज्ञानाचे दररोज नवनवी क्षितीजे काबीज करीत मानवी बुध्दीला पडलेल्या अनेक कोड्यांचा उलगडा केला. त्याचप्रमाणे सामान्य माणसाची मती गुंग होऊन जावी असे अनेक शोध लावले. संगणकापासून ते अण्वस्त्रापर्यंत आणि

मानवी शरीरात ह्दयासारख्या अत्यंत महत्वाच्या अवयवाचे रोपण करण्यापासून ते क्लोनिंगच्या तंत्राद्वारे नव्या प्राण्यांची निर्मिती करण्यापर्यंत विज्ञानाचे सर्वच क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे.

## ● आण्विक शस्त्रसामुग्री आणि सामुहिक संहार

आणूची संकल्पना भारतीय शास्त्रज्ञ कणाद यांनी मांडली. विसाव्या शतकात अल्बर्ट आइन्स्टाईन यांनी सापेक्षतावादाचा सिध्दांत मांडला. आइन्स्टाईनच्या $E=mc^2$ या सूत्रावरच अणुबॉम्ब निर्मितीचे तत्व आधारीत आहे. रॉर्बट ओपेनहायमरच्या नेतृत्वाखाली मनहॅटन प्रकल्पाने तयार केलेल्या जगातील पहिल्या अण्वस्त्राची यशस्वी चाचणी न्यू मेक्सिकोत १६ जुलै १९४५ मध्ये झाली होती. त्यानंतर अमेरिकेने हिरोशिमा आणि नागासाकी या दोन शहरांवर अण्वस्त्रांचा हल्ला केला. अमेरिकेने ६ व ९ ऑगस्ट १९४५ मध्ये लिटिलबॉय व फॅटमॅन या दोन अणुबॉम्बची जैव चाचणी घेतली. हिरोशिमात १,४०,००० लोक मारले गेले तर नागासकीत ७४००० लोक मारले गेले. तेव्हापासून मानवतेच्या नजरेतून जगभरच्या शांतता चळवळी अण्वस्त्रांना विरोध करत आल्या आहेत.

अण्वस्त्रे महाविध्वसंक आहेत, कारण ती कोण मरते आहे यांची पर्वा न करता जीवित हानी करतात. युध्दात नि:सशस्त्र नागरिक ठार करुन शत्रूदेशाच्या शासनाचे मनोधैर्य खच्ची करणे हा अशा युध्दांचा डावपेच असावा. विषारीवायु, विषारी पाणी पुरवठा, अत्यंत घातक रोगजंतू पसरवणे, प्लेगने मृत्यू झालेल्या मागणसाची प्रेते शत्रू प्रदेशांत टाकणे इत्यादी प्रकारची जैविक अस्त्रे किंवा वस्त्यांना आगी लावणारे रासायनिक बॉम्ब, अण्वस्त्रे इत्यादी अस्त्रे सैनिकांपेक्षा नि:शस्त्र नागरिक जास्त प्रमाणात मारत आहेत. दुसऱ्या महायुध्दाचा शेवट करणाऱ्या अण्वस्त्रांनी मुख्यत्वे नि:शस्त्र जपानी नागरिकच मारले. नि:शस्त्र नागरिकांना केवळ ते शत्रू देशाच्या शासकीय सत्तेखाली असल्यामुळे ठार करणाऱ्या शस्त्रांना 'महाविध्वंस अस्त्रे' (वेपन्स ऑफ मास डिस्ट्रक्शन) म्हटले जाते.

जैविक आणि रासायनिक महाविध्वंसक अस्त्रांच्या तुलनेत महाविध्वंसक अण्वस्त्रे आधुनिक आहेत. जगातील त्यांच्या पहिल्या वापराने हिरोशिमा बेचिराख केले. नंतर तीनच दिवसांनी नागासाकी या जपानी शहरावर अमेरिकेने दुसरा अण्वस्त्र हल्ला केला. या दोन अण्वस्त्र हल्ल्यानंतर गेल्या सत्तर वर्षात हिरोशिमा जपान, भारत इतर सारी राष्ट्रे आणि जग यांचीही लोकसंख्या आज काही पटींनी वाढली आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक शहरांची वस्ती दाट झाली आहे. जोडीला अण्वस्त्रांची संख्या परिणामकारकता, तिच्या वापरासाठी लागणाऱ्या क्षेपणव्यवस्था, त्यांचा वेग, लक्ष्यांचा अचूक वेध घेण्याची क्षमता आणि सक्षम जलद प्रत्युतर अशा अंगानी महाविध्वसंक अस्त्रे कल्पनेबाहेर विकसित झाली आहेत.

जगातील नऊ अण्वस्त्रधारी राष्ट्रांकडे मिळून सध्यासुमारे १५००० अण्वस्त्रे आहेत. त्यातील सुमारे १८०० अण्वस्त्रे काही मिनिटांत नेमून दिलेल्या लक्ष्यापर्यंत पोहचू शकतील अशा जय्यत तयारीत आहेत. जण अणुयुध्द झालेच तर हिरोशिमापेक्षा जास्त शक्तिशाली किमान शे. दोनशे अणुबॉम्ब थोड्या दिवसांत मोठ्या शहरांवर वापरले जातील.

स्फोट, आगीचे तांडव, झंझावती वारे, पत्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळणाऱ्या अगणित इमारती, किरणोत्सार यांनी काही कोटी माणसे स्फोटानंतरच्या पहिल्या महिन्यात ठार होतील. अनेक शहरातील सर्व प्रकारच्या सामाजिक व्यवस्था होत्याच्या नव्हत्या होतील, रोगराई पसरेल, उगवलेला सूर्य व दिसण्याएवढे आकाश धुळीने दीर्घकाळ व्यापले जाईल.

परिणामी सूर्याचा प्रकाश आणि उष्णता जमिनीपर्यंत पोहोचणार नाही. अणुयुध्दामुळे संपूर्ण पृथ्वीवर काही महिने प्रचंड अणु-हिवाळा पसरेल त्यातून मानवजात आणि कित्येक सजीव नामशेष होण्याची शक्यता दाट आहे. म्हणूनच जगातील शस्त्रू मित्रशासनाला इंग्रजीतील Communications, Command, Control and Intelligence म्हणजे C31 या यंत्रणांच्या अध्ययावतेची खूप काळजी घ्यावी लागते. हे काम अण्वस्त्रे बनवण्यापेक्षा खूप जास्त खर्चिक आहे. या स्पर्धेचा खर्च कायम वाढता राहणार आहे. तो एखाद्या देशाला परवडला नाही, तर अशा देशाचे या यंत्रणांकडे दुर्लक्ष होऊ शकते. मानवी चुका वाढू शकतात, शत्रू काय करेल याचे अंदाज कोलमडू शकतात. तसेच काही राष्ट्रप्रमुख बेजबाबदार असतील अण्वस्त्र युध्दाला आमंत्रणच मिळू शकते. राष्ट्रप्रमुख नि:स्वार्थी जबाबदार असतील तरीही अपघाताने हल्ले होऊ शकतात.

कडव्या दशहतवादी गटांशी तर चर्चा संभवतच नाहीत. त्यांच्या हाती जरी दुय्यम दर्जाची महाविध्वंसक अण्वस्त्रे पडली, तरी बाका प्रसंग येऊ शकतो. थोडक्यात लहानशी चूक सजीव जगाच्या सर्वकष विनाशाला कारणीभूत होऊ शकते, हे वास्तव मानवी मनाचा थरकाप उडवणारे आहे. म्हणूनच अण्वस्त्रांची निर्मिती, जग भकास करु पाहणारा त्यांचा विकास, त्यांची दहशत आणि वापर यांच्या शक्यता हे सारे मुळापासून नष्ट करण्याची इच्छा वास्तवात उतरविणाऱ्या आंतरराष्ट्रीय कराराची आणि त्याच्या काटेकारे अंमलबजावणी अत्यंत आवश्यक आहे.

पृथ्वीवरून मानवासकट जीवसृष्टीचे अस्तित्वतच नामशेष होण्याइतकी गंभीर परिस्थिती उद्‌भवण्याचा धोका समोर उभा ठाकलेला आहे. त्यावेळी अण्वस्त्रबंदी कराराच्या प्रक्रियेत मात्र काळजी वाटावी असे पुढील गुंतागुंतीचे आणि परस्परविरोधी घटक कार्यरत आहेत. या कराराचा अंतिम मसूदा तयार करणाऱ्या वाटाघाटींच्या पहिल्या पायरीपासून कडवा विरोध करणारी एकूण ३९ राष्ट्रे आहेत. त्यांची विभागणी पुढीलप्रमाणे.

१) अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स आणि चीन ही युनोत नकारधिकार (व्हेटो) मिळलेली अण्वस्त्रधारी पाच राष्ट्रे.

२) इस्त्रायल, भारत, पाकिस्तान आणि उत्तर कोरिया ही नव्याने अण्वस्त्रधारी बनलेली चार राष्ट्रे.

३) नाटो कराराला बांधील २९ राष्ट्रे.

४) अमेरिकन अण्वस्त्रांच्या छायेत सुरक्षितता शोधणारा जपान.

संयुक्त राष्ट्रसंघ (युनो) या एकमेव आंतरराष्ट्रीय संघटनेच्या अधिपत्याखालीच अण्वस्त्रबंदी करार होऊ शकतो आणि त्याची अंमलबजावणी देखील युनोमार्फत होऊ शकते हे वास्तव आहे. परंतु युनोचा वार्षिक खर्च भागवणाऱ्या राष्ट्रांत एकट्या अमेरिकेचा वाटा २२ टक्के आहे. त्यातच उरलेल्या (युनोत) नकाराधिकार असणाऱ्या चार राष्ट्रांचा आणि नाटो कराराची २९ सभासद राष्ट्रे व जपान यांचा एकत्रित वाटा ६० टक्केपेक्षा जास्त आहे. म्हणजे ३९ विरोधक राष्ट्रापैकी ३५ राष्ट्रे युनोच्या वार्षिक खर्चाचा ८० टक्क्यांपेक्षा थोडा मोठा वाटा उचलित आहेत. विरोधक राष्ट्रांचे आर्थिक आणि राजकीय संघटनात्मक सामर्थ्य युनोला नमविणार नाहीच याची खात्री कोणी द्यायची सध्या २९ राष्ट्रांच्या हाती अणवस्त्र निर्मिती दहशत बसविणे आणि प्रसंगी त्यांचा वापर करण्याची कुवत आहे. त्यांना वगळून हा करार झाला आहे. त्यामुळे कराराची चांगली अंमलबजावणी होणे अवघड आहे.

या गुंतागुंतीमुळे जग अण्वस्त्र मुक्ततेकडे नेण्याची ही प्रक्रिया पुढे कशी जाणार याबद्दल प्रश्नचिन्ह उद्भवणे साहजिक आहे. आशेचा किरण म्हणजे अण्वस्त्रबंदी करार यशस्वी होण्यासाठी इंटरनॅशनल कॅम्पेन टू अबॅलिश न्युक्लीअर वेपन्स (आयकॉन) या संस्थेने अक्षरश: जीवाचे रान केले आहे. या शिखर संस्थेला २०१७ या वर्षीचे शांतता नोबेल पारितोषिक मिळाले. त्यामुळे अण्वस्त्रबंदी विरोधक राष्ट्रांवरील दबाव वाढणार आहे. जोडीला अण्वस्त्रनिर्मिती, त्यांच्या वापराचे मानवावरील आणि पृथ्वीच्या पर्यावरणावरील दुष्परिणाम, मानवी अस्तित्वाचा प्रश्न यांचे सामाजिक भान येण्यासाठी जागतिक पातळीवर मोठे कार्य झाले आहे पण त्याचा हवा तितका सकारात्मक दबाव तयार होताना दिसत नाही ही चिंतेची बाब आहे.

महाभारतकार व्यासमुनी महाभारतीय युध्दानंतर शरपंजरी पडलेल्या भीष्मांकडून जेत्यांना शांतीपर्व ऐकवतात. हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवरील १९४५ सालच्या अमेरिकी अण्वस्त्र चाचण्यानंतरचे शांतीपर्व १८ एप्रिल १९५५ रोजी प्रसिध्द झालेल्या रसेल-आइन्स्टाईन जाहिरनाम्याच्या रुपात अवतरते ते एखाद्या राष्ट्राचे नागरिक म्हणून नव्हे, तर केवळ मानवजातीचे सभासद या नात्याने अण्वस्त्रांचे धोके सांगत शांततेच्या मार्गाने प्रश्न सोडविण्याची आर्जवे करते. युध्दानंतरच्या अशा शांतीपर्वामुळे माणुसकीचा थोडाबहुत विकास होतो. परंतु काळ सरतो, तसे नवे अन्याय नव्या युध्दांना आमंत्रणे देतात. परिणामी युध्दे आणि शांतता यांची आवर्तने चालूच राहतात. प्रत्येक आवर्तनात तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे शस्त्रास्त्रे अधिकाधिक परिणामकारक आणि युध्द अधिकाधिक क्रूर आणि संहारक होतात. एकविसाव्या शतकात अण्वस्त्रयुध्दे झाली तर ती संपूर्ण मानवजात नष्ट करू शकतील एवढी प्रगती अण्वस्त्र आणि क्षेपणास्त्र निर्मिती हेच उद्दिष्ट असलेल्या जगभराच्या प्रयोगशाळांनी साध्य केली आहे. साहजिकच याही काळात शांततेची गरजदेखील जास्त प्रकर्षाने जाणवते.

## ● भारताच्या अणुचाचण्या :-

१९६० च्या चीन आक्रमणानंतर भारताने लष्करीदृष्टया सक्षम होण्यासासाठी, आपली संरक्षणसिध्दता जगाला दर्शविण्यासाठी १९७४ व १९९८ मध्ये पोखरण येथे अणुचाचण्या केल्या अमेरका,चीन व पाकीस्तान

यांच्यातील वाढत्या सामाजिक सहकार्याच्या पार्श्वभूमीवर १८ मे १९७४ ला भारताने पहिला अणुस्फोट राजस्थानातील पोखरण येथे घडवून आणला. डॉ. होमी भागा, डॉ. साराभाई, डॉ. सेठला, डॉ. रामण्णा यांच्यासारख्या शास्त्रज्ञांच्या अथक प्रयत्नांतून हा अणुस्फोट घडवून आण्यात आला.

११ मे १९९८ रोजी दुपारी ३ वाजून ४५ मिनिटांनी राजस्थानातील पोखरण येथे एकाच वेळी ३ अणुस्फोट घडवून आणले व १३ मे १९९८ रोजी पुन्हा दोन अणुस्फोट घडवून आणले. यास ऑपरेशन शक्ती या नावाने ओळखले जाते. या चाचण्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आल्या. भारताने आपला अणुकार्यक्रम शातंतेसाठी असल्याचे घोषित केले.

## ● अण्वस्त्रप्रसार बंदी करार (NPT)

अण्वस्त्रप्रसार प्रतिबंधक करार १ जुलै १९६८ मध्ये सह्यांसाठी युनोमध्ये मांडण्यात आला आणि ५ मार्च १९७० मध्ये हा करार प्रत्यक्षात आला. या कराराचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे अण्वस्त्रांचा तसेच अण्वस्त्रविषयक तंत्रज्ञानाचा प्रसार थांबविणे हा होता. सुरुवातीला हा करार २५ वर्षांसाठी करण्यात आला होता व त्याचा आढावा दर पाच वर्षांनी घेण्यात येत होता. परंतु न्यूयॉर्क येथे ११ मे १९९५ रोजी झालेल्या आढावा बैठकीत कुठल्याही अटीशिवाय या कराराची मुदत अनंत काळासाठी वाढविण्यात आली. या करारातील प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे :-

१) १ जानेवारी १९६८ पूर्वी ज्या देशांनी अणुचाचण्या केल्यात त्यांना अण्वस्त्रधारी देशांचा अधिकृत दर्जा दिला जाईल व त्यानंतरच्या सर्व देशांना अण्वस्त्रविहीन देश म्हणून घोषित केले जाईल.

२) अण्वस्त्रधारी देश परस्परांमध्ये आण्विक तंत्रज्ञानाची देवाणघेवाण करु शकतात.

३) अण्वस्त्रविहीन देश अणुतंत्रज्ञानाची आयात-निर्यात करु शकणार नाहीत.

४) प्रत्येक बिगर अण्वस्त्रधारी राष्ट्राने व या करारास मान्यता देणाऱ्या राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाशी सुरक्षेबाबत करार करावा, अशी तरतूद केली.

भारताने या करारास विरोध केला. भारताच्या मते, हा करार भेदभावमूलक असून अण्वस्त्राधारी राष्ट्रांची आण्विक मक्तेदारी अबाधित ठेवण्यासाठी केला गेला आहे. भारताने या करारावर सही न करून आपला अण्वस्त्र बनविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

## ● सर्वसमावेशक अण्वस्त्र चाचणी बंदी करार (CTBT)

सी.टी.बी.टी. या कराराची निर्मिती संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अंतर्गत जिनिव्हा येथे भरलेल्या नि:शस्त्रीकरण परिषदेतील चर्चेतून झाली. २४ सप्टेंबर १९९६ पासून हा करार सदस्य देशांसाठी मंजूरीसाठी खुला केला. यात सहभागी झालेल्या प्रत्येक देशाने अण्वस्त्रांची विस्फोटक चाचणी न करण्याची हमी घेतली आहे. सी.टी.बी.टी. कराराचे सामान्यत: दोन भाग करण्यात आले होते. त्यातील पहिल्या भागातील तरतुदी

१) हा करार मान्य असणाऱ्या देशांमध्ये समन्वय असावा, असे निश्चित करण्यात आले आहे. २) वादग्रस्त प्रश्नांची सामोपचाराने चर्चा करुन त्यावर मार्ग काढणे. ३) कराराचे उल्लंघन करणाऱ्यावर आर्थिक आणि अन्य स्वरुपाचे निर्बंध घालणे. ४) कराराच्या दुसऱ्या भागात अणुऊर्जेचा वापर शांततेसाठी करणे, तसेच सदस्य राष्ट्रांचे अण्वस्त्रापासून संरक्षण करणे इ. बाबींचा यात अंतर्भाव आहे.

- **सी.टी.बी.टी. करारातील वादगस्त तरतुदी :-**

१. या करारांतर्गत भूमिगत किंवा वातावरणात अण्वस्त्र चाचण्या करण्यास बंदी व जर अशा चाचण्या कोणी केल्यास तर त्याची पडताळणी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा समिती नियुक्ती केली.

२. प्रयोगशाळेमध्ये संगणकाद्वारे किंवा इतर मार्गांनी चाचण्या करण्यास बंदी घालण्यात आली.

- **भारताचा आक्षेप :-**

१. अमेरिका, फ्रान्स, रशिया, चीन व ब्रिटन या पाच अण्वस्त्रधारी राष्ट्रांकडे मोठ्या प्रमाणात अण्वस्त्रे आहेत. तरी अण्वस्त्रे नष्ट करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम जाहीर करण्यात यावा. भारताने त्यासाठी १० वर्षे कालावधी सुचविला होता.

२. पाच अण्वस्त्रधारी राष्ट्रांना करारातून माघार घेऊन त्यांना अण्वस्त्रनिर्मिती करण्याची मोकळीक देण्यात आली आहे. त्यामुळे या राष्ट्रांना अण्वस्त्र कार्यक्रम व प्रयोगशाळेतील संशोधन तसेच पुढे चालू ठेवता येईल.

३. हा करार खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक नाही, कारण ज्यांच्याकडे करारापूर्वी अण्वस्त्रे आहेत, त्यांच्या चाचण्यांना बंदी नाही व त्यांच्या अण्वस्त्रनिर्मितीचा कार्यक्रम अनिर्बंध चालूच राहणार आहे.

भारताने घेतलेल्या या आक्षेपांना कोणत्याही अण्वस्त्रधारी राष्ट्राने समर्पक उत्तर दिले नाही. मात्र सी.टी. बी.टी. चा विरोध म्हणून भारतावर कठोर टीका करण्यात आली. या करारावर स्वाक्षरी करावी म्हणून भारतावर अनेक प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न झाला. आजही दबाव आहे. मात्र कोणत्याही दबावाला बळी न पडता भारताने या करारावर स्वाक्षरी केलेली नाही.

- **अण्वस्त्रविरोधी आंदोलने :-**

अमेरिकेत युध्दाविरोध आणि शांतता यासाठी भरपूर निदर्शने, चळवळी झाल्या आहेत. व्हिएतनाम युध्दाला विरोध करणारी दोन निदर्शने अनुक्रमे २७ नोव्हेंबर १९६५ आणि १५ नोव्हेंबर १९६९ रोजी अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन डी.सी. येथे झाली. त्यामध्ये अनुक्रमे २.५ लाख आणि ६ लाख विद्यार्थी व नागरिक सहभागी होते. वॉशिंग्टन डी.सी. येथेच ६ मे १९७९ रोजी १.२५ लाख लागरिक तर १२ जून १९८२

रोजी अमेरिकेतील न्यूयॉर्क शहराच्या सेंट्रल पार्कमध्ये अण्वस्त्रविरोधी निदर्शनात १० लाख नागरिक आणि विद्यार्थी सहभागी झाले होते. अमेरिकेच्या व्हिएतनाम युध्दाच्या विरोधात अमेरिकेत जशी नागरिकांची निदर्शने झाली तशीच ती अफगाणिस्तान, इराक येथे अमेरिकेने छेडलेल्या युध्दांविरोधातही झाली आहेत. सध्या उत्तर कोरिया विरोधात डोनाल्ड ट्रम्प बरळत आहेत, त्या विरोधी निदर्शने होण्यास सुरुवात झाली आहे. इंग्लंडमध्ये १९५७ मध्ये स्थापन झालेली कॅम्पेन फॉर न्यूक्लीअर डिसअर्मामेंट (CND) ही अशासकीय संघटना रासायनिक, जैविक आणि आण्विक शस्त्रांना कायम विरोध करत आहे. अण्वस्त्रधारी ब्रिटन अमेरिकेसोबत सोविएत रशियाशी अण्वस्त्र स्पर्धेत उतरल्याचे ब्रिटीश नागरिकांना जाणवत होते. या पार्श्वभूमीवर CND ने १९५८ ते १९६५ दरम्यान अलडरमास्टन येथील अण्वस्त्रनिर्मिती केंद्र ते लंडनमधील सुप्रसिध्द ट्रॅफल्गर चौकापर्यंत दरवर्षी मोर्चे आयोजित केले होते. १९५९ सालच्या मोर्चात सुमारे ६०,००० नागरिक तर १९६० आणि १९६१ या वर्षीच्या सुमारे दीड लाख नागरिक सहभागी झाले होते. ब्रिटनने आपली अण्वस्त्रे नष्ट करावीत अशी या मोर्च्याची मागणी होती. संघटनेचे चिन्ह आणि 'Ban the Bomb' ही घोषणा युरोपभर गाजली होती. बर्ट्रांडरसेल १९६० सालापर्यंत या संघटनेचे सभासद होते. या मोर्चाचे युरोपभर मोठे स्वागत झाले. शांतता चळवळीचा दबाव युरोपभर वाढला आणि (CND) ची सदस्य संख्या प्रचंड प्रमाणात वाढली. महासत्तांच्या स्पर्धेमुळे १९८० च्या दशकात (CND) ने पुन्हा उसळी घेतली. यावेळी (CND) ची राष्ट्रीय सभासद संख्या ९०००० वर सर्वसामान्य सभासद संख्या २,५०,००० पर्यंत गेली होती.

युरोपातील आणि अमेरिकेतील १९६० आणि १९७० च्या दशकातील शांतता चळवळीनी अण्वस्त्रस्पर्धेला विरोध करताना अनेक अंगांनी भरडल्या जाणाऱ्या कोणत्याही देशाच्या सामान्य नि:शस्त्र माणूस केंद्रस्थानी मानला होता. ती परंपरा नंतर हरवली आणि केंद्रस्थानी राष्ट्रीय सुरक्षा येऊन बसली या बदलामध्ये अमेरिका आणि सोव्हिएत रशिया यांच्यातील शीतयुध्दाचा मोठा वाटा होता.

जगातील महासत्ता अण्वस्त्रधारी राष्ट्रे आणि नाटो कराराच्या छत्रछायेतील राष्ट्रे यांच्या विरोधाना न जुमानता युनोने ७ जुलै २०१७ रोजी जाहीर केल्याप्रमाणे अण्वस्त्रबंदी कराराचा अंतिम मसुदा दोन फेऱ्यांतील वाटाघाटीनंतर १२२ विरुध्द ०१ अशा बहुमताने स्वीकृत केला आहे. आता 'महाविध्वंसक अण्वस्त्रे बाळगणे ही भूमिका केवळ अनैतिक आणि लांच्छनास्पद नसून, ती जागतिक कायदा मोडणारी देखील आहे, असे संयुक्त राष्ट्रांनी जाहीर केल्याचा क्षण ऐतिहासिक आहे. अण्वस्त्र हल्ला हा मानवतेविरुध्द गुन्हा असल्याचे आता मान्य झाले आहे. त्यामुळे केवळ एखादे राष्ट्र तुमचे शत्रू असले म्हणून त्या राष्ट्रातील लक्षावधी नि:शस्त्र नागरिकांना महाविध्वंसक अस्त्रांनी राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली ठार मारणे मुळीच समर्थनीय ठरणार नाही. विशेष म्हणजे या कराराला विरोध करणारी बहुतेक सर्व राष्ट्रे बलाढ्य आर्थिक महासत्ता असताना अण्वस्त्रे बेकायदेशीर ठरवणाऱ्या कराराचा अंतिम मसुदा युनोने वाटाघाटी करुन बहुमताने मान्य करण्याची अपेक्षा करणेदेखील अवघड होते. अशा परिस्थितीत कराराचा अंतिम मसुदा स्वीकृत झालाच शिवाय त्या मसुद्यावर २० सप्टेंबर २०१७ पासून राष्ट्रांच्या मान्यता, स्वाक्षऱ्या होण्यास सुरुवातही झाली. पहिल्याच दिवसी ५३ राष्ट्रप्रमुखांनी मसुदा मान्यतेवर (स्टेट सिग्नेटोरिज म्हणून) सह्या केल्या आहेत. एवढेच नव्हे, तर

तीन राष्ट्रांनी कराराच्या बंधनकारकता मान्यतेवर (रेटीफिकेशन) सह्या केल्या आहेत. किमान ५० राष्ट्रांनी प्रस्तुत कराराच्या बंधनकारकतेला मान्यता दिल्यानंतरच हा करार अंमलबजावणी योग्य ठरणार आहे.

अण्वस्त्रबंदी करार होण्यात महत्वाची भूमिका निभावलेल्या इंटरनॅशनल कॅम्पेन टू अबॉलिश न्युक्लीअर वेपन्स (आयकॅन ICAN) या जिनिव्हा, स्वित्झर्लंडस्थित शिखर संस्थेला २०१७ या वर्षीचे शांतता नोबेल पारितोषिक देऊन निवड समितीने जगभरच्या शांतता चळवळीचे मनोधैर्य देखील उंचावले आहे.

शीतयुध्दाच्या काळात जगभरात विविध देशात मिळून साधारणपणे ५०,००० इतके अणुबॉम्ब तयार झाले. त्यांची विल्हेवाट कशी लावायची आणि बेजबाबदाराच्या हाती त्याचे नियंत्रण जाण्यापासून कसे रोखायचे या विवंचनेने जगास या काळात ग्रासले होते. त्यातूनच विविध अण्वस्त्रबंदी असलेले आणि नसलेले यातील तणावातून आणखी एक नवा संकरित गट जन्माला आला. अण्वस्त्रधारी गटात नसलेला आणि तरीही अण्वस्त्रे असणारा इस्त्रायल, दक्षिण आफ्रिका, भारत व पाकिस्तान या गटात मोडतात. तेव्हा या देशांचे करायचे काय असा प्रश्न अण्वस्त्रे असलेल्या आणि नसलेल्या दोघांनाही पडला त्याचे उत्तर बराच काळ न मिळाल्यामुळे या तिसऱ्या गटांतील सदस्यांची संख्या हळूहळू वाढत गेली.

अणुबॉम्बची पंचाहत्तरी पाळली जातानासुध्दा जगास भेडसावत आहे तो हाच प्रश्न या तिसऱ्या गटातील देशांचे काय करायचे? याचे कारण दरम्यानच्या काळात या तिसऱ्या गटातील देशांचे काय करायचे? याचे कारण दरम्यानच्या काळात या तिसऱ्या गटातील देशांची संख्या वाढत गेली. उत्तर कोरिया, पाकिस्तान, सौदी अरेबिया आणि इराण या देशांनी अणुविद्या हस्तगत केली. स्वत:ला अण्वस्त्रसज्ज बनवण्याचा प्रयत्न केला. याच्या जोडीला आणखी एक चिंता आहे ती म्हणजे देशविहीन अण्वस्त्रधारी शक्तींचे काय करायचे. तलिबान, अल कायदा वा इसिस या व्यवस्थाशून्य दहशतवादी संघटनांच्या हाती अणुबॉम्ब पडल्यास त्यांना कोण आणि कसे आवरणार?

तेव्हा या सगळ्याचा अर्थ लक्षात घेतल्यानंतर ही काही प्रश्न उपस्थित होतात ते म्हणजे (१) अणुबॉम्बच्या निर्मितीने जग होते त्यापेक्षा अधिक सुरक्षित झाले का? (२) एखाद्या शस्त्राने प्रचंड संहार करणयाची क्षमता मिळते म्हणून केवळ कोणी स्वत:ला व देशाला अधिक सुरक्षित मानावे का? जपानवरील अणुबॉम्ब हल्ल्याची पंचाहत्तरी घातली जात असताना हे प्रश्न अनेकांसाठी अस्वस्थ करणारे आहेत. विज्ञान तंत्रज्ञानाच्या साहाय्याने निर्माण केलेल्या या संहारकशस्त्रांनी जगाची प्रगती केली की अधोगती? याविषयी सर्वांना अंतर्मुख होवून विचार करण्याची वेळ आली आहे.

## स्वयं-अध्ययन प्रश्न - १

- **योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

१. सायन्स हा शब्द ............... भाषेतून आला आहे.

*(अ) संस्कृत* *(ब) हिंदी* *(क) लॅटिन* *(ड) यापैकी नाही.*

२. अणूची संकल्पना ............ यांनी मांडली.

*(अ) कणाद* *(ब) पंतजली* *(क) आर्यभट्ट* *(ड) ब्रहमगुप्त.*

३. सापेक्षतावादाचा सिध्दांत .............. यांनी मांडला.

*(अ) एडिसन* *(क) ॲरिस्टॉटल*

*(ब) न्यूटन* *(ड) अल्बर्ट आइन्स्टाइन.*

४. अणुबॉम्बची निर्मिती .................. या देशात प्रथम झाली.

*(अ) भारत* *(ब) चीन* *(क) अमेरिका* *(ड) रशिया.*

५. रॉबर्ट ओपेनहायमर हे नाव ............... निर्मितीशी संबंधित आहे.

*(अ) अणुबॉम्ब* *(क) विमान*

*(ब) हायड्रोजन बॉम्ब* *(क) यापैकी नाही.*

## ३.२.२ संदेश वहन आणि माहिती तंत्रज्ञ

- **संदेशवहन :-**

संदेशवहन हा मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. आदिकालात हातवारे, खाणाखुणा, वेगवेगळे आवाज यातून संदेशवहनाची निर्मिती झाली. पुढे भाषा लिपीमुळे हे काम खूपच सोपे होत गेले. वाहनांच्या माध्यमातून साध्य झालेला कमाल वेग आणि केवळ एका क्लिकच्या अंतराने जोडलेले जग, यातून दळणवळण आणि संदेशवहन वेगवान झाले. आज विद्युतचुंबकीय प्रारणांच्या माध्यमांमधून ध्वनी आणि दृश्य स्वरूपाने प्रसारण थेट समुद्रापारच नाही तर अंतराळातही अगदी सहज साध्य झाले आहे. आजच्या जगण्यात विद्युतचुंबकीय प्रारणांचे ऑक्सिजन इतकेच महत्त्व आहे.

- **संदेशवहनाचा पूर्व इतिहास :-**

संदेशवहनाची सुरुवात ख्रिस्तपूर्व ३५०० मध्ये झाली असे मानले जाते. सुमेर जमातीतील आदिवासी लोक वाळूत तयार केलेल्या विटांवरील चित्रांमार्फत संदेशवहन करीत असत. मानवी प्रगतीच्या प्रारंभीच्या टप्प्यांमध्ये निरोप्यांमार्फत संदेश एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचवले जात. या कामाकरिता उंट, घोडे, गाढव यासारख्या प्राण्यांचा वापर निरोपे करत. पूर्वी प्रत्यक्ष संदेश पाठविण्यासाठी सर्रास घोडेस्वारांचा वापर केला जात असे. परंतु याचबरोबर आग, धूर, बुजगावणी तुताऱ्या, शिट्या यासारख्या अनेक सांकेतिक मार्गाचा संदेश वहनासाठी वापर करण्यात येत असे. अमेरिकेमध्ये विल्यम वॅडल आणि अलेक्झांडर मेजर्स यांनी व्यावसायिक तत्त्वावर संदेशवहनासाठी घोडेस्वारांचा सर्वप्रथम वापर केला. त्यांनी या कामासाठी पोनी एक्सप्रेस या कंपनीची इ. स. १८६० मध्ये स्थापना केली. रॉयटर्स सारखी वृत्तसंस्था तिच्या आरंभीच्या काळात कबुतरांमार्फतच बातम्यांचे आदान-प्रदान करीत असे.

## ● संदेशवहनातील क्रांती :-

१. **तारायंत्र :** संदेशवहनातील पहिली क्रांती घडून आली ती तारायंत्राच्या शोधाने होय. मोर्स या संशोधकाने १८३६ साली तयार केलेल्या तारायंत्राच्या साहाय्याने सांकेतीक शब्दात शेकडो मैलावर काही सेकंदात संदेश पाठविता येऊ लागला. या शोधानंतर काही काळातच जमिनीवर तारांचे जाळे उभे राहिले. सायरस फिल्ड यांच्या अविरत प्रयत्नातून १८५८ मध्ये अटलांटिक समुद्राखालून तारा टाकल्या व आंतरखंडीय संदेशवहनाची सुरुवात केली.

२. **टेलिफोन :** तारायंत्राच्या पुढची पायरी म्हणजे टेलिफोन होय. अलेक्झांडर ग्रॅहम बेल या संशोधकाने १८७६ साली टेलिफोनचा शोध लावला. या शोधामुळे बोलणाऱ्याचे शब्द जसेच्या तसे एका ठिकाणाहून दुसरीकडे पाठविणे शक्य झाले. नंतर एडिसनने बेलच्या टेलिफोनमध्ये अनेक सुधारणा केल्या. परत तारायंत्र असो वा टेलिफोन या उपकरणामधील तारा तुटल्या की संदेशवहन ठप्प होत असे.

३. **रेडिओ :** इटालियन शास्त्रज्ञ मार्कोनी यांनी १८९५ मध्ये बिनतारी यंत्राचा (रेडिओ) शोध लावला. मार्कोनीने तयार केलेल्या यंत्रामध्ये विद्युतचुंबकीय लहरींच्या सहाय्याने ध्वनी लहरींचे दूर अंतरावर प्रक्षेपण केले जात असे. २७ जुलै १८९६ रोजी त्यांनी इंग्लंडमध्ये बिनतारी संदेशवहनाचा यशस्वी प्रयोग केला. यानंतर लगेचच १२ डिसेंबर १९०१ रोजी मार्कोनीने इंग्लंडहून अटलांटिक समुद्रावरून थेट न्यू फाऊलँडपर्यंत बिनतारी संदेश पाठविला. दोन खंडांना जोडणाऱ्या या जगातील पहिल्या बिनतारी संदेशाने साऱ्यांना आश्चर्यचकित करून सोडले. यानंतर जगभर रेडिओ स्टेशन्स उभारण्यात आली. पहिल्या व दुसऱ्या महायुध्दात या बिनतारी यंत्रांनी अजोड कामगिरी केली.

४. **टेलिव्हिजन :** जॉनबेअर्ड, हे संशोधक १९२४ सालापासून व्यक्तींची प्रतिमा हवेतून शेकडो मैलांवर जशीच्या तशी पाठवायचा ध्यास घेतला. १९४५ साली त्यांना यश आले.

५, **उपग्रह :** ४ ऑक्टोबर १९५७ रोजी रशियाचा स्फुटनिक १ हा पहिला उपग्रह अवकाशात झेपावला आणि पृथ्वीवर उपग्रहीय दळणवळणाचे युग अवतरले. उपग्रहीय दळणवळण सुरु झाल्यापासून दूरचित्रवाणीचे कार्यक्रम खूप विस्तीर्ण प्रदेशावर सुलभपणे प्रक्षेपित करणे शक्य झाले. आजमितीस रशिया, अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, चीन व भारत इत्यादी देशांनी शेकडो उपग्रह अवकाशात धाडले आहेत. आजमितीस शंभरहून अधिक उपग्रह एकाचवेळी अवकाशात यशस्वीपणे सोडण्यात भारत जगात अग्रेसर आहे.

## ● संदेशवहनातील आधुनिक क्रांती :-

१. **संगणक :** हर्मन होलरीथ या तंत्रज्ञाने आय.बी.एम. या संस्थेची स्थापना केली. या कंपनीने हॉवर्ड विद्यापीठाच्या सहकार्यातून १९४४ साली मार्क-१ या संगणकाची निर्मिती केली.

मार्क-१ हा अमेरिकेतील पहिला डिजीटल संगणक होता. तो ८ फूट उंच ५१ फूट लांब आणि ५ टन वजनाचा होता. त्यात ५०० मैल लांबीचे तारांचे जाळे पसरले होते. ५ अश्वशक्तीच्या विद्युत जनित्राद्वारे तो कार्यरत केला जाई. काहींच्या मते, नाझी राजवटीच्या काळात कोनार्ड इयुस यांनी १९४१ मध्ये झेड-१ हा पहिला डिजीटल संगणक तयार केला होता. संगणकाची पहिली पिढी सन १९४६ ते सन १९५९, दुसरी पिढी सन १९५९ ते १९६५, संगणकाची तिसरी पिढी सन १९६५ ते १९७५ आणि संगणकाची चौथी पिडी सन १९७५ नंतर आजपर्यंत कार्यरत आहे. चौथ्या पिढीतील संगणकाचा आकार व वजन कमी झाले असून कार्यक्षमता कित्येक पटीने वाढलेली दिसते.

२. **इंटरनेट :** संदेशवहनाचे अत्याधुनिक साधन म्हणून इंटरनेट ओळखले जाते. १९६९ साली इंटरनेटच्या कल्पनेचा जन्म झाला. अमेरिकन लष्कराने इंटरनेटच्या पायाभूत ठरणारे 'आर्पानेट' नावाचे नेटवर्क वापरात आणले. अमेरिकेने सुरुवातीस लष्करी कामासाठी त्याचा वापर केला. त्यानंतर अमेरिकेतील विद्यापीठांना शिक्षणकार्यासाठी वापरास इंटरनेट खुले झाले.

नवीन संशोधन व माहितीची देवाणघेवाण या कामासाठी इंटरनेटचा वापर सुरू झाल्यानंतर सर्वक्षेत्रातील लोकांचे याकडे लक्ष वेधले गेले आणि इंटरनेटचा उपयोग सुरू झाला. १९६९ मध्ये ४ केंद्रे असणारे हे नेटवर्क १९९५ मध्ये ५० लाख केंद्रे असणाऱ्या नेटवर्कमध्ये रुपांतरित झाले. आता इंटरनेटमध्ये लक्षावधी नेटवर्क असून आता ५० टक्के नेटवर्क अमेरिकेबाहेर इतर देशांत आहेत. इंटरनेटमुळे जग जवळ आले आहे. आज घरबसल्या अमेरिका किंवा इंग्लंडमधील विद्यापीठाची पदवी इंटरनेटच्या माध्यमातून संपादन करता येते.

जगाच्या ४ कोपऱ्यात असणाऱ्या व्यक्ती व्हिडीओ कॉन्फरसिंगच्या माध्यमातून एकमेकांशी संवाद साधू शकतात. तसेच इंटरनेट वरील ई-मेल या सेवेचा वापर करून आपण काही सेकंदात कुठेही संदेश पाठवू शकतो. ई-मेल हे एका सेकंदाच्या दहाव्या भागातच संदेश पोहचविता येतो.

३. **मोबाईल :** जपानच्या एन टी टी (NTT) या कंपनीने १९८० मध्ये पहिले मोबाईल फोनच्या संदेशवहनासाठी आवश्यक असणारे जाळे उभारले. यानंतर व्यावसायिक तत्वावर मोबाईल फोनची सेवा देण्यास प्रारंभ झाला. मार्च २००८ मधील आकडेवारीनुसार चीनमध्ये ५३ कोटी ४० लाख, अमेरिकेत २५ कोटी ७० लाख, भारतात २३ कोटी ७० लाख तर रशियात १७ कोटी २० लाख मोबाईलधारक होते. २००९ साली भारतातील मोबाईलधारकांमध्ये ८ कोटी ३० लाखांनी वाढ झाल्याचे दिसून आले आहे. मोबाईल व इंटरनेटच्या समन्वयातून मोबाईलवरच व्हिडीओ कॉन्फरसिंग करता येऊ लागले आहे. मोबाईलच्या माध्यमातून फेसबुक, वॉटस्अप, इन्स्टाग्राम, ट्विटर या सोशल मिडियाच्या माध्यमातून विचारांची देवाणघेवाण एका क्षणात करणे सहज शक्य झाले आहे. आज संगणक, मोबाईल आणि उपग्रह या तिघांनी हात मिळवणी

केल्याने संदेशवहन अभूतपूर्व क्रांती घडून आली आहे. आता मानवाला या अफाट पसरलेल्या विश्वातील एखाद्या परग्रहवासीयांशी संपर्क करायचे वेध लागले आहेत. त्याकरिता १९७७ साली व्हॉएजर हे अवकाशयान सोडण्यात आलेले आहे.

## ● माहिती तंत्रज्ञान :-

माहिती प्रक्षेपित करण्यासाठी, साठविण्यासाठी, तयार करण्यासाठी, प्रदर्शित करण्यासाठी किंवा तिची देवाणघेवाण करण्यासाठी वापरली जाणारी विद्युत उपकरणे म्हणजे माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान होय. यामध्ये रेडिओ, दूरदर्शन, व्हिडिओ, डिव्हीडी, दूरध्वनी, मोबाईल फोन, उपग्रहावर आधारित सेवा व सुविधा, संगणक व त्या संबंधित हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर अशा गोष्टींचा समावेश होतो. हया व्यतिरिक्त व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, ईमेल, ब्लॉग अशा तंत्रांचा ही यात समावेश होतो.

माहिती तंत्रज्ञानात सर्वात महत्वाचे जाळे इंटरनेटचे आहे. आज त्याचा विस्तार फार मोठा आहे. त्यामुळे जग आपल्या मुठीत आल्यासारखे भासते. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात आपण इंटरनेटद्वारे जगातील कुठलीही माहिती व ज्ञान क्षणार्धात एक कळ दाबून मिळवू शकतो. आपल्या रोजच्या जीवनातील कामे अगदी सहज व सोप्या पध्दतीने करण्यास माहिती तंत्रज्ञान मदत करीत आहे. आज सर्वच प्रकारची माहिती इंटरनेटवरील गुगल, याहू अशा विविध प्रकारच्या संकेत स्थळांमुळे सहज व अगदी काही मिनिटात मिळणे शक्य झाले आहे. माहिती तंत्रज्ञानाचे जाळे आजच्या युगात एवढे घट्ट विणले गेले आहे की, आता आपण सर्वस्वी त्यात गुरफटून गेलो आहोत. थोडक्यात, आज संगणकाचे ज्ञान ज्यांना आहे, त्यांनाच साक्षर म्हणावे अशी वेळ आली आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या या विस्तृत कार्यपध्दतीमुळे या तंत्रज्ञानादवारे मोठ्या प्रमाणात व्यावसायिक संधी देखील उपलब्ध झाल्या आहेत. उदा. ई-कॉमर्स या क्षेत्रात आर्थिक भांडवलापेक्षा बौध्दिक भांडवलास जास्त महत्त्व असल्याने अनेक युवकांचा या क्षेत्राकडे कल वाढतच आहे. बी.पी.ओ., कॉलसेंटर व के.पी.ओ. (नॉलेज प्रोसेस आऊट सोर्सिंग) ही तरुणांसाठी रोजगाराची नवी दालने माहिती तंत्रज्ञानाने खुली केली आहेत.

हवामानशास्त्र, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र, करमणूक क्षेत्र, मुलभूत विज्ञान व तंत्रज्ञान अशा बहुविध क्षेत्रांमध्ये माहिती तंत्रज्ञान आपली महत्त्वाची भूमिका बजावत आहे. कोअर बँकिंग, टेलिबँकिंग, ATM यासारख्या बँकींग क्षेत्रात क्रांती घडविणाऱ्या अनेक प्रचलित सेवा या माहिती तंत्रज्ञानामुळेच साकारल्या आहेत.

## ● माहिती तंत्रज्ञानातील भारताची वाटचाल :-

सन १९६५ मध्ये 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फन्डामेंटल रिसर्च' या संस्थेत भारतातील पहिला संगणक दाखल झाला आणि माहिती तंत्रज्ञानाची भारतात सुरुवात झाली. भारत सरकारने पंतप्रधान राजीव गांधींच्या

दूरदृष्टीमुळे या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. १९८६ मध्ये सॉफ्टवेअर धोरण, १९८८ मध्ये जागतिक व्यापार धोरण तर मे १९९८ मध्ये दीर्घकलीन माहिती तंत्रज्ञान विकासाचा त्रिस्तरीय कृती आराखडा घोषित केला. या साऱ्याचे फलित म्हणजे १९९०-१९९१ मध्ये असलेली केवळ १५० लक्ष अमेरिकन डॉलर मूल्यांची माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उलाढाल २००८ सालात ८५ अब्ज अमेरिकन डॉलरवर पोहोचली. प्रतिवर्षी यामध्ये सुमारे ४० टक्केपेक्षा अधिक वाढ होत आहे. सन १९९८ मध्ये सकल घरेलू उत्पादनामध्ये (GDP) सॉफ्टवेअर क्षेत्राचा पर्यायी माहिती तंत्रज्ञानाचा वाटा १.२ टक्के होता तो २००७ मध्ये ५.२ टक्के झाला.

पूर्वी केवळ रत्ने आणि दागिने निर्यात करणारा आपला देश माहिती तंत्रज्ञानात केलेल्या प्रगतीच्या जोरावर सॉफ्टवेअर निर्यात करणारा जगातील प्रमुख देश म्हणून आज ओळखला जातो. आजमितीस जगातील ९५ देशांना भारत सॉफ्टवेअर निर्यात करतो. जगात अग्रगण्य गणल्या जाणाऱ्या फॉर्च्युन ५००० कंपन्यांपैकी ७५ टक्के कंपन्या भारताकडून सॉफ्टवेअर सेवा घेत आहेत. सन २००७ मध्ये या क्षेत्रातील निर्यातीने ४० अब्ज डॉलरची पातळी गाठलेली होती. माहिती तंत्रज्ञान उद्योगांना चालना देण्यासाठी व योग्य पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी सरकारने आय.टी.पार्कची संकल्पना प्रत्यक्षात आणलेली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबरच भारत सरकारने संगणक प्रसारावरही भर दिला आहे. २०००-२००१ मध्ये भारतात संगणकाचे प्रमाण दर हजारी ६.३ संगणक होते ते वाढून २००८ साली दर हजारी २५ संगणक झाले आहेत.

## स्वयं-अध्ययन प्रश्न - २

- **योग्य पर्याय निवडा.**

१. रेडिओचा शोध ............ यांनी लावला.

*(अ) मार्कोनी* *(ब) ग्रॅहमबेल* *(क) मोर्स* *(ड) यापैकी नाही.*

२. टेलिव्हिजनचा शोध ............ यांनी लावला.

*(अ) ग्रॅहम बेल* *(ब) मार्कोनी* *(क) मोर्स* *(ड) जॉन बेअर्ड.*

३. रशियाने ........... हा उपग्रह ४ ऑक्टोबर १९५७ रोजी अवकाशात सोडला.

*(अ) स्फुटनिक* *(क) स्फुटनिक-३*

*(ब) फूटनिक-२* *(ड) यापैकी नाही.*

४. अमेरिकेतील पहिला डिजीटल संगणक .......... हा आहे.

*(अ) मार्क* *(ब) मार्क-१* *(क) मार्क-२* *(ड) मार्क-३.*

५. आयलव्ह यू हा संगणकाशी संबंधित ........... आहे.

*(अ) व्हायरस* *(ब) सॉफ्टवेअर* *(क) हार्डवेअर* *(ड) यापैकी नाही.*

## ३.२.३ मानवी हक्क

● **मानवी हक्कांचे घोषणापत्र :-**

मानवाच्या मूलभूत हक्काचा विचार फार वर्षापासून होत असला तरी सर्व राष्ट्रांनी मिळून काही मानवी हक्कांना मान्यता दिली व त्याच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारली, ही गोष्ट अगदी अलीकडील आहे. १९३९ ते १९४५ ही सहा वर्षे चाललेल्या दुसऱ्या महायुध्दात जर्मनीतील नाझी राजवटीने लक्षावधी निरपराध ज्यूंची हत्या केली. न्यूरेंबर्ग येथे १९४५-४६ साली चाललेल्या युध्द गुन्हेगारांच्या चौकशीत ज्या क्रूर घटना पुढे आल्या, त्यामुळे मानवी हक्कांच्या संरक्षणाची आवश्यकता जगाला पुन्हा एकदा भासू लागली. १९४५ सालीच संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनापत्रात मानवी हक्कांना महत्वाचे स्थान देण्यात आले. १० डिसेंबर १९४८ रोजी पॅरिस येथे संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने मानवी हक्क जाहीर करणारे घोषणापत्र संमत केले. यात एकूण ३० कलमे आहेत या घोषणापत्रावर सभासद राष्ट्रांनी सह्या केल्या. या घोषणापत्राचे महत्त्व असे की, यापुढे कोणत्याही देशाच्या सरकारला 'आम्ही आमच्या नागरिकांना कसेही वागवू' असे म्हणण्याचा नैतिक किंवा कायदेशीर अधिकार उरला नाही. आपल्या देशातील नागरिकांचे मानवी हक्कसुध्दा पायदळी तुडविण्याचा अधिकार कोणत्याही सरकारला उरला नाही. कोणत्याही देशाचे सरकार आपल्या देशातील नागरिकांना मानवी हक्कांपासून वंचित ठेवत असेल तर आंतरराष्ट्रीय समुदाय त्या सरकारवर हे हक्क बहाल करण्यासाठी दडपण आणू शकतो. यादृष्टीने मानवी हक्कांची ही घोषणा फार महत्त्वाची आहे.

एखाद्या देशातील नागरिकांच्या मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय समुदायाने किंवा संयुक्त राष्ट्र संघासारख्या संघटनेने रक्षण करण्यात मोठी अडचण त्या देशाच्या सार्वभौमत्वाची येते. देशातील नागरिकांनी सरकारचे होत असलेले वर्तन हा इतरांना चर्चा करण्याचा विषय होत नाही, अशी भूमिका अनेक देश घेतात. उदाहरणार्थ, चीनमधील नागरिकांनी विचार स्वातंत्र्याची मागणी केली, तर तेथील साम्यवादी सरकार ती दडपून टाकण्यासाठी नागरिकांवर अत्याचार करते. या अत्याचारांविरुध्द इतर देशांनी किंवा इतर देशातील नागरिकांनी मत व्यक्त केले तर चीनचे सरकार त्याला आपल्या कारभारात हस्तक्षेप मानते. मात्र मानवी अधिकारांच्या घोषणेवर सर्व प्रमुख राष्ट्रांनी स्वाक्षऱ्या केल्यामुळे एक प्रकारचे आंतरराष्ट्रीय नैतिक दडपण अस्तित्वाला आले आहे, ही गोष्ट खरी आहे. म्हणून आता सरकारांना 'आम्ही मानवी हक्कांचा भंग केला नाही' असाच बचाव द्यावा लागतो. एकदा मानवी हक्क किंवा मूल्य सर्व जगाने स्वीकारले, त्यासाठी घोषणापत्रावर स्वाक्षऱ्या केल्या तर त्याचा उपयोग होतोच. १९८५ साली बर्लिन परिषदेने गुलामगिरीची प्रथा बेकायदेशीर ठरवली व माणसाच्या मुक्तीच्या दिशेने एक महत्त्वाचे आंतरराष्ट्रीय पाऊल उचलले.

### (१) मानवी हक्कांची गरज :-

माणसाचे इतर प्राणीमात्रांपेक्षा वेगळेपण कशात आहे? आकारमानात तर ते निश्चितच नाही.

माणसापेक्षाही अधिक सुंदर दिसणारे प्राणी अस्तित्वात आहेत. निसर्गातील हवामान, इतर वस्तू आणि इतर प्राणी यांच्यासमवेत जसे जगता येईल तसे फक्त जगावे एवढेच माणूस करीत नाही. आपल्या भोवतालची परिस्थिती बदलण्याचा, निसर्गावर मात करण्याचा, निसर्गातील गोष्टींचा आपल्यासाठी उपयोग करून घेण्याचा तो प्रयत्न करीत असतो. मनुष्याच्या या धडपडीतून त्याचा विकास होतो. आपण जे पाहतो ते माणूस लक्षात ठेवतो, त्याचे विश्लेषण करतो, त्याच्यावर चिंतन करतो आणि आपल्या बुध्दीचा वापर करुन नवनवे शोधही लावतो. म्हणून स्मृती आणि विश्लेषक बुध्दी या माणसाला मिळालेल्या महत्त्वाच्या देणग्या आहेत. मनुष्याने निसर्गाच्या प्रतिकूलतेवर मात करण्यासाठी अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याचा शोध लावला आणि त्यात सतत चाललेल्या शोधाने अधिकाधिक चांगल्या प्रकारचा निवारा आणि चांगली वस्त्रे निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जिवंत राहण्यासाटी आणि आपल्या शारीरिक क्षमतेसाठी मनुष्य अन्य मिळवू लागला. इतर प्राण्यांच्या शिकारीसारख्या साध्या गोष्टींपासून ते निसर्गातील वनस्पतींतून अन्न विकसित करण्याचे प्रयोग त्याने केले. शिकारीसाठी हत्यारे बनविली, शेतीसाठी अवजारे बनविली, प्रवासासाठी आणि प्रगतीसाठी चाक बनविले. आपल्या प्रतिभेचा आविष्कार करण्यासाठी गुहेमध्ये चित्रे काढली. पुढे शिल्पकला विकसित केली. आपल्या भावनांची अभिव्यक्ती करण्यासाटी गायनादी कला निर्माण केल्या. आपल्या जीवन अधिक सुसह्य आणि समृध्द व्हावे यासाठी विज्ञानाची कास धरुन नवनवे शोध लावले. चाकापासून, अणुशक्तीपासून निर्माण होणाऱ्या ऊर्जेपर्यंत मनुष्याने विविध शोधांनी आपले जीवन विकसित केले. या भौतिक विकासाबरोबच मनुष्याचा मानसिक आणि आत्मिक विकासासाठी त्याच्या अंत:प्रेरणांनी, त्याच्या प्रतिभेने विविध कलांचा विकास केला आणि जगाची उत्पत्ती कशी झाली, मृत्यूपलीकडे काही अस्तित्व आहे काय? अशा विविध प्रश्नांना सामोरे जाऊन त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा आपापल्या मतीप्रमाणे प्रयत्न केला. नवनवीन श्रध्दास्थाने निर्माण केली आणि आचरणाचे नवनवे नियम बनवले. माणसामाणसांतील संबंधाचे नियमन करण्यासाठी नियम तयार केले. एकमेकांच्या मदतीने सामुदायिक जीवन अस्तित्वात आणले.

## (२) प्रगती आणि स्वातंत्र्य :-

वर सांगितलेल्या सर्व क्रिया एकमेकांशी जवळ संबंध असलेल्या होत्या. मनुष्याची सामाजिक, भौतिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक प्रगती यांचा एकमेकांशी संबंध आहेच. या सर्व प्रकारच्या प्रगतीला अनेक घटक कारणीभूत झाले असले तरी महत्वाचे कारण म्हणजे मनुष्याला उपभोगावयास मिळालेले स्वातंत्र्य हेच होते. आपल्या आवडीप्रमाणे जीवन जगण्याचा आपला विकास करुन घेण्याचा अधिकार त्याने बजावला होता. नवनवे शोध आणि नवनवे आविष्कार, नवनवी अभिव्यक्ती हे सर्व करण्याचा त्याला अधिकार जेवढा अधिक तेवढा तो प्रगतीच्या दिशेने अधिक वेगाने जात होता. मानवी प्रगती करुन घेण्याची सहज प्रेरणा असते. या प्रेरणेला अनुकूल वातावरण स्वातंत्र्य उपलब्ध करून देते. आपल्याला आवडणाऱ्या व कराव्याशा वाटणाऱ्या गोष्टी करण्याचे स्वातंत्र्य आवश्यक असते. तसेच या स्वातंत्र्यामुळे त्याच्या बौध्दिक व मानवी शक्तीही विकसित होतात. म्हणून जेव्हा एखादा जनसमूह पारतंत्र्यात जातो, तेव्हा त्याचा

विकास खुंटतो असे आपण पाहतो. तसेच ज्या राजवटीत नागरिकांना अधिकाधिक स्वातंत्र्य असेल त्या राजवटीतील नागरिकांनी स्वत:चा आणि आपल्या देशाचा अधिक विकास केला असे दिसते. याचे कारण स्पष्ट आहे. मनुष्याचा विकास ही यांत्रिक क्रिया नव्हे. या क्रियेचा संबंध मनुष्याच्या मन आणि बुध्दी यासारख्या इंद्रियगम्य गोष्टींशी आहे. म्हणून मानवी अधिकार जेवढे अधिक प्रमाणात उपभोगता येतील तेवढा माणसाचा अधिक विकास होत जातो. जेव्हा माणसाला नवे विचार मांडण्याला प्रतिबंध होतो तेव्हा विकासाची प्रक्रियाच थांबते. म्हणून नवा विचार मांडणाऱ्यांना अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. सूर्याभोवती पृथ्वी व ग्रह फिरत असतात ही कोपर्निकसची कल्पना सत्य आहे असे संशोधन करुन सिध्द करणाऱ्या गॅलिलिओला (इटालियन शास्त्रज्ञ, १५६४-१६४२) खटल्यास तोंड द्यावे लागले. धर्म सत्तेच्या दबावामुळे माघार घ्यावी लागली. मानवसदृश देवावर विश्वास न ठेवणाऱ्या सॉक्रेटिसला (ग्रीक तत्त्वज्ञ इ.स.पू. ४७०-३९९) विषाचा प्याला प्यावा लागला.

आजच्या जीवनात व्यक्तीला ज्या अडचणींना, त्रासाला सामोरे जावे लागले, त्याचे निराकरण करणे तसेच जीवन अधिक सुखदायी करणे हा विकासाचा उद्देश असतो. म्हणून आजची आपली स्थिती खुलेपणाने सांगण्याचे स्वातंत्र्य मनुष्याला आवश्यक आहे. या परिस्थितीत आपल्याला कसा बदल हवा याविषयीच्या कल्पना नक्की करण्यासाठी त्याला आवश्यक ते शिक्षण घेण्याचे व आवश्यक ती माहिती मिळविण्याचे स्वातंत्र्य हवे. व्यक्तीच्या आणि समाजाच्या स्थितीचा विचार करुन त्यामध्ये बदल सुचविण्याचे स्वातंत्र्य आणि धैर्य आवश्यक असते. व्यक्तीचे जीवन त्याला त्याच्या मर्जीप्रमाणे व्यतीत करता यावे व व्यक्तिसमूहाचे नियंत्रण करणाऱ्या शासनासारख्या राजकीय आणि धर्मासारख्या नैतिक संस्था त्याच्या मर्जीच्या असाव्या हेही त्याचा विकासाला आवश्यक आहे. शासनाने केलेले कायदे किंवा समाजाने केलेले नीतीनियम या सर्वांचा उददेश व्यक्तीच्या विकासाला मदत करणे हाच असला पाहिजे.

### (३) समतेचा अधिकार :-

मानवाधिकारांच्या घोषणेत पहिल्याच कलमात सर्व माणसे स्वतंत्र म्हणून आणि सन्मान आणि हक्कांच्या बाबत समान म्हणून जन्माला आली आहेत, असे म्हटले आहे. माणूस जन्मत:च स्वतंत्र आहे. त्याला हे स्वातंत्र्य दुसऱ्या कोणीही दिलेले नाही. शिवाय सर्व माणसे समान आहेत, त्यांना समान हक्क आहेत आणि त्यांना समान सन्मान आहे. मनुष्यप्राण्याला विवेकबुध्दी मिळालेली आहे. आपल्या सद्सदविवेकाचा वापर करुन माणूस आयुष्यातील निर्णय घेतो, त्याच्या स्वातंत्र्याचा वापर त्याने आपल्या सदसद्विवेकबुध्दीच्या साह्याने करावयाचा आहे. चांगले काय, वाईट काय, आपण काय करावे, याचा निर्णय त्याने स्वत:च करावयाचा आहे. याच कलमात असे म्हटले आहे की, माणसाने दुसऱ्या माणसाशी बंधुभावाच्या भावनेने वागावे. पहिल्या कलमात जन्मत:च समान अधिकार असतील असे जे म्हटले आहे, त्याचे स्पष्टीकरण दुसऱ्या कलमात आहे. वंश, रंग, लिंग, भाषा, धर्म, राजकीय पंथ, राष्ट्रीय किंवा सामाजिक वारसा, संपत्ती, जन्मस्थ किंवा इतर दर्जा या कारणांवरुन अधिकारांच्या उपभोगाबदल भेदभाव केला जाणार नाही, तसेच तो ज्या राज्यात राहत असेल त्या राज्याच्या आंतरराष्ट्रीय दर्जामुळे किंवा ते राज्य कोणाच्या अंकीत

असल्यामुळे त्याच्या मानवी अधिकारंचा संकोच होणार नाही अशी ग्वाही देण्यात आली आहे. ७व्या कलमात कायद्यासमोर सर्व माणसे समान असतील व कायद्याने समान संरक्षण कोणत्याही भेदभावाशिवाय त्यांना मिळेल असे सांगितले आहे.

कलम १, २ आणि ७ या तीन कलमांत मिळून मनुष्याच्या समानतेची घोषणा करण्यात आली आहे. समानतेचा पहिला पाया म्हणजे माणसांना जन्मत:च अधिकार मिळालेले आहेत असे मानणे होय. म्हणजे ज्याचा जन्म झाला त्याला आपोआप अधिकार मिळाले. अधिकार कोण्या दुसऱ्या माणसाने, राजाने किंवा सरकारने किंवा धर्मासारख्या संस्थेनेही दिलेली नाहीत. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे माणसामाणसात अधिकारांबदल भेद केला जाणार नाही. माणसाने दुसऱ्यापेक्षा आपण श्रेष्ठ आहोत हे सिध्द करण्यासाठी अनेक, त्याच्या हातात नसलेल्या गोष्टींचाही आधार घेतला. उदाहरणार्थ, आपण कोणत्या वंशात जन्म घेऊ हे आपल्या हातात नसते. आपण गोरे असू की काळे हेही आपल्या हातात नसते. आपला जन्म कोणत्या गावी होईल हेही आपल्या हातात नसते, आपल्यापैकी कोणी पुरुष असेल कोणी स्त्री असेल, परंतु अशा कारणांवरून आपल्याला मिळालेल्या अधिकारांत भेदभाव होण्याचे कारण नाही. गैरलागू मुद्यांवरून माणसे स्वत:ला वरिष्ठ किंवा कनिष्ठ असे समजतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे भारतातील जातिव्यवस्था आहे. एखाद्या जातीने परंपरेने विशिष्ट काम केले म्हणजे ती जात श्रेष्ठ होते अगर कनिष्ठ होते याला काहीही आधार नाही, असे असतानाही चुकीच्या कल्पनांच्या आधारे एक जात दुसऱ्या जातीपेक्षा स्वत:ला मोठी समजू लागली. युरोपीय देशांत आफ्रिकेतून किंवा आशियातून आलेल्या किंवा आणल्या गेलेल्या लोकांना कनिष्ठ समजून त्यांना तुच्छतेने वागवण्यात येऊ लागले. सर्वात पराकोटीची गोष्ट म्हणजे एकाच घरात राहणाऱ्या स्त्री – पुरुषांतसुध्दा उच्चनिचतेची भावना निर्माण झाली. पुरुष स्त्रीला आपल्यापेक्षा कनिष्ठ मानू लागला. आपले महत्त्व, आपला दर्जा, आपले अधिकार, आपल्याच घरातल्या स्त्रीपेक्षा जास्त आहेत असे त्याला वाटू लागले. मनुष्याच्या मनातील दुसऱ्यावर कुरघोडी करण्याची मूळ वृत्ती अशा रितीने उच्चनिचतेच्या कल्पनांद्वारे प्रगट होऊ लागली. ज्याच्या हाती सामाजिक सत्ता आली किंवा आर्थिक सत्ता आली किंवा जो शारीरिकदृष्ट्या बलदंड होता त्याने दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठत्व मिळविण्यासाठी आपल्या हातातील या सत्तांचा उपयोग केला. हे श्रेष्ठत्व मानीत होते. ते प्रत्यक्षात अस्तित्वात नव्हते. खोट्या कल्पनांचाच त्याला आधार होता. परंतु ही श्रेष्ठत्वाची भावना एवढी भयानक ठरली की, दुसऱ्या समूहाला किंवा व्यक्तीला दाबून टाकण्यासाठी आणि तिचे न्याय अधिकार तिला नाकारण्यासाठी त्याचा वापर करण्यात आला. भारतामध्ये काही जातींना अस्पृश्य समजण्यात आले. त्यांना स्पर्शही करावयाचा नाही, त्यांना गावाच्या मूळ वस्तीत राहूही द्यायचे नाही येथपर्यंत या अन्यायाची मजल गेली. दक्षिण आफ्रिकेत ब्रिटिश राज्यकर्त्यांनी मूळ आफ्रिकन लोकांना वेगळ्या वस्त्यांत राहणे भाग पाडले. वेगळ्या सार्वजनिक वाहनात प्रवास करण्याची सक्ती केली. अमेरिकन संयुक्त संस्थानातील अनेक राज्यांत काळयांना (निग्रोंना) गोऱ्यांच्या शाळेत प्रवेशही देण्यात येत नसे. इंग्लंडमध्ये लोकशाही येऊन पुरुषांना मताचा अधिकार मिळाला, पण स्त्रियांना तो लवकर दिला गेला नाही. अनेक मुस्लीम राष्ट्रांत स्त्रियांना बुरखा वापरण्याची सक्ती केली गेली. भारतात कुटुंबाच्या संपत्तीच्या वाटणीबाबत पुरुष आणि स्त्री यांच्यात भेदभाव केला जात असे.

या सर्व अन्यायाचे मूळ विषमतेत होते. ही विषमता मनुष्याने निर्माण केलेली होती. माणसामाणसांत भेदभाव केला जाणार नाही, ही मानवाधिकाराच्या सनदेतील घोषणा म्हणून महत्त्वाची आहे. माणसांच्या अधिकारांचे रक्षण आणि नियमन करण्यासाठी जर कायदे अस्तित्वात आले असतील तर त्यांच्यासमोर सर्व माणसे सारखीच असली पाहिजेत व सर्व माणसांना त्या कायद्याने समान संरक्षण मिळाले पाहिजे. भारतात जुन्या काळी वरिष्ठ जातीच्या माणसाने गुन्हा केला तर कमी शिक्षा व कनिष्ठ जातीच्या माणसाने तोच गुन्हा केला तर जास्त शिक्षा असा प्रकार होता. ब्रिटिशांचे राज्य आल्यानंतर काही दिवस युरोपीयन माणसाने गुन्हा केल्यास त्याला वेगळी वागणूक दिली जाई. सरंजामदारी व्यवस्थेत राजाने किंवा राजकुटुंबियांनी काही गुन्हा केल्यास त्याला शिक्षा होऊ शकत नसे. कायद्यासमोर सर्व माणसे समान आहेत याचा अर्थ कायद्याचे संरक्षण त्यांना सारखेच मिळेल आणि कायदा मोडल्यास त्यांना सारखीच शिक्षा होईल असा आहे.

### (४) जगण्याचा अधिकार :-

मानवाधिकारापैकी सर्वात महत्वाचा अधिकार म्हणजे जगण्याचा अधिकार होय. अधिकार घोषणेच्या ३ऱ्या कलमान्वये प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा अधिकार असेल, ती मुक्त असेल आणि तिच्या जीविताचे संरक्षण केले जाईल, असे सांगण्यात आले. कायद्याचा आदेश नसताना कोणालाही मारता येणार नाही, त्याचे जीवन हिरावून घेता येणार नाही. बहुतेक सर्व देशांतील फौजदारी कायद्यात खून करणे हा दंडनीय अपराध असतोच. मात्र युध्द चालू असतानाही शत्रू सैनिकाला पकडल्यानंतर त्याला मारता येत नाही. त्याच्या जीविताचे रक्षण करण्याची जबाबदारी तो ज्यांच्या ताब्यात असतो त्यांची आहे. जे आपल्या देशाचा नागरिक नाही त्याच्याशी जीवनाच्या हक्काचे रक्षण करण्याची जबाबदारी देशावर असते. जगण्याच्या अधिकारात अनेक महत्त्वाच्या गोष्टींचा समावेश आहे. नागरिकाला जगण्याच्या अधिकार आहे याचा अर्थ नुसतेच त्याला शस्त्राने मारण्यात येणार नाही अगर विष देऊन त्याचा खून करता येणार नाही एवढाच नाही. कोणत्याही माणसाला उपासमारीने सुध्दा मरु दिले जाणार नाही असा त्याचा अर्थ आहे. स्वत:च्या देशातील दुष्काळाने ग्रस्त किंवा वादळाने पीडित झालेले लोक असोत की शेजारच्या राष्ट्रातून अमानुष वागणुकीमुळे आपल्या देशात आलेले निर्वासित असोत त्या सर्वांना अन्न पुरविणे, ते आजारी असतील तर त्यांना वैद्यकीय सेवा पुरविणे एवढेच काय पण पाण्याच्या किंवा हवेतील प्रदूषणामुळे जर रोगराई वाढत असेल व लोकांना शुध्द हवा आणि पाणी मिळत नसेल तर त्याची व्यवस्था करणेसुध्दा जगण्याच्या अधिकारामध्ये समाविष्ट आहे. माणूस जगला तरच त्याला बाकीच्या अधिकारांचा उपयोग घेता येईल, म्हणून जगणे महत्वाचे आहे. जगण्याचा अधिकारही महत्वाचा आहे.

भारताच्या राज्यघटनेत कलम २१ अन्वये जगण्याचा अधिकार देण्यात आला आहे. कोणत्याही व्यक्तीच्या जीवनाचे किंवा त्याच्या व्यक्तिस्वातंत्र्याचे कायद्याने घालून दिलेल्या पध्दतीचा अवलंब केल्याशिवाय हरण करता येणार नाही, असे या कलमात म्हटले आहे. एखाद्या माणसाला फाशी देण्याचा अगर त्याला तुरुंगात ठेवण्याचा आदेश न्यायालयाने योग्य चौकशी केल्यानंतर दिला असेल तरच त्याला फाशी देता येईल किंवा तुरुंगात ठेवता येईल. कोणाच्या लहरीनुसार एखाद्याचे जीवन हिरावून घेता येणार

नाही. कायद्याने सांगितलेली योग्य पध्दत अवलंबल्याशिवाय शिक्षा देता येणार नाही, याचा अर्थ असा की कायद्यात सांगितलेली असेल तेवढीच शिक्षा देता येईल, जास्त देता येणार नाही. तसेच ही शिक्षा देण्याचा ज्याला अधिकार असेल त्यालाच ती देता येईल आणि अशी शिक्षा देण्यापूर्वी संबंधिताचा गुन्हा सिध्द असला पाहिजे व त्याला त्याच्या बचावाची संधी असली पाहिजे. भारतातील न्यायालये असेही मानतात की, ज्याला आपला बचाव करणे शक्य नाही त्याला कायद्याची मदत व सल्ला उपलब्ध करुन देण्याची जबाबदारीसुध्दा सरकारवर आहे.

भारतीय न्यायालयांनी आपल्या निवाड्यांद्वारे जगण्याच्या अधिकाराचा अर्थविस्तार केलेला आहे. केवळ आपले शारीरिक अस्तित्व टिकविण्याच्या अधिकारापुरताच जगण्याचा अधिकार मर्यादित नाही. माणूस घरात राहतो. ते घर त्याचे असते. त्या घरातील कुटुंबियांसमवेत शांततेने तो राहतो. यापैकी कशावरही अतिक्रमण होणे हे जगण्याच्या अधिकाराचा भंग मानले पाहिजे. जगण्यासाठी आवश्यक असलेला व्यवसाय करण्यात त्याला झालेला अडथळा हा सुध्दा जगण्याच्या अधिकारांचा संकोच आहे. माणसाचे जगणे म्हणजे नुसते इतर प्राण्यांसारखे जगणे नव्हे. आपले शारीरिक अस्तित्व टिकविणे एवढाच जगण्याचा अधिकार नाही. हे जगणे सन्मानपूर्वक असले पाहिजे. प्रत्येक माणसाला ज्या किमान सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे तशा पध्दतीने त्याला जगता आले पाहिजे. याचा स्पष्ट अर्थ असा की, इतर मानवाधिकार त्याला उपभोगता येत असले पाहिजेत. त्या अधिकारासह जगणे हे खरे जगणे आहे. जगण्यासाठी आवश्यक व्यवसाय करण्याचा अधिकार हा सुध्दा जगण्याच्या अधिकाराचा भाग समजला गेला आहे. विनाचौकशी तुरुंगात डांबले जाणे, वर्षानुवर्षे खटला पडून असणे व त्यामुळे तुरुंगात राहावे लागणे, कारण नसताना बेड्या घालणे हे सर्व जगण्याच्या अधिकाराचा उल्लंघन मानले गेलेले आहेत.

व्यक्ति स्वातंत्र्याशी संबंधित आणखी एक महत्वाचा अधिकार कलम ४ सांगते. कोणालाही गुलाम करण्यात येणार नाही व सर्व प्रकारच्या गुलामगिरीला प्रतिबंध करण्यात आला आहे हे त्या कलमाने घोषित केले आहे. ग्रीक आणि रोमन साम्राज्याच्या काळापासून या ना त्या स्वरुपात जगाच्या कोणत्या तरी भागात गुलामगिरी अस्तित्वात होती. आपल्यासारखाच हाडामासांचा दुसरा एक जीवंत असलेला माणूस हा आपल्या मालकीच्या असावा ही कल्पना मानवी हक्कांच्याच नव्हे तर सुसंस्कृततेच्याच विरोधी आहे. दुसरा जीवंत माणूस एखाद्या वस्तूप्रमाणे विकला जाऊ शके. अमेरिकेतील वसाहतवाल्यांनी कामासाठी आफ्रिकेतून आणलेले मजूर गुलाम म्हणून विकत घेतलेले असावयाचे. गुलामगिरीची ही प्रथा त्यावेळेला कायदेशीर समजली जात असे. अब्राहम लिंकनच्या काळात अमेरिकन यादवी युध्दाने या गुलामगिरीला तिलांजली दिली. माणूस जन्मत:च जर स्वतंत्र असेल व त्याचे हे व्यक्तिस्वातंत्र्य अहस्तांतरीय असेल तर त्याला विकत कसे घेता येईल?

घोषणापत्रातील कलम ५, ९, १० आणि ११ यांनी फौजदारी प्रकरणांच्या संदर्भात मानवी हक्क सांगितले आहेत. कलम ५ प्रमाणे कोणाचाही छळ केला जाणार तसेच क्रूर, अमानवी व अपमानास्पद शिक्षा दिल्या जाणार नाहीत, असा दंडक घालण्यात आला आहे. कबुलीजबाब मिळविण्यासाठी आरोपीचा

पोलिसांनी छळ करणे, तुरुंगात कैद्याचा छळ करणे, युध्दकैदी म्हणून युध्दात ताब्यात आलेल्या शत्रूंच्या सैनिकांचा छळ करणे या गोष्टी मानवाधिकारांचा भंग करणाऱ्या आहेत. गुन्हा करणाऱ्या गुन्हेगाराला, कायदा मोडणाऱ्याला शिक्षा दिली गेली पाहिजे. मात्र ही शिक्षा सूड घेण्यासाठी दिलेली क्रूर शिक्षा नसावी. शिक्षेचे स्वरूप सभ्य आणि सुसंस्कृत समाजाला शोभणारे असावे. नुकतेच पाकिस्तानात सुमारे शंभर अल्पवयीन मुलांना क्रौर्याने माल्याचे प्रकरण उघडकीस आले. यातील प्रमुख गुन्हेगाराला एका पाकिस्तानी न्यायाधीशाने सार्वजनिक ठिकाणी गुन्हेगाराचे तुकडे करावे व ते ॲसिडमध्ये विरघळण्यास टाकावे अशी शिक्षा फर्मावली ही शिक्षा मानवाधिकाराशी सुसंगत नाही. पाकिस्तानी सरकारही ती देऊ शकणार नाही. गुन्हा अमानवी असला तरी शिक्षा अमानवी असू नये. तसे झाले तर गुन्हेगार आणि शासन करणारी यंत्रणा यांच्यात काहीच फरक राहणार नाही. फटक्यांची शिक्षा आता भारतात दिली जात नाही.

कलम ९ मध्ये कोणालाही योग्य अधिकाराशिवाय पकडले जाणार नाही, स्थानबध्द केले जाणार नाही व हद्दपार केले जाणार नाही असे म्हटले आहे. एखादी व्यक्ती सरकारला आवडत नाही, एवढ्याच कारणावरून तिला तुरुंगात ठेवता येणार नाही. देशाबाहेर हद्दपार करता येणार नाही. भारतीय दंड संहितेमध्ये काही गंभीर गुन्ह्यांबद्दलच न्यायालयाच्या अधिकारपत्राशिवाय पोलीस आरोपीला अटक करून शकतात. इतर बाबतीत त्यांना न्यायालयाकडून तसे अधिकार पत्र (वॉरंट) मिळवावे लागले. कलम १० मध्ये स्वतंत्र आणि नि:पक्षपाती न्यायाधीकरणाने चौकशी केल्याशिवाय व आरोपीची जबाबदारी सिध्द झाल्याशिवाय शिक्षा दिली जाऊ शकत नाही. चौकशीची पध्दत सर्वांसाठी समान असली पाहिजे व ती न्याय्य व लोकांसाठी खुली असली पाहिजे. न्यायालयीन चौकशी खुली असणे ही महत्त्वाची गोष्ट आहे. कारण त्यामुळे कोणाही नागरिकाला चौकशी पाहता येते व न्यायालयांनाही चौकशी लोकांच्या नजरेसमोर आहे हे लक्षात ठेवून कायद्याचे व नियमांचे काटेकारे पालन करावे लागले. हुकूमशाही राजवटीत बचावाची पुरेशी संधी न देताना गुप्तपणे चौकशीचा फार्स करुन एखाद्याला फासावर लटकविले जाते असे प्रकार मानवी अधिकारांचे भंग होत. गुन्हा सिध्द होईपर्यंत प्रत्येक व्यक्ती निरपराध आहे असे मानले पाहिजे व त्या देशाच्या किंवा आंतरराष्ट्रीय कायद्याच्या एखाद्या तरतुदीचा भंग झाल्याशिवाय कोणतेही कृत्य करण्याबद्दल किंवा न करण्याबद्दल कोणाला शिक्षा दिली जाऊ नये व ती शिक्षा कायद्यात सांगितल्यापेक्षा जास्त असू नये, असे कलम ११ ने बजावले आहे. एखाद्या देशात विशिष्ट मते बाळगल्याबद्दल अगर एखाद्या राजवटीला विरोध केल्याबद्दल कोणाचा छळ केला जात असेल तर त्याला इतर देशात आश्रय मागण्याचा अधिकार आहे. हुकूमशाही राजवटीच्या छळापासून अगर धर्मवेड्या राजवटींपासून मुक्ततेसाठी अनेक लोक शेजारच्या किंवा दुसऱ्या देशात पळून जातात. त्यांना ते देश आश्रय देतात. पूर्वीच्या पूर्व पाकिस्तानातील हिंदू आणि इतर आदिवासी लोक भारतात आले. या लक्षावधी निर्वासितांना भारताने तात्पुरता आश्रय दिला. त्यापैकी बहुसंख्य बांगला देशच्या निर्मितीनंतर मायदेशाला परत गेले. तिबेटमधील बौध्द धर्मगुरू व सामान्य जनता यांचा चीनने छळ चालविल्यानंतर तिबेट स्वातंत्र्याची चळवळ जिवंत ठेवण्यासाठी दलाई लामा व इतर लोक भारतात आले व ते सध्या भारतात राहत आहेत. दुसऱ्या महायुध्दापूर्वी जर्मनीतील वंशवादी सरकारने ज्यूंचा

छळ चालविल्यानंतर हजारो ज्यू लोक जगाच्या विविध राष्ट्रांत आश्रयार्थ गेले. दुसऱ्या देशात आश्रय मागण्याचा अधिकार हा सर्वसाधारण फौजदारी गुन्हे केलेल्या गुन्हेगारांना मात्र असत नाही. म्हणजे एखाद्या माणसाला पाकिस्तानात चार-दोन खून करून भारतात आश्रय मागता येणार नाही.

मानवी अधिकारांच्या घोषणापत्रातील आणखी महत्त्वाचे अधिकार माणसाच्या स्वातंत्र्यासंबंधीचे आहेत. सज्ञान झालेल्या प्रत्येक स्त्री, पुरुषाला वंश, धर्म किंवा राष्ट्रीयत्व यांचा विचार न करता आपल्या आयुष्याचा जोडीदार निवडता येईल, लग्न करता येईल व कुटुंब स्थापन करता येईल. लग्न करता येईल व कुटुंब स्थापन करता येईल. अनेक देशांत लग्न कायदेशीर होण्यासाठी आपल्याच धर्मातील व्यक्तीबरोबर लग्न करता येते. अनेक धर्म असे मानतात की, त्या धर्मातील व्यक्तीशीच लग्न करता येईल. म्हणून एखादा हिंदू मुलाने मुस्लीम मुलीशी लग्न करावयाचे असेल अगर एखाद्या मुस्लिम मुलाला ख्रिश्चन मुलीशी लग्न करावयाचे असेल अगर एखाद्या मुस्लीम मुलीला ख्रिश्चन मुलीशी लग्न करावयाचे असेल तर त्यांना कोणता तरी एकच धर्म दोघांनाही स्वीकारावा लागेल. वस्तुत: पती-पत्नीचे वेगवेगळे धर्म असावयास काही हरकत नाही. बहुतेक सुसंस्कृत देशात नागरी विवाह कायदे अस्तित्वात आहेत. त्याद्वारे भिन्न धर्मीयांनासुध्दा कायदेशीर लग्न करता येते. धर्म ही उपासनेची पध्दत आहे. ती वैवाहिक संबंधांच्या आड येण्याचे कारण नाही. प्रत्येक व्यक्तीला धर्मस्वातंत्र्य असेल तर पती-पत्नीचा वेगवेगळा धर्म असू शकतो.

प्रत्येक कुटुंबाला समाजाकडून व देशाकडून संरक्षण मिळण्याचा अधिकार असेल. प्रत्येक व्यक्तीला संपत्ती धारण करण्याचा अधिकार असेल व त्याचा संपत्ती अनाधिकाराने हिरावून घेतली जाणार नाही. एखाद्या माणसाने स्वकष्टाने संपत्ती मिळविली असेल तर ती जबरदस्तीने हिरावून घेतली जाऊ शकणार नाही. मात्र सार्वजनिक उपयोगासाठी एखादी मालमत्ता हवी असेल तर मोबदला देऊन ती शासनाला ताब्यात घेता येईल असे कायदे अनेक देशांत अस्तित्वात आहेत. तसेच इतरांचे शोषण करुन कोणी श्रीमंत बनू नये, यासाठी सरकारे उपाययोजना करु शकतात. भारतीय राज्यघटनेत पूर्वी संपत्ती बाळगण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार होता, तो वगळून आता कलम ३००अ प्रमाणे तो फक्त एक कायदेशीर अधिकार ठेवण्यात आला आहे.

प्रत्येक माणसाला विचाराचे, श्रध्देचे व धर्माचे स्वातंत्र्य असेल. धर्माचा प्रचार करण्याचे तसेच धर्म बदलण्याचेही स्वातंत्र्य त्याला असेल असे घोषणेच्या कलम १८ मध्ये म्हटले आहे. भारताच्या घटनेतील कलम २५ मध्ये हेच स्वातंत्र्य बहाल करण्यात आले आहे. धर्म हा माणसाला सुसंस्कृत करणारा असतो, परंतु धर्माचे वेड आणि दुराग्रह निर्माण झाल्यास दुसऱ्यावर अत्याचार सुध्दा धर्माच्या नावावरच केले जातात. भारतातील फाळणीच्या वेळी झालेल्या जातीय दंगली आणि अधूनमधून आजही होणारे प्रकार याची साक्ष देतात. धर्माचे स्वातंत्र्य असावे, याचा अर्थ त्याने कोणताही धर्म स्वीकारला तरी त्याला शासनाकडून सारखीच वागणूक मिळावयास हवी. अनेक देश स्वत:ला विशिष्ट धर्माचे देश म्हणतात. त्या देशात इतर धर्मीयांना बरोबरीचा दर्जा नसतो. तेथे मानवी हक्कांचा भंग होतो असे मानले पाहिजे. धर्माचे, धर्म बदलण्याचे व धर्म प्रसाराचे स्वातंत्र्य याचा अर्थ इतरांना जबरदस्तीने आपल्या धर्मात आणण्याचा अधिकार

नव्हे. धर्म हा माणसाच्या व्यक्तिगत इच्छेचा प्रश्न आहे? ती इच्छाही स्वतंत्र असावी लागते. प्रलोभनाने किंवा दडपणाने धर्म बदलता जाऊ नये. दुसऱ्यालाही धर्मस्वातंत्र्य असेल, तर त्याला आपल्या इच्छेनुसार दुसऱ्या धर्मात राहण्याचा अधिकार आहे असे आपण मानले पाहिजे. त्याच्या मुक्तीच्या काळजीने व त्याने आपलाच धर्म स्विकारल्याशिवाय गत्यंतर नाही असा अनेकांचा समज असतो. असा शासनाचाही समज असेल तर धर्मांतराला प्रोत्साहन मिळते. धर्माची निर्मिती खरे म्हणजे माणसाला सुसंस्कृत करण्यासाठी झाली. परंतु धर्माच्या दुराग्रहामुळे जेवढे जुलूम आणि हिंसा जगात झाली तेवढी दुसऱ्या कोणत्याही कारणाने झाली नाही. तलवारीच्या आणि बंदुकांच्या जोरावर धर्मांतरे घडवून आणण्यात आली व न जुमानणाऱ्यांना यमसदनास पाठविण्यात आले. गोव्यातील पोर्तुगीज मिशनऱ्यांचे धर्मांतराचे हिंसक प्रयत्न आणि जर्मनीतल्या नाझी राजवटीने लक्षावधी ज्यूंची केलेली हत्या ही उदाहरणे सर्वांच्या परिचयाची आहेत. सुसंस्कृत समाजात धर्म ही व्यक्तिगत बाब मानली पाहिजे, तो समाजाच्या नियंत्रणाचा विषय बनू नये. मानवाधिकारांपैकी धर्माच्या अधिकाराचा हा खरा अर्थ आहे. धर्मसंबंधीचे दुराग्रह माणसामाणसातील समतेच्या व स्वातंत्र्याच्या कल्पनेच्या विरुध्द आहेत.

त्याला मतस्वातंत्र्य असेल व आपले मत बनण्यासाठी जगभरातील सर्व माध्यमांकडून माहिती मिळविण्याचा त्याला अधिकार असेल. लोकशाही राज्यव्यवस्थेत प्रत्येक नागरिक राज्यकारभारात सहभागी असतो. त्याला असलेला मत देण्याचा अधिकार म्हणजे झालेल्या राज्यकारभाराबद्दल आपली पसंती-नापसंती व्यक्त करण्याचा व पुढील कारभारासाठी अपेक्षा व्यक्त करण्याचा अधिकार असतो. हा योग्य रितीने बजावयाचा असेल तर राज्यकारभार कसा चालतो, त्यातले निर्णय कोणत्या निकषावर घेतले गेलेले आहेत, उपलब्ध साधनांचा विकासासाठी योग्य वापर केला जातो की नाही, नागरिकांचे मूलभूत अधिकार राहिले जातात की नाही या सर्व गोष्टींची त्याला यथायोग्य माहिती असायला हवी. तरच त्याचा कारभारावरील सहभाग योग्य असू शकेल. नागरिकाला माहितीचा व माहिती कोठूनही मिळविण्याचा अधिकार असला पाहिजे. माहिती मिळविताना राज्यांच्या सीमांचा त्याला अडथळा होता कामा नये. देशाच्या सुरक्षिततेसाठी ज्या किमान गोष्टी गुप्त ठेवणे आवश्यक असेल, त्या वगळता इतर सर्व कारभार पारदर्शक असला पाहिजे. कित्येकवेळा आपल्यावर झालेल्या अन्यायांचे स्वरूपच अविकसित देशातील अशिक्षित नागरिकांना लक्षात येत नाही. त्यामुळे त्या अन्यायाचा ते विरोधही करीत नाहीत. विकासाच्या प्रक्रियेत शिक्षणाचा अभाव व देशातील राज्यकारभाराच्या सर्वांगीण माहितीचा अभाव हे मोठेच अडथळे असतील.

प्रत्येक व्यक्तीला शांततेने इतरांबरोबर एकत्र जमण्याचे व संघटना करण्याचे स्वातंत्र्य असेल. तसेच कोणालाही विशिष्ट संघटनेचा सभासद होण्याची सक्ती केली जाणार नाही, असे मानवाधिकार घोषणेचा २० व्या कलमात म्हटले आहे. एकत्र जमून विचारविनिमय करणे, एखाद्या गोष्टीबद्दल पसंती अथवा नापसंती व्यक्त करण्यासाठी सभा घेणे, मिरवणूक काढणे, सभेत भाषण करणे व विशिष्ट ध्येयाच्या पूर्तीसाठी संघटना स्थापन करणे ही परिवर्तनाची आणि विकासाची महत्त्वाची साधने होत. कोणतेही जुलमी किंवा लोकांची संमती नसलेले सरकार आपले अस्तित्व टिकविण्यासाठी सभा आणि संघटना स्वातंत्र्यावर बंदी घालते.

अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ही राजकीय संघटना १९८५ साली स्थापन झाली व तिने भारतीय स्वातंत्र्याची मागणी संघटितपणे केली. प्रार्थना समाज, ब्राम्हो समाज, आर्य समाज किंवा सत्यशोधक समाज अशा धर्मातील अनिष्ठ रुढींच्या विरोधात लोकांना जागृत करणाऱ्या संघटनांनी महत्वाचे कार्य केले. पाण्याच्या वाटपाबद्दल होणारा अन्याय, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांकडून होणारी अन्याय्य वसुली किंवा शासनातील भ्रष्टाचाराच्या विरोधात होणारे आंदोलन हे सर्व माणसे एकत्र आल्याने व त्यांनी संघटना केल्यानेच शक्य होते. एखादी शिक्षण संस्था स्थापण्यासाठी किंवा खेळाच्या विकासासाठी एखादी संघटना स्थापण्यासाठी नागरिकांना आज स्वातंत्र्य आहे. कामगार आपल्या कामाच्या शर्ती किंवा आपले वेतन याबद्दल मागण्या मांडण्यासाठी स्वत:ची कामगार संघटना उभारतात. हे सभा व संघटना स्वातंत्र्य शांततेने एकत्र येऊनच उपभोगावयाचे आहे. बेकायदेशीर गोष्टी करण्यासाठी उदाहरणार्थ, गुन्हे करण्यासाठी टोळी स्थापन करणे अगर लोकांनी निवडून दिलेले सरकार हिंसेचा वापर करून उलथून लावण्यासाठी या स्वातंत्र्याचा वापर करता येणार नाही. भारताच्या राज्यघटनेत १९व्या कलमात जी स्वातंत्र्ये सांगितले आहेत, त्यातील उपकलब 'ब' मध्ये शांततेने व शस्त्राशिवाय एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य व उपकलब 'क' मध्ये संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य आश्वासिले आहे.

घोषणेच्या कलम २३ मध्ये प्रत्येकाला काम करण्याचा अधिकार दिलेला आहे. त्याला त्याच्या आवडी प्रमाणे नोकरी करण्याचा, नोकरीसाठी न्याय्य शर्ती मिळविण्याचा अधिकार दिला आहे. कामाबद्दल त्याला न्याय्य मोबदला मिळाला पाहिजे आणि हा मोबदला त्याचा आणि त्याच्या कुटुंबाचा चरितार्थ मानवी सन्मानाच्या किमान गरजा भागविणारा असला पाहिजे. काम करण्याला तयार असणाऱ्या प्रत्येक नागरिकाला शासनाने व समाजाने काम पुरविले पाहिजे व त्या कामाबद्दल त्याला यथायोग्य वेतन दिले पाहिजे. कामाचा हा अधिकार भारतीय घटनेत मूलभूत अधिकारात समाविष्ट केलेला नाही. राज्यासाठी जो मार्गदर्शक तत्त्वे घटनेच्या चौथ्या भागात सांगितलेली आहेत, त्यातील ४१ व्या कलमात आपल्या आर्थिक क्षमतेच्या मर्यादेत राज्य नागरिकांना काम करण्याचा हक्क मिळवून देईल, बेकारीच्या, वृध्दावस्थेच्या, अपंगत्वाच्या व आजारपणाच्या कलमात राज्याने जीवनभरणाला आवश्यक असे किमान वेतन मिळावे यासाठी कायदे करावेत, असे सांगितले आहे. राज्याच्या मार्गदर्शक तत्वात सांगितलेल्या गोष्टी शासनाने न केल्यास न्यायालयात दाद मागता येत नाही हे खरे असले तरी ही तत्त्वे डोळ्यांसमोर ठेवून राज्य चालावे अशी आपल्या राज्यघटनेची अपेक्षा आहे. अनेक राज्य सरकारांनी तसेच केंद्र सरकारने या मार्गदर्शक तत्वाला अनुसरून काही कायदे केलेले आहेत. उदा. किमान वेतन कायद्याप्रमाणे विविध धंद्यातील किमान वेतन मिळावे हे कायद्यात निश्चित करण्यात आले आहे. जेव्हा शेतीचा हंगाम नसतो किंवा अवर्षणामुळे शेतीवर अवलंबून असणारे लोक मोठ्या प्रमाणावर बेकार होतात व त्यांना चरितार्थासाठी काम हवे असते त्यावेळी त्यांना काय दिले जावे म्हणून 'जवाहर रोजगार हमी योजना' यासारख्या योजना हाती घेऊन तात्पुरते काम मिळवून दिले जाते. 'संजय गांधी निराधार योजने'सारख्या काही योजनांद्वारे अल्पप्रमाात का होईना परंतु निराधार व्यक्तीला थोडेसे आर्थिक सहाय्य दिले जाते. अर्थात आपल्या देशातील सर्वच सरकाराची आर्थिक क्षमता व गरजू लोकांची प्रचंड वाढती संख्या अशा योजना लोकांच्या गरजेच्या मानाने फार अपुऱ्या आहेत.

अमेरिकेसारख्या देशात आणि अनेक पाश्चात्य देशांत सामाजिक सुरक्षेसाठी परिणामकारक कायदे आणि योजना अस्तित्वात आहेत.

मात्र बेकार राहणे व सरकारने दिलेल्या सामाजिक सुरक्षा भत्यावर जगणे हे अभिमानास्पद नाही व आपण काम केले पाहिजे हे लोकांच्या मनावर अगोदर ठसवणे आवश्यक आहे. विकासाच्या प्रक्रियेत गरजू लोकांना मदतीचा हात समाज आणि शासनाने दिला पाहिजे हे खरे. मात्र अशा मदतीमुळे काम न करण्याची व सरकारी अनुदानावर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती वाढल्यास राष्ट्राला तो प्रचंड हानीकारक आहे. श्रमातूनच संपत्ती उभी राहते याची शिकवण कठोरपणे दिली गेली पाहिजे. काम करायला तयार असूनही खरोखरच कामच मिळत नसेल किंवा वृध्दत्व, अपंगत्व किंवा आजारपण यासारख्या कारणांनी काम करता येणे अशक्य असेल तर मात्र शासनाने सुरक्षेचे कवच त्या माणसाला उपलब्ध करून दिले पाहिजे.

मानवाधिकारांच्या घोषणापत्रातील २६ व्या कलमान्वये प्रत्येकाला शिक्षण घेण्याचा अधिकार दिला आहे. शिक्षणाचा अधिकार हा विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा अधिकार आहे. आजूबाजूच्या जगाचे ज्ञान, आपल्या स्थितीचे ज्ञान, आपल्या हक्कांचे ज्ञान व ते मिळविण्याच्या मार्गांचे ज्ञान, आपला आर्थिक विकास करुन घेण्याच्या मार्गाचे ज्ञान हे सर्व शिक्षणामुळेच साध्य होते. एके काळी भारतात शिक्षण घेण्याचा अधिकार काही जातींना नाकारला होता. तसेच सर्व जातींच्या स्त्रियांनासुध्दा शिकू दिले जात नसे. शिक्षणाचा अधिकार नुसता देऊन उपयोग नाही तर समाजात शिक्षणाविषयी आस्था नसेल तर किमान प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणे आवश्यक असते. भारतातील शिक्षणाचा अभाव दूर करण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले. राजा राममोहन रॉय, महात्मा जोतिबा फुले, सयाजीराव गायकवाड, गोपाळ गणेश आगरकर, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहू महाराज, महर्षि धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील अशा अनेकांनी ज्या वर्गांनी शिक्षण मिळत नव्हते अशा वर्गांना शिक्षणाचा लाभ मिळावा, यासाठी जनतेत जागृती निर्माण केली व शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या.

गरिबीमुळे शाळेत मुलाला पाठविण्याऐवजी त्याला रोजगार मिळविण्यासाठी काम करण्यास सांगावे असे अनेक पालकांना वाटते. आई-वडिलांच्या उत्पन्नाला लहान मुलांच्या उत्पन्नाची जोड मिळाल्याशिवाय कुटुंबाची गुजराण होतच नाही अशी अनेक ठिकाणी परिस्थिती आहे. 'मुलीला शिकवून काय करावयाचे, ती थोडीच नोकरी करणार आहे' हाही विचार ग्रामीण भागात बोलला जात असे. शिवाय शिकण्याची इच्छा झालीच तर जवळपास शाळाच उपलब्ध नसे व शाळा असली तर तेथे परवडत नसे, कष्ट करुन, त्रास सहन करुन शिक्षण घ्यावे अशी प्रेरणा समाजसुधारकांनी केलेल्या लोकशिक्षणामुळे निर्माण होऊ लागली आहे व देशातील शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे.

प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण सर्वसाधारणपणे उपलब्ध असावे व उच्च शिक्षण सर्वांना गुणवत्तेच्या निकषांवर मिळू शकावे असे घोषणापत्रात म्हटले आहे. मुलांना कोणते शिक्षण द्यावयाचे हे ठरविण्याचा पहिला अधिकार पालकांना आहे असेही त्यात नमूद आहे. शिक्षण हे मानवी व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त असावे, त्याने अधिकारांविषयी आणि मूलभूत

स्वातंत्र्याविषयी आदर निर्माण करावा, विविध राष्ट्रे, वंश आणि धार्मिक गट यांच्यात सामंजस्य, सहिष्णुता आणि मैत्री निर्माण होण्याला मदत करावी अशी अपेक्षा घोषणापत्रात व्यक्त करण्यात आली आहे.

प्रत्येक व्यक्तीला एक राष्ट्रीयत्व मिळविण्याचा अधिकार असेल, त्याच्या देशाच्या कारभारात भाग घेण्याचा त्याला अधिकार असेल, लोकांच्या संमत्तीवर आधारलेले म्हणजे लोकशाही सरकार प्रत्येक देशात अस्तित्वात असेल व ही संमत्ती व्यक्त करण्यासाठी गुप्त मतदानाने व समान मताधिकाराने प्रतिनिधी निवडण्याचा नागरिकांना अधिकार असेल, असे घोषणापत्रात म्हटले आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेला या घोषणापत्रात नमूद केलेले अधिकार मिळत रहावेत अशी समाजरचना व आंतरराष्ट्रीय व्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्याचा नागरिकांनी अधिकार आहे.

## ● स्वातंत्र्य आणि विकास यांचे संबंध : अमर्त्य सेन यांचे विचार

विकास आणि मानवी स्वातंत्र्ये यांचा परस्परसंबंध उलगडून दाखवणारे बरेचसे नवे विचार अमर्त्य सेन या भारतीय असलेल्या व १९९८ चे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषक मिळविणाऱ्या शास्त्रज्ञाने मांडलेले आहेत. मनुष्याचे जीवन ज्या स्वतंत्र जीवनपध्दतीचे अधिक विकासोन्मुख होते त्या जीवनपध्दतीला कारणीभूत होणारी पाच साहाय्यक स्वातंत्र्य सेन यांनी सांगितलेली आहेत. त्यातले पहिले म्हणजे राजकीय स्वातंत्र्य होय. राजकीय स्वातंत्र्यात नागरी हक्कांचा समावेश होतो. आपल्यावर कोणी राज्य करावे, कोणत्या पध्दतीने राज्य चालावे, शासनाच्या कामाची चिकित्सा करण्याचा व शासनावर टीका करण्याचा अधिकार, प्रसिध्दीपूर्व नियंत्रणाशिवाय बजावले जाणारे वृत्तपत्र स्वातंत्र्य व राजकीय संवाद, भिन्न मत आणि टीका शक्य करणाऱ्या सर्व व्यवस्थेचा अंतर्भाव असलेले राजकीय स्वातंत्र्य विकासासाठी आवश्यक असणाऱ्या स्वातंत्र्यापैकी पाहिले आहे. दुसरे स्वातंत्र्य म्हणजे आर्थिक सोयी. जीवनाला आवश्यक असणारी आर्थिक साधने सर्वसाधारण नागरिकांना त्याचा उपयोग करण्यासाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे. या साधनांपासून उत्पादन करणे, उत्पादित मालाचा उपयोग घेणे व उत्पादित मालाची देवघेव करणे या तिन्ही गोष्टी शक्य झाल्या पाहिजे. राष्ट्राचे उत्पन्न आणि राष्ट्राची संपत्ती व व्यक्तीचे उत्पन्न आणि संपत्ती यांचा न्याय्य संबंध पाहिजे. राष्ट्रीय उत्पन्नाचा विनियोग कसा होतो, त्या विनियोगात सामाजिक विचार किती आहे हे या दृष्टीने फार महत्वाचे आहे.

तिसरे साहाय्यभूत स्वातंत्र्य हे सामाजिक संधीचे आहे. शिक्षण, आरोग्य यासारख्या मुलभूत सोयी किती प्रमाणात उपलब्ध आहेत हे जसे व्यक्तिगत जीवनासाठी महत्वाचे आहे, तसेच ते त्याच्या आर्थिक व राजकीय जीवनातील सहभागासाठीसुध्दा आवश्यक आहे. उदा. आर्थिक कार्यक्षेत्रात काम करण्यास निरक्षरता हा अडथळा ठरू शकतो, तसेच वृत्तपत्र न वाचता येणे व लिहिता न येणे यामुळे राजकीय जीवनातील सहभागास अडचण येथे. शिक्षणविषयक सोयींचे महत्व सांगताना सेन यांनी चीन आणि भारत यांचे तुलनात्मक उदाहरण दिले आहे. १९७९ पासून खुल्या व बाजारप्रेरित अर्थरचनेकडे चीन वळला, तर भारतात ही प्रक्रिया १९९१ साली सुरु झाली. चीनमध्ये असणाऱ्या कम्युनिस्ट राजवटीने नागरिकांचे शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रात जे चांगले काम केले होते त्याचा उपयोग नवी अर्थव्यवस्था अधिक कार्यक्षमतेने

राबवण्यासाठी चीनला झाला. तर भारतात अर्धशिक्षित लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे आर्थिक क्षेत्रातील आपली कार्यक्षमता मर्यादित राहिली. चीनप्रमाणेच दक्षिण कोरिया आणि तैवान या देशांतसुध्दा सुशिक्षित सामान्य जनता ही अर्थोत्पादनामध्ये नव्या व्यवस्थेत भारताच्या तुलनेत चांगली कामगिरी करू शकली. मात्र विकासाला लोकशाही कशी मदत करते हे स्पष्ट करताना सेन यांनी दुष्काळाचे उदाहरण घेतले आहे. इंग्रजी राजवटीत १९४३ साली बंगालमध्ये दुष्काळ पडून २० लक्षाहून अधिक माणसे मृत्युमुखी पडली. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य नसलेल्या कम्युनिस्ट चीनमधील सांस्कृतिक क्रांतीच्या काळात (१९५८-१९६१) पडलेल्या दुष्काळामुळे लक्षावधी माणसे मृत्युमुखी पडली. स्वतंत्र व लोकशाही देशात अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली तरी त्याच्या अशा भयानक परिणामांना प्रतिबंध करता येतो. शासनाने केलेले किंवा न केलेल्या उपाययोजनेची परखड चिकित्सा करता येते व लोकमताचे दडपण आणून योग्य गोष्टी करण्यास भाग पाडता येते. आपदेच्या प्रसंगी लोकमताची दखल घेऊन सरकारला योग्य काळजी घ्यावी लागते.

सेन यांनी सांगितलेले चौथे स्वातंत्र्य म्हणजे पारदर्शकतेची हमी. सार्वजनिक जीवनात विशेषत: राजकीय क्षेत्रात जर पारदर्शकता असेल तर आपल्याला काय मिळावयास हवे व त्यापैकी काय मिळत आहे याची तपासणी मनुष्य करु शकतो. राज्य करण्याचा अधिकार प्रतिनिधींना दिला म्हणजे प्रतिनिधी हे सामान्य मतदाराचे विश्वस्त बनतात. या विश्वस्तांनी लोकांच्या विश्वासाला पात्र असा कारभार केला आहे की नाही हे लोकांना कळाले पाहिजे. पाचवे साहाय्यक स्वातंत्र्य म्हणजे सामाजिक सुरक्षा. उपासमारीने व्यक्ती मरणार नाही. दुष्काळ, बेकारी तसेच नैसर्गिक आपदा यांच्या काळात त्याला किमान आर्थिक साहाय्य राज्याने पुरविले पाहिजे. ही सुरक्षा केवळ आपदेच्या काळात नागरिकांचे रक्षण एवढेच नव्हे तर आपदा नसतानाही खुलेपणाने काम करण्यास त्याला प्रोत्साहित करते व आपदा आली असताना आपले कसे होईल ही काळजी वाटू देत नाही. हे सुरक्षेचे आश्वासन नागरिकांच्या कार्यक्षमतेत वाढ करणारे असते.

अमर्त्य सेन यांच्या विचारातील एक महत्वाचे सूत्र म्हणजे गरिबी हे माणसाला विकासापासून वंचित ठेवण्याचे महत्वाचे कारण ठरते. विकासाचा अधिकार दिला, विकासासाठीचा संधी उपलब्ध असल्या तरी व्यक्ती असो अगर देत असो तो गरीब असेल तर त्याला या संधीचा उपयोग करताच येत नाही. भारताच्या राज्यघटनेत विकासाच्या समान संधीचे आश्वासन आहे. सर्व राजकीय स्वातंत्र्येही उपलब्ध आहेत, मानवाधिकारांच्या घोषणेतही त्यांचे आश्वासन आहे. असे असले तरी आर्थिक व्यवहारांमध्ये, उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये परिणामकारक भाग घ्यावयाचा तर व्यक्तीच्या किमान आर्थिक गरजा चांगल्या रितीने भागल्या गेलेल्या असल्या पाहिजेत. ज्याला उद्याची भ्रांत असेल तो माणूस आर्थिक समृध्दीच्या कोणत्याही प्रयत्नात भाग घ्यावयास अपात्र ठरतो. आज संगणकामुळे जगभर नुसती आर्थिकच नव्हे तर एक सामाजिक क्रांती झाली आहे. या क्रांतीमध्ये बिहारमधल्या किंवा ओरिसामधल्या खेडयातील माणसाकडे काय भूमिका आहे या बदलांचा त्यांच्या जीवनावर किती परिणाम झाला आहे, जग जवळ आल्यामुळे व माहितीचे दळणवळण सोपे झाल्यामुळे विकासाच्या ज्या नव्या संधी उपलब्ध झाल्या त्याचा लाभ घेण्याची क्षमता या माणसांची कितपत आहे दुर्दैवाने या सर्व प्रश्नांचे उत्तर नकारार्थी द्यावे लागणार आहे. वेगवान बदल जेव्हा राजकीय

किंवा आर्थिक क्षेत्रात होतात तेव्हा त्या बदलांमध्ये प्रगतीच्या दिशेने जाण्याची शक्ती यावी यासाठी किमान गरजांची चिंता नसली पाहिजे, तसेच आवश्यक शिक्षणाने त्या माणसाची पूर्वतयारी झाली असली पाहिजे.

- **विकासामध्ये मानवाधिकारांचे महत्व तीन प्रकारे सांगता येईल.**

१) मानवाधिकारांचे स्वयंसिध्द महत्व.

२) त्यांचा राजकीय प्रेरणेत व आर्थिक सुरक्षा मिळविण्यासाठी होणारा उपयोग.

३) समाजव्यवस्थेतील मूल्ये आणि प्राधान्ये निश्चित होताना त्यांना मिळणारे महत्त्व.

अमर्त्य सेन यांनी आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी प्रेरके म्हणून स्वातंत्र्याचा होणारा उपयोग विविध अर्थशास्त्रज्ञांनी कसा विचारात घेतला आहे याचा आपल्या विवेचनात विचार केला आहे. ॲडम स्मिथ, कार्ल मार्क्स, फ्रेडरिक हॉएक आणि पीटर बॉएर यासारख्या अर्थवेत्यांनी निवड करण्यासाठी पर्याय उपलब्ध असणे आणि नापसंती व्यक्त करण्याचा किंवा नकार देण्याचा अधिकार असणे यांचे आर्थिक विकासातील महत्व नोंदविले आहे.

### (१) खुल्या अर्थव्यवस्थेतही सामाजिक नियंत्रणाची गरज :-

खुल्या अर्थव्यवस्थेत नागरिकांचा किंवा देशाचा आपोआप विकास होईल असे समजणे मात्र गंभीर चूक ठरेल. खुल्या आर्थिक व्यवस्थेत पर्याय उपलब्ध असतील, नकाराचे स्वातंत्र्य असेल हे खरे मात्र पर्याय निवडण्यासाठी किमान आर्थिक क्षमता व पर्यायांचा पूर्ण उपयोग करण्यासाठी किमान शैक्षणिक पात्रता आणि या सर्वांच्या जोडीला राष्ट्रात श्रमसंस्कृती असणे या तीनही गोष्टी आवश्यक आहेत. खुल्या अर्थव्यवस्थेत स्पर्धा असणार, स्पर्धेचा उद्देश अधिकाधिक नफा मिळविणे हाच असणारा, अशावेळी महत्त्वाचे निर्णय घेण्याचा निकष हा केवळ व्यक्तिगत किंवा संस्थागत फायदा असा न राहता एकूण समाजाच्या हिताचा विचार प्राधान्येकरुन निर्णयाच्या वेळी केला जावा, हे आवश्यक आहे. म्हणून खुल्या अर्थव्यवस्थेतही सामाजिक नियंत्रणे काही बाबतीत तरी आवश्यक ठरतील. नव्या अर्थव्यवस्थेत समाजहितासाठी आवश्यक त्या किमान नियंत्रणासाठी नव्या संस्था शोधाव्या लागतील असे सोरोससारखे या शतकातील महत्वाचे आर्थिक विचारवंत आपल्याला बजावत आहेत. त्याकडेही लक्ष दिले पाहिजे.

- **मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी यंत्रणा**

बहुतेक मानवाधिकारांचा आपल्या घटनेतील मूलभूत अधिकारात प्रत्यक्षपणे किंवा राज्यांच्या मार्गदर्शक तत्वांच्याद्वारे अप्रत्यक्षपणे समावेश झालेला आहे. त्यामुळे मानवाधिकारांच्या भंगाबद्दल दाद मागण्यासाठी दोन प्रकारची व्यासपीठे उपलब्ध आहेत. एक म्हणजे मूलभूत अधिकारांच्या भंगाबद्दल सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयात दाद मागता येते. दुसरे व्यासपीठ म्हणजे भारताने केलेल्या १९९३ च्या मानवाधिकार संरक्षण कायद्याखाली स्थापन झालेले केंद्रीय व राज्यांचे मानवाधिकार आयोग.

- **न्यायालये**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ अन्वये मूलभूत अधिकारांच्या भंगाबद्दलची तक्रार सर्वोच्च न्यायालयाकडे करता येते. पाच प्रकारचे न्यायलेख (रिटस) सर्वोच्च न्यायालय जारी करु शकते. कलम २२६ अन्वये हेच पाच विशेष आदेश उच्च न्यायालयालाही जारी करता येतात.

### (१) बंदी प्रात्यक्षिकरण न्यायलेख (Habeas Corpus)

कोणत्याही व्यक्तीस सरकारी अधिकाऱ्यांने किंवा अन्य कोणा व्यक्तीने बेकायदेशीररित्या डांबून ठेवले आहे अशी तक्रार त्या व्यक्तीच्या वतीने सर्वोच्च अगर उच्च न्यायालयाकडे अर्ज करून केल्यास न्यायालय अशा बंदिस्तास आपल्यासमोर हजर करावे असा आदेश देते व ही बंदी बेकायदेशीर आहे असे चौकटीत आढळल्यास त्याच्या मुक्ततेचा हुकूम देते.

### (२) परमादेश न्यायलेख (Mandamus)

एखादा सार्वजनिक सेवेतील अधिकारी आपले कर्तव्य करत नसेल व त्यामुळे एखाद्या नागरिकास त्याला मिळावयाचा अधिकार, गोष्ट किंवा सेवा मिळत नसेल तर अशावेळी शासकीय अधिकाऱ्यास आपले कर्तव्य करण्याचा आदेश न्यायालय देऊ शकते. उदाहरणार्थ, एखाद्या गावात एखाद्या रोगाची गंभीर साथ पसरली असेल व आरोग्य खाते कोणतीही उपाययोजना करीत नसेल तर सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयास त्या खात्यातील अधिकाऱ्यास आपले कर्तव्य करण्याचा निर्देश देता येतो.

### (३) प्रतिषेध न्यायलेख (Prohibition)

एखाद्या कनिष्ठ न्यायालयासमोर, न्यायधिकारणासमोर अगर चौकशी अधिकाऱ्यासमोर एखाद्या प्रकरणाची सुनावणी चालू असेल व अशी सुनावणी ऐकण्याचा त्या न्यायालयास किंवा अधिकाऱ्यास अधिकार नसेल किंवा अन्य कारणांनी ही सुनावणी तेथे होणे योग्य नसेल तर पुढील चौकशीस बंदी करावी असा आदेश सर्वोच्च किंवा उच्च न्यायालये देऊ शकतात.

### (४) अधिकारपृच्छा न्यायलेख (Quo - warranto)

एखादी व्यक्ती कोणत्याही शासकीय पदावर किंवा लोकसेवक म्हणून काम करीत असले, परंतु हे पद धारण करण्याचा त्या व्यक्तीस अधिकार नसेल, त्या व्यक्तीची निवड अगर नेमणूक कायदेशीर नसेल तर या पदावर काम करण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे अशी विचारणा करणारा न्यायलेख सर्वोच्च व उच्च न्यायालयास जारी करता येतो.

### (५) उत्प्रेषण न्यायलेख (Cretiorari)

कोणत्याही कनिष्ठ न्यायालयाने अगर न्यायाधिकरणाने एखाद्या प्रकरणात दिलेला निकाल जर त्याच्या अधिकारकक्षेच्या बाहेर असेल किंवा नैसर्गिक न्यायतत्वांचा भंग करुन दिला असेल तर अशा

निर्णयाचे पुनविलोकन करुन तो निकाल फिरवण्याचा अगर दुरुस्त करण्याचा उच्च न्यायालयास अधिकार आहे.

सर्वोच्च व उच्च न्यायालयासमोर येणाऱ्या प्रकरणात अनेकवेळा मानवाधिकारांचे प्रश्नही गुंतलेले असतात. पोलिसांनी विनाकारण डांबून ठेवलेल्या व्यक्तीची सुटका, पोलिसांच्या ताब्यात असताना बेपत्ता झालेल्या व्यक्तीचे प्रकरण, वर्षानुवर्षे तुरुंगात खितपत पडूनही खटलेच सुनावणीसाठी न निघालेल्या आरोपींची प्रकरणे, चौकशीसाठी करण्यात आलेला निरपराधांचा छळ, मजूर आणि बालगुन्हेगार यांचे होणारे शोषण, वेतनाच्या बाबतीत स्त्रियांना दिली जाणारी असमान वागणूक, सार्वजनिक आरोग्याची हेडसांड, चरितार्थाचे साधन अचानक हिरावून घेणारे शासकीय निर्णय, शहरात वाढणारे प्रदूषण व त्यामुळे जीवनाला आवश्यक असणाऱ्या शुध्द हवेचा अभाव, अविचाराने होणारी जंगलतोड व त्यामुळे उद्ध्वस्त होणारे आदिवासींचे जीवन अशा अनेक प्रकरणांत सर्वोच्च व उच्च न्यायालयांची लक्ष घातले व व्यक्तिगत किंवा समुदायाच्या मानवाधिकारांचे रक्षण केले आहे. मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयांच्या न्यायलेख जारी करण्याच्या अधिकारांचा उपयोग होऊ शकतो. शिवाय जेथे एखाद्या मानवाधिकारांचा भंग हा फौजदारी कायद्याखाली गुन्हा आहे तेथे कनिष्ठ न्यायालयेही गुन्हेगारास शिक्षा करु शकतात.

● **मानवाधिकार आयोग**

भारतीय संसदेने मानवाधिकार संरक्षण कायदा १९७३ मध्ये संमत केला. या कायद्याप्रमाणे एक राष्ट्रीय मानवाधिकार आयोग स्थापन करण्यात आलेला आहे. मानवाधिकार आयोगात एकूण पाच पूर्णवेळ सदस्य असतात. त्यातील एक आयोगाचा अध्यक्ष असतो. आयोगाचा अध्यक्ष सर्वोच्च न्यायालयाचा निवृत्त मुख्य न्यायाधिश असतो. इतर चार पूर्णवेळ सभासदांत सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त व उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश यांचा समोवश असतो. राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष, राष्ट्रीय अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगाचे अध्यक्ष, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा हे आयोगाचे पदसिध्द सभासद असतात. याशिवाय भारतीय नागरी सेवेतील एक निवृत्त अधिकारी आयोगाचा चिटणीस व भारतीय पोलीस सेवेतील एक निवृत्त अधिकारी आयोगाचा मुख्य चौकशी अधिकारी असतो. आयोगाच्या कामकाजाचे वार्षिक अहवाल संसदेला सादर होतात. गेल्या सात वर्षात अनेक महत्वाच्या प्रकरणांत आयोगाने चौकशी करुन मानवाधिकारांच्या रक्षणासाठी महत्वाचे काम केले आहे.

## स्वयं-अध्ययन प्रश्न - ३

● **योग्य पर्याय निवडा.**

१. १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्काचे घोषणापत्र यूनोच्या आमसभेने ................. येथे जाहिर केले.

*(अ) अमेरिका* *(ब) बर्लिन* *(क) जपान* *(ड) पॅरिस.*

२. मानवी हक्काच्या घोषणापत्रात एकूण ................ कलमे आहेत.

*(अ) १५* *(ब) २५* *(क) ३०* *(ड) २८.*

३. मानवी हक्काच्या घोषणापत्रात ............... कलमात प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा अधिकार दिला आहे.

*(अ) कलम ५* *(ब) कलम ३* *(क) कलम १५* *(ड) यापैकी नाही.*

४. १९८५ साली ................ परिषदेने गुलामगिरीची प्रथा बेकायदेशीर ठरविली.

*(अ) बर्लिन* *(ब) पॅरिस* *(क) रोम* *(ड) यापैकी नाही.*

५. मानवी हक्काच्या घोषणापत्रात ................ कलमात समतेचा अधिकार दिला आहे.

*(अ) कलम ११* *(ब) कलम १७* *(क) कलम २३* *(ड) कलम १.*

## ३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

* **विज्ञान –** निरीक्षण, प्रयोग व विगमन यांच्याद्वारे मिळविलेले निसर्गातील घडामोडीचे सुसूत्र आणि पध्दतीशीर ज्ञान म्हणजे विज्ञान होय.
* **तंत्रज्ञान –** विज्ञानाचा व्यवहारात केलेला वापर म्हणजे तंत्रज्ञान होय.

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

१. *(क) लॅटिन.*

२. *(अ) कणाद.*

३. *(ड) अल्बर्ट आइन्स्टाइन.*

४. *(क) अमेरिका.*

५. *(अ) अणुबॉम्ब.*

### स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

१. *(अ) मार्कोनी.*

२. *(ड) जॉन बेअर्ड.*

३. *(अ) स्फुटनिक.*

४. *(अ) मार्क.*

५. *(अ) व्हायरस.*

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे**

  १. *(ड) पॅरिस.*

  २. *(क) ३०.*

  ३. *(ब) कलम ३.*

  ४. *(अ) बर्लिन.*

  ५. *(ड) कलम १.*

## ३.५ सारांश

विसावे शतक हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. या शतकात विज्ञानाच्या अनेक शाखात नवनवीन शोध लागले. या ज्ञानांच्या मदतीने तंत्रज्ञानामध्ये आमूलाग्र बदल घडून आले. या बदलांनी संपूर्ण मानवी जीवन व्यापले. अणुच्या शोधाने जगभरात अनेक उलथापालथ घडविल्या. अणुशक्ती संपन्न देशांनी इतर देशांवर मक्तेदारी निर्माण करण्याचा घाट घातला. अमेरिकेने जपानवरील केलेल्या अण्वस्त्र हल्ल्याने संपूर्ण जग हादरले. अण्वस्त्र संपन्न देश घडविण्याच्या स्पर्धेत संपूर्ण मानवी जीवनच धोक्यात आले आहे, त्यामुळे जगभरातून अण्वस्त्रप्रसार बंदीची मागणी वेग घेत आहे.

टेलिफोन, रेडिओ, टेलिव्हिजन (T.V.) उपग्रह या तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे संदेशाचे वहन जलद गतीने झाले. संगणक, इंटरनेट, मोबाईल आणि उपग्रह यांच्या हातमिळविणीमुळे संदेशवहनात अभूतपूर्व क्रांती घडून आली. रोजगाराची नवीन दालने खुली झाली. जग एक वैश्विक खेडे बनले. परंतु स्मार्टफोन, वॉटस्अप, फेसबुक, इंटरनेट, चॅटींग, प्रोफाईलपीक, स्टेट्स लाईक, कमेंटस् या 'आभासीवलया भोवती' अनेकजण गुरफटले, त्यामुळे संवाद क्रांतीच्या युगातच वास्तवातील संवाद हरवत चालल्याचे चित्र आहे. व्यक्ती अधिकाधिक आत्मकेंद्री होताना दिसत आहे.

अण्वस्त्रांच्या मनमानी वापरामुळे लाखो लोकांना आपले जीव गमवावे लागले. त्यामुळे युनोने मानवाला सन्मानाने जगता यावे याकरिता 'मानवी हक्कांचे घोषणापत्र' जारी केले. प्रत्येक देशाला मानवी अधिकारांचे पालन करणे बंधनकारक झाले. मानवी हक्कांमुळे व्यक्तीची सुरक्षितता व प्रगतीसाठी आशादायी चित्र निर्माण झाले. विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवाच्या भौतिक जीवनात फार मोठे बदल घडून आले असले तरी त्याची मनोवृत्ती आणि विचारपध्दती यामध्ये मात्र अपेक्षित परिवर्तन झालेले दिसत नाही.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

- **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

  १. विज्ञान व तंत्रज्ञान म्हणजे काय ते सांगून दोन्हीतील फरक स्पष्ट करा.

२. अण्विक शस्त्रसामुग्री आणि सामूहिक संहाराचा आढावा घ्या.

३. समतेच्या अधिकाराचा आढावा घ्या.

४. मानवाच्या जगण्याच्या अधिकाराची व्यापकता स्पष्ट करा.

५. स्वातंत्र्य आणि विकास यांच्या संबंधातील डॉ. अमर्त्य सेन यांचे विचार स्पष्ट करा.

६. विसावे शतक प्रगतीचे शतक होते काय? टीकात्मक विवेचन करा.

७. संदेश वहनातील प्रगतीचा आढावा घ्या.

- **टीपा लिहा.**

१. विज्ञान व तंत्रज्ञानातील फरक.

२. अण्वस्त्रविरोधी आंदोलने.

३. अण्वस्त्रप्रसार बंदी करार.

४. संदेशवहनातील प्रगती.

५. माहिती तंत्रज्ञान.

६. मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी यंत्रणा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१ गेरी व हाईड, अणुशक्ती : आज आणि उद्या (अनु. जिज्ञासू).

२. रॉस फ्रॅंक, विज्ञानाचे नवे विश्व (अनु. चौबळ ज.स.).

३. शिकारपूर दीपक व मराठे उज्वला आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या विश्वात.

४. Davies M, An Outline of the Development of Science.

५. Sneh Mahajan, Issued in Twentieth- Century World History, Macmillan, 2009.

६. Walter G. Moss, An Age of Progress? Clashing Twentieth- Century Global Forces, Anthem Press, 2008.


❋ ❋ ❋

घटक-४

# शीतयुध्दाचा शेवट

---

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ समाजवादी राष्ट्रांच्या संघाचे विभाजन : पूर्व युरोप, जर्मनी

४.२.१.१ समाजवाद-अर्थ आणि संकल्पना

४.२.१.२ समाजवादी राष्ट्रांचा संघ

४.२.१.३ पूर्व युरोप

४.२.१.४ जर्मनी

४.२.१.५ समाजवादी राष्ट्रांच्या संघाचे विभाजन-कारणे, परिणाम

४.२.२ राजकीय स्थितीतील बदल (द्विध्रुवीय ते एकध्रुवीय जागतिक पद्धत)

४.२.२.१ शीतयुध्दानंतर जागतिक राजकारणात झालेला बदल

४.२.२.२ शीतयुध्दानंतर रशियाचे कमी झालेले तर अमेरिकेचे वाढलेले महत्त्व

४.२.२.३ जागतिक राजकारणात एकमेव महासत्ता म्हणून अमेरिकेचा उदय

४.२.३ जागतिकीकरण : अर्थ, स्वरूप आणि मानवी जीवनावरील परिणाम

४.२.३.१ जागतिकीकरण : अर्थ आणि संकल्पना

४.२.३.२ जागतिकीकरण : स्वरूप

४.२.३.३ जागतिकीकरण : मानवी जीवनावरील परिणाम

४.३ सारांश

४.४ शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्‌दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१. समाजवादाची संकल्पना स्पष्ट करून ती समजून घेता येईल.

२. पूर्व युरोपातील समाजवादाच्या प्रभावाखालील राष्ट्रांच्या गटाचे/संघाचे स्वरूप अभ्यासता येईल.

३. पूर्व युरोपातील समाजवादी राष्ट्रगटाच्या विघटनाची कारणे सांगता येतील.

४. पूर्व युरोपातील राष्ट्रगटाच्या विघटनाची प्रक्रिया व परिणाम स्पष्ट करता येईल.

५. शीतयुध्दानंतर जर्मनीवरील समाजवादाचा प्रभाव विशद करता येईल.

६. जर्मनीतील समाजवादाचे विघटन सांगता येईल.

७. शीतयुध्दानंतर जागतिक राजकारणामध्ये झालेला बदल अभ्यासता येईल.

८. शीतयुध्दानंतर रशिया व अमेरिकेचे वाढलेले महत्त्व सांगता येईल.

९. जागतिक राजकारणात रशियाची कमी झालेली व अमेरिकेची वाढलेली सत्ता व त्याचे महत्त्व समजून घेता येईल.

१०. जागतिक राजकारणात एकमेव महासत्ता म्हणून अमेरिकेचा उदय कसा झाला याची चर्चा करता येईल.

११. जागतिकीकरण अर्थ आणि संकल्पना स्पष्ट करता येईल.

१२. जागतिकीकरणाचे स्वरूप समजून घेता येईल.

१३. जातिकीकरणाचे मानवी जीवनावरील परिणाम विशद करता येतील.

## ४.१ प्रास्ताविक

विसावे शतक हे जागतिक राजकारणात, अर्थकारणात आणि समाजकारणात मोठ्या प्रमाणात उलथापालथ करणारे ठरले. या शतकाचा पूर्वार्ध हा दोन अतिशय महत्त्वपूर्ण घटनांचा साक्षीदार झाला. त्या घटना म्हणजे १९१४-१९१८ चे पहिले महायुद्ध आणि १९३९-१९४५ या काळात चाललेले दुसरे महायुद्ध होय. या दोन्ही महायुद्धाने जगातील जवळजवळ सर्वच राष्ट्रांना हानी पोहोचलेली होती. पण पहिल्या महायुद्धाच्या तुलनेत दुसरे महायुद्ध हे सर्वच दृष्टीने विनाशकारी, विध्वंसक ठरले. सर्व राष्ट्रातील, सर्वच स्तरातील लोकांना त्याची झळ बसली. जागतिक राजकारण व अर्थव्यवस्था कोलमडली. दुसऱ्या महायुदधानंतर झालेली संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना, जागतिक शांततेसाठीचे वाढलेले महत्व, रशिया व अमेरिकेचा महासत्ता म्हणून उदय, शीतयुध्दाची सुरुवात, त्यातून सुरू झालेली सत्ता स्पर्धा, शीतयुध्दाचे परिणाम,

अलिप्ततावादी चळवळ, अमेरिका आणि आफ्रिकेतील सामाजिक न्यायासाठी झालेल्या चळवळी, अमेरिकेतील स्त्रीवादी चळवळी, विज्ञान आणि तंत्रज्ञान, आण्विक शस्त्रास्त्रे, संवाद आणि माहिती तंत्रज्ञान आणि मानवी हक्क इ. सर्व मुद्दयांचा अभ्यास आपण मागील प्रकरणांमध्ये केलेला आहे. या मुद्द्यांच्या अभ्यासानंतर आपणास दुसऱ्या महायुद्धानंतर आणि शीतयुध्द काळात आर्थिक व लष्करी सामर्थ्य वाढविण्यासाठी प्रत्येक राष्ट्राने केलेल्या प्रगतीचा अभ्यास करता आला. तर 'शीतयुद्धाचा शेवट' या प्रकरणात आपण समाजवादाची संकल्पना, पूर्व युरोपातील समाजवादाच्या प्रभावाखालील राष्ट्रे, त्यांचा गट/संघ, पूर्व युरोपातील समाजवादी राष्ट्र गटाच्या विघटनाची कारणे, स्वरूप/प्रक्रिया व परिणाम, शीतयुद्ध काळात जर्मनीवरील समाजवादाचा प्रभाव, जर्मनीतील समाजवादाचे विघटन, शीतयुद्धानंतर जागतिक राजकारणात झालेला बदल, रशिया व अमेरिकेचा महासत्ता म्हणून उदय, त्यानंतर रशियाचे कमी झालेले महत्त्व, परिणामी जागतिक राजकारणात अमेरिकेचा एकमेव महासत्ता म्हणून झालेला उदय, जागतिकीकरणाचा अर्थ व संकल्पना, जागतिकीकरणाचे स्वरूप आणि त्याचे मानवी जमीनीवरील परिणाम इ. महत्त्वपूर्ण घटकांचा अभ्यास करणार आहोत. हा अभ्यास करत असताना प्रामुख्याने आपण १९५०-२००० मध्ये या घटकांच्यासंदर्भात झालेल्या बदलांचा आढावा घेणार आहोत.

थोडक्यात, या प्रकरणात आपण शीतयुद्धकाळ व शीतयुद्धांचा शेवट' हा मुद्दा मध्यवर्ती ठेवून शीतयुद्धोत्तर जागतिक राजकारणात झालेले बदल व त्याचे परिणाम सुसंगतपणे अभ्यासणार आहोत. त्यातही १९५०-२००० या काळात झालेल्या महत्त्वपूर्ण घडामोडींचा आढावा घेणे अपेक्षित आहे.

## ४.२ विषय विवेचन

## ४.२.१ समाजवादी राष्ट्रांच्या संघाचे विभाजन : पूर्व युरोप, जर्मनी (Dis-integrationof Socialist block - Eastern Europe, Germany)

### ४.२.१.१ अ) दुसरे महायुद्ध आणि जागतिक राजकारणातील परिणाम

संपूर्ण जगाला संहारक शस्त्रांच्या आधारे होरपळून टाकणाऱ्या दुसऱ्या विनाशकारी महायुद्धाचा शेवट १९४५ मध्ये झाला. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर लगेचच बड्या राष्ट्रांमध्ये परस्परांची शक्ती क्षीण करून परस्परांना संपविण्यासाठी जीवघेणी संहारक शस्त्रास्त्र स्पर्धा सुरू झाली. या महायुद्धामुळे सर्वात जास्त हानी ज्या देशाची झाली तो देश म्हणजे रशिया होय. त्याचबरोबर त्याला काही फायदेही झाले. ते म्हणजे (१) पहिल्या महायुद्धापूर्वी आणि महायुद्धानंतर रशियाने गमावलेले बरेचशे प्रदेश रशियाने दुसऱ्या महायुद्धानंतर मिळविले. २) रशियाला लॅटव्हिया, प.युक्रेन, कार्पेशो युक्रेन, लिशुआनिया, इस्टोनिया, बुकोविना, बेसारिबिया, पूर्व प्रशिया, कारेलो, फिनलंड (पेस्तानो), सखाईल व कुराईल बेटे इ. खूप मोठा प्रदेश मिळाला होता. ३) रशियाच्या पश्चिम सीमेवर युगोस्लाव्हिया, झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, रूपानिया, बल्गेरिया, पोलंड व पूर्व जर्मनी या ठिकाणी प्रस्थापित झालेली समाजवादी सरकारे हा रशियाचा एक मोठा लाभ होता.

रशियाला एवढ्या मोठ्या प्रवेश प्रक्रिया लाभ झाला असला तरीसुध्दा झारकालीन रशियापेक्षा सुमारे २७००० चौ.मैल कमी प्रदेश सोव्हिएत संघाच्या अधिपत्याखाली होता.

१९४५-४७ हा दुसऱ्या महायुद्धानंतरचा दोन वर्षांचा काल म्हणजे जगाची विभागणी दोन गटांमध्ये करणारा व त्यातून निर्माण झालेल्या शीतयुध्दाचा साक्षीदार ठरला. याच काळात, अमेरिका व रशिया या बलाढ्य व आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण अशा राष्ट्रांच्या नेतृत्वाखाली परस्परविरोधी वैचारिक भूमिका असलेले भांडवली व समाजवादी असे दोन गट निर्माण झाले. हे दोन्ही गट आपापल्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठी व एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी एकमेकांच्या विरोधात उभे राहिले. या दोन गटातील शस्त्रास्त्रविरहीत सत्तासंघर्षालाच जागतिक राजकारणात 'शीतयुद्ध' असे म्हटले गेले.

## ४.२.१.२ ब) शीतयुद्ध आणि जागतिक राजकारणातील बदल

जागतिक राजकारणामध्ये १९४५ मध्ये दुसरे महायुद्ध संपते न संपते तोच अमेरिका व रशियामध्ये शीतयुद्धाला प्रारंभ झाला. त्यामुळे अण्वस्त्रनिर्मिती, जीवघेणी शस्त्रास्त्र स्पर्धा, निर्वसाहतीकरण व युरोपीय साम्राज्यवादाचा शेवट इ. महत्त्वूपर्ण गोष्टी घडत राहिल्या. त्याचा जागतिक राजकारणावर प्रचंड परिणाम झाला. लॅटिन अमेरिका, आफ्रिका व आशियामध्ये निर्वसाहतीकरण झालेच पण शीतयुध्दामुळेही काही ठिकाणी संघर्ष झाले. अमेरिका-रशिया यांच्यातील अण्वस्त्र स्पर्धा तीव्र झाली. त्यासंदर्भात शीतयुद्ध काळातील प्रत्येक टप्प्यामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वपूर्ण बदल होत गेले. युरोपीय विभागणी दोन गटांमध्ये झाली. त्यातूनच अमेरिका व इंग्लंडने पश्चिम युरोपातील देशांना तर रशियाने पूर्व युरोपीय देशांना जर्मनीपासून मुक्त केले. पण त्यानंतर रशियाने पूर्व युरोपीय देशातील आपले सैन्य काढून न घेता पूर्व व पश्चिम युरोपच्या सरहद्दीवर तैनात केले. यावरून स्पष्ट होते की, कुठेतरी रशियाच्या मनात अमेरिकेच्या शस्त्रास्त्रांची व हल्ल्याची भीती होती. जमिनीचेही विभाजन करण्यात आले. अमेरिका व इंग्लंडच्या लोकशाही व्यवस्थेखाली पश्चिम जर्मनी तर साम्यवादी (समाजवादी) व्यवस्थेखाली पूर्व जर्मनीचा भाग गेला. बर्लिन शहराचेही विभाजन झाले. अमेरिका-इंग्लंडकडे पश्चिम भाग तर रशियाकडे पूर्व बर्लिन गेला. या सर्व घटनांमुळे शीतयुध्दकाळात आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वाचे बदल घडून आले.

## ४.२.१.३ क) शीतयुद्धकाळातील महत्त्वाचे टप्पे आणि रशिया व पूर्व युरोपातील साम्यवाद (समाजवाद)

येथे शीतयुद्ध काळातील महत्त्वाचे टप्पे आणि त्या दरम्यान जागतिक राजकारणात आणि विशेषत: अमेरिका व रशिया यांच्या भूमिकांमध्ये झालेला बदल, साम्यवाद (समाजवाद) म्हणजे काय? आणि रशियाच्या नेतृत्वाखाली पूर्व युरोप व पूर्व जर्मनीमध्ये पसरलेला समाजवाद, अमेरिकेने समाजवादाला रोखण्यासाठी केलेले प्रयत्न या मुद्द्यांचा अभ्यास करणार आहोत.

सर्वप्रथम आपण साम्यवाद/समाजवाद म्हणजे काय हे समजून घेवू.

## ❑ साम्यवाद (समाजवाद) :-

इ.स. १८२७ मध्ये रॉबर्ट ओवेन याने 'कोऑपरेटिव्ह मॅगेझिन'मध्ये 'समाजवाद' या शब्दाचा सर्वप्रथम वापर केला. समाजवादात विषमता नष्ट करून समता प्रस्थापित करण्यावर भर दिला जातो.

साम्यवाद व समाजवाद या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मार्क्स यांचे विचार जसेच्या तसे प्रत्यक्षात आणणे म्हणजे 'साम्यवाद' होय व त्यास व्यावहारिक रूप देणे म्हणजे 'समाजवाद' होय. समाजवादात उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीची असतात. तसेच यामध्ये व्यक्तीलाही आपल्या गुणांची जोपासना करण्याची संधी असते.

पूर्व युरोपातील साम्यवादी राष्ट्रांचा संघ व त्याचे विघटन हे अभ्यासण्यापूर्वी आपण रशियातील साम्यवादाचा उदय व अस्त थोडक्यात अभ्यासणार आहोत.

## ❑ रशियातील साम्यवादाचा उदय आणि अस्त

१८४८ मध्ये कार्ल मार्क्स यांनी 'कम्युनिस्ट पक्षाच्या जाहीरनामा' (Communist Manifesto) सांगितला. त्यामध्ये त्यांनी कष्टकरी वर्गाला भांडवलशाहीच्या अधपतनाची आणि समाजवादी क्रांतीच्या विजयाची अपरिहार्यता शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध करून दाखवली. तसेच कष्टकरी/कामगार वर्गाच्या आंदोलनातील कर्तव्ये व उद्दिष्ट्ये आखून दिली. साम्यवादी तत्त्वज्ञानाचा आधार घेवून १९१७ मध्ये रशियात पहिली क्रांती झाली. ही क्रांती यशस्वी झाल्यानंतर रशियाची सत्तासूत्रे लेनिन यांच्या ताब्यात गेली. लेनिन यांच्या मते, नवे राज्य केवळ रशियाचे नाही तर त्याच्या सभोवताली असलेल्या अनेक लहान-मोठ्या प्रदेशांचे आहे. या सर्वच प्रांतांना पहिल्या महायुद्धाची मोठी झळ पोचली होती. त्यामुळे या सर्वांचे एक बलशाली राज्य उभे करण्याचे स्वप्न लेनीनसमोर होते. त्यातूनच लेनीन यांनी क्रांतिपूर्वकाळात रशियन साम्राज्यात समाविष्ट असलेल्या सर्व राज्यांना एका छत्राखाली आणले. परिणामी, ३० डिसेंबर १९२२ रोजी एक प्रशासन व्यवस्था म्हणून सोव्हिएत युनियनची स्थापना झाली. त्यानंतर स्टॅलिन सत्तेवर आल्यानंतर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात १९२६ साली नवी राज्यघटना जाहीर केली. त्यानुसार अधिकृतपणे 'युनियन ऑफ सोव्हिएत सोशॅलिस्ट रिपब्लिक' (U.S.S.R.) या नावाने रशियाचे सोव्हिएत प्रजासत्ताक संघराज्य असित्वात आले. असा बलाढ्य रशिया जगातील एक प्रभावी साम्यवादी राष्ट्र निर्माण करण्याच्या ध्येयाने स्टॅलिन झपाटलेले होते. त्यांच्या हुकूमशाहीने साम्यवादी पक्षातील नेते आणि जनता खचून गेली होती. त्यामुळे स्टॅलिन आणि साम्यवादाविरोधी त्यांच्यात असंतोष निर्माण झाला. परंतु त्यांच्या मृत्युनंतर म्हणजे १९५३ नंतर साम्यवादी राजवटीविरुध्दचा असंतोष हळूहळू बाहेर पडू लागला. त्यातूनच रशियाचे विघटन घडून आले. पण स्टॅलिन यांच्या हुकूमशाही राजवटीशिवाय इतरही अनेक कारणे सोव्हिएत युनियनच्या विघटनास कारणीभूत होती. जसे लोकांचा साम्यवादावरील अविश्वास, अपयशी अंतर्गत धोरण, लोकांच्या मूलभूत स्वातंत्र्यावर घातलेली बंधने, जबरदस्तीने केलेली सोव्हिएत संघराज्याची निर्मिती, पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटींचे विघटन/शेवट आणि गोर्बाचेव्ह यांचे 'पुनर्रचना आणि खुलेपणा' यांचे धोरण इ. होत.

सोव्हिएत संघाच्या स्थापनेपूर्वी झारचे रशियन साम्राज्य हे प्रत्यक्षरित्या रशियाबाहेर पूर्व युरोपातील बाल्कन राष्ट्रे, अतिपूर्वेस सैबेरियाच्या दक्षिण भागात मंगोलियात, काळ्या समुद्राजवळ क्रिमिया इ. भागात पसरले हाते. वास्तविक या संघराज्यात समाविष्ट केली गेलेली राज्ये पूर्वी स्वतंत्र होती.

१) बाल्टिक राष्ट्रे : पहिल्या महायुद्धानंतरच्या पॅरिस तहानुसार नवीन राष्ट्रे म्हणून निर्माण करण्यात आली होती. पण रशियन राज्यक्रांतीनंतर लष्करी दबावाचा वापर करून त्यांना सोव्हिएत संघराज्यात सामील करून घेतले. ही राष्ट्रे निर्माण भाषिक होती व त्यांची संस्कृती फिनलंडची होती.

२) रशियन लष्कराच्या दबावामुळेच उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान व ताझिकीस्तान सोव्हिएत संघराज्यात होती. या राज्यांच्या मागासलेपणाचा फायदा घेवून रशियाकडून त्यांच्यावर दबावतंत्राचा वापर केला गेला होता.

३) रशिया शेजारील युक्रेन आणि बायलोरशिया (बैलारूर्स) येथे बहुसंख्य लोक हे रशियन भाषिक व रशियन वंशाचे होते. पुढे खरे पाहता केवळ याच राज्यांना सोव्हिएत संघराज्यात सामील होणे शक्य होते. परंतु अतिबलाढ्य रशिया निर्माण करण्याच्या अट्टाहासामुळे उत्तर १४ लहान-मोठी राज्येही त्यामध्ये बळजबरीने सामील करून घेण्यात आली.

४) रशियाच्या दक्षिणेकडील भागातील उझवेकिस्तान, तुर्कमेनिस्तान, ताझिकिस्तान, कझकिस्तान, आर्मेनिया व अझरबेजान या राज्यांमध्ये बहुसंख्य लोक हे इस्लामधर्मीय होते आणि त्यांना वंशही रशियन लोकांपेक्षा भिन्न होता.

५) जॉर्जिया व युक्रेन येथेही स्लाव्ह वंशीय लोक बहुसंख्य होते. याचाच अर्थ असा होतो की, सोव्हिएत संघातील एकूण १५ प्रदेशांना वंश, धर्म, भाषा, इतिहास व संस्कृती इ. बाबतीत कमालीची भिन्नता होती. केवळ आणि केवळ साम्यवादी हुकूमशाहीच्या लष्करी दबावामुळे राजकीयदृष्ट्या या राज्यांना एकत्रित बांधले गेले होते. पण या हुकूमशाहीचा पगडा थोडासा कमी होताच या १५ राज्यांतील असंतोष उफाळून आला आणि सोव्हिएत संघराज्याचे विघटन (अस्त) घडून आले.

रशियातील साम्यवादाच्या विघटनास 'पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटींचा शेवट' हे एक महत्त्वाचे कारण होते. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व रशिया या दोन जागतिक महासत्ता म्हणून उदयास आल्या. परिणामी जगाची विभागणी दोन भागात झाली. रशियाने पूर्व युरोप, पूर्व जर्मनी व पूर्व बर्लिन आपल्या ताब्यात घेतले. पूर्व युरोपातील युगोस्लाव्हिया, झेकोस्लोव्हाकिया, पोलंड, हंगेरी, रूमानिया व बल्गेरिया येथे साम्यवादी सरकारे स्थापन करून त्यांना आपल्या छत्राखाली आणले. त्यांच्याशी वार्सा लष्करी केला. या करारानुसार रशियन लष्करास केव्हाही या सर्व प्रदेशातील अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करता येणार होता. तेथील सत्ताधारी रशियाच्या तालावर नाचत असले तरी प्रत्यक्ष जनतेला ही साम्यवादी व्यवस्था नको होती.

त्यामुळे काही ठिकाणी बंडे झाली पण रशियाने ती मोडून काढली. पुढे युगोस्लाव्हिया मुक्त झाले. पण इतर राष्ट्रे अजूनही रशियन वर्चस्वाखाली होती. पण १९८० च्या दशकात शीतयुध्दाची शेवट होताच इतर राष्ट्रांनीही साम्यवादी शासनव्यवस्था धुडकावून लावली आणि ती स्वतंत्र झाली. यावेळी पूर्व युरोपात चाललेल्या या बंडांना/चळवळींना मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी अजिबात विरोध केला नाही किंवा त्यामध्ये हस्तक्षेपही केला नाही. परिणामी पूर्व युरोपमधील साम्यवादी शासनव्यवस्थेचा अस्त घडून आला. तथापि, त्यांच्यापासूनच प्रेरणा, स्फूर्ती घेवून सोव्हिएट संघातील जनतेने साम्यवादाविरोधात आवाज उठविला.

## ❑ शीतयुध्दाच्या विविध टप्प्यांमध्ये अमेरिका व रशियाने परस्परांना शह देण्यासाठी स्वीकारलेली भूमिका :-

१९४५ नंतर आणि विशेषत: १९५०-२००० या काळाचा विचार करता 'शीतयुद्ध' हा आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्त्वाचा टप्पा होता. त्याने जगातील प्रत्येक भागातील राष्ट्रांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे परिणाम घडूवन आणला. शीतयुद्धाचे एकूण पाच टप्पे मानण्यात येतात. या प्रत्येक टप्प्यांमध्ये अमेरिका व रशिया या दोन महासत्तानी आपआपल्या विचारसरणीच्या राष्ट्रांबरोबर लष्करी करार करून त्यांना आर्थिक व लष्करी मदत देवून आपली शक्ती वाढविण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान रशियाची भूमिका ही पूर्व युरोपातील सर्व साम्यवादी राष्ट्रांना सर्वतोपरी आर्थिक व लष्करी मदत देवून साम्यवादाचा प्रसार करणे अशी होती. तर अमेरिकेने आपल्या परराष्ट्र धोरणात महत्त्वाचे दोन घटक डोळ्यासमोर ठेवून वाटचाल केली. १) साम्यवाद व त्याचा प्रसार रोखणे. २) साम्यवादी राष्ट्रसंघाला वेढा घालणे.

आता आपण शीतयुध्दाच्या विविध टप्प्यांमध्ये जागतिक राजकारणात झालेले बदल पाहू.

## ❑ शीतयुद्धाचा पहिला टप्पा (१९४५-१९४९) :-

या टप्प्यामध्ये अमेरिकेने आपल्या लष्करी दबाव तंत्राने रशियातील साम्यवाद पूर्णपणे नष्ट करण्यासाठी मोर्चेबांधणी केली. यावेळी अमेरिकेची शक्ती जास्त होती. कारण केवळ याच देशाकडे ॲटम बॉम्ब होता. त्यामुळे या टप्प्यामध्ये अमेरिकेत साम्यवादाविरोधी वातावरणनिर्मिती होत होती. त्यातच भर म्हणजे ५ मार्च १९४६ रोजी विन्स्टन चर्चिल यांनी रशियाविरुध्द केलेले प्रक्षुब्ध भाषण. या भाषणात त्यांनी रशियाविरुध्द भूमिका घेवून अमेरिकेला सरळ-सरळ पाठिंबाच दिला होता. याच भाषणाचा परिणाम म्हणजे युरोपातील जवळजवळ सर्वच राष्ट्रांनी साम्यवादाविरोधी भूमिका घेतली. या टप्प्यामध्ये अमेरिकन सरकारने साम्यवादाचा प्रसार रोखण्यासाठी दोन महत्त्वाचा घोषणा केल्या.

### १. ट्रुमन सिद्धांत (Truman Doctrine) :-

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ट्रुमन यांनी आशियातील देशांना साम्यवादी राष्ट्रांच्या आर्थिक पकडीतून वाचविण्यासाठी ट्रुमन सिध्दांताची घोषणा केली. त्यानाच 'ट्रुमन यांनी जाहीर केलेले तत्व' म्हणजेच (Truman Doctrine) असे म्हटले जावू लागते. ही घोषणा १९४७ मध्ये करण्यात आली. या तत्वाद्वारे/ योजनेद्वारे अमेरिकेत जगातील कोणत्याही राष्ट्रामध्ये साम्यवादाचा प्रसार होवून तेथील लोकशाहीला

साम्यवादाचा विळखा पडू नये यासाठी आर्थिक मदत व शस्त्रसामर्थ्य यांच्या मदतीने तेथे हस्तक्षेप करता येणार होता.

## २. मार्शल योजना (Marshall Plan) :-

या योजनेमागील हेतूही आर्थिक मदत पुरवणे हाच होता. ही योजना मार्शल नावाच्या मंत्र्याने तयार केल्याने ती 'मार्शल योजना' नावाने प्रसिद्ध झाली. एखाद्या दुर्बल राष्ट्राला आर्थिक मदत देवून तेथे साम्यवादाचा प्रसार करण्यासाठी साम्यवादी राष्ट्रांनी प्रयत्न चालवले होते. ते रोखण्यासाठी ही मार्शल योजना होती. अमेरिकेने प्रथमत: ही योजना युरोपीयन राष्ट्रांसाठी असल्याचे घोषित केले. त्यानुसार युरोपातील एकूण १४ राष्ट्रांनी या योजनेअंतर्गत आर्थिक मदत घेतली. पण रशिया व त्याचे मित्रराष्ट्र यामध्ये नव्हते. कारण त्यामुळे आपले आर्थिक स्वातंत्र्य संपुष्टात येईल असे त्यांना वाटत होते. पण याचवेळी चीन व पाकिस्तानने 'चतु:सूत्री कार्यक्रम' या योजनेअंतर्गत अमेरिकेची आर्थिक मदत घेतली. यावरून आपण असे म्हणू शकतो की, यावेळी अमेरिका रशियापेक्षा वरचढ होता.

## ❑ शीतयुद्धाचा दुसरा टप्पा (१९४९-१९५२) :-

या दुसऱ्या टप्प्यामध्ये म्हणजेच एप्रिल १९४९ मध्ये घडलेली सर्वात महत्वाची घटना म्हणजे साम्यवादाचा प्रसार रोखण्यासाठी अमेरिकेने केलेला 'नाटो करार'. नाटो करार (North Atlantic Treaty) हा सरळसरळ रशियाविरुध्द केलेला करार होता. त्याचे वर्णन अॅन्टिकॉमिंनटर्न पॅक्ट असेही केले जाते. लोकशाही राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करणे हा त्यामागील हेतू होता. यामध्ये अमेरिकेसह एकूण १२ राष्ट्रे होती. तर १९५२ मध्ये ग्रीस व तुर्कस्तान त्यामध्ये समाविष्ट झाले. या टप्प्याचे वैशिष्ट्य म्हणजे आशियात साम्यवादी चीनचा उदय आणि कोरियातील अमेरिका व रशिया संघर्ष होय. त्यामुळे शीतयुद्ध तीव्र झाले. यावेळी अमेरिका व रशिया दोघांनीही एकमेकांचा प्रभाव कमी करण्यासाठी एकमेकांना प्रतिकार केल्याचे दिसते.

## ❑ शीतयुद्धाचा तिसरा टप्पा (१९५३-१९५७) :-

या काळातील महत्त्वाच्या घटना म्हणजे रशियाने अमेरिकेला आळा घालण्यासाठी केलेला अणुबॉम्बचा स्फोट, अमेरिकेने रशियाभोवती लष्करी तळ उभारून रशियाला वेढण्यासाठी केलेले प्रयत्न, अमेरिकेने ४३ राष्ट्रांशी केलेले संरक्षक करार, दक्षिण-पूर्व आशियातील साम्यवादाच्या प्रतिबंधासाठी केलेला आग्नेय-आशिया संरक्षक करार (SEATO-Sourth East Asia Treaty Organisation), मध्यपूर्व संरक्षक संघटना करार (MEDO-Middle East Defence Organisation), व्हिएटनाम युद्धातील अमेरिकेचा सहभाग इ. होत.

या सर्व घटनांना/करारांना प्रतिउत्तर म्हणून रशियाने सुद्धा पूर्व युरोपातील राष्ट्रांशी वॉर्सा करार (Warsaw Pact) या नावाखाली संरक्षण करार केला. यामध्ये १२ राष्ट्रे समाविष्ट होती. या टप्प्यामध्ये

अमेरिकेने हंगेरीत अयशस्वी प्रतिक्रांती घडवून आणली. तर पोस्टडेंन करारानुसार पूर्व व पश्चिम अशी दोन जर्मन राज्ये निर्माण झाली. यावेळी आंतरराष्ट्रीय शांतता निर्माण करण्यासाठी परस्परांमध्ये सहकार्य आवश्यक आहे अशी गरज निर्माण झाल्याने शीतयुद्धाची तीव्रता थोडी कमी झालेली दिसते.

## ❑ शीतयुद्धाचा चौथा टप्पा (१९५७-१९६२) :-

या काळात अमेरिका व रशियाने परस्पर सहकार्याचे तत्त्व मान्य केले. यावेळी क्रश्चेव्हच्या हाती रशियाची सत्ता होती. भांडवलशाही/लोकशाही युद्ध गरजेचे नाही हे तत्त्व मध्यवर्ती ठेवून क्रश्चेव्ह यांनी आपल्या परराष्ट्र धोरणात आमूलाग्र बदल केले. त्यामुळे शीतयुद्धाची तीव्रता कमी झाली. परिणामी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष आयसेनव्हॉवर व क्रुश्चेव्ह यांच्यात भेटी होवून चर्चा घडू लागल्या. या शांततेच्या वातावरणातच यु-टू (U-2) आणि क्युबाची अंतर्गत क्रांती यामुळे पुन्हा वातावरण बिघडले. या काळात अमेरिकेचे यु-टु हे हेरगिरी करणारे विमान रशियामध्ये २००० किलोमीटर आत गेले, त्यावेळी दोन्ही देश संतापले व परस्परांवर युद्धखोरीचे आरोप केले गेले. पण १९६० च्या अमेरिकन अध्यक्ष केनेडी व क्रश्चेव्ह यांच्या शिखर परिषदेत तो तणाव कमी करण्यात आला.

तसेच यावेळी क्युबामध्ये क्रांती होवून तेथे फ्रिडेल कॅस्ट्रो यांचे साम्यवादी सरकार सत्तेवर आले. क्युबाला रशियाने लष्करी मदत दिली. त्यामुळे अमेरिकेला धोका निर्माण झाला. परिणामी अमेरिका व रशियामध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. पण क्रश्चेवने अमेरिकेकडून क्युबावर आक्रमण होणार नाही' असे वचन घेतले आणि त्यामुळे वातावरण निवळले व महायुद्धाचा धोका टळला, व दोन्ही दोन्ही देशातील तणाव एकदमच कमी झाला.

## ❑ शीतयुद्धाचा पाचवा टप्पा (१९६२-१९७२) :-

या टप्प्यापर्यंत शीतयुद्धाची तीव्रता अतिशय कमी झालेली होती. त्यातच १९६२ मध्ये अणुचाचण्यांवर अंशत: बंदी घातली. या काळातील महत्वाच्या घटना म्हणजे १९६३ मध्ये राष्ट्राध्यक्ष केनेडीचा झालेला खुन १९६४ मध्ये क्रुश्चेव्हला सोडावे लागलेले पंतप्रधानपद. १९६३ मध्येच जिनेव्हा करारानुसार अमेरिका व रशिया यांच्यात 'हॉट लाईन' प्रस्थापित केली गेली. अडचणीच्या/संकटाच्या काळात परस्परांना तातडीने एकमेकांशी संपर्क साधता यावा हा त्यामागील हेतू होता.

याच टप्प्यामध्ये १९६८ मध्ये 'Non Prolifferation Treaty' हा तह होवून त्यानुसार ज्यांच्याजवळ अणु-शस्त्रास्त्रे नाहीत त्यांनी ती दुसऱ्या देशाकडून घेणे किंवा त्यावर नियंत्रण मिळवणे यावर बंदी घातली गेली. अमेरिका, रशिया व ग्रेट ब्रिटन यांनी असे जाहीर केले की अशा राष्ट्रांवर अणुशासत्राचा मारा झाल्यास ही राष्ट्रे त्यांच्या मदतीला जातील. व्हिएतनाम, जर्मनी याचे प्रश्न अजून तसेच होते. १९६८ मध्ये रशियाने झेकोस्लाव्हाकियात सैन्य घुसविले. १९७२ मध्ये राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी मास्कोला भेट देवून रशियाशी दोन करार केले. १) क्षेपणास्त्रांच्या मर्यादीत उपयोगाबद्दल २) अक्रमक शस्त्रांच्या मर्यादित उपयोगाबद्दल.

यावरून आपल्या असे लक्षात येथे की, या काळापर्यंत अमेरिका व रशिया यांच्यात परस्पर सहकार्य व सहअस्तित्वाला प्रारंभ झाला होता. यालाच देतात/शिथिलीकरण असेही म्हटले जाते. याच काळात जागतिक राजकारणात द्विध्रुवीकरण खऱ्या अर्थाने पूर्ण झाले होते. पण पुढे शीतयुदधाचे स्वरूप बदलत गेले आणि हा संघर्ष केवळ अमेरिका व रशिया यांच्यात न राहता, रशिया व चीन या साम्यवादी राष्ट्रांतही संघर्ष घडून झाला.

यानंतरच्या महत्त्वाच्या घटना म्हणजे, डिसेंबर १९७९ मध्ये अफगाणिस्थानात क्रांती घडून येवून तेथे साम्यवादी सरकार अस्तित्वात आले. त्यांना स्थिर करण्यासाठी सोव्हिएत युनियनने तेथे आपले लष्कर घुसविले. पुढे जवळजवळ एक दशकानंतर या सैन्याला तेथून माघार घ्यावी लागली. या काळात सोव्हिएत युनियनचे नेतृत्व लिओनिद ब्रेझनेव्ह यांच्याकडे राहिले तर १९८० पर्यंत अमेरिकेत निक्सन व कार्टर यांनी नेतृत्व केले. १९८० मध्ये रोनाल्ड रेगन हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होताच त्यांनी 'देतांत'चे धोरण नष्ट केले आणि संघर्षाचे धोरण स्वीकारले. १९८२ मध्ये ब्रेझनेव्ह यांचा मृत्यू झाला. मध्यंतरीच्या काळात आंद्रोपोव व चेर्नेको सत्तेवर होते. तर १९८५ मध्ये मिखाईल गोर्बाचेव्ह सोव्हिएत युनियनच्या सत्तेवर आले. त्यानंतर पुन्हा जागतिक राजकारणात महत्त्वाचे बदल झालेले दिसतात. त्यांच्या 'ग्लासनोस्त व पेरेस्रोइका' या धोरणांमध्ये काही काळातच सोव्हिएत युनियनचा शेवट केला. त्यांच्या 'ग्लासनोस्त' या धोरणाचा परिणाम म्हणजे १९९० च्या दरम्यान पूर्व युरोपातील देशांमध्ये सोव्हिएत प्रभावापासून मुक्त होण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. स्वतंत्र होण्यासाठी चळवळी सुरू झाल्या. पूर्व युरोपात जोपर्यंत ब्रेझनेव्ह प्रणाली होती, तोपर्यंत तेथे साम्यवादाची पकड घट्ट होती. मात्र गोर्बाचेव्हच्या काळात पूर्व युरोपातील राजवटी मुक्त होवू लागल्याने त्या धडाधड कोसळल्या. १९८९ मध्ये जर्मनीतील लोकांनी एकत्र येवून बर्लिन भिंत तोडली व जर्मनीचे एकीकरण घडवून आणले. या काळात गोर्बाचेव्ह हे शांतताप्रेमी तर जॉर्ज बुश हे बंडखोर/युद्धखोर अशा प्रतिमा निर्माण झाल्या. १९९० मध्ये रशियाने अफगाणिस्तानातील सैन्यही माघारी घेतले. तर १९९० च्या पॅरिस करारानुसार पारंपारिक पद्धतीचे सैन्यही परत घेण्यात आले. त्यातूनच शीतयुद्धाचा शेवट घडून आला. पण अण्वस्त्रांची निर्मिती व वापरावर नियंत्रणे असली तरी पूर्णपणे शस्त्रास्त्रबंदी नसल्याने अण्वस्त्रांचा/क्षेपणास्त्रांचा धोका आहे तसाच राहणार होता.

थोडक्यात गोर्बाचेव्हच्या 'पेरेस्त्राइका व ग्लासनोस्त' तत्वांचा परिणाम म्हणजे सोव्हिएत युनियनचे आणि पूर्व युरोपातील साम्यवादी संघाचे विघटन होय.

## ४.२.१.४ ड) पूर्व युरोपमधील साम्यवादी संघाच्या विघटनाची कारणे

आपण याआधीच्या मुद्द्यांमध्ये सोव्हिएत युनियनचा उदय व अस्त, पूर्व युरोपातील साम्यवादी संघाची निर्मिती, सोव्हिएत युनियनची नेतृत्वे, त्यांच्या धोरणांचा जागनिक राजकारणावरील परिणाम इ. गोष्टी अभ्यासल्या. त्यावरून आपण असे म्हणू शकतो की, सोव्हिएत युनियनमध्ये घडणाऱ्या घटनांचा प्रयत्क्ष/अप्रत्यक्ष परिणाम पूर्व युरोपात दिसत होता. बर्लिन भिंत नष्ट केली गेली, त्याचाही परिणाम तेथे दिसून

आला. पण या सर्व पूर्व युरोपात स्वतंत्र होण्यासाठी चळवळी सुरू असताना एकंदरीत पाहता सोव्हिएत युनियनने तेथे हस्तक्षेप न करण्यामागेही कारणे आहेत. एकंदरीत पाहता सोव्हिएत युनियनमधील साम्यवादाचा काळ हा ७० वर्षांचा तर पूर्व युरोपात तो फक्त ४० वर्षांचा होता. युगोस्लाव्हिया वगळता इतर सर्व पूर्व युरोपियन राष्ट्रांवर तो रशियाकडून लादला गेला हातो. तेथील वंश, भाषा, संस्कृती भिन्न होती. म्हणूनच त्यांनी साम्यवादाला विरोध करण्यामागे खूप मोठी कारणमीमांसा दिसून येते.

## १. पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटी ह्या कृत्रिम होत्या :-

दुसऱ्या महायुदधानंतर पूर्व युरोपात ज्या साम्यवादी राजवटी निर्माण झाल्या, ती सर्व राष्ट्रे पहिल्या महायुद्धानंतरच्या पॅरिस शांतता तहानुसार स्वयंनिर्णयाच्या तत्वावर नात्याने निर्माण केली गेली होती. पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात विड्रो विलसन (अमेरिकन अध्यक्ष) यांच्या 'चौदा कलमी' योजनेतील स्वयंनिर्णयाचे तत्व लागू करून पूर्व युरोपातील भिन्न वंश, संस्कृती, भाषा, आचार-विचार यांची सरमिसळ असलेल्या नागरिकांना आपले स्वत:चे राष्ट्र निर्माण करण्याची संधी देखील आली. त्यातूनच हंगेरी, पोलंड, रूमानिया, बल्गेरिया व मोल्डेव्हिया ही राष्ट्रे तयार झाली. तसेच झेक व स्लाव्ह वंशीयांना एकत्र करून झेकोस्लाव्हाकिया व युगोस्लाव्हिया ही राष्ट्रे कृत्रिमपणे निर्माण केली गेली. कारण विजेत्या राष्ट्रांना ऑस्ट्रिया-हंगेरी व रशियाचे साम्राज्य खिळखिळे करून त्यांचा पूर्व युरोपातील प्रभाव नष्ट करावयाचा होता. त्यामुळेच पोलंड, युगोस्लाव्हिया व झेकोस्लोव्हाकियामध्ये नेहमीच अराजकता व अशांतता टिकून राहिली. दुसऱ्या महायुदधानंतर रशियाने पूर्व युरोपात साम्यवादी राजवटीचा संघ तयार करून त्यांना वॉर्सा कराराने जोडले. त्यांच्या अंतर्गत राज्यकारभारात केव्हाही रशिया हस्तक्षेप करू शकत होता. पण पूर्व युरोपातील सत्ताधारी साम्यवादाच्या बाजूने होते तर बहुसंख्य जनता साम्यवादाविरोधी होती, कारण तो त्यांच्यावर लादला गेला होता. म्हणूनच या सर्व राजवटींनी साम्यवादापासून मुक्ती मिळविण्यासाठी सतत प्रयत्न सुरू ठेवले. त्यांना योग्य संधी मिळाली तर गोर्बाचेव्ह यांच्या काळात त्यांनी गोर्बाचेव्हच्या अंतर्गत व परराष्ट्र धोरणाचा फायदा घेवून स्वत:ला साम्यवादापासून मुक्त केले.

## २. साम्यवादी पक्षाची कमी होत चाललेली लोकप्रियता :-

रशियामध्ये मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी आणि चीनमध्ये डेंग झियोपिंग यांनी जेव्हा आर्थिक व राजकीय सुधारणा आणल्या तेव्हा रशिया आणि चीनमधील सनातनी साम्यवादास मोठा धोका बसला. याचा परिणाम म्हणजे अतिशय हळुवार गतीने भांडवलशाही या दोन्ही देशात येवू पाहत होती. हा अप्रत्यक्षपणे साम्यवादाचा अंतच होता. पण याचा परिणाम रशिया व चीन याबरोबरच जिथे-जिथे साम्यवादी राजवटी होत्या त्यांना भोगावा लागणार होता. खरे पाहता १९५३ पासून म्हणजे स्टॅलिनच्या मृत्यूपासूनच साम्यवादाच्या पतनास प्रारंभ झाला होता. त्यानंतर १९६० मध्ये रशिया व चीनमधील साम्यवादी पक्षात मतभेद निर्माण झाले, पूर्व व मध्य युरोपातील साम्यवादाची लोकप्रियताही कमी होवू लागली, पश्चिम युरोपात दुसऱ्या महायुद्धानंतर सुरू झालेल्या आर्थिक प्रगतीस साम्यवादी पक्ष अडथळे निर्माण करत होता. या सर्व कारणांमुळे एकंदरीत

जागतिक राजकारणात साम्यवादी पक्षाची लोकप्रियता कमी होत गेली. परिणामी, पूर्व युरोपातील साम्यवादी संधीचे विघटन घडून आले.

## ३. पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटींची बेबंद हुकूमशाही :-

स्टॅलिन यांनी आपल्या कारकिर्दीत रशियात हुकूमशाही तंत्राचा वापर केला. दुसऱ्या महायुद्धानंतर त्यांनीच प्रस्थापित केलेल्या पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटींनी स्टॅलिन यांचा आदर्श समोर ठेवून आपआपल्या प्रदेशात बेबंद हुकूमशाही राबवली. लोकशाही व व्यक्तीस्वातंत्र्याची तत्वे तेथील जनतेपर्यंत पोहचू दिली नाहीत. मार्शल टिटो यांनी युगोस्लाव्हियाला साम्यवादाचा विळखाच पडू दिला नाही. पोलंड, हंगेरी येथे साम्यवादी हुकूमशाही लाथाडून लावण्यासाठी चळवळी झाल्या पण ह्या देशातील साम्यवादी नेत्यांना रशियाने लष्करी मदत पुरविली व चळवळी चिरडून टाकल्या. पुढे ब्रेझनेव्ह काळातील उठावही असेच चिरडण्यासाठी लष्करी हस्तक्षेपाचा परवानाच दिला गेला. त्यामुळे पूर्व युरोपातील साम्यवादी नेत्यांच्या हुकूमशाहीचे रूपांतर हिंसकशाहीत झाले. त्यामुळे तेथील जनता प्रक्षुब्ध झाली व त्यांनी पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटी उलथवून टाकल्या.

## ४. युरोकम्युनिस्ट पक्षाची स्थापना व साम्यवादाचे पतन :-

पश्चिम युरोपातील साम्यवादी पक्षाने १९७० नंतरच्या बदलत्या आर्थिक व राजकीय परिस्थितीला तोंड देण्यासाठी 'युरोकम्युनिस्ट पक्ष' स्थापन केला. या पक्षाने साम्यवादी क्रांतीने बदल घडविण्यापेक्षा संसदीय शासनव्यवस्थेवर भर देवून सुधारणा करण्याचे धोरण ठरविले. याचे नेतृत्व इटलीतील साम्यवाद्यांकडे होते. युरोकम्युनिस्ट पक्षाने मध्य व पूर्व युरोपात ज्या आर्थिक व राजकीय सुधारणा घडवून आणल्या, त्यामुळे तेथील साम्यवादाचा अंत समीप दिसू लागला. स्टॅलिन यांच्या मृत्यूनंतर पूर्व युरोपातील साम्यवाद विरोधकांना अनुकूल वातावरण मिळाले. परिणामी पूर्व युरोपातील साम्यवादाचे पतन होण्यास कारणीभूत ठरलेल्या अनेक कारणापैकी युरोकम्युनिस्ट पक्ष स्थापना व त्यांनी केलेल्या सुधारणा हे एक होय.

## ५. साम्यवाद्यांचा धर्माकडे बघडण्याचा दृष्टिकोन :-

साम्यवादी विचारसरणीने रशिया व इतर साम्यवादी देशातील धार्मिक मंदिरे व संस्था बंद केल्या होत्या. पण मानवाला त्याची मानसिक व अध्यात्मिक गरज म्हणून एखाद्या अव्यक्त शक्तीची उपासना करण्याची गरज वाटत असते. साम्यवादी जनता या गरजेपोटी धर्मभावनेचा हळूहळू जागर करत होती. धार्मिक स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जनतेने प्रयत्न केले. साम्यवादी देशातील बहुसंख्य जनता ख्रिश्चनधर्मीय होती. त्यामुळे या धर्माशी संबंधित सण-समारंभ ते साजरे करीत होते. पोलंडच्या रोमन कॅथॉलिक पंथाने पोपच्या आगमनावेळी खूप जल्लोष केला होता. पण त्यावेळी तेथील साम्यवादी सरकारने तेथील जनतेवर दबाव आणणून त्यांच्या धार्मिक कार्यक्रमांवर बंदी घातली. त्यामुळे जनतेमध्ये असतोष वाढला व तेथे अराजकता माजली. परिणामी तेथील जनता साम्यवादाविरोधी एकत्रित आली व साम्यवादाचा अंत घडून आला.

## ६. साम्यवादी राजवटींची लोकशाही शासनव्यवस्थेची आस :-

साम्यवादी शासनव्यवस्थेत हुकूमशाही ही अभिप्रेतच असते. काहीवेळा ती पक्षाची असते; कामगारांची असते किंवा एखाद्या नेतृत्वाची असते. हुकूमशाहीमध्ये स्थितीजन्यता असते, ती काल व परिस्थितीनुसार बदलत नाही. जनतेवर संपूर्ण नियंत्रण ठेवणे हे तिचे वैशिष्ट्य असते. याउलट लोकशाही शासनप्रणाली ही लोकाभिमुख असल्याने व लोककल्याण हे तिचे वैशिष्ट्य असल्याने ती काल व परिस्थितीनुसार बदलताना दिसते; जनतेचे मूलभूत स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची हमी दिलेली असते.

पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटीचे स्वरूप हे केवळ दाखविण्यापुरते लोकशाहीचे होते. पण प्रत्यक्षात तेथे हुकूमशाही होती. घटनेने जरी लोकांना मूलभूत स्वातंत्र्ये दिली असली तरी त्यांच्यावर कडक नियंत्रणे होती. जनतेला कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. या व्यवस्थेला झिडकारण्यासाठी आणि लोकशाही शासनव्यवस्थेसाठी तेथील जनतेने जेव्हा बंड/उठाव केला तेव्हा ते क्रूरतेने रशियन लष्कराची मदत घेवून चिरडले गेले.पण गोर्बाचेव्ह यांच्या काळात त्यांच्या खुलेपणा व पुनर्रचना या धोरणामुळे हे उठाव पुन्हा जोर धरू लागले आणि त्यातूनच या साम्यवादी राजवटीचे पतन झाले.

## ७. चाकोरीबद्ध किंवा सुधारणाविरोधी साम्यवादी विचारसरणी :-

साम्यवादी विचारसणीला विशिष्ट अशी एक चौकट आहे. वर्गविहीन व राज्यविहीन समाज, कलह आणि कामगारांची हुकूमशाही यामध्ये साम्यवादास बंदिस्त करण्यात आले असून त्याला 'शास्त्रीय समाजवाद' (Scientific Socialism) असे नाव दिले गेले. जिथे सुधारणांना अजिबात जागा नव्हती. परिणामी, ज्या-ज्या ठिकाणी ही विचारणी लागू केली गेली त्या-त्या ठिकाणी काही कारणामुळे बदल होत गेले. पण त्याचवेळी साम्यवादी विचारसरणी त्या परिस्थितीस जुळवून घेण्यास कमी पडली.

पूर्व युरोपमधील राजवटींमध्ये तेथील साम्यवादी नेत्यांनी जनतेवर साम्यवादी पक्षाचे एवढे कडक नियंत्रण प्रस्थापित केले होते की, तेथे कोणत्याही प्रकारच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक सुधारणांना वाव दिला जात नव्हता. थोड्याच कालावधीमध्ये रशियात आणि पूर्वयुरोपात सुधारणांचा विरोधक अशी तेथील साम्यवादाची ओळख निर्माण झाली. त्याचवेळी चीनमध्ये मात्र साम्यवादाचे राजकीय स्वरूप न बदलता तेथे आर्थिक व सामाजिक सुधारणा देण्यात आल्या. म्हणूनच रशिया व पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटींच्या तुलनेत साम्यवादी चीनने विसाव्या शतकात एक आर्थिक महासत्ता म्हणून आपली ओळख निर्माण केली. म्हणूनच चाकोरीबद्ध आणि सुधारणाविरोधी साम्यवादी विचारसरणीमुळे पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटींचा लवकर अंत घडून आला.

## ८. गतीशून्य साम्यवादी अर्थव्यवस्था :-

दुसऱ्या महायुद्धानंतर स्टॅलिन यांनी पूर्व युरोपमध्ये साम्यवादी शासन प्रस्थापित केले. त्याचवेळी त्यांनी रशियन अर्थव्यवस्थेनुसारच तेथेही अर्थव्यवस्थेची रचना केली. पण पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटीतील अर्थव्यवस्थेला नगण्य यश मिळाले. याउलट अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या धर्तीवर आधारित खुल्या अर्थव्यवस्थेची

आव्हाने स्वीकारून पश्चिम युरोपातील राष्ट्रे आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाली. त्यांनी जागतिक बाजारपेठेत एक वेगळे स्थान निर्माण केले. त्यांच्या तुलनेत पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटी खूपच मागे पडल्या. त्यामुळे तेथे कोणत्याही प्रकारचे औद्योगिक आणि तांत्रिक ज्ञान वाढले नाही आणि बाहेरूनही घेता आले नाही. त्यामुळे सर्वच क्षेत्रातील उत्पादन घटले, बेकारी वाढली. या सर्व संकटांना आणि जनतेच्या असंतोषाला तोंड देणे साम्यवादी अर्थव्यवस्थेला शक्य झाले नाही. परिणामी साम्यवादी विचारसरणी लोकांना नकोशी झाली व त्यातूनच त्यांच्या विघटनाची बीजे पेरली गेली.

ही आहेत पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटींच्या विघटनाची महत्त्वाची कारणे आता आपण या साम्यवादी राजवटीचे विघटन कसे झाले हे थोडक्यात अभ्यासणार आहोत.

## ४.२.१.५ इ) पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटीचे विघटन :-

### १. युगोस्लाव्हिया :-

युगोस्लाव्हिया या पहिल्या महायुध्दानंतर अस्तित्वात आलेला देश. तो ख्रिश्चन, इस्लाम धर्म आणि स्लाव्ह, क्रोट, सर्ब, मॅसिडोनियन अल्बानियम वंशांच्या लोकांना एकत्र आणून ऑस्ट्रिया-हंगेरीला शह देण्यासाठी कृत्रिमरित्या त्याची निर्मिती केली गेली. तेथे कोणत्याच प्रकारचा समन्वय नव्हता. केवळ मार्शल टिटोच्या नेतृत्वाखालील साम्यवादी पक्षाने तेथे थोडीफार एकता निर्माण केलेली होती. दुसऱ्या महायुद्ध समाप्तीनंतर पूर्व युरोपातील सर्व साम्यवादी पक्ष अत्यंत कमकुवत झाले होते. पण युगोस्लाव्हिया मात्र प्रबळ होता. दुसऱ्या महायुद्धादरम्यान आंतरराष्ट्रीय साम्यवादी संघटनेने मान्य केलेल्या साम्यवादी पक्षाचे नेतृत्व मार्शल टिटोंकडे होते. पण १९४८ मध्ये स्टॅलिन व मार्शल टिटो यांच्यात मतभेद झाले. त्यामुळे युगोस्लाव्हियातील साम्यवादी पक्षाचे आंतरराष्ट्रीय साम्यवादी संघटनेतील स्थान संपुष्टात आले. परिणामी युद्धोत्तर काळात मार्शल टिटोंनी लोकांची लोकशाही अंमलात आणण्याचा प्रयत्न केला. युगोस्लाव्हियाचा पाश्चात देशांशी संबंध आला व रशिया आणि पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटीपासून तो वेगळा झाला. क्रुश्चेव्ह काळातही तो साम्यवादाच्या प्रभावापासून मुक्तच राहिला. पण टिटोंच्या एकतंत्री राजवटीमुळे तो देश प्रबळ/प्रभावी होवू शकला नाही. १९८० नंतर म्हणजे टिटोंच्या निधनानंतर तो देश एकसंघ राहिला नाही. १९९१ पासून त्याचे विघटन होण्यास सुरुवात झाली. बोस्निया, क्रोशिया, मॅसिडोनिया व स्लोव्हानिया ही स्वतंत्र राष्ट्रे झाली तर केवळ सर्बिया-माँटेनिग्रोचा मिळून युगोस्लाव्हिया राहिला.

### २. रूमानिया :-

हा पहिल्या महायुद्धानंतर निर्माण झालेला देश. कॅरोल दुसरा या राजाने तेथे १९३८ मध्ये हुकूमशाही राजवट स्थापन केली. १९३९ मध्ये या राजाने आपला पुत्र मायकेल याच्याहाती सत्ता सोपविली. मायकेल यांचे संबंध आधीपासूनच रशियाशी चांगले असल्याने रशियाने तेथे सुलभपणे प्रवेश केला व १९४५ मध्ये तेथे रशियाधार्जिणे सरकार स्थापन केले. त्यानंतर देज यांच्या नेतृत्वाखाली साम्यवादी पक्षाने बऱ्याच

सुधारणा घडवून आणल्या. त्यानंतर १९६५ मध्ये चॉसेस्क्यू यांची रूमानियातील साम्यवादी पक्षाच्या चिटणीसपदी नेमणूक झाली. नंतर सरचिटणीस म्हणून काम पाहिले व त्यानंतर ते रूमानियाचे सत्ताधीश झाले. सत्ताधीश असताना त्यांनी लेनिन व स्टॅलिनप्रमाणेच हुकूमशाही राजवट प्रस्थापित केली. त्यांची राजवट एकछत्री असून जाचक व अतिशय क्रूरतेची होती. लोकांवर अन्याय, अत्याचार, शेतीचे सामुदायिकीकरण, सर्वत्र बळाचा वापर इ.मुळे लोकांवर जुलूम जबरदस्ती वाढली. परिणामी साम्यवादी पक्षाबद्दल अनास्था निर्माण झाली. अशा परिस्थितीतच १९८५ मध्ये जेव्हा गोर्बाचेव्ह यांनी खुलेपणाचे धोरण जाहीर केले, तेव्हा रूमानियावरही त्याचा परिणाम झाला. तेथे सत्ताधिशांविरोधात वातावरण निर्मिती होवू लागली. तेथील नॅशनल सॉलव्हेशन फ्रंट (National Salvation Front) संघटनेची स्थापना हा त्याचाच परिणाम होय. या संघटनेने सत्तेविरोधात उभारलेल्या आंदोलनाला तेथील लष्कराची मोठी साथ मिळाली. अशा कठिण परिस्थितीत लष्करच सत्ताधिशाच्या विरोधात गेल्यामुळे चॉसेस्क्यू यांच्या जुलमी साम्यवादी सत्तेचा शेवट लष्कराकडूनच झाला.

## ३. हंगेरी :-

पहिल्या महायुद्धानंतर नव्या हंगेरीचा उदय झाला. त्यानंतर पुढच्याच वर्षी म्हणजे १९१९ मध्ये केवळ चार महिने तेथे साम्यवादी राजवट होती. पण चार महिन्यानंतर मिकोलास हार्दी यांच्या नेतृत्वाखाली तेथे लष्करी हुकूमशाही प्रस्थापित झाली. रशियाने १९४४ मध्ये हार्दीला अटक केली आणि साझालासी यांची नेमणूक हार्दीच्या जागेवर केली. पुढे एक वर्षातच म्हणजे १९४५ मध्ये रशियाने हंगेरीवर पूर्ण वर्चस्व प्रस्थापित केले. १९४५ मध्ये झालेल्या निवडणूकीत साम्यवादी पक्ष बहुमतावर नसला तरी केवळ रशियाच्या दबावामुळे तो पक्ष सरकारमध्ये आला. सत्तेत असताना त्यांनी दडपशाहीचे धोरण स्वीकारले. पुढे १९४९ मध्ये साम्यवादी पक्षाला बहुमत मिळाले आणि राकोसी हे सत्तेवर आले. त्यांनी दहशतवादी कारवाया करून लोकांच्या कत्तली केल्या. परिणामी लवकरच लोकांच्या असंतोषाचे परिणाम म्हणून इम्रे नाज हे साम्यवादी पण सुधारणावादी नेते पंतप्रधान झाले. त्यांना स्टॅलिन यांची राज्यघटना व राज्यव्यवस्था मान्य नव्हती त्यांनी हंगेरीतून रशियन फौजा काढून घेण्यासाठी रशियाकडे मागणी केली. रशियाने ती नाकारली, तेव्हा हंगेरीत उठाव झाला. पण रशियाने तो क्रूरपणे चिरडून टाकला व जानोस कादर यांच्या हाती सत्ता दिली गेली. इम्रेनाज यावेळी युगोस्लाव वकिलातीत आश्रयास होते. पुढे तेथून बाहेर काढण्यासाठी त्यांना सरकारने सुरक्षिततेची हमी दिली. पण ते बाहेर येताच त्यांना अटक करण्यात आली. रशियाने तेथील उठाव चिरडून टाकला. इम्रे नाज व इतर ३०० नेत्यांना १६ जून १९५८ रोजी फाशी दिली गेली. तर १६ जून १९८९ मध्ये ३१ वर्षांनी साम्यवादी राजवटीचा अंत होताच नाज यांना शासकीय इतमामात दफन करण्यात आले. यावेळी साम्यवादी पक्षाला तेथे येण्यास विरोध केला. म्हणजे साम्यवादी राजवटीचा अंतच करण्यात आला.

हंगेरीचे वैशिष्ट्य म्हणजे पूर्व युरोपातील इतर साम्यवादी देशापेक्षा तेथे सुधारणवादी व पुराणमतवादी पक्षात जवळजवळ १५ वर्षे संघर्ष चालू होता; पण तो तीव्र नव्हता. तसेच तेथे साम्यवादी पक्षच सत्ताधारी व वर्चस्व माजवणारा राहील याची काळजी घेण्यात आली. पण ही व्यवस्था दीर्घकालीन टिकणारी नव्हती.

परिणामी, तात्कालीन कायदामंत्री कुलचर यांनी सुधारणा घडविण्यासाठी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्यातच जानोस कादर यांनी केलेल्या सुधारणांमुळे लोक आणखीन सुधारणा मागू लागले. त्यातच गोर्बाचेव्ह यांच्या पुनर्रचना व खुलेपणा या धोरणांमुळे हंगेरीयन लोकांमध्ये क्रांतीची लाट पसरली. हंगेरीतील खुल्या विचारसरणीमुळे तेथे अनेक गट निर्माण झाले असले तरीही त्यांच्यात एकी होती.

हंगेरीमध्ये १९८९ मध्ये सार्वत्रिक निवडणूका झाल्या. त्यामध्ये कोणत्याच पक्षाला ठाम बहुमत न मिळाल्याने हंगेरीमध्ये 'हंगेरीयन डेमॉक्रॅटिक फोरम', 'फ्री डेमोक्रॅटस' व 'इंडिपेन्डन्ट स्मॉल होल्डर्स' या तीन पक्षांचे संयुक्त सरकार अस्तित्वात आले. त्यानंतर जानोस कादर यांना पदच्युत करण्यात आले आणि हंगेरीतील साम्यवाद जवळजवळ ४० वर्षानंतर संपुष्टात आला.

## ४. झेकोस्लोव्हाकिया :-

पहिल्या महायुद्धानंतर ऑस्ट्रिया-हंगेरीचे साम्राज्याचे पतन होवून झेक आणि स्लॉव्ह वंशियांचे मिळून एक राष्ट्र निर्माण करण्यात आले. झेक भाग ऑस्ट्रियाचा तर स्लोव्हॉक मात्र हंगेरीच्या अधिपत्याखाली होता. पुढे १९३९ मध्ये जर्मनीने झेकोस्लोव्हाकियावर कब्जा मिळवला. परिणामी, तेथील अध्यक्ष इंग्लंडला गेले. नंतर झेकोस्लोव्हाकिया जर्मनींच्या प्रभावापासून मुक्त होताच अध्यक्ष इंग्लंडहून परत आले व त्यांनी रशियाबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. परिणामी, सहा साम्यवादी नेत्यांनी मंत्रीमंडळात स्थान मिळवले. १९४६ मधील सार्वत्रिक निवडणूकीनंतर तेथे संयुक्त सरकार स्थापन होवून ग्रोटवॉल हे साम्यवादी नेते पंतप्रधान झाले. १९५३ मध्ये त्यांच्या मृत्यूनंतर नोव्हान्ती हे त्यांच्या जागेवर आले. त्यांनीही जनतेच्या मनात स्थान निर्माण करता आले नाही. त्यामुळे १९६० नंतर ड्यूबचेक यांनी समाजवादाचे मानवीकरण करण्याची व समाजवादाला मानवी चेहरा प्राप्त करून देण्याची घोषणा केली. तसेच त्यांनी स्टॅलिनविरुध्दच्या चळवळीचे नेतृत्व स्वीकारले. ही चळवळ बरीच परिणामकारक झाली. त्यामुळे १९६८ मध्ये नोव्हास्लींना सत्ता गमवावी लागली तर ड्यूबचेक यांना सत्ता प्राप्त झाली. ड्युबचेक यांच्या सुधारणा आणि नवपरिवर्तन रशियाला रूचणे शक्य नव्हते. त्यामुळे हे सर्व थोपविण्यासाठी १९६८ मध्ये पोलंड, हंगेरी, बल्गेरिया व पूर्व जर्मनीने झेकोस्लोव्हाकियावर आक्रमण केले. त्यानंतर ड्युबचेक यांची सत्ता जावून तेथे हुसाक हे रशियन विचारसरणीशी जुळवून घेणारे नेते सत्तेवर आले. 'रशियाला न दुखवणे/त्याच्या विरोधात न जाणे' हे धोरण त्यांनी अवलंबले. या काळात देशात बऱ्यापैकी स्थैर्य निर्माण झाले व जनतेचाही त्यांना पाठिंबा मिळाला. हुसाक रशियाशी जमवून घेतील खरे पण त्याबदल्यात स्वातंत्र्य गमावणे तेथील विद्यार्थ्यांना व जनतेला मान्य नव्हते. कारण आंतरराष्ट्रीय साम्यवादाच्या नावाखाली इतर पूर्ण युरोपीय देशांप्रमाणे रशियाने झेकोस्लोव्हाकियाची लूट करून त्यावर अन्याय, अत्याचार केले होते. त्यामुळे जनतेत असंतोष धुमसत होता. त्यांना रशियाचे वर्चस्व अमान्य होते. परिणामी, जनता प्रक्षुब्ध होवून जनआंदोलने तीव्र झाली. हुसाकनंतर याकसनीही पूर्वीचेच धोरण पुढे चालू ठेवले. त्यामुळे रशियाचा प्रभाव तेथील जनतेवर होताच. दरम्यानच्या काळात पूर्व युरोपात साम्यवादी राजवटींच्या ऱ्हासाचे सत्र सुरू होते. त्याचा झेकोस्लोव्हाकियावर परिणाम होणे साहजिकच होते. त्याचा परिणाम असा झाला की, १९८९ मध्ये याकसला राजीनामा देणे भाग पडले. त्याच

दरम्यान गोर्बाचेव्हनी असे जाहीर केले की, लोकांच्या मागण्या दडपण्यासाठी रशियाची कोणतीच मदत नाही. त्यामुळे जिथे-जिथे साम्यवाद होता त्या-त्या देशात तेथील सत्तेविरुध्द आवाज उठू लागला. झेकोस्लॉव्हाकियातही वेगळी परस्थिथती नव्हती. रशियाची मदत न मिळाल्याने याक्स यांना झेकॉस्लोव्हाकिची सत्ता सोडावी लागली. ४५ वर्षानंतर प्रश्नच तेथे खुल्या निवडणूका झाल्या आणि हॉवेल यांनी स्थापन केलेल्या 'सिव्हिकल फोरम' पक्षास स्पष्ट बहुमत मिळाले. १९८९ मध्ये हॉवेल यांच्याकडे झेकोस्लोव्हाकीयाचे अध्यक्षपद आले आणि तेथील साम्यवादी सत्ता संपुष्टात आली. त्यानंतर झेक वंशीयांचे झेकलँड तर स्लोव्हॉक वंशीयाचे स्लोव्हाकिया ही दोन स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्रे निर्माण झाली.

## ५. पोलंड :-

बाल्टिक समुद्र ते काळा समुद्र या भागात पसरलेला प्रदेश म्हणजे पूर्वीचा पोलंड, नंतर सतरा व अठराव्या शतकात त्याचा ऱ्हास झाला. पुढे रशिया-प्रशिया आणि ऑस्ट्रियाची साम्राज्ये नष्ट झाली आणि पहिल्या महायुद्धानंतर म्हणजे १९१८ मध्ये पोलंडच्या पुनर्जन्म झाला. दुसऱ्या महायुद्धादरम्यान दक्षिण पोलंड जर्मनीने तर अर्धा पोलंड रशियाने काबीज केला. परिणामी तेथे रशियाचा प्रभाव दिसू लागला आणि पोलंडमध्ये साम्यवादी सरकार स्थापन झाले. रशियाने गोमुष्का यांच्या हातील सता दिली. पण त्यांना रशियाचे वर्चस्व मान्य नसून त्यांचा काळ समाजवादाकडे होता. जाणारा स्वत:चा पोलिश मार्ग स्वीकारण्याकडे होता. त्यांचे सरकार हे समाजवादी नेते असलेले वर्चस्व गोमुष्कांना मान्य नसल्याने त्यांची सत्ता काढून घेण्यात आली. परिणामी पोलंडवर रशियाचा प्रभाव वाढला. परिणामी भाववाढीमुळे १९५६ मध्ये जनतेने उठाव केला. ती परिस्थिती सुधारण्यासाठी पुन्हा गोमुष्काची नियुक्ती सत्तेवर करण्यात आली, त्यानंतर मिळालेल्या स्वातंत्र्यामुळे व साम्यवादाविरोधी उठावामुळे साम्यवादी पक्षाचे स्थान कमी झाले. परिणामी, गोमुष्का हुकूमशाही बनले. जनतेशी संपर्क तुटला. आर्थिक संकटामुळे लोकांत असंतोष निर्माण झाला. १९६८ ला वॉर्सात बंड झाले. १९७० ला आर्थिक स्थिती चिंताजनक झाली. सर्वत्र संपाचे वारे वाहू लागले.

गोमुष्कानंतर साम्यवादी पक्षाचे सरचिटणीस गिरेक सत्तेवर आले. १९७६ ला पुन्हा आर्थिक संकटामुळे संप, दंगली झाल्या. गिरेक यांनी लोकांना विश्वासात न घेतल्याने जनता व सत्ताधारी यांच्यातील दरी वाढत गेली. कामगारांची तीव्र निदर्शने झाली. परिणामी, सरकारने भाववाढ रद्द केली, पण वर्षभरातच कामगार आंदोलने जारे धरू लागली. साम्यवादी धोरणामुळे अर्थव्यवस्था कोलमडली. परिणामी, शेतकरी व कामगार, ग्रामीण व शहरी जनता नाराज झाले, त्यांनी स्वतंत्र संस्था निर्माण केल्या. आंदोलनात कामगारांनी राज्यव्यवस्था बदलण्याची जोरदार मागणी केली. याच आंदोलनातून लेक वालेन्सा हे कामगार नेते म्हणून उदयास आले. यादरम्यान कामगार व सरकार यांच्यात तडजोड होवून कामगारांना संपाचा अधिकार मिळाला. पण रशियाला ते मान्य नव्हते. त्याने पोलंड व इतर पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटीतील हालचालींवर लक्ष ठेवले, 'सपा'या शब्दाला आक्षेप घेतला. गिरेक यांच्यावर दबाव आणून त्यांना सत्ता सोडावी लागली. त्यांच्या जागी यारूझेल्स्की हे लष्करप्रमुख व पंतप्रधान म्हणून सत्तेवर

आले. १४ ऑगस्ट १९८० मध्ये गडान्स्क बंदरातील गोदी कामगारांनी जो संप केला त्याचा परिणाम देशभर झाला. यारूझेल्स्की यांना ती परिस्थिती हाताळता न आल्याने १९८१ मध्ये पोलंडमध्ये 'लष्करी राजवट' लागू केली गेली.

लष्करी राजवटीपूर्वी 'सॉलिडॅरिटी' या कामगार संघटनेने साम्यवादी प्रभावी राजवट संपवण्याची, सत्तेच्या विकेंद्रीकरणाची मागणी केली होती. म्हणून सरकारने ती संघटनाच बरखास्त करून टाकली. त्यामुळे आर्थिक व्यवस्था सुधारण्यासाठी सरकारला वॉलेन्सा व त्याच्या पक्षाशी तडजोड करणे गरजेचे होते. परिणामी १९८९ च्या प्रारंभी त्यांच्यात एक तडजोडीचा करार झाला, त्यांच्या पक्षाला मान्यता दिली, त्यास निवडणूकीत भाग घेण्याची परवानगी देण्यात आली. त्यानुसार १९८९ मध्ये झालेल्या खुल्या निवडणूकीमध्ये सॉलिडेसिटी पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले आणि साम्यवादी पक्षाची सत्ता संपली. १९ सप्टेंबर १९८९ रोजी बिगर साम्यवादी मंत्रीमंडळ पोलंडमध्ये अस्तित्वात आले. यारूझेलस्कीच अध्यक्ष राहीले. पण नंतर झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणूकीत वालेन्सा अध्यक्षपदी निवडून आले. पण तेच वॉलेन्सा १९९७ च्या निवडणूकीत पराभूत झाले; पुन्हा ते पूर्वीच्याच कारखान्यात कामगार म्हणून काम करू लागले. अध्यक्ष म्हणून त्यांची कारकिर्द अयशस्वी ठरली होती.

## ६. जर्मनी :–

दुसऱ्या महायुद्धानंतर सुरू झालेल्या शीतयुद्ध काळात युरोपची विभागणी जशी दोन गटांत करण्यात आली. तसेच जर्मनी आणि बर्लिन शहराचेही विभाजन झाले. त्यानुसार अमेरिका व इंग्लंडच्या लोकशाही व्यवस्थेखाली पश्चिम जर्मनी व पश्चिम बर्लिन तर रशियाच्या साम्यवादी (समाजवादी) व्यवस्थेखाली पूर्व जर्मनी व पूर्व बर्लिनचा भाग गेला.

पश्चिम जर्मनी हा पाश्चात्य राष्ट्रांच्या प्रभावाखाली वेगाने प्रगती करीत होता. तर पूर्व जर्मनीमध्ये १९७१ पासून साम्यवादी पक्षप्रमुख आणि जर्मनीचे अध्यक्ष एरिच होनेकर यांनी सुधारणाविरोधी धोरण स्वीकारून, लष्करी बळाचा वापर करून पूर्व जर्मनीतील साम्यवादी राजवट कायम टिकवून धरण्याचा निर्णय घेतला. पण रशियामध्ये मिखाईल गोर्बाचेव्ह सत्तेवर येताच त्यांनी पुर्नरचना व खुलेपणाचे धोरण स्वीकारले. त्यामुळे रशियामध्ये दुसऱ्या राज्यक्रांतीच्या दिशेने वाटचाल चालू झाली. स्वातंत्र्याची ठिणगी पोलंडकडून पूर्व जर्मनीकडे आली. जून १९८९ मध्ये पश्चिम जर्मनीकडून आर्थिक मदत मिळविण्याच्या हेतूने गोर्बाचेव्ह यांनी पश्चिम जर्मनीला भेट दिली. यावेळी जर्मनीकडून मिळणाऱ्या आर्थिक मोबदल्याच्या बदल्यात जर्मनीचे एकीकरण करण्याच्या प्रयत्नात पश्चिम जर्मनीचे चॅन्सेलर कोहल यांना मदत करण्याचे आणि पूर्व जर्मनीला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे आश्वासन/वचन गोर्बाचेव्ह यांनी कोहल यांना दिले. मे १९९० मध्ये हंगेरीतील साम्यवादाचा अंत झाला. तेथे संयुक्त सरकार अस्तित्वात आले. परिणामी, ऑस्ट्रिया व हंगेरीच्या सीमेवरील काटेरी तारांचे कुंपन नष्ट करण्यात आले. त्यामुळे पूर्व जर्मनीतील निराश्रीतांना पश्चिमेकडे जाणे सहज शक्य झाले. हजारोंच्या संख्येने लोक पूर्व जर्मनीतून पश्चिम जर्मनीकडे स्थलांतरित होवू लागले. याचा परिणाम असा झाला की, पूर्व जर्मनीतील अत्यावश्यक सेवा कोलमडून पडल्या. पूर्व जर्मनीमध्ये साम्यवादी

राजवटीविरुध्द असंतोष धुमसू लागला. जनता आंदोलनाची तयारी करू लागली. पण त्याचवेळी गोर्बाचेव्ह यांनी असे जाहीर केले की, ही आंदोलने दडपण्यासाठी लष्करी बळाचा वापर करू नये किंवा त्यासाठी रशियाकडून कोणत्याच मदतीची अपेक्षा करू नये. यावेळी एरिच होनेकर हे पूर्व जर्मनीचे अध्यक्ष होते. गोर्बाचेव्ह यांनी होनेकर यांना कळविले की, लोकशाहीचा मार्ग स्वीकारून पूर्व जर्मनीत युगपरिवर्तने करण्याचा प्रयत्न करावा. या गोष्टीचा परिणाम होवून १९८९ मध्ये पूर्व जर्मनीत 'स्वातंत्र्य आणि साम्यवादाचा अंत' या महत्त्वपूर्ण मागण्यांसाठी तीव्र निदर्शने होवू लागली. यावेळी होनेकर यांना लष्करी बळाचा वापर करावयाचा होता. पण इतर साम्यवादी पक्षाच्या नेत्यांनी त्यांना प्रखरतेने विरोध केला. पक्षांतर्गत मतभेद पराकोटीला पोचले आणि शेवटी होनेकरना सत्ता गमवावी लागली. त्यांच्यानंतर इगोन क्रेंझ हे साम्यवादी पक्षाचे सरचिटणीस व जर्मनीचे अध्यक्ष बनले.

क्रेंझ यांनी सत्तेवर येताच पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनीची फाळणी करणारी कुप्रसिद्ध अशी 'बर्लिन भिंत' ही दोन्ही जर्मनीतील लोकांच्या असंतोषाचे व दु:खाचे प्रतीक आहे हे लक्षात घेवून पूर्व व पश्चिम बर्लिनमधील दळणवळणावरील सर्व निर्बंध काढून टाकले. शेवटी क्रेंझ यांच्या साम्यवादी सरकारने ९ नोव्हेंबर १९८९ रोजी बर्लिन भिंत पाडून टाकली. त्यामुळे तेथील लोकांना अतोनात आनंद झाला आणि ते जर्मनीच्या एकीकरणाची स्वप्ने पाहू लागले.

काळाच्या ओघात हुकूमशाही स्टॅलिनची जागा आता सुधारणावादी गोर्बाचेव्ह यांच्याकडे आली. त्यांनी जर्मनीच्या एकीकरणास मनापासून पाठिंबा व्यक्त केला. त्यामुळे जर्मनी-एकीकरणाच्या कार्यास गती मिळाली. एका वर्षाच्या आतच क्रेंझ यांच्या जागी ग्रेगोर व्यसी पूर्व जर्मनीचे अध्यक्ष झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्व जर्मनीतील साम्यवादी पक्षाने आपल्या राजकीय सत्तेच्या मक्तेदारीचा त्याग केला. जागतिक राजकारणातील बड्या देशांनी जर्मनीच्या एकीकरणात अडथळे निर्माण करणार नाही, असा शब्द देताच पश्चिम जर्मनीतील राजकीय पक्षांनी पूर्व जर्मनीत आपल्या शाखा उघडल्या. मार्च १९९० मध्ये पूर्व जर्मनीत ज्या खुल्या निवडणूका झाल्या त्यामध्ये पूर्व जर्मनीतील कोहल यांच्या पक्षाने स्पष्ट बहुमत मिळविले. पूर्व-जर्मनीमध्ये हंगामी सरकार स्थापन झाले. त्यांनी पूर्व जर्मनीचा भाग पश्चिम जर्मनीमध्ये विलिन करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या घटनात्मक बाबींची पूर्तता करून घेतली.

जर्मनीच्या एकीकरणाबाबत इंग्लंड-फ्रान्स असंतुष्ट होते, पण यावेळी त्यांनी कोणतीही अडचण निर्माण केली नाही; तर सोव्हिएत रशिया व अमेरिकेचा जर्मनीच्या एकीकरणास पाठिंबा होता. त्यानुसार गोर्बाचेव्ह यांनी १९९४ पर्यंत पूर्व जर्मनीतून सर्व रशियन लष्कर काढून घेण्याबाबत शब्द दिला. सरतेशेवटी ३ ऑक्टोबर १९९० च्या मध्यरात्री जर्मनीच्या एकीकरणाची घोषणा होवून एकसंघ आणि सार्वभौम असा नवा जर्मनी देश अस्तित्वात आला. डिसेंबर १९९० मध्ये झालेल्या खुल्या निवडणूकांमध्ये साम्यवादी पक्षाला सपाटून पराभव पत्करावा लागला. कोहल यांच्या नेतृत्वाखालील तीन पक्षांच्या युतीने स्पष्ट बहुमत मिळविले. एकसंघ जर्मनीचे पहिले चॅन्सलर म्हणून हेल्मुट कोहल यांच्या हाती सत्ता आली आणि २० जून १९९१ रोजी बर्लिन ही जर्मनीची राजधानी बनली.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-१

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. १९४५ मध्ये दुसरे महायुद्ध संपते न संपते तोच ........... व ............ यांच्यात 'शीतयुद्ध' सुरू झाले.

*(अ) अमेरिका व रशिया* *(ब) अमेरिका व इंग्लंड*

*(क) रशिया व चीन* *(ड) इंग्लंड व फ्रान्स.*

२. इ.स. ............ मध्ये रॉबर्ट ओवेन याने 'कोऑपरेटिव्ह मॅगेझिन' मध्ये 'समाजवाद' या शब्दाचा सर्वप्रथम वापर केला.

*(अ) १८२१* *(ब) १८२२* *(क) १८२७* *(ड) १८२५.*

३. .............. येथे मार्शल टिटो यांच्या नेतृत्वाखालील साम्यवादी पक्षाने लोकांमध्ये एकता निर्माण केलेली होती.

*(अ) हंगेरी* *(ब) युगोस्लाव्हिया* *(क) पोलंड* *(ड) बल्गेरिया.*

४. 'नॅशनल सॉल्व्हेशन फ्रंट' या पक्षाची स्थापना ............. येथे झाली होती.

*(अ) बल्गेरिया* *(ब) हंगेरी* *(क) झेकोस्लोव्हाकीया* *(ड) रूमानिया.*

५. इ.स. ............... मध्ये झेकोस्लोव्हाकियातील साम्यवादी सत्ता संपुष्टात आली.

*(अ) १९८९* *(ब) १९८८* *(क) १९८७* *(ड) १९८६.*

६. यारूझेल्स्की हे ............ येथे लष्करप्रमुख व पंतप्रधान म्हणून सत्तेवर आले.

*(अ) जर्मनी* *(ब) हंगेरी* *(क) पोलंड* *(ड) हंगेरी.*

७. ............ रोजी क्रेंझ यांच्या साम्यवादी सरकारने बर्लिन भिंत पाडून टाकली.

*(अ) ८ नोव्हेंबर १९८९* *(ब) ९ नोव्हेंबर १९८९*

*(क) ७ नोव्हेंबर १९८९* *(ड) ६ नोव्हेंबर १९८९.*

## ४.२.२ राजकीय स्थितीतील बदल (द्विध्रुवीय ते एकध्रुवीय जागतिक पद्धत)

(Change in Political Order-From Bipolar to Unipolar World System)

दुसऱ्या महायुद्धादरम्यान (१९३९-१९४५) अमेरिका आणि रशिया यांची मदत घेवूनच इंग्लंड व फ्रान्सने जपान आणि जर्मनी यांचा पराभव केला. अमेरिका, रशिया आणि इतर पाश्चात्य राष्ट्रे यांचे समान ध्येय होते ते म्हणजे जपान व जर्मनी यांना नेस्तनाबूत करणे. या एकाच ध्येयप्राप्तीसाठी ही सर्व बडी राष्ट्रे परस्परातील मतभेद विसरून किंवा एका विशिष्ट मर्यादेपर्यंत ते मतभेद नियंत्रणात ठेवून एकत्र आली होती.

पण जपान आणि जर्मनी यांच्या पराभवानंतर मात्र त्यांच्यातील स्पर्धा जोर धरू लागली. त्याला त्यांची परस्परविरूद्ध विचारप्रणाली/राजकीय व्यवस्थाही कारणीभूत होती. त्यातूनच अमेरिकेच्या प्रभावाखालील राष्ट्रे आणि रशियाच्या प्रभावाखालील राष्ट्रे अशी युरोपची विभागणी झाली. जागतिक राजकारणात भांडवलदारी राष्ट्रे विरुध्द साम्यवादी राष्ट्रे असा संघर्ष सुरू झाला. त्यातूनच 'शीतयुद्ध' सुरू झाले. प्रारंभी शीतयुद्धाची तीव्रता अधिक होती. पण १९६२ नंतर ही तीव्रता कमी होवून अमेरिका व रशिया या दोन्ही देशांनी सहअस्तित्वाचे व सामंजस्याचे धोरण स्वीकारले. प्रारंभीच्या काळातील संघर्षाच्या तीव्रतेतून जी जीवघेणी शस्त्रास्त्र स्पर्धा सुरू झाली, त्यातूनच जागतिक राजकारणात अमेरिका व रशिया या दोन महासत्तांचा उदय झाला.

दुसऱ्या महायुद्धात जेव्हा जपान शरणागती स्वीकारत नव्हता तेव्हा अमेरिकेने हिरोशिमा व नागासाकीवर अणुबॉम्ब टाकले आणि जपानने शरणागती स्वीकारली. आश्चर्य म्हणजे त्यावेळेपर्यंत रशियालाही अणुबॉम्बची माहिती नव्हती. त्यामुळे आपोआपच अणुबॉम्बच्या शक्ती व प्रयोगामुळे अमेरिका महासत्ता (Super Power) म्हणून उदयास आली. पण पुढील काळात लवकरच रशियानेही हे तंत्रज्ञान/शक्तीचा शोध लावला. परिणामी, अमेरिका आणि रशिया या दोन देशांचा सुपर पॉवर/महासत्ता म्हणून उदय झाला. त्यातून सत्तास्पर्धा आणि शस्त्रास्त्रस्पर्धा सुरू झाली.

## ❑ **द्विध्रुवीय जागतिक पद्धत** (Bipolar World System)

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व रशिया महासत्ता म्हणून उदयास आल्या, आणि जागतिक राजकारणात द्विध्रुवीकरण पूर्ण झाले असे म्हटले जाते. या 'द्विध्रुवीकरणाची कारणे अभ्यासण्यापूर्वी महासत्ता' (Super Power) बनण्याकरता ज्या कसोट्या आवश्यक होत्या त्याचा आपण थोडक्यात आढावा घेवू. या खालीलप्रमाणे :-

१) अशा राष्ट्राला युनोच्या सुरक्षा समितीचे कायम सदस्यत्व मिळालेले असावे.

२) जगातील उर्वरित राष्ट्रांवर प्रभुत्व निर्माण करण्याची/प्रभाव पाडण्याची ताकद या राष्ट्राकडे असायला हवी.

३) जागतिक राजकारणात अशा राष्ट्राला स्वत:चे महत्त्व सिद्ध करता आले पाहीजे.

४) अशा राष्ट्राला राजकारणातील सर्व निर्णय स्वत:च्या जबाबदारीवर व सामर्थ्यावर घेता आले पाहिजेत.

५) अशा राष्ट्राजवळ अणुशस्त्रास्त्रे निर्माण करण्याचे तंत्रज्ञान असले पाहिजे तसेच अणुशस्त्रास्त्रे असली पाहिजेत.

६) अशा राष्ट्राजवळ आण्विक शस्त्रास्त्रे (Nuclear Weapons) ने-आण करण्यासाठी प्रभावी अशी आधुनिक साधने उपलब्ध असली पाहिजेत.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळाचा आपण जर विचार केला तर त्या काळात केवळ आणि केवळ अमेरिकाच या सर्व कसोट्या पूर्ण करू शकत होते. काही काळाने अमेरिकेच्या या शक्तीला रशियाने आव्हान दिले. अमेरिकेप्रमाणेच अणुबॉम्बचा व हायड्रोजन बाँबचा शोध लावून रशियानेही 'महाशक्ती' म्हणून आपली ओळख निर्माण केली व जागतिक राजकारणात अमेरकिच्या बरोबरीचे स्थान संपादन केले. कालांतराने चीनही या स्पर्धेत उतरला.

## ❑ अमेरिका व रशियाचा महासत्ता म्हणून उदय होण्याची कारणे

### १. दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्लंडचे नेतृत्व संपुष्टात आले :-

दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी-शेवटी जर्मनीने शरणागती स्वीकारली. पण तत्पूर्वी जर्मनीला संपविण्यासाठी इंग्लंड-फ्रान्सने रशिया व अमेरिकेची मदत घेतल्याने हिटलर यांचा पराभव झाला. त्यामुळे आपोआपच जागतिक राजकारणात इंग्लंडचे महत्त्व आणि नेतृत्त्व लयास गेले. दुसऱ्या महायुद्धाचा इंग्लंडवर अतिशय वाईट परिणाम झाला. आर्थिक स्थिती कोलमडली. परिणामी अंतर्गत प्रश्न सोडविण्यातच इंग्लंडने स्वत:ला झोकून घेतले. त्यामुळे त्याला जागतिक राजकारण/प्रश्नांमध्ये फारसे स्वारस्य राहिले नाही.

### २. इंग्लंडच्या आर्थिक व्यवस्थेवर प्रचंड आघात :-

दुसऱ्या महायुद्धापूर्वी इंग्लंड आणि फ्रान्स यांचे साम्राज्य विशाल होते. अनेक ठिकाणी त्यांनी आपल्या वसाहती निर्माण केल्या होत्या. पण दुसऱ्या महायुद्धानंतर चित्र बदलले. या सर्व वसाहतींमध्ये स्वातंत्र्यासाठी मोठ्या प्रमाणात जाणीव-जागृती निर्माण झाली. त्यामुळे या वसाहती इंग्लंडला गमवाव्या लागल्या. त्याचा अप्रत्यक्ष परिणाम इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेवर झाला. पण त्याचवेळी अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धात भाग घेवूनही त्याने कोणत्याही वसाहती गमावल्या नाहीत. शिवाय अमेरिकेकडे प्रचंड पैसा असल्याने अर्थव्यवस्थेवरही फारसा परिणाम झाला नाही.

### ३. अमेरिकेचा दुसऱ्या महायूद्धातील प्रवेश (अलिप्ततावादी धोरणाचा त्याग) :-

दुसऱ्या महायुद्धकाळात अमेरिकेने जाणीवपूर्वक शेवटपर्यंत अलिप्ततावादी धोरण अवलंबिले होते. पण अगदी शेवटच्या टप्प्यामध्ये जगातील हुकूमशहांचा पाडाव केल्याखेरीज लोकशाहीचे संरक्षण होणार नाही याची जाणीव झाल्याने अमेरिकेने युद्धप्रवेश केला. अमेरिकेच्या ताकदीपुढे जर्मनी व जपानला शरणागती स्वीकारण्याशिवाय पर्याय राहिला नाही, आणि एक बलाढ्य राष्ट्र म्हणून अमेरिकेकडे पाहू लागले.

### ४. अमेरिकेशिवाय इतर कोणाकडेही अणुबॉम्ब नव्हता/अमेरिकेचा महासत्ता म्हणून उदय:-

दुसऱ्या महायुद्धकाळात फक्त अमेरिकेलाच अणुबॉम्ब निर्मितीस तंत्रज्ञान माहीत होते. त्यामुळे तेथील वैज्ञानिकांनी गुप्तपणे ते तंत्रज्ञान विकसित करून अणुबॉम्बची निर्मिती केली. तसेच जपानच्या हिरोशिमा व नागासाकीवर अमेरिकेने त्याचा वापर केला. त्या शक्तीने सारे जगच हादरून गेले. परिणामी अमेरिकेला महासत्ता समजले जावू लागले.

### ५. रशियाचा महासत्ता म्हणून उदय :-

अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धकाळात अणुबॉम्ब निर्मितीचे तंत्र आत्मसात केले व त्याचा वापर केला. पण या अणुबॉम्बच्या तंत्र व वापरामुळे रशिया अस्वस्थ झाले. रशियाने आपल्या देशातील वैज्ञानिक व शास्त्रज्ञांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन व अर्थसाहाय्य देवून ते तंत्रज्ञान शिकून घेतले. तसेच हायड्रोजन बॉम्ब व क्षेपणास्त्रांमध्येही प्रगती केली. शिवाय इतर क्षेत्रातही रशिया अमेरिकेप्रमाणेच पुढे-पुढे जात होता. त्यामुळे लवकरच जागतिक राजकारणात रशिया, अमेरिकेचा प्रतिस्पर्धी आणि जागतिक महासत्ता म्हणून उदयाला आला.

अशाप्रकारे द्वितीय महायुद्धानंतर अमेरिका व रशिया या दोन महासत्तांचा उदय झाल्याने जागतिक राजकारणात महत्त्वपूर्ण बदल घडून आला आणि जागतिक राजकारणाचे द्विध्रुवीकरण (Bipolarisation) घडून आले. त्यानंतर या दोन महासत्तांमध्ये शीतयुद्ध सुरू होवून ती दोन्ही राष्ट्रे एकमेकांवर वर्चस्व गाजविण्यासाठी प्रयत्न करू लागली.

### ❑ जागतिक राजकारणाच्या द्विध्रुवीकरणाचे परिणाम :-

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात सत्तेचे जे द्विध्रुवीकरण घडून आले त्याचा जागतिक राजकारणावर काय परिणाम झाला हे पाहणे आवश्यक आहे. कारण या दोन्ही राष्ट्रांचे तत्त्वज्ञान किंवा विचारसरणी या परस्परविरोधी होत्या, रशियाला जगातील सर्व देशात साम्यवादाचा प्रसार करावयाचा होता तर अमेरिकेला ह्या साम्यवादाचा प्रसार थांबवायचा होता. जगातील (युरोप/आशियातील) कोणत्याही देशाने रशियन साम्यवादाच्या आहारी जावू नये अशी अमेरिकेची इच्छा होती. तर त्याचवेळी जगातील जास्तीत जास्त राष्ट्रे साम्यवादाच्या प्रभावाखाली यावीत अशी रशियाची इच्छा होती. त्यातूनच दोन्ही महासत्तांमध्ये कमालीचा संघर्ष निर्माण झाला व तो वाढतच गेला. त्याची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे :-

### १. साम्यवादाचा प्रसार रोखण्यासाठी अमेरिकेने केलेले प्रयत्न :-

अमेरिका हा भांडवलशाही, लोकशाहीचा समर्थक असल्याने त्याने साम्यवाद रोखण्यासाठी महत्त्वपूर्ण अशी दोन धोरणांचा स्वीकार केला. ती खालीलप्रमाणे :-

***(अ) अमेरिकेचे व्यापक आर्थिक धोरण :*** दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात युरोपमध्ये होत असलेला साम्यवादाचा प्रसार रोखण्यासाठी अमेरिकेने ज्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. त्याला 'ताब्यात ठेवण्याचे धोरण' (Policy of containment) असे म्हटले जाते. त्यासाठी अमेरिकेने 'ट्रुमन सिद्धांत' (Truman Doctrine) आणि 'मार्शल योजना' (Marshal Plan) अंमलात आणल्या. या योजनांद्वारे युरोपीय राष्ट्रांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत देण्यात आली. त्यामुळे युरोपीय राष्ट्रांची आर्थिक परिस्थिती बऱ्यापैकी सुधारली. युरोपीय राष्ट्रांच्या प्रभावाखालून मुक्त होवून स्वतंत्रपणे आपले परराष्ट्र धोरण ठरविण्याचा ते विचार करू लागले होते. ग्रीस आणि तुर्कस्थान यांच्या आर्थिक दुर्बलतेचा फायदा घेवून रशिया तेथे साम्यवादाचा प्रसार करेल म्हणून या देशांना अमेरिकेने मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत दिली.

***(ब) अमेरिकेचे लष्करी करारांचे जाळे :*** अमेरिकेने ट्रूमन सिध्दांत आणि मार्शल योजना यांची अंमलबजावणी केल्यानंतर साम्यवादाच्या वाढत्या प्रसाराला रोखण्यासाठी लष्करी गटांची/करारांची साखळी निर्माण करण्याची गरज वाटू लागली. भविष्यात जर रशियाबरोबर युद्धाचा प्रसंग पडलाच तर त्यादृष्टीने युरोपीय राष्ट्रे लष्करीदृष्ट्या सक्षम असावीत असा अमेरिकेचा हेतू होता. त्यातूनच अमेरिकेने नाटो (NATO : North Atlantic Treaty Orgnisation-1949) करार केला. त्याद्वारे अमेरिकेने असे जाहीर केले की, जी राष्ट्रे साम्यवादाच्या प्रभावापासून दूर राहतील आणि ज्यांना लष्करी मदतीची गरज असेल त्यांना ती अमेरिकेकडून दिली जाईल. त्याच धर्तीवर आग्नेय रशियात सिटो (SEATO : South East Asian Collective Defence Treaty Orgnisation) ही लष्करी संघटना स्थापन झाली. साम्यवाद व इतर आक्रमकांच्या विरोधात परस्परात सहकार्य असावे या हेतूने तुर्कस्थान आणि इराक यांच्या बगदाद करारावर सह्या झाल्या व त्यांचेच रूपांतर नंतर सेन्टो (CENTO : Central Treaty Orgnisation) मध्ये झाले. याशिवाय साम्यवादाला रोखण्यासाठीच इस्त्रायलची निर्मितीही करण्यात आली होती.

या अमेरिकेच्या धोरणांमुळे अमेरिकेने महासत्ता म्हणून आपले स्थान टिकवून धरले होते. पण त्याचवेळी रशियाही अमेरिकेला शह देण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते.

## २. अमेरिकेच्या साम्यवादविरोधी धोरणाला स्टॅलिनचे प्रतिउत्तर :-

युरोपीय देशांमध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर होत असलेला साम्यवादाचा प्रसार रोखण्यासाठी अमेरिकेने जे जे प्रयत्न केले ते रशियाला सहन होणार नव्हते. त्यामुळेच स्टॅलिनने अमेरिकेच्या प्रत्येक योजनेला प्रतिउत्तर दिले. अमेरिकेने युरोपीय देशांशी करार करून जसे लष्करी करारांचे जाळे निर्माण केले तसेच रशियाने पूर्व युरोपमध्ये युगोस्लाव्हाकिया, झेकोस्लोव्हाकिया, रूमानिया, बल्गेरिया, हंगेरी, पोलंड इ. साम्यवादी राष्ट्रांचा एक गटच निर्माण केला होता. त्यांच्याशी 'वॉर्सा संरक्षण करार' करून त्यांना लष्करी मदत देण्याची हमी दिली गेली होती. आपल्या गटातील राष्ट्रांची संख्या जास्तीत जास्त कशी वाढेल यासाठी रशिया सतत प्रयत्नशील होते. रशियाने विविध देशातील स्थानिक युद्धांना प्रोत्साहन देवून दोन्ही महासत्तांच्या शक्तीचे परीक्षण करण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच भारत पाकिस्तान संघर्ष, अरब-इस्रायल संघर्ष, व्हिएतनाम व कोरियातील संघर्ष घडून आला असे म्हणता येईल.

यावरून आपण असे म्हणू शकतो की, अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे द्विध्रुवीकरण घडून आले. त्यांच्यातील संघर्ष वाढत जावून तो टोकाला पोचला, त्यातूनच जगाला तिसऱ्या महायुद्धाचा धोका अटळ वाटू लागला; पण दोन्ही महासत्तांना हा धोका टाळायचा असल्याने थोड्याच काळात त्यांनी सामंजस्याचे धोरण स्वीकारले. परिणामी या संघर्षाची तिव्रता कमी झाली. पण तरीही त्या दोन्ही महासत्तांना परस्परांच्या हल्ल्याची भीती वाटत असल्याने छुप्या पध्दतीने त्यांच्यात अंतर्गत संघर्ष धुमसत होता. त्यातूनच स्वत:चे वर्चस्व टिकविण्यासाठी त्यांची धडपड चालू होती. पुढे रशियामध्ये महत्त्वपूर्ण नेतृत्त्वबदल घडून आले, त्यांचे अंतर्गत परराष्ट्रीय धोरण बदलते, त्याचा परिणाम जागतिक राजकारणावर होणे अपरिहार्य होते. या सर्व बदलांमध्ये रशिया सत्तास्पर्धेत मागे पडत गेला तर अमेरिका स्वत:च्या डावपेचांनी स्वत:चे वर्चस्व

टिकविण्यात यशस्वी झाला. परिणामी भविष्यात अमेरिका एकमेव महासत्ता म्हणून टिकून राहिला. हे सर्व बदल घडत असताना जागतिक राजकारणात महत्वाच्या घडामोडी घडून आल्या. त्यातूनच जेव्हा 'एकमेव महासत्ता' म्हणून अमेरिकेकडे सारे जग पाहू लागले, तेव्हा जागतिक राजकारणाचे 'एकध्रुवीकरण' (Unipolarisation) घडून आले. यादरम्यान ज्या घडामोडी घडल्या, त्याचा आपण आता आढावा घेणार आहोत.

## ❑ **एकध्रुवीय जागतिक पद्धत** (Unipolar World System)

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व रशिया या दोन देशांचे महत्व वाढले, त्यांच्या शस्त्रास्त्र स्पर्धा व सत्ता स्पर्धा सुरू झाली, त्यातूनच शीतयुद्धाला प्रारंभ झाला. सीतयुद्धाच्या प्रारंभीच्या काळात स्वत:चे 'महासत्ता' म्हणून जागतिक राजकारणात असलेले स्थान टिकवून ठेवण्यासाठी दोन्ही देशांनी विज्ञान, तंत्रज्ञान, अणुबॉम्ब, लष्कर इ. सर्वच बाबतीत मोठ्या प्रमाणात प्रगती केली. आपआपल्या राष्ट्रांचे गट निर्माण केले. त्यांच्याशी लष्करी करार केले. दोन्ही देशांना एकमेकांच्या हल्ल्याची भीती होती. त्यांच्यामध्ये प्रचंड तणावाची परिस्थिती होती. त्यातूनच तिसऱ्या महायुद्धाची चाहूल/भीती दोघांनाही जाणवू लागली. पण त्यांना ते संकट नको होते. म्हणून त्यांनी शहाणपणाने ही परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न केला. परिणामी बऱ्याच काळानंतर हा तणाव काही प्रमाणात का असेना कमी झाला. हा तणाव कमी होण्यासाठी जे घटक कारणीभूत होते त्याची आपण इथे थोडक्यात चर्चा करू कारण त्यातूनच रशियातील राजकारण व नेतृत्व आणि त्यांची धोरणे बदलली. परिणामी जागतिक राजकारणात रशियाची ताकद कमी होवून अमेरिकेचे वर्चस्व कायम राहिले व एकध्रुवीय जागतिक पद्धत अस्तित्वात आली. खालील काही महत्त्वपूर्ण घटनांमुळे अमेरिका व रशिया यांच्यातील तणाव कमी झाल्याचे दिसून येते.

### १. रशियातील नेतृत्वबदल :-

रशियाच्या इतिहासात १९५३ मध्ये एक घटना घडली की ज्यामुळे तेथे महत्त्वपूर्ण बदल घडून आले, ती घटना म्हणजे सोव्हिएत रशियाचे पंतप्रधान स्टॅलिन यांचे निधन होय. ते हट्टी वृत्तीचे असून हुकूमशाही पद्धती अवलंबणारे होते. ते असेपर्यंत कोणीही साम्यवादाविरोधी बोलण्याचे/कृती करण्याचे धाडस केले नव्हते. पण त्यानंतर कुश्चेव्ह सत्तेवर आले. त्यांनी जागतिक राजकारणातील बदल आणि प्रगती ओळखून 'जगा आणि जगू द्या' या तत्वाचा अंगीकार केला आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी 'शांततापूर्ण सहअस्तित्वाचे' धोरण स्वीकारले. त्यामुळे रशियन लोकांना विचार स्वातंत्र्य मिळाले, या बदललेल्या परराष्ट्र धोरणाचा परिणाम म्हणजे अमेरिका व रशिया यांच्यातील तणाव कमी झाला.

### २. जागतिक प्रश्न चर्चेने सोडविण्यावर भर :-

शीतयुध्दकाळात जेव्हा युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यासारखे वाटत होते, तेव्हा ती परिस्थिती टाळण्यासाठी दोन्ही महासत्तांना असे वाटू लागले की, जागतिक पातळीवरील सर्वच प्रश्नांकरिता संघर्ष न करता ते चर्चेनेच सोडविले जावेत, अगदीच गरज पडण्यास महासत्तांच्या प्रमुखांनी त्यासाठी शिखर परिषदा

आयोजित करून त्याद्वारे चर्चा करून असे प्रश्न मिटविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचा परिणाम असा झाला की, या दोन्ही दोशातील संघर्षाची भूमिका मागे पडत गेली.

### ३. साम्यवादी चीनचे महासत्तांना आव्हान :-

शीतयुद्धकाळातच १९४९ मध्ये आशियातील चीनमध्ये माओ-त्से-तुंग यांच्या नेतृत्वाखाली साम्यवादी क्रांती होवून 'साम्यवादी चीन'चा उदय झाला. त्यानंतर चीनमध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती होवून सर्व क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून आले. चीन लष्करी तसेच आर्थिकदृष्ट्या प्रबळ झाला. त्यामुळे उदयोन्मुख तिसरी जागतिक महासत्ता म्हणून जग चीनकडे पाहू लागले. चीनचा वाढता प्रभाव म्हणजे अमेरिका-रशिया एक मोठे आव्हानच होते. त्यांच्या एकाधिकाराला तो मोठा धक्काच होता. त्यामुळे दोन्ही महासत्तांनी सहअस्तित्वाचे धोरण स्वीकारले.

### ४. क्युबाचे संकट आणि क्रुश्चेव्ह यांचे शहाणपणाचे धोरण :-

शीतयुद्धकाळात जे अतिशय गंभीर असे पेचप्रसंग निर्माण झाले, त्यामध्ये क्युबाचा पेचप्रसंग हा सर्वात गंभीर समजला जातो. रशियाने क्युबामध्ये अनेक क्षेपणास्त्रे तसेच त्यांची केंद्रे निर्माण केली होती. क्युबा आणि अमेरिका यांच्यातील अंतर अतिशय कमी होते. त्यामुळे अमेरिकेची सुरक्षितता धोक्यात आली. २२ ऑक्टोबर १९६२ मध्ये अमेरिकन अध्यक्ष केनेडी यांनी क्युबाची नाविक नाकेबंदी करून तेथे कोणतीही लष्करी मदत पोहचू नये अशी व्यवस्था केली. पण केनेडींच्या या भूमिकेमुळे रशिया नाराज झाला आणि केनेडींच्या आदेशाला डावलून क्युबात शस्त्रास्त्रे पाठविण्याचा निर्णय घेतला. यावेळी केनेडींनी ही क्षेपणास्त्रे ताबडतोब तेथून काढून घेण्याची मागणी केली. रशियाने त्यास नकार दिल्यास युद्ध होणार की काय या भीतीमध्ये सारे जग वावरत होते. पण रशियाचे पंतप्रधान क्रुश्चेव्ह यांनी जागतिक शांततेचा विचार करून शहाणपणाचे धोरण स्वीकारून क्युबातून क्षेपणास्त्रे काढून घेतली. त्यामुळे दोन्ही महासत्तांमधील तणाव कमी झाला.

### ५. अणुबॉम्ब निर्मिती तंत्रज्ञानाची अमेरिकेची एकाधिकारशाही संपुष्टात :-

अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धात जपानवर अणुबॉम्ब टाकला आणि सारे जगच हादरून गेले. कारण त्यावेळी हे तंत्रज्ञान केवळ अमेरिकेलाच माहीत हाते. पण शीतयुद्धकाळात रशियानेही या तंत्रज्ञानाचा शोध लावला. त्यानंतर हळूहळू सर्वच राष्ट्रांनी अणुविधा व अणुशक्तीचा शोध लावून त्याचा आपल्या लष्करात समावेश केला. त्यामुळे त्याचा आंतरराष्ट्रीय राजकारणावर परिणाम झाला. या क्षेत्रातील अमेरिकेची एकाधिकारशाही/मक्तेदारी संपुष्टात आली. परिणामी अमेरिका-रशिया यांच्यातील संघर्षाची तीव्रता कमी झाली.

या सर्व चर्चेवरून असे लक्षात येते की, १९६२ पर्यंत दोन महासत्तांमधील संघर्षाची तीव्रता बऱ्यापैकी कमी झालेली होती. १९६३ मध्ये दोन्ही महासत्तांमध्ये परस्परांच्या मदतीसाठी 'हॉट लाईन' प्रस्थापित केली गेली. त्यानंतर अमेरिका-रशियाने अणुचाचण्यांवर अंशत: बंदी घातली. त्यामुळे दोन महासत्तांमधील संघर्षाची तीव्रता कमी झाली असली तरी साम्यवादी चीन विरुद्ध साम्यवादी रशिया यांच्यात संघर्ष निर्माण

होवून शीतयुद्धाचे स्वरूप बदलले. त्यातच रशियाचे नेतृत्व ब्रेझनेव्ह, आंद्रेपोव, चर्नेको आणि नंतर गोर्बाचेव्ह यांच्याकडे गेले. परिणामी रशियाच्या परराष्ट्र धोरणात मोठा फरक पडला. त्याचा आंतरराष्ट्रीय राजकारणावर परिणाम होवून अमेरिकेने वर्चस्व अबाधित राहिले आणि जागतिक राजकारण हे द्विध्रुवीय जागतिक पद्धतीतून एकध्रुवीय जागतिक पद्धतीच्या रूपाने अस्तित्वात आले. कारण आता अमेरिका ही एकमेव महासत्ता राहिली. त्याची कारणे खालीलप्रमाणे :-

## ४.२.२.३ जागतिक राजकारणात एकमेव महासत्ता म्हणून अमेरिकेचा उदय

### १. अमेरिकेची विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगती :-

दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारले होते. पण तरीही ते श्रीमंत राष्ट्र असल्याने भविष्यातील धोका ओळखून त्याने स्वत:ला लष्करी व शस्त्रास्त्रदृष्ट्या अतिशय सक्षम केले होते. पैशाच्या जोरावर त्याने विज्ञान-तंत्रज्ञान, अवकाश संशोधन, अणु-विज्ञान, हायड्रोजन बॉम्ब, क्षेपणास्त्रे, चहांवरील शोध इ.मधील संशोधनासाठी वैज्ञानिक व शास्त्रज्ञांना प्रोत्साहन दिले. परिणामी ह्या क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती होवून अमेरिका एक बलाढ्य देश/महासत्ता म्हणून जगाचे नेतृत्व करण्यासाठी समर्थ ठरला.

### २. दुसऱ्या महायुद्धानंतर दुर्बळ झालेली राष्ट्रे :-

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स व चीन या राष्ट्रांमध्ये महासत्तापद मिळविण्यासाठी स्पर्धा सुरू झाली. पण युरोपीय राष्ट्रांना स्वत:च्या देशातील प्रश्न सोडविणेच कठिण झाले. त्यामुळे केवळ अमेरिका व रशियामध्ये ही स्पर्धा राहिली. पण रशियासमोरही अनेक संकटे होती. तर अमेरिका व रशियाच्या सत्तास्पर्धेत चीन दुर्लक्षित राहिला. या दोन महासत्तांमध्ये जे शीतयुद्ध झाले, त्यामध्ये शेवटी रशियाला माघार घ्यावी लागली, सोव्हिएत संघराज्य यातील साम्यवाद संपुष्टात आला आणि शीतयुद्ध संपले. त्याचवेळी अमेरिकेला आव्हान देणारे कोणतेच राष्ट्र पुढे न आल्याने आपोआपच अमेरिका एकमेव महासत्ता म्हणून अस्तित्वात आले. त्यानंतर आपले हे अस्तित्व टिकविण्यासाठी अमेरिकेने अनेक आंतरराष्ट्रीय प्रश्नांमध्ये हस्तक्षेप करण्याचे धोरण स्वीकारले. उदा. अरब-इस्राईल वादात समेट घडविण्यासाठी केलेला 'कॅम्प डेव्हिड करार', युगोस्लाव्हियातील हिंसाचार थांबवणे, सर्ब, क्रोट व इस्लामधर्मीय यांच्यातील यादवी थांबवणे, यासाठी अमेरिकेने संयुक्त राष्ट्रांकरवी केलेली मदत, भारत-पाकिस्तान यांच्यात मध्यस्थी करण्यासाठी तर नेहमीच काश्मीर प्रश्नात हस्तक्षेप करण्याचे धोरण स्वीकारले. पण भारताकडून अमेरिकेस अपेक्षित सहकार्य न मिळाल्याने अमेरिकेच्या महासत्तापदास आव्हान मिळत गेले.

### ३. अमेरिकेचे महासत्तापद अमान्य करणारी राष्ट्रे/अमेरिकेस प्रतिआव्हाने :-

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेला सहजपणे महासत्तापद मिळाले असले तरी रशियाने मात्र ते स्वत:च्या सामर्थ्याने मिळवले होते. काही अपरिहार्य परिस्थितीमुळे रशियाला ते गमवावे लागले. पण जगातील अनेक लहान-मोठ्या राष्ट्रांनाही अमेरिकेचे वर्चस्व अमान्य असल्याने त्यांनी अमेरकिच्या सूचना,

धमक्यांना भीक घातली नाही. तेथे अमेरिकेला माघार घ्यावी लागली. आर्थिक स्तरावर तर जपानसारख्या लहान राष्ट्राने व्यापारात अमेरिकेला जेरीस आणले आहे. पश्चिम व पूर्व जर्मनीतील समस्यांचे निराकरण झाल्यास जर्मनी सुद्धा आर्थिक महासत्ता स्पर्धेत येवू शकतो. चीन तर प्रगतीच्या सर्वच क्षेत्रात पुढे आहे. त्यामुळे अमेरिका चीनला दचकूनच आहे. ज्या शस्त्रास्त्रांच्या जोरावर अमेरिका महासत्तापदाचा डंका वाजवते तितकाच साठा रशियाकडेही आहे आणि कोणत्याही क्षणी गरज पडल्यास रशिया अमेरिकेला शह देवू शकते. त्यामुळे अमेरिका रशियालाही घाबरला आहे. पण तरीही आपले महासत्तापद टिकवून ठेवण्यासाठी अमेरिकेची धडपड चालू आहे.

## ४. रशिया–चीन सामंजस्य करार (१९९७) :–

'नाटो' संघटनेद्वारे अमेरिकेने रशिया व चीन यांच्या सीमेवर आपले लष्कर ठेवण्याचा प्रयत्न केला. पण जगात यापुढे कोणत्याही राष्ट्राची दादागिरी/एकाधिकारशाही खपवून घेतली जाणार नाही हे दाखवून देण्यासाठी रशिया–चीन यांच्यात हा सामंजस्य करार करण्यात आला. 'अलिप्त राष्ट्रांच्या चळवळीची' प्रशंसा यामध्ये करण्यात आली. या करारात असे म्हटले गेले की, जग हे एकाच महासत्तेभोवती केंद्रित न होता, सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. त्यामुळे हा करार म्हणजे अमेरिकेच्या महासत्तेला मोठे आव्हानच होते. कारण त्याद्वारे रशिया व चीन या महासत्तेचा दावेदार म्हणून उभ्या राहिल्या होत्या. अमेरिकेला त्यांची धास्ती होतीच पण तरीही आपले महासत्तापद टिकविणे हेही अमेरिकेपुढील मोठे आव्हान होते. त्यासाठी ते प्रयत्नशील होते.

## ५. अध्यक्ष बिल क्लिंटन व अमेरिकेची धोरणे (१९९२–२०००) :–

जॉन एफ. केनेडीनंतर अमेरिकेचे सर्वात तरुण अध्यक्ष म्हणजे बिल क्लिंटन होय. उत्साही, प्रभावी व्यक्तीमत्व, प्रभावशाली वक्तृत्व व आक्रमकता इ. गुणांमुळे त्यांनी आपल्या आठ वर्षाच्या काळात जागतिक राजकारणात आपली वेगळी ओळख निर्माण केली. क्लिंटन सत्तेवर आल्यावर सर्वात महत्त्वाचा बदल घडून आला तो म्हणजे सोव्हिएत संघराज्याचे विभाजन या विभाजनामुळे जवळजवळ ३०–४० वर्षे समर्थपणे उभ्या राहिलेल्या रशियाला आपले महासत्तापद गमवावे लागले. त्यामुळे क्लिंटन यांना जागतिक राजकारणात वेगवेगळ्या खेळी खेळण्यास मैदान मोकळे झाले. १९९२–१९९५ या पहिल्या चार वर्षात त्यांचे जागतिक राजकारणात निर्विविवाद वर्चस्व होते. पण १९९६–२००० या दुसऱ्या चार वर्षात अमेरिकेच्या महासत्तापदास प्रति आव्हाने देणारे देश पुढे आले. क्लिंटनसमोर अतिपूर्वेकडील चीनचे नवे आव्हान उभे होते. त्यातच रशियासी चीनने संधान बांधून त्यांच्यात सामंजस्य करार करून आला. क्लिंटन यांना रशिया–चीन यांची ही खेळी अनपेक्षित होती. त्यामुळे काही काळ ते गोंधळले, आणि त्यातूनच त्यांचे आक्रमक धोरण उदयाला आले.

## ६. अमेरिकेची इराकबाबतची भूमिका :–

ऑगस्ट १९९० मध्ये इराकने कुवैतवर आक्रमण केले. पण जॉर्ज बुश यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या

नाममात्र सहमतीने या आक्रमणाचा प्रतिकार केला आणि फेब्रुवारी १९९१ मध्ये कुवैतला इराकच्या तावडीतून सोडवले. पण अमेरिकेची ही इराकमधील एकतर्फी कारवाई होती. त्यामुळे पश्चिम आशियात अमेरिकेचे वर्चस्व निर्माण झाले. इराकने अमेरिकेच्या क्षेपणास्त्रांसमोर शरणागती स्वीकारली. पण सद्दाम हुसेनच्या जिद्दी स्वभावामुळे इराकचा कायमचा बंदोबस्त करणे शक्य नव्हते. १९९१ नंतर क्लिंटनने संयुक्त राष्ट्रसंघाच्या पाठिंब्यामुळे इराकवर वारंवार बॉम्बहल्ले केले, पण सद्दाम हुसेन त्यांच्यापुढे झुकला नाही. पण इराकविरुध्द अरब राष्ट्रांची फळी उभारण्याचा अमेरिकेचा प्रयत्न चालूच आहे.

## ७. क्लिंटन यांचे दुसरे पर्व (अमेरिकेचा महासत्तापद टिकविण्यासाठीचे प्रयत्न/कुटनिती) :-

क्लिंटन यांनी आपल्या दुसऱ्या पर्वात (१९९६-२०००) आपले महासत्तापद टिकविण्यासाठी व युरोपीय राष्ट्रांना दहशत बसावी. म्हणून 'नाटो'चा सदस्य या नात्याने युगोस्लाव्हियात हस्तक्षेप केला. युगोस्लाव्हिया नष्ट करण्याची अमेरिकेची बऱ्याच काळापासूनची इच्छा होती. १९८० मध्ये मार्शल टिटोंच्या मृत्यूनंतर अमेरिकेने उदारीकरण व राजकीय विकेंद्रीकरण यांच्या नावाखाली युगोस्लाव्हियातील राज्यांमध्ये वांशिक, धार्मिक, प्रांतिक मतभेदांना खतपाणी घातले, त्यांना यादवी युद्धासाठी भडकावले. त्यातूनच १९९१ मध्ये युगोस्लाव्हियात यादवी युद्ध सुरू झाले. म्हणजेच सोव्हिएत युनियनचे विघटन आणि शीतयुद्धाचा अखेरचा टप्पा या काळात अमेरिका अधिक आक्रमक व विध्वंसक व हिंस्रपणे प्रकट होवू लागली. अमेरिकेने २३ मार्च ते १० जून, १९९९ या काळात युगोस्लाव्हियात केलेला बॉम्बवर्षाव अतिशय तीव्र स्वरूपाचा होता. त्यामध्ये सामान्य नागरिक होरपळून निघाले. म्हणजेच अमेरिकेला वाटाघाटीच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्याऐवजी आपले शक्तीप्रदर्शन करणे महत्त्वाचे वाटते. अशा हिंस्र वृतीतून जगावर दहशत बसवण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे. या कृतीचा कडक शब्दात निषेध करण्याचे धाडस चीनव्यतिरिक्त कोणत्याही देशाने दाखवले नाही.

## ८. अमेरिकेचे महासत्तापद/एकाधिकारशाही अबाधित :-

कोणत्याही महासत्तेच्या गटात जायचे नाही आणि आपले सार्वभौमत्व गहाण ठेवायचे नाही या हेतूने भारताचे पं.नेहरू, युगोस्लाव्हियाचे मार्शल टिटो व इजिप्तचे अब्दुल गमाल नासर यांच्या पुढाकाराने 'अलिप्त राष्ट्रांची चळवळ' (NAM) सुरू झाली. जागतिक राजकारणात वर्चस्ववाद विरोधी ही तिसरी शक्ती उभी होती. मार्शल टिटो जिवंत होते, तोपर्यंत या तिसऱ्या शक्तीचे अमेरिका-रशिया यांच्यासमोर मोठे आव्हान होते. पण त्यांच्या निधनानंतर (१९८०) सोव्हिएत युनियनचे विघटन व पूर्व युरोपीय साम्यवादी राजवटींची अखेर यामुळे ही तिसरी शक्ती कमजोर होवून तिचे अस्तित्व कमी झाले. रशियाही शांतच आहे. त्यामुळ १९९० नंतर अमेरिका जॉर्ज बुश, बिल क्लिंटन यांच्यासारखे नेतृत्व, आण्विक शक्ती व आर्थिक पाठबळ यांच्या जोरावर जगावर प्रभुत्व गाजवत आहे. जागतिक राजकारणातील कोणतीही घटना अमेरिकेच्या संमतीशिवाय घडू शकत नव्हती, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. अमेरिकेने प्रत्येक आंतरराष्ट्रीय प्रश्नांत हस्तक्षेप करून आपल्या साम्राज्यवादी धोरणाला अनुकूल असणाऱ्या राष्ट्रांच्या बाजूनेच बोलण्याची भूमिका घेतली आहे. तसेच अमेरकिच्या आर्थिक मदतीवर अवलंबून असणाऱ्या देशांची अनेक निर्बंधाद्वारे

गळचेपी केलेली दिसून येते. त्यामुळेच इ.स. २००० पर्यंत तरी अमेरिकेने आपले महासत्तापद टिकवून ठेवलेले दिसून येते.

### ९. क्लिंटन यांची भारत-पाकिस्तान भेट (२०-२४ मार्च,२००० (भारत), २५ मार्च २००० (पाकिस्तान) :-

क्लिंटन यांच्या भारतभेटीवेळी अण्वस्त्रप्रसार व अणुचाचणी बंदी करार (सीटीबीटी) बाबत दोन्ही देशांची विशिष्ट भूमिका होती. त्यामुळे क्लिंटन यांनी याबाबत भारतावर कोणताही दबाव आणला नाही. पण मैत्री पातळीवर झालेल्या बैठकीत, भारताने सीटीबीटीवर स्वाक्षरी केल्यास भारतावर लादण्यात आलेले निर्बंध कमी करण्यात येतील, असे स्पष्ट करण्यात आले. अण्वस्त्राने शांतता प्रस्थापित होईल की नाही हे भारताने स्वत: ठरवावे असे त्यांचे मत होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अमेरिकेबरोबर भारताचे व्यापारी व अन्य क्षेत्रघातील संबंध सुधारले तरी काश्मीर प्रश्नाचे काय होणार? कारण भारताला याबाबतीत अमेरिकेची मध्यस्थी मान्य नाही. त्यामुळे काश्मीर प्रश्न तसाच राहण्याची शक्यता आहे. क्लिंटन यांनी २५ मार्च २००० रोजी पाकिस्तानात केलेल्या भाषणात दहशतवाद थांबविण्याचा पाकिस्तानला खणखणीत इशारा दिला होता. तसे न केल्यास अमेरिकेची मदत मिळणार नाही असे स्पष्टपणे सांगितले, तरीही काश्मीर प्रश्न आणि पाकिस्तानात लोकशाहीची पुर्नस्थापना याबाबत मुशर्रफ यांच्याकडून क्लिंटन यांना कोणतेच ठाम आश्वासन मिळाले नाही.

वरील सर्व चर्चेवरून असे लक्षात येते की, एकमेव महासत्ता म्हणून अभिमान असणाऱ्या अमेरिकेने विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जगातील प्रत्येक राष्ट्रांच्या समस्येत हस्तक्षेप करून तेथे प्रभुत्व गाजवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. उदा. तैवानचे स्वातंत्र्य, पॅलेस्टाईन-इस्त्राइल मध्यस्थी, अफगाणिस्तानातील तालिबान राजवट इ. जागतिक राजकारणातील अमेरिकेचा हा हस्तक्षेप पाहून असे दिसते की, जोपर्यंत तिच्याकडे आण्विक शक्ती व आर्थिक भक्कम पाठबळ आहे तोपर्यंत ती एकमेव महासत्ता म्हणून आपले अस्तित्व टिकवून ठेवेल.

२० जानेवारी २००१ रोजी जॉर्ज बुश (ज्युनिअर) यांनी सत्ताग्रहण केले. त्यानंतर त्यांची कारकिर्द पाहिल्यास असे दिसते की, विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात अमेरिकेने सुरू केलेली दादागिरी एकविसाव्या शतकातही अव्याहतपणे चालू राहिली पाहिजे, हेच बुश यांच्या परराष्ट्र धोरणाचे सूत्र होते. मे, २००१ मध्ये अमेरिकेने 'राष्ट्रीय क्षेपणास्त्र सुरक्षा प्रणाली' जाहीर करून, जागतिक पातळीवर 'फोडा आणि झोडा' नीतीचा अवलंब केला. रशिया-चीन, रशिया-युरोप, युरोपीय राष्ट्रे इत्यादीमध्ये मतभेद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पण ११ सप्टेंबर २००१ चा वर्ड ट्रेड सेंटरवरील दहशतवादी हल्ल्याने अमेरिकेच्या महासत्तापदास जबरदस्त धक्का दिला. त्यावेळी अफगाणिस्तानातील तालिबान राजवटीत कार्यरत असलेल्या ओसमा-बीन लादेन याला जबाबदार धरून ७ ऑक्टोबर २००१ रोजी 'शाश्वत न्यायासाठी कारवाई' या नावाखाली लादेन व दहशतवादी संघटना यांच्याविरोधात युद्ध पुकारले. तसेच मार्च २००३ चा अमेरिकेचा इराकवरील हल्ला, अमेरिकेची सिरीया, इराण, उत्तर कोरिया, चीन, रशिया यांना पायदळी तुडविण्याची

इच्छा व त्यासाठीचे प्रयत्न, अमेरिकेची आंतरराष्ट्रीय पातळीवरील दादागिरी आणि विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती इत्यादीच्या जोरावर तिने एकविसाव्या शतकातही आपले 'एकमेव महासत्ता' हे स्थान अढळ ठेवले आहे. तरीही फ्रान्स, जर्मनी, रशिया, चीन आणि सध्याची परिस्थिती पाहता कदाचित भारतही महासत्तापदाला प्रतिआव्हान देण्यासाठी तयार राहतील.

### स्वयं-अध्ययन प्रश्न-२

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. दुसऱ्या महायुद्धानंतर ........... या दोन देशांचा महासत्ता म्हणून उदय झाला.
*(अ) इंग्लंड, फ्रान्स (ब) रशिया, फ्रान्स (क) अमेरिका, रशिया (ड) चीन, जपान.*

२. जागतिक राजकारणात साम्यवादाचा प्रसार रोखण्यासाठी ............. या राष्ट्राने 'ट्रमन सिद्धांत' व 'मार्शल योजना' अंमलात आणल्या.
*(अ) अमेरिका (ब) रशिया (क) चीन (ड) जपान.*

३. इ.स. ............. साली अमेरिकेने 'नाटो' हा लष्करी करार केला.
*(अ) १९४६ (ब) १९४७ (क) १९४८ (ड) १९४९.*

४. ............... या राष्ट्राने पूर्व युरोपातील साम्यवादी राष्ट्रांना लष्करी मदत देण्याच्या बाजूने 'वॉर्सा संरक्षण करार' केला.
*(अ) इंग्लंड (ब) फ्रान्स (क) रशिया (ड) अमेरिका.*

५. सारे जग जेव्हा 'एकमेव महासत्ता' म्हणून ........... कडे पाहू लागले, तेव्हा जागतिक राजकारणाचे 'एकध्रुवीकरण' घडून आले.
*(अ) अमेरिका (ब) इंग्लंड (क) रशिया (ड) चीन.*

## ४.२.३ जागतिकीकरण : अर्थ, स्वरूप आणि मानवी जीवनावरील परिणाम

### ४.२.३.१ जागतिकीकरण : अर्थ व स्वरूप

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात अमेरिका व रशिया या दोन महासत्तांमध्ये शीतयुद्ध सुरू झाले. १९९१ नंतर शीतयुद्ध संपुष्टात आले. त्याचवेळी साम्यवादी अर्थव्यवस्था कोसळल्यामुळे, पूर्व युरोप व रशिया हे देश तसेच तिसऱ्या जगातील देशांची अर्थनीती फसल्यामुळे अमेरिकेच्या नेतृत्वाखालील भांडवलशाहीला ह्या अर्थव्यवस्थांना खुल्या बाजारपेठीय अर्थव्यवस्थेत ओढून घेणे व त्यामध्ये प्रवेश करणे शक्य झाले. शीतयुद्धाच्या समाप्तीमुळे खऱ्या अर्थाने जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करण्यास आवश्यक असणारी राजकीय स्थिती निर्माण झाली. त्यामुळेच शीतयुद्ध समाप्तीनंतरच्या काळातील आर्थिक व राजकीय घडामोडी आणि तंत्रज्ञानातील प्रगती इत्यादीमुळे एक नवी जागतिक अर्थव्यवस्था निर्माण होवू

लागली; म्हणजेच आर्थिक व्यवहारांचे जागतिकीकरण होवू लागले, तर संगणक व दूरसंचार यामधील प्रगतीमुळे अर्थकारणाचा वेग वाढला, जगातील वेगवेगळ्या भागातील समाज, संस्कृती व लोक एकमेकांशी अधिक जोडले जावू लागले, जगाच्या एका भागात घडणाऱ्या घटनांचा परिणाम आणि प्रभाव जगातील लांब-लांबच्या समाज व लोकांवर पडू लागला. याच प्रक्रियेला आपण 'जागतिकीकरण' असे म्हणतो. ही केवळ वर्णनात्मक नसून ती एक विचार प्रणालीसुद्धा दर्शविते. त्यानुसार जागतिकीकरण ही एक उपाययोजना आहे, ती वर्तमानकालीन विचारांवर, धोरण निश्चितीवर व राजकीय व्यवहारांवर वर्चस्व गाजवते.

थोडक्यात, जागतिकीकरण हे आंतरराष्ट्रीय व्यापार, माहीती व तंत्रज्ञान, भांडवल यांच्या एकाच जागतिक बाजारपेठेत होणाऱ्या वाढत्या व्याप्ती व खोलीचे निदर्शन करते.

आता आपण जागतिकीकरण ही संज्ञा समजून घेण्यासाठी जागतिकीकरणाच्या काही व्याख्या पाहू.

**१. डॉ. दिपक नायर :-**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जगातील विविध राष्ट्रांना परस्परावलंबी अशा आर्थिक व्यवहारात भाग घ्यावा लागतो, त्यासाठी परस्परांचे सहकार्य आवश्यक असते. डॉ. दिपक नायर यांच्या मते, ''राष्ट्रराज्यांच्या भौगोलिक सीमांपलीकडे जावून आर्थिक व्यवहारांचा झालेला विस्तार म्हणजे जागतिकीकरण होय.''

**२. श्रवणकुमारसिंग :-**

''जागतिकीकरण म्हणजे सर्व राष्ट्रांची एक बाजारपेठ निर्माण करणे आणि त्या बाजारपेठेत जगातील साधनसामग्रीचे आणि भांडवलाचे सुलभ परिचलन निर्माण करणे होय.''

**३. चार्लस हिल :-**

या अर्थतज्ञांच्या मते, ''जागतिकीकरण म्हणजे अधिक एकात्मता आणि परस्परावलंबन या दिशेने जागतिक अर्थव्यवस्थेत झालेला बदल होय.''

**४. प्रा. देवेंद्र अवस्थी :-**

यांच्या मते, ''बाजाराधिष्ठित आर्थिक विकासाच्या डावपेचातून जागतिकीकरणाचे धोरण अस्तित्वात आले. जागतिकीकरणात आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक वातावरणाशी राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा समन्वय साधण्याचा प्रयत्न होतो.''

**५. रूसी मोदी :-**

यांनी 'खुली स्पर्धा' आणि 'जगाची एकच बाजारपेठ' या जागतिकीकरणाच्या दोन वैशिष्ट्यांवर भर देताना असे म्हणतात की, ''जागतिकीकरण म्हणजे नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून उत्पादनात वाढ करणे व त्यायोगे खुल्या स्पर्धेस वाव देणे आणि जागतिक बाजारपेठेत त्याची विक्री करणे होय.''

वरील सर्व व्याख्यांच्या अभ्यासावरून आपण असे म्हणू शकतो की, जागतिकीकरण म्हणजे

'जागतिक अर्थव्यवस्था' निर्माण करणे होय. जागतिक बँकेच्या मते, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण करणे, सर्व वस्तूंच्या आयातीवरील निर्बंध टप्प्याटप्प्याने रद्द करणे व आयात कमी करणे ही जागतिकीकरणाची उद्दिष्ट्ये असावीत.

## ४.२.३.२ जागतिकीकरणाच्या प्रक्रियेस चालना देणारे महत्त्वाचे घटक

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेस खरी गती आली ती विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील शेवटच्या तीन दशकांत आला. कारण या काळात इंटरनेट व इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांचा वापर जगभर वाढला. जग हे 'जागतिक वेडे' (Global Village) झाले. त्यामुळेच या प्रक्रियेस चालना देणारे घटक अभ्यासणे आवश्यक आहे, ते खालीलप्रमाणे :-

१) जागतिकीकरणामुळे बाजाराचा व्याप व विस्तार वाढल्याने कंपन्यांना आपल्या उत्पादनासाठी कोणत्याही एका देशाच्या मागणीवर अवलंबून राहावे लागत नाही.

२) औद्योगिक उत्पादनाच्या पद्धती व टप्पे देशनिहाय भिन्न असतात, त्यामुळे कंपन्या आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरेल अशा देशात आपले उद्योग सुरू करू शकतात.

३) ज्या देशाकडे अतिरिक्त साधनसंपत्ती आहे, त्या देशांना त्या साधनसंपत्तीचा योग्य प्रकारे उपयोग करणे शक्य असते.

४) कोणत्याही वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर करणे जागतिकीकरणामुळे शक्य होते. त्यामुळे उत्पादन खर्च कमी येतो व गुणवत्ताही सुधारते.

५) सुलभ आर्थिक व्यवहारांमुळे व्यक्तीची क्रयशक्ती वाढून लोकांच्या राहणीमान सुधारते.

६) विविध देशातील नवनवीन बाजारपेठा शोधून काढण्यास चालना मिळते.

७) जागतिकीकरणामुळे विविध देशात पसरलेल्या कंपन्यांमुळे रोजगारनिर्मितीच्या संधी उपलब्ध होतात.

८) जागतिकीकरणामुळे जगातील भिन्न-भिन्न देशांतील संस्कृतींचा प्रथम परस्परांवर वेगाने होवून सांस्कृतिक परिवर्तन होण्यास चालना मिळते.

आज जागतिकीकरणामुळे अमेरिका आणि इतर पाश्चात्य प्रगती देश विकसनशील देशातील स्वस्त श्रमशक तीचा वापर करून घेताना दिसतात. त्यामुळेच जागतिकीकरणाच्या बाजारपेठेत स्पर्धेच्या परिपूर्ण तयारीने उतरणे हाच मार्ग सर्व देशांनी अवलंबणे अत्यावश्यक आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिकीकरणाची प्राचीन परंपरा आहे. रामायण-महाभारताचा काळ असो की, सिंधु-संस्कृतीचा असो भारतीय अर्थव्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्थेशी संलग्नित असलेली दिसून येते. गुप्त काळात तर पूर्वेकडील देशांबरोबर भारताचा व्यापार तेजीत होता. जुलै १९९१ पासून भारताने

आपल्या अर्थव्यवस्थेस जागतिकीकरणाच्या दिशेने नेण्यासाठी प्रयत्न सुरू होते. भारतातील जागतिकीकरण व उदारीकरणाच्या धोरणाचे उद्‌गाते म्हणजे डॉ. मनमोहन सिंग होत. पंतप्रधान पदावर आल्यानंतर त्यांनी मोठ्या धैर्याने भारतीय अर्थव्यवस्थेसाठी जागतिकीकरणाचा स्वीकार केला. तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव व अर्थमंत्री मनमोहनसिंग यांचे यात मोठे योगदान आहे.

विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात माहिती आणि तंत्रज्ञान या क्षेत्रातील प्रगती एवढ्या गतीने झाली की, त्यामुळे जागतिकीकरणानेही वेग घेतला, एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीपासून तर अशी परिस्थिती निर्माण झाली की, जागतिक खुल्या बाजारपेठेत कोणताही देश कोणत्याही वस्तूचे उत्पादन व विक्री कोठेही करू शकतो. या अशा बदलेल्या परिस्थितीमुळेच जागतिकीकरणाचा मानवी जीवनावर काय परिणाम झाला आणि त्याचे फायदे व तोटे काय याची आपण येथे चर्चा करणार आहोत. एकविसाव्या शतकात जागतिक अर्थव्यवस्थेत झपाट्याने वाढलेल्या जागतिकीकरणाचे सर्वच देशातील मानवी जीवनावर आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक परिणाम झालेले दिसून येतात.

## ❑ जागतिकीकरणाचे चांगले परिणाम/गुण (Merits & Globalization)

### १. आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ :-

जागतिकीकरणामुळे विविध देशातील ग्राहकांची संख्या वाढते, त्यांच्या वैविध्यपूर्ण गरजा पूर्ण होतात, वेगवेगळ्या कंपन्यांना कोणत्याही देशातून कच्चा माल घेता येतो, कोणतेही नवीन तंत्र व कौशल्य वापरून उत्पादन करता येते, गुणवत्तापूर्ण उत्पादन देवून आपले विशिष्ट स्थान निर्माण करता येते, त्यामुळे जागतिक व्यापारामध्ये वाढ होते.

### २. जागतिकीकरणामुळे बाजार विस्तार व्यापर होतो :-

जागतिकीकरणामुळे कंपनीला उत्पादनाच्या मागणीसाठी कोणत्याही एका देशावर अवलंबून रहावे लागत नाही, त्या सतत नवनवीन देश शोधत राहतात. त्यातूनच बाजाराचे क्षेत्र/विस्तार व्यापक होताना दिसतो व त्याचा मानवी जीवनावर सकारात्मक परिणाम होतो.

### ३. औद्योगिक क्षेत्रातील प्रगती :-

जागतिकीकरणामुळे औद्योगिक क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान परस्परांच्या देशात वापरता येते, गरज पडल्यास जागतिक स्तरावर भांडवल उभारणी करणे शक्य होते, त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात प्रगती घडून येण्यास मदत होते.

### ४. नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात :-

जागतिकीकरणामुळे विकसनशील देशात फार मोठे बदल घडून येऊ शकतात. नवे उद्योगधंदे, नवे व्यवसाय इ.मुळे बेरोजगारांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतात. हा एक जागतिकीकरणाचा महत्वाचा परिणाम म्हणावा लागेल.

### ५. लोकांचे राहणीमान उंचावते :-

जागतिकीकरणामुळे रोजगाराच्या संधी वाढतात, लोकांना काम मिळते, पैसा मिळतो त्यामुळे चांगल्या दर्जाच्या वस्तू परवडणाऱ्या किंमतीत मिळतात. परिणामी सामान्य नागरिकांचे राहणीमान उंचावते. आधुनिक सोयी-सवलती आणि माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे वाढलेली बौद्धिक गुणवत्ता यामुळे भौतिक व बौद्धिक दर्जा सुधारण्यास मदत होते.

### ६. नव्या तंत्रज्ञानाचे आदान-प्रदान :-

जागतिकीकरणामुळे प्रगत देशांकडील वेगवेगळ्या क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान अप्रगत/विकसनशील देशांमध्ये वापरणे सहज शक्य झाले आहे. त्यातून त्या देशांना आपली प्रगती करून घेणे सोईचे झाले आहे.

### ७. भांडवलाचे चलनवलन :-

जागतिकीकरणामुळे कोणत्याही देशाला आता केवळ देशांतर्गत भांडवलावरच अवलंबून राहता येत नाही. जगातील अतिरिक्त बचतीच्या भांडवलाचा पुरवठा गरजू देशांना आता सहजपणे उपलब्ध होवू शकतो. त्यामुळे गरीब/विकसनशील देशांची अर्थव्यवस्था सुधारण्यास मदत होवू लागली आहे.

### ८. सांस्कृतिक परिवर्तन :-

जागतिकीकरण तसेच माहीती तंत्रज्ञानातील प्रगती यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यातील लोक, त्यांचे राहणीमान, आचार-विचार, संस्कृती इत्यादीची देवाण-घेवाण होते. त्यामुळे सांस्कृतिक परिवर्तन होते, नवनवीन गोष्टी पहायला, शिकायला मिळतात, त्या एकमेकांकडून स्वीकारल्या जातात.

## ❑ जागतिकीकरणाचे वाईट परिणाम

वरील काही चांगल्या परिणामांबरोबरच जागतिकीकरणाचे काही वाईट परिणामही मानवी जीवनावर होताना दिसून येतात. ते खालीलप्रमाणे :-

### १. चलनवाढ व अर्थव्यवस्थेवरील परिणाम :-

जागतिकीकरणामुळे परकीय भांडवल मिळवणे सोपे झाले. पण त्याला तोंड देण्यासाठी चलनवाढ करण्याशिवाय पर्याय नसतो. अशावेळी देशातील मालाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत निर्यात मालासाठी घ्यावी लागते. त्यामुळे निर्यात कमी होते, आयातीसाठी स्थानिक चलनात जास्त किंमत घ्यावी लागते. हा व्यवहार चलनवाढ केल्यानेच पूर्ण होतो, त्यामुळे स्थानिक जमाखर्चावर देणी भागविण्याचा मोठा ताण येतो.

### २. लोककल्याणकारी योजनांच्या खर्चात कपात :-

लोककल्याणासाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांना सबसिडी, पूरक अनुदाने दिलेली असतात. पण

जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी त्याला मान्यता देते नाही. त्यामुळे जागतिकीकरणामध्ये या दोन संस्थांच्या नियमांमुळे लोककल्याणकारी योजनांच्या खर्चात कपात करावी लागते. त्यामुळे याचा फटका आर्थिक दुर्बल घटकांना बसतो व त्यांची प्रगती खुंटते.

### ३. सार्वजनिक-सरकारी उद्योगांचे खाजगीकरण :-

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत प्रत्येक उदयोग नफा-तोट्याचा विचार करूनच उभा केला जातो. त्यामुळे त्यांच्या स्पर्धेत सरकारला आपले उद्योग चालवणे कठीण होते. म्हणून सरकारी उद्योगांच्या खाजगीकरणाची मागणी येते व त्यानुसार त्यांचे खाजगीकरण केले जाते. अशा उद्योगात नफेखोरी वाढल्यास त्याचा परिणाम ग्राहकांवर होवून ते यामध्ये भरडले जातात.

### ४. बेरोजगारी वाढण्याची शक्यता :-

जागतिकीकरणात खाजगीकरण व उदारीकरण यांना प्राधान्य दिल्याने असे उद्योग कमी भांडवल, कमी मनुष्यबळ व जास्त फायदा या तत्त्वावर चालू असतात. त्यामुळे नोकरीच्या संधी कमी होतात. शिवाय सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण होताना मोठ्या प्रमाणात कामगार कपात केली जाते. याचा फटका कामगार वर्ग व त्याच्या कुटुंबाला बसतो.

### ५. स्थानिक उद्योगांचा बळी :-

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जगातील सर्व देशात बहुराष्ट्रीय कंपन्यांचा विस्तार दिसतो. त्यामुळे स्थानिक उद्योगांचा बळी घेतला जातो. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे भांडवल, तंत्रज्ञान, कौशल्य, जाहीरातबाजी इ. पुढे या स्थानिक उद्योगांच्या कला-कौशल्याची कदर केली जात नाही. त्यामुळे कालांतराने त्या नामशेष होवू लागतात.

### ६. गरीब-श्रीमंत यांच्यातील वाढती दरी :-

जागतिकीकरणाच्या खुल्या अर्थव्यवस्थेत सर्वच क्षेत्रात जीवघेणी स्पर्धा असते. कुशाग्र बुद्धिमत्ता, कौशल्य संपादित व्यक्तींना कामाचा मोठा मोबदला तर असंरक्षण, अकुशल व केवळ शारीरिक कष्टाची कमी करणाऱ्यांना कमी वेतन अशा वेतनातील फरकामुळे श्रीमंत हा अधिक श्रीमंत होतो तर गरीब आणखी गरीब होवून या दोघांतील ही दरी वाढतच जाते व आर्थिक समानता कुठेच दिसून येत नाही.

अशाप्रकारे जागतिकीकरणाचे बरे-वाईट परिणाम आपणांस मानवी जीवनावर झालेले दिसून येतात. त्यातून सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक तसेच पर्यावरणीय असे कोणतेच क्षेत्र सुटलेले नाही. पण आज एकविसाव्या शतकात, या इंटरनेट व माहिती तंत्रज्ञानाच्या मायाजाळात या खुल्या जागतिक अर्थव्यवस्थेला स्वीकारणे व त्याला हिंमतीने तोंड देणे याशिवाय कोणत्याही देशाकडे पर्याय नाही.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-३

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. डॉ. दिपक नायर यांच्या व्याख्येनुसार 'राष्ट्रराज्यांच्या भौगोलिक सीमापलीकडे जाऊन आर्थिक व्यवहारांचा झालेला विस्तार म्हणजे ............ होय.'

*(अ) उदारीकरण (ब) जागतिकीकरण (क) खाजगीकरण (ड) समाजकारण.*

२. इ.स. ............ पासून भारताने आपल्या अर्थव्यवस्थेत जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले.

*(अ) जून १९९१ (ब) जून १९९२ (क) जुलै १९९० (ड) जुलै १९९१.*

३. जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा विस्तार देशाच्या ............ धोका निर्माण करतात.

*(अ) समाजकारणास (ब) राजकारणास (क) अर्थव्यवस्थेस (ड) व्यापारवृद्धीस.*

४. ............... या काळात सॉफ्टवेअर उद्योग तेजीत असल्याचे दिसून येते.

*(अ) १९९८-२००१ (ब) १९९०-१९९४ (क) १९९८-२००० (ड) १९९९-२००२.*

५. जागतिकीकरणाचा पुरस्कार करून राजकीय नियंत्रण प्रस्थापित करण्याच्या दिशेने दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेने ............ ही योजना अंमलात आणली.

*(अ) नाटो (ब) वॉर्सा पॅक्ट (क) ट्रुमन सिद्धांत (ड) मार्शल प्लॅन.*

## ४.३ सारांश

'शीतयुद्धाचा शेवट' या प्रकरणात आपण १९३९-१९४५ या काळात झालेल्या दुसऱ्या महायुद्धाच्याअंतानंतर जागतिक राजकारणात घडून आलेल्या महत्त्वाच्या घडामोडींचा अभ्यास केला. यामध्ये शीतयुध्दाचा प्रारंभ, त्याचे स्वरूप, त्याचे विविध टप्पे, त्याचा जागतिक राजकारणावरील परिणाम इत्यादीचा अभ्यास केला. तसेच रशियातील साम्यवादाचा उदय आणि अस्त, पूर्ण युरोपातील साम्यवादाचा प्रसार व स्वरूप, तेथील साम्यवादी राष्ट्रांच्या गटाचे विघटन, त्याचा जागतिक राजकारणावरील परिणाम इत्यादीची विस्तृतपणे चर्चा केली. याशिवाय जागतिक राजकारणात द्विध्रुवीय राकजीय पद्धतीचा उदय, त्यातून एकध्रुवीय पद्धतीकडे वाटचाल व एकध्रुवीय/एकाधिकारशाहीचा जागतिक राजकारणात उदय, त्याची कराणे, अमेरिका-एकमेव महासत्ता म्हणून उदयास येण्याची कारणे, जागतिकीकरण ही संकल्पना व त्याचे मानवी जीवनावरील परिणाम इ. मुद्द्यांची सांगोपांग चर्चा केली.

अशाप्रकारे या सर्व मुददयांच्या सविस्तरपणे अभ्यास करून आपणास दुसऱ्या महायुद्धानंतर बदलले जग समजून घेण्यास मदत होईल. तसेच १९५०-२००० या काळात शीतयुद्धाचे स्वरूप तीव्रतेकडून बोथट कसे होत गेले आणि त्यातून त्याचा शेवट कसा झाला हे समजून घेता येईल. तसेच शीतयुद्ध समाप्तीनंतर

जागतिकीकरणाची संकल्पना कशी पुढे आली आणि त्यातून सारे जग कसे जवळ आले व त्याचे मानवी जीवनावर, प्रगतीवर काय परिणाम झाले या गोष्टी समजून घेता आल्या.

## ४.४ शब्द, शब्दार्थ

१. **ट्रुमन सिद्धांत/तत्व** : अमेरिकेचे अध्यक्ष हॅरी ट्रुमन यांनी १९४७ मध्ये आर्थिक व लष्करीदृष्ट्या प्रबळ राष्ट्रांच्या दुर्बलतेचा फायदा घेवून साम्यवादी राष्ट्रे तेथे साम्यवाद पसरवत होते, त्यासाठी अशा दुर्बल राष्ट्रांना या तत्वाद्वारे मदत जाहीर केली. आपल्या मित्र राष्ट्रांना सर्वतोपरी मदत करणे आणि साम्यवादाचा प्रसार रोखणे हा यामागील हेतू होता.

२. **उत्तर अटलांटिक करार संघटना-नाटो (North Atlautic Tready Organization-NATO)** : पश्चिम युरोप व उत्तर अमेरिकेतील एकूण १२ देशांनी एकत्र येवून एप्रिल १९४९ मध्ये सामूहीक सुरक्षेच्या तत्वावर आधारीत ही संघटना निर्माण केली. यामध्ये पश्चिम युरोपीय देशांना अमेरिकेकडून सुरक्षेची हमी देण्यात आली होती. यामध्ये मुख्यत्वे अमेरिका, ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, कॅनडा, पोर्तुगाल, नॉर्वे, डेन्मार्क, इटली, नेदरलँडस्, आइसलँड, लक्झेंबर्ग व बेल्जियम अशी १२ राष्ट्रे होती.

३. **देतांत/शिथीलीकरणाचे तत्व (Detente)** : देतांत म्हणजे शीतयुद्धकाळात अमेरिका व रशिया यांच्यामधील तणावपूर्ण परिस्थितीमध्ये आलेले शिथिलीकरण होय. याच काळामध्ये या दोन्ही देशात परस्पर सहकार्याने अण्वस्त्र नियंत्रणासाठी चर्चा होत होत्या. साधारणत: ६० च्या दशकाचा उत्तरार्ध ते ७० च्या दशकाचा शेवट हा देतांतचा काळ मानला जातो.

४. **ग्लासनोस्त (Glasnost) खुलेपणा** : १९८५ मध्ये मिखाईल गोर्बाचेव्ह रशियाच्या सत्तेवर येताच त्यांनी अंतर्गत व परराष्ट्र धारेणात आमूलाग्र बदल केले. त्यांनी अंतर्गत विरोध व टीका याबाबत सहिष्णूतेचे धोरण स्वीकारले. तसेच राजकीय व्यवस्थेत आणखी खुलेपणा आणण्याचे धोरण स्वीकारले, त्यास 'ग्लासनोस्त' असे म्हणतात.

५. **पेरेस्त्रोइक/पुनर्रचना (Perestroika)** : गोर्बाचेव्ह यांना खूलेपणाच्या जोडीलाच रशियाच्या आर्थिक व राजकीय व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्यासाठी पुनर्रचना करण्याचे धोरण स्वीकारले, त्याच 'पैरेस्त्रोइका' असे म्हणतात.

६. **'ब्रेझनेव्ह प्रणाली'** : १९६८ मध्ये सोव्हिएत युनियनचे प्रधानमंत्री लिओगिर ब्रेझनेव्हयांनी पूर्व युरोपच्या प्रती जाहीर केलेले परराष्ट्र धोरण म्हणजे 'बेझनिव्ह प्रणाली' होय. त्यानुसार वॉर्सा करार संघटनेच्या सदस्यांना त्यांच्या राजकीय विकासात केवळ मर्यादित सार्वभौमत्व देण्यात आले होते. तर सोव्हिएत राष्ट्रप्रमुखांनी या राष्ट्रांच्या राजकीय घडामोडीत हस्तक्षेप करण्याचा अधिकार स्वत:कडे राखून ठेवला होता.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे**

**अ)** १. *(अ) अमेरिका व रशिया.*

२. *(क) १८२७.*

३. *(ब) युगोस्लाव्हिया.*

४. *(ड) रूमानिया.*

५. *(अ) १९८९.*

६. *(क) पोलंड.*

७. *(ब) ९ नोव्हेंबर १९८९.*

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे**

**अ)** १. *(क) अमेरिका, रशिया.*

२. *(अ) अमेरिका.*

३. *(ड) १९४९.*

४. *(क) रशिया.*

५. *(अ) अमेरिका.*

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे**

**अ)** १. *(ब) जागतिकीकरण.*

२. *(क) जुलै १९९०.*

३. *(क) अर्थव्यवस्थेस.*

४. *(अ) १९९८-२००१.*

५. *(ड) मार्शल प्लॅन.*

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात सुरू झालेल्या शीतयुद्धाच्या विविध टप्प्यांची चर्चा करा.

२. 'समाजवाद' ही संकल्पना स्पष्ट करून रशियातील त्याचा उदय आणि अस्त स्पष्ट करा.

३. पूर्व युरोपमधील साम्यवादी संघाच्या विघटनाच्या कारणांची विस्तृत माहिती द्या.

४. दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीवर झालेल्या परिणामांची चर्चा करा.

५. जर्मनीच्या एकीरकणाबद्दल सविस्तर विश्लेषण करा.

६. जागतिक राजकारणात द्विध्रुवीय जागतिक पद्धतीतून एकध्रुवीय जागतिक पद्धतीचा उदय कसा झाला याची सांगोपांग चर्चा करा.

७. जागतिक राजकारणात सत्तेचे द्विध्रुवीकरण पूर्ण झाल्यानंतर 'एकमेव महासत्ता' म्हणून अमेरिकेचा कसा झाला हे स्पष्ट करा.

८. जागतिकीकरण ही संकल्पना स्पष्ट करून त्याचे स्वरूप सांगा.

९. जागतिकीकरणाचे मानवी जीवनावरील परिणाम विशद करा.

**ब) टिपा लिहा.**

१. शीतयुद्ध आणि जागतिक राजकारणातील बदल.

२. गोर्बाचेव्ह यांचे 'पुनर्रचना व खुलेपणाचे' धोरण.

३. मार्शल योजना.

४. जागतिक राजकारणाच्या द्विध्रुवीकरणाचे परिणाम.

५. अमेरिकेचा एकमेव महासत्ता म्हणून उदय.

६. जागतिकीकरणाचे परिणाम.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. Mahajan V. D. (1959) : "History of Modern Europe Since 1789", New Delhi, B. Chand and Company Pvt. Ltd.

२. Rao B. V. (1991) : "World History", New Delhi, Sterling Publishers Pvt. Ltd.

३. Ketelbey C.D.M. (1978) : "A Short History of Modern Europe", New Delhi, B. Surjeet Publications.

४. Rao B. V. (1993) : "History of Modern Europe Since 1789-1992", New Delhi, Sterling Publishers Private Limited.

५. कॉ. स्टॅलिन (संपादक), शं. पा. देशपांडे (अनुवादक) (मे, १९४३), 'सोविएत युनियन कम्युनिस्ट (बोल्शेविक) पार्टीचा इतिहास', मुंबई, लाल निशाण पक्ष प्रकाशन, (रशियन प्रथम आवृत्ती, सप्टेंबर १९३८)

६. डॉ. पेंडसे अरूणा, सहस्त्रबुद्धे उत्तरा (२०११) : 'आंतरराष्ट्रीय संबंध, शीतयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण', हैद्राबाद, ओरिएन्ट ब्लॅक खान प्रा. लि.

७. डॉ. आचार्य धनंजय (२००७) : 'विसाव्या शतकातील जग (इ.स. १९००-२००५)', श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

८. डॉ. तांबोळी एन. एस. (मे, २००९) : 'आधुनिक जग (इ.स. १४५३-२००८)', निराली प्रकाशन, पुणे.

९. तळवलकर गोविंद (१ जानेवारी २००१) : 'सोव्हिएत साम्राज्याचा उदय आणि अस्त', मौज प्रकाशन, मुंबई.

१०. कदम य. ना. (१९९७) : 'द्वितीय महायुद्धानंतरचे जग (१९४७ ते १९९७)', श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

११. कदम य. ना. (२००१) : 'समकालीन आधुनिक जग (१९४५-२०००)'. फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१२. कदम य. ना. (डिसेंबर २००३) : 'विसाव्या शतकातील जग', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

❋ ❋ ❋